मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 JUN 1989
5 JUL 1989
9 JUL 1989
19 JUL 1989
9 AUG 1989
DEC 1989
DEC 1989
27 DEC 1989

17 JAN 1990
7 FEB 1990
26 1992

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

संदर्भ निबंध
3320
२५८००
३७५१७८

# जाती आणि जमाती

रामनाथ नामदेव चव्हाण

REFBK-0025900

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

© सौ. शीला रामनाथ चव्हाण

प्रथमावृत्ती : एप्रिल, '८९

प्रकाशक :
अनिलकुमार मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र घळसासी,
संजीव मुद्रणालय,
४६९, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :
चंद्रमोहन कुलकर्णी

मूल्य ६० रुपये

ISBN 81-7161-024-2

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
8326

ज्यांच्या अपार कष्टांतून, अखंड निष्ठेतून
आणि असीम त्यागातून
महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर हे प्रज्ञासूर्य
दलित उपेक्षितांना लाभले;
आणि त्यांच्या प्रकाशात
या देशातील मानवमुक्तीच्या लढ्याला
खरी सुरुवात झाली,
त्या
वंदनीय
सावित्रीबाई फुले
आणि
रमाई आंबेडकर
यांना
कृतज्ञतापूर्वक
अर्पण.

— रामनाथ चव्हाण

# प्रस्तावना

महाराष्ट्रामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये समाजाच्या सर्व थरांतून जागृतीचा नवा स्फोट होत आहे. सुरुवातीला ही जागृती अस्पृश्य समाजापुरतीच मर्यादित होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उत्तुंग नेतृत्वामुळे या समाजात शेकडो वर्षांनंतर प्रथमच आपल्या अस्मितेची जाणीव झाली आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे या समाजात नवी लढाऊ प्रवृत्ती निर्माण झाली. अस्पृश्य समाजात जरी सुरुवातीला ही जागृती आली, तरी आता ही जागृती मुख्यत: नव्या सामाजिक क्रांतीचा प्रारंभ होता. तरीदेखील हा समाज गावगाड्याचा एक भाग होता. आता गेल्या काही वर्षांत या दलित समाजाच्या पलीकडे उपेक्षित आणि शोषित अशा समाजाचा फार मोठा महासागर पसरलेला आहे. त्यांच्यांतही आता सुदैवाने नवी जागृती होत आहे. यांत मुख्यत: भटक्या समाजांतील अनेक जाती–पोटजातींचा उल्लेख करावा लागेल. याशिवाय शतकानुशतक ज्यांच्या कपाळी गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेला होता, अशा विमुक्त समाजांत जागृती होत आहे. देवदासी, वेश्या या समाजांतूनही नव्या जागृतीची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. या सर्व जागृतीचे एक वैशिष्टय असे, की सुमारे दोन हजार वर्षांनंतर समाजाच्या अशा सर्व थरांत इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती होत आहे. भगवान बुद्धाने प्रथम या देशात सामाजिक क्रांतीचे निशाण उभारले. जाती-व्यवस्थेवर व स्त्री-पुरुष व्यवस्थेवर प्रहार केले. त्यानंतर चार-पाचशे वर्षे समाजाच्या त्या काळातल्या उपेक्षित अशा समाजांत नवी मानवी हक्कांची जाणीव निर्माण झाली. परंतु दुर्दैवानें पुढे लवकरच क्रांतीचे चक्र उलट फिरवले गेले आणि पुढे हा समाज शतकानुशतक उपेक्षित राहिला.

मध्ययुगामध्ये १३ व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंत म्हणजे ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत समाजात नवी लाट निर्माण झाली होती. या काळात शूद्र, अतिशूद्र आणि स्त्री या वर्गांतूनही संतांचा एक वर्ग निर्माण झाला होता. न्हावी, कुंभार, माळी, महार, चांभार, शिंपी आणि वेश्या अशा थरांतून पुढे आलेले संत केवळ या परिवर्तनाची प्रतीके होती. परंतु या सामाजिक परिवर्तनाला मोठ्या मर्यादा होत्या. हा सर्व बदल मुख्यत: भक्तीच्या क्षेत्रापुरता मर्यादित होता. देवाच्या दरबारात सर्व समान आहेत, एवढीच त्यांची भूमिका होती. अर्थात हा बदलही त्या

काळाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा होता. परंतु यामुळे समाजातील अस्पृश्यता, जाती-व्यवस्था यांना या भक्तिमार्गाने स्पर्शही केला नाही. गावातील अस्पृश्यांच्या वस्त्या वेगळ्या, जाती–जमातींच्या वस्त्या यांच्यांत यत्किंचितही बदल झाला नाही. त्यामुळे मध्ययुगात झालेला हा बदल कितीही स्वागतार्ह असला, तरी त्याच्या मर्यादा मोठ्या प्रमाणावर होत्या. उलट, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात होणारा बदल हा कितीतरी मूलगामी स्वरूपाचा आणि आमच्या समाज-जीवनाची चेहरेपट्टी बदलून टाकणारा ठरणार आहे.

गेल्या दहा-पंधरा वर्षांत दलित समाजातील वेगवेगळ्या थरांतून प्रसिद्ध झालेली आत्मचरित्रे ही केवळ उद्याच्या व्यापक सामाजिक क्रांतीची नांदी आहे. सामाजिक क्रांतीचे ते केवळ अग्रदूत आहेत. समाजामध्ये घडून येत असलेल्या या सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात या पुस्तकाचे महत्त्व विशेष मोलाचे मानावे लागेल. या व्यापक सामाजिक क्रांतीचा एक भाग म्हणून या पुस्तकाचा गौरवाने उल्लेख करावा लागेल.

या पुस्तकामध्ये गावगाड्याचा भाग असलेल्या काही दलित वर्गातील जाती आणि या गावगाड्याच्या बाहेर शेकडो वर्षे असलेल्या भटक्या समाजांतील काही जाती, त्याप्रमाणे विमुक्त समाजांतील काही जाती, पोटजाती यांचा अंतर्भाव केलेला आहे.

वेशीच्या आत आणि बाहेरच्यापेक्षा इथल्या भटक्या विमुक्त जमातींचे जीवन निराळे आहे. जाती-व्यवस्थेत या जमाती अस्पृश्य मानलेल्या नाहीत किंवा त्यांच्याशी व्यवहार करताना अस्पृश्यता पाळली जात नाही. त्यामुळे त्यांचे दुखणे वेशीबाहेरच्या अस्पृश्य जातींपेक्षा वेगळे आहे. त्यांना अस्पृश्यतेपेक्षा उपरेपणाचे दुःख अधिक आहे. भटका समाज हा जाती-व्यवस्थेचा एक भाग आहे आणि नाही, असे त्याचे स्वरूप आहे. त्यामुळे प्रत्येक जाती-जमातीच्या दुःखाची तऱ्हाही वेगवेगळी आहे. त्यांच्या वेदनाही वेगवेगळ्या आहेत. त्यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आहेत. इथल्या समाजाला मात्र त्याची जाणीव नाही. त्यांच्या जगण्या-मरण्याची फारशी कल्पना नाही. त्यामुळे या जाती-जमातींच्या जनजीवनाचे दर्शन घडविण्याचा या ग्रंथात जो लेखकाने प्रयत्न केलेला आहे, तो स्वागतार्ह आणि कौतुकास्पद आहे.

या ग्रंथाचे मोल मराठी साहित्यामध्ये असाधारण आहे. विशेष उल्लेखनीय आहे. या शतकानुशतक उपेक्षित असलेल्या समाजांतील चालीरीती, लग्नविधी त्यांची कुटुंबसंस्था, जन्म, लग्न आणि मृत्यू यांवरील वेगवेगळे संस्कार यांविषयी माहिती बरीचशी नवीन आहे. मला तर प्रामाणिकपणे असे वाटते, की एके काळी गाजलेल्या

आणि आजही संदर्भ-ग्रंथासारख्या ज्या पुस्तकाचा उपयोग होतो, त्या 'गावगाडा' या पुस्तकाचे गावगाड्याच्या संदर्भात जे स्थान होते, ते स्थान भटक्या व इतर समाजाच्या संदर्भात या पुस्तकाचे आहे.

श्री. त्रिंबक नारायण आत्रे यांच्या 'गावगाडा' या पुस्तकापेक्षा या पुस्तकाचे एक वेगळेपण चटकन नजरेस पडते. श्री. आत्रे यांनी गावगाडा पुस्तकात भटक्या-विमुक्त समाजासंबंधी काही उल्लेख केलेले आहेत, परंतु या समाजाचा उल्लेख करताना त्यांच्या पोटातील या वर्गाबद्दलची तुच्छतेची भावना जाणवल्याशिवाय राहत नाही. त्यांची भूमिका केवळ सहानुभूतिशून्यच नाही, तर हा सर्व समाज हा लुटारू व जन्मजात गुन्हेगार आहे, अशा पद्धतीनेच त्यांचे काहीसे वर्णन केलेले आहे. उलट, श्री. चव्हाण यांनी या पुस्तकात रेखाटलेले चरित्र अत्यंत जिव्हाळ्याने व्यापक भूमिकेतून केलेले आहे.

वेगवेगळ्या थरांतील या समाजाचे अंतरंग जिव्हाळ्याने, आपुलकीने रेखाटण्याचा लेखकाने केलेला प्रयत्न हा अतिशय महत्त्वाचा आहे. श्री. आत्रे व श्री. चव्हाण यांच्या भूमिकांतील फरक हा मूलगामी प्रकारचा आहे. ग्रंथाचे लेखक चव्हाण हे उपेक्षित व शोषित समाजाच्या सुखदुःखांशी व आकांक्षा-जीवनाशी एकरूप झाल्याने त्याला वेगळाच व्यापकपणा आला आहे. त्यांच्या या विवेचनाला व्यापक अशा मानवी मूल्यांची भव्य बैठक मिळाल्याने त्यांचे हे वर्णन अंतःकरणाची पकड घेणारे ठरलेले आहे.

हे पुस्तक वाचताना एक खंत मात्र मनाला राहून राहून अस्वस्थ करते. स्वातंत्र्य मिळून आता जवळ जवळ ४२ वर्षे झाली. देशाच्या सात पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत, परंतु या समाजाचे जीवन पाहिले, म्हणजे या गोष्टींचा तेथे आपल्याला थांगपत्ताही लागणार नाही, इतके त्यांचे जीवन अजूनही उपेक्षित, वंचित राहिलेले आहे. लेखकाने त्यांच्या जीवनातील चालीरीतींचे दिलेले काही प्रसंग अतिशय बोलके आहेत. वेगवेगळ्या जमातींत अजूनही जातपंचायत अतिशय प्रभावी आहे. जात–पंचायतीचा निर्णय हा अजूनही तेथे अखेरचा मानला जातो. या जातपंचायतींनी दिलेल्या शिक्षादेखील अतिशय अमानुष, पाशवी आहेत. लेखकाने या संदर्भात दिलेली उदाहरणे कोणत्याही सुसंस्कृत माणसाला बेचैन केल्याशिवाय राहणार नाहीत.

या देशातील न्यायदान–प्रक्रिया त्यांच्या सीमेपर्यंत अजून पोहोचली नाही. कायदा आणि सुव्यवस्था यांचा तेथे थांगपत्ता लागत नाही. दारिद्र्य तर अमाप आहे. खरोखर ऑर्थर टोस्लर या लेखकाने वर्णन केल्याप्रमाणे या समाजात थराखाली थर इतके आहेत, की शेवटचा थर कधी हातालाच लागत नाही. या संदर्भात लक्ष्मण गायकवाड

या लेखकाने आपल्या ' उचल्या ' या आत्मचरित्रात केलेले भुकेचे वर्णन अंगावर रोमांच उभे करणारे आहे. मराठी साहित्यात गेल्या शंभर वर्षांत असे हृदय पिळवटून टाकणारे वर्णन प्रथमच वाचावयास मिळाले. या पुस्तकाचे लेखक चव्हाण यांनीदेखील या समाजाचे केलेले जनजीवनाचे, पर्यायाने दारिद्र्याचे वर्णन असे सर्वांना कमालीचे अस्वस्थ करणारे ठरेल, यात मला यत्किंचितही शंका वाटत नाही.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत दलित समाजातून लेखकांचा एक मोठा वर्ग निर्माण होत आहे. महाराष्ट्रातल्या सत्यशोधक चळवळीतून जो लेखकांचा नवा वर्ग निर्माण होऊ शकला नाही, तो लेखकांचा नवा वर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतून निर्माण झाला, ही केव्हाही अभिमानाची गोष्ट आहे. दलित समाजातून पुढे आलेल्या लेखकांमध्ये नवे मोठे सामर्थ्य आहे, यात शंकाच नाही. परंतु त्यांचे सर्व सामर्थ्य लक्षात घेऊनही एक गोष्ट जाणवते, की आजपर्यंतचे बरेचसे दलित साहित्य हे काव्य, नाटक, आत्मचरित्र, कथा अशा ललित साहित्यापुरते मोठ्या प्रमाणात मर्यादित राहिले. काही थोड्या लेखकांचा अपवाद वगळता दलित साहित्यात विचारप्रधान, चिंतनात्मक, संशोधनपर, गंभीर स्वरूपाचे साहित्य फारसे निर्माण झालेले नाही. वैचारिक सामर्थ्य हेच कोणत्याही आंदोलनाचे महत्त्वाचे सामर्थ्य असते. कोणतीही चळवळ विचारांच्या पायावर उभी असते, तेव्हा त्या चळवळीला वेगळेच बळ प्राप्त झालेले असते. या दृष्टींनी दलितांचे हे आंदोलन सामर्थ्यसंपन्न बनायचे असेल, तर दलित लेखकांकडून संशोधनपर, विचारप्रधान साहित्य लिहिणाऱ्या लेखकांचा वर्ग मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला पाहिजे. दलित साहित्यातील ही उणीव काहीअंशी माझे मित्र श्री. चव्हाण यांनी या पुस्तकाच्या रूपाने भरून काढली आहे. ही गोष्ट मला अतिशय मोलाची वाटते.

या पुस्तकामध्ये समाजाच्या तळागाळातील शेकडो वर्षे उपेक्षित राहिलेल्या समाजाची दुःखे अतिशय प्रभावी शब्दांत मांडलेली आहेत. अनेकांच्या नजरेला कदाचित ती प्रथमच इतक्या स्पष्ट स्वरूपात पुढे येत असतील, असे वाटते. समाजामध्ये शेकडो वर्षे वंचित, शोषित राहिलेल्या समाजाच्या प्रश्नांबद्दल समाजातील सुशिक्षित वर्गात नव्या जाणिवा निर्माण झाल्या, तरी या पुस्तकाचा उद्देश काही अंशी साध्य झाला, असे मी मानतो. किंबहुना या पुस्तकाचे हे यशही मी अतिशय महत्त्वाचे मानीन. कारण प्रश्नांच्या जाणिवा निर्माण होणे हा त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा खरा प्रारंभ असतो. या दृष्टीने या पुस्तकाने केलेले कार्य हे ऐतिहासिक स्वरूपाचे ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

समाजातल्या या भटक्या जमाती, शेकडो वर्षे गुन्हेगार म्हणून ज्यांच्या कपाळी शिक्का मारला, असा उपेक्षित समाज स्वातंत्र्याच्या ४२ वर्षांनंतर विकासाच्या सर्व कार्यक्रमांपासून बराचसा दूर राहिला याचे महत्त्वाचे कारण हा समाज अजूनही

असंघटित राहिला आहे. हा समाज संघटित झाल्याशिवाय आणि त्यांनी आपल्या प्रश्नांसाठी लढा केल्याशिवाय त्यांच्या प्रश्नांकडे समाज सहजासहजी लक्ष देईल, असे मला वाटत नाही. समाजामध्ये गेल्या २५–३० वर्षांत एक चमत्कारिक दृश्य दिसत आहे. एका बाजूला पंचवार्षिक योजनांमुळे राष्ट्राची संपत्ती वाढत आहे, असे आपण पाहतो, तर दुसऱ्या बाजूला दारिद्र्यरेषेखाली लोकांची संख्या सतत वाढत आहे. असे पाहावयास मिळते. याचे माझ्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे समाजातल्या १०–१२ टक्के असलेल्या संघटित वर्गाने राष्ट्रीय संपत्तीचा आपल्या संघटनेच्या बळावर सगळ्यांत मोठा लचका तोडून घेतलेला आहे. पर्यायाने असंघटित वर्ग हा जास्तीत जास्त दारिद्र्यरेषेखाली चाललेला आहे. ज्यांचा पगार रु. २०००।– आहे, त्यांचा पगार रु. ४०००।– होण्यासाठी संघर्ष होतो आणि त्यांच्या बऱ्याचशा मागण्या त्यांच्या पदरातही पडतात. म्हणजे समाजात असे दृश्य निर्माण झाले आहे, की ज्याचे पोट भरून जेवण झाले आहे, त्याला आम्ही श्रीखंडाची वाटी देत आहोत, परंतु जो उपाशी आहे, त्याला भाकरी तरी मिळाली आहे, की नाही, याचा आम्ही विचार करीत नाही. ज्याचे घरात रेडिओ आहे, त्याच्या घरात रंगीत टी. व्ही. कसा जाईल, याचा विचार आम्ही करीत आहोत. परंतु ज्याच्या डोक्यावर छप्परही नाही, त्याला साधा झोपडीचा निवारा कसा मिळेल, याचा आम्ही विचार करीत नाही. हे चित्र जर काही काळ असेच राहिले, तर समाजातील ही परिस्थिती अधिकाधिक स्फोटक बनत जाईल.

समाजातील संघटित वर्ग आणि बहुतेक असंघटित वर्ग यांच्यांतील दरी झपाट्याने वाढत राहील. या असंघटित वर्गांत भटक्या जमाती, विमुक्त समाज, वेशीबाहेरचा मोठा अस्पृश्य समाज, आदिवासी समाज, देवदासी यांचा प्रामुख्याने अंतर्भाव करावा लागेल आणि या दृष्टीने या सर्व असंघटित व शेकडो वर्षे उपेक्षित राहिलेल्या समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांचा पोटतिडकीने विचार झाला पाहिजे. केवळ चर्चेच्या पातळीवर हे प्रश्न न राहता त्यांच्या प्रगतीसाठी तसाच भरीव कार्यक्रम आखला गेला पाहिजे. हे झाले नाही, तर त्यांच्यांतील असंतोषाचा केव्हाही स्फोट होऊ शकेल. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीनेही त्यांचे हे प्रश्न लवकरात लवकर सुटले पाहिजेत. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्या त्या समाजातूनच नेतृत्व मोठ्या प्रमाणावर पुढे आले पाहिजे व त्यांना यात उत्तेजन दिले पाहिजे. ज्याचे दुःख त्यालाच अधिक प्रभावी रीतीने मांडता येईल, 'घायल की गत घायल हि जाने' हे सत्य नाकारून चालणार नाही आणि त्या दृष्टीने अशा प्रकारचे त्या त्या समाजाचे नेतृत्व या निमित्ताने पुढे आले, तरी या पुस्तकाचा हेतू काही अंशी साध्य झाला, असेही मी मानीन.

शेवटी या पुस्तकाचे लेखक व माझे मित्र श्री. रामनाथ चव्हाण यांनी मराठी

भाषेतील एक संशोधनपर असा ग्रंथ लिहिल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पुस्तकातील विवेचन अनेकांना बरेचसे नवीन वाटेल. त्याप्रमाणे या सर्व प्रश्नांबद्दल लेखकास वाटणारा अस्सल जिव्हाळा हादेखील तितकाच अधिक महत्त्वाचा आहे. किंबहुना त्यामुळेच या पुस्तकाचा आपल्यावर खोलवर ठसा उमटतो.

महाराष्ट्रातील वाचक उद्याच्या सामाजिक परिवर्तनाचा एक अग्रदूत म्हणूनही या पुस्तकाचे अंत:करणपूर्वक स्वागत करतील, असा मला विश्वास वाटतो. लेखकास यासाठी मन:पूर्वक धन्यवाद !

**डॉ. मा. प. मंगुडकर**

# जाती-जमातीच्या निमित्ताने

अनेक जाती, भाषा व जगातील सर्व धर्म–पंथ असलेला, तरीही विविधतेतून एकता साधणारा जगाच्या पाठीवरील भारत हा एकमेव देश आहे.

या देशातील प्रत्येक जातीनिहाय माणसाच्या जीवनमरणाची संहिता भिन्न भिन्न प्रकारची आहे, प्रत्येकाची जात वेगळी. जगणे-मरणे वेगळे आहे. ज्यानें ज्या जातीत जन्मावे, त्याने त्याच जातीत मरावे, हे इथल्या धर्म–शास्त्रांचे बंधन, त्यामुळे धर्म, जाती, रूढी-परंपरेच्या मर्यादा ओलांडण्याचे धाडस सहसा इथे कोणी करीत नाही. शक्यतो धर्म–जातीच्या मर्यादेतच जगण्याचा प्रयत्न इथला प्रत्येक माणूस करीत असतो.

अशा या अनेक धर्म असलेल्या समाजव्यवस्थेत जन्मावरून माणसाची जातवार विभागणी तर झालीच आहे, याशिवाय त्या त्या जातीचा आणि माणसाचा सामाजिक दर्जा ठरविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक जाती–जमातीच्या वस्त्या वेगळ्या, पाणवठे वेगळे, स्मशाने वेगळी किंबहुना त्यांचे जनजीवनच वेगवेगळे झालेले आहे. याला पारंपरिक मंडळी आदर्श (?) समाजव्यवस्था म्हणतात !

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजव्यवस्थेला ' उतरंडीची विषम व्यवस्था ' किंवा ' बिनशिडीच्या मनोऱ्याची समाजव्यवस्था ' असे म्हणतात. ' ही व्यवस्था आजही या देशात टिकून आहे.

अशा या उतरंडीच्या किंवा बिनशिडीच्या समाजव्यवस्थेत जगणाऱ्या माणसांना त्यातल्या जाती–व्यवस्थेचे भान आहे. जाती–जमातीच्या जगण्या–मरण्याचे भान आहे, परंतु इतरांच्या जाती-जमातींत डोकावण्याची तसदी सहसा कोणी घेत नाही. त्यामुळे वरकरणी एक असलेली, परंतु जाती-जमातींमुळे विभागलेली अशी भारतीय माणसे आहेत. अशा विभागलेल्या काही माणसांचे किंबहुना त्यांच्या काही जाती-जमातींचे जनजीवन कशा तऱ्हेचे आहे, याची अल्पशी ओळख करून देण्याचा प्रयत्न या निमित्ताने मी केलेला आहे.

हा प्रयत्न काहीसा मर्यादित स्वरूपातला आहे. गावाच्या वेशीच्या आतल्या जातींचा विचार तूर्त या पुस्तकात केलेला नाही. केवळ वेशीच्या बाहेरच्या किंवा ज्यांना आजही अस्पृश्य, दलित, हरिजन किंवा मागासवर्गीय म्हणून ओळखले जाते,

३३२० ... ३०।७।८९

अशांपैकी मातंग, चर्मकार, ढोर आणि मेहतर या जातींचा प्रामुख्याने समावेश केलेला आहे. यांशिवाय ज्यांना वेशीच्या आतल्याही जगात स्थान मिळाले नाही, आणि वेशीच्या बाहेरही जे स्थिर होऊ शकले नाहीत, परंतु आतल्या आणि बाहेरच्या लोकांच्या आश्रयाने वर्षानुवर्षे आपली उपजीविका करीत राहिले, तरीही इथल्या जाती-व्यवस्थेचे जे अविभाज्य घटक आहेत, अशा भटक्या आणि विमुक्त या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काही जमातींचा समावेश या पुस्तकात केलेला आहे.

जाती-जमातींच्या जनजीवनाची ओळख करून देत असताना त्यांच्या जात-निर्मितीबाबत पारंपरिक लोककथा, त्यांची संस्कृती, रूढी-परंपरा, त्यांच्या देव-देवता, सणवार, उत्सव, विवाहाच्या प्रथा, त्यांची भाषा, व्यवसाय, कला आणि जातपंचायती यांसंबंधीची जातवार माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा तऱ्हेची माहिती मिळविण्यासाठी जाती-जमातींच्या वेगवेगळ्या थरांतील अनेक लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतलेल्या आहेत. या लोकांनी त्यांच्या जाती-जमातीं-विषयी जी माहिती दिली, तीच माहिती या पुस्तकात समाविष्ट केलेली आहे. त्यात काही उणिवा, अपुरेपणा असणे शक्य आहे. परंतु या निमित्ताने जी माहिती उपलब्ध झालेली आहे, ती प्रस्तुत पुस्तकामध्ये ज्या जाती-जमाती दिलेल्या आहेत, त्यांचा परिचय होण्याइतपत पुरेशी आहे, असे मला वाटते.

जाती-जमातींच्या जनजीवनाविषयी माहिती मिळविण्याच्या निमित्ताने अनेक लोकांशी प्रत्यक्ष संबंध आला. कधी मोकळेपणाने, कधी तोलूनमापून, तर कधी राखीव मनाने (Reserved mind) बोलणे झाले आणि त्यानिमित्ताने जाती-जमातींचे अंतरंग अधिक जवळून पाहता आले. अनुभवता आले.

वरवर पाहता आपला असा समज असतो, की समाज बदलतोय्, जातीय सलोखा वाढतोय्, अस्पृश्यता नाहीशी होतेय्, हळूहळू जाती-व्यवस्थाही नाहीशी होईल. परंतु आपला समज किंवा समाज-बदलाचे आपले निष्कर्ष किती वरवरचे आहेत, हे त्या त्या जाती-जमातीत मिसळल्याशिवाय कळणारे नाहीत. 'दुरून डोंगर साजरे' इतकेच याविषयी म्हणता येईल. कारण वरकरणी जाती-जमातींचा चेहरामोहरा आज बदलतोय्, असे वाटत असले, तरी जाती-जमातींच्या अंतरंगातील सनातनी—पारंपरिक पीळ आजही कायम आहेत. त्यांच्या मूळ प्रवृत्तीत फारसा बदल झालेला नाही.

एकीकडे जाती-जमातींच्या सामाजिक सुधारणेचे प्रयत्न केले जात आहेत. जाती-जमातींच्या कोषातून माणसं बाहेर काढण्याचे प्रयत्न चालू आहेत किंवा सामाजिक समता आणि माणसाची माणूस म्हणून असणारी प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी सामाजिक चळवळी आणि संघर्ष चालू आहेत, मात्र दुसरीकडे जाती-जमातींच्या भिंती अधिक पक्क्या कशा होतील, यासाठीच आपली सर्व शक्ती पणाला लावली जात आहे. पर्यायाने इथल्या माणसाला त्याच्या जाती-जमातींच्या कोषात अधिक

बंदिस्त कसा करता येईल, याचेच प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे जाती-जमातींतील माणसे कमीअधिक प्रमाणात सुधारत असली किंवा त्यांची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक अवस्था (गरजेपुरती) बदलत असली, तरी माणसांची मानसिक विचारांची दिशा बदललेली नाही. आज जो काही बदल आपल्याला दिसतो आहे, तो व्यक्तिगत पातळीवरील हितसंबंधांतील अथवा कामापुरता (Give and Take) तात्कालिक स्वरूपाचा आहे.

ज्यांच्या वाटचाला पिढ्यान् पिढ्या उपेक्षा आली आणि वेशीबाहेरचे हीन जगणे जगावे लागले, अशा मातंग, चर्मकार, ढोर आणि मेहतर या समाजात अलीकडे सामाजिक बदलाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यांना सामाजिक बदलाचे भान येऊ लागले आहे, किंबहुना आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली आहे; परंतु स्वतःच्या जातीचे पारंपरिक आचार–विचार नाकारण्याचे स्पष्ट धाडस त्यांच्याकडून होताना दिसत नाही. आजही धर्मबंधनांत विशिष्ट समाजाच्या दबावाखाली किंवा पारंपरिक रूढी-परंपरेत, आणि जात-व्यवसायात जातीच्या मर्यादेतच जगण्याचा किंवा तडजोड करून समाधान मानण्याचा प्रयत्न केला जात आहे. वरकरणी या समाजाची सुधारणा दिसत असली, तरी जाती-जमातींतील त्यांचे पीळ आणि ताणतणाव आजही कायम आहेत. इतर दलित मागासवर्गीयांची यापेक्षा वेगळी अवस्था नाही. प्रत्येकालाच आपल्या जातीचा अभिमान आहे. जात सोडायला कोणीही तयार नाही, परंतु आपली जातजमात कशी हलाखीत जगतेय्, हेही सांगायला कोणी विसरत नाही, असे माझे मत बनले आहे.

इथली जाती-व्यवस्था ही वाईट आहे, यावर सर्वांचेच एकमत आहे, परंतु वाईट असलेली जाती-व्यवस्था मोडण्याची भाषा करताना कोणी आढळले नाही, किंवा जाती-व्यवस्था मोडण्यासाठी कोणी परिणामकारक कार्यक्रमही सुचविला नाही.

भटक्या–विमुक्त जमातींचे जग यापेक्षा थोडे वेगळे आहे. उपजीविकेसाठी पिढ्यान् पिढ्या भटकंती चालू असल्याने स्थिर जीवनाच्या लाभापासून हा समाज अनेक वर्षे वंचित राहिलेला आहे. नाव सांगायला स्वतःचा गाव नाही, कसायला स्वतःची जमीन नाही, राहायला कायमची जागा नाही, अशी यांची अवस्था आहे. त्यामुळे आपली जमात आणि आपले कुटुंब हेच त्यांच्या जगण्या–मरण्याचे एक विश्व झालेले आहे. या विश्वात त्यांनी स्वतःची अशी वेगळी संस्कृती आणि रूढी-परंपरा निर्माण केलेली आहे आणि त्यातच ते रममाण झालेले आहेत. जमातीच्या मर्यादा सोडायला आजही ते तयार नाहीत. उलट, प्रत्येकालाच आपल्या जमातीचा अभिमान असल्याचे आढळले.

सतत पोटाच्यामागे धावणारा हा भटका समाज अनेक वर्षे शिक्षणापासून वंचित राहिल्याने अत्यंत दरिद्री, पराकोटीचा अज्ञानी, टोकाचा अंधश्रद्धाळू आणि सामाजिकदृष्टया मागासलेला आहे. आजही त्यांची अवस्था फारशी बदललेली नाही.

महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्तांच्या बेचाळीस जमाती असल्याचे मानले जाते. त्यांच्या पोटजातींची संख्या शेकडयात भरेल, इतकी आहे. या सर्व जमाती स्वतःला स्वतंत्र आणि इतरांपेक्षा वेगळया समजतात. त्यांच्या एकमेकांच्या जन-जीवनात टोकाची भिन्नता आहे. त्यांची भाषा, पेहराव, व्यवसाय आणि चालीरीती यांमुळे त्यांचे वेगळेपण चटकन लक्षात येते. त्याचे कारण असे आहे, की महाराष्ट्रात आज आपल्याला दिसणाऱ्या ज्या भटक्या विमुक्तांच्या जमाती आहेत, त्या सर्वच मूळ महाराष्ट्रातील नाहीत, तर त्यांच्यापैकी बहुतेक जमाती उपजीविकेच्या किंवा अन्य कारणाने महाराष्ट्रात आलेल्या आहेत. विशेषतः गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यांतून आलेल्या भटक्या जमातींचे प्रमाण अधिक आहे.

अशा या वेगवेगळया प्रदेशांतील भटक्या-विमुक्त जमातींची माहिती घेण्याच्या निमित्ताने त्यांच्या पालांवर, वस्त्यांवर आणि तांडयांवर सतत तीन वर्षे भटकावे लागले. प्रत्येक जमातीच्या लोकांना प्रत्यक्ष भेटणे आणि त्यांना बोलते करणे हे तसे कष्टाचे आणि अवघड असे काम होते. एकतर त्यांच्याशी बोलायचे, म्हणजे पहिली भाषेची अडचण; त्यात हे लोक सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकणारे, त्यामुळे विशिष्ट ठिकाणी भेटतीलच, याची शाश्वती नाही आणि चुकून भेटलेच, तर खरे बोलतीलच, हे सांगता येत नाही. त्यामुळे कित्येक वेळा माहिती-शिवाय त्यांच्या तांडयावरून परत यावे लागत असे. परंतु त्या वेळी जे भेटले, त्यांच्याशी बरेच बोलणे झाले, तेव्हा त्यांना आपल्या भूतकाळाविषयी प्रचंड अभिमान असल्याचे जाणवत होते. त्यांच्यापैकी काहीजण स्वतःला आणि स्वजमातीला रजपुतांचे वंशज समजतात, तर काही आपण क्षत्रिय वंशाचे असल्याचे सांगत. तर कोणी स्वतःला उच्चकुलीन सवर्ण असल्याचे सांगून पूर्वास्पृश्यांना स्पर्श करीत नसल्याचे किंवा त्यांच्या घरचे अन्न भीक म्हणून स्वीकारत नसल्याचे मोठ्या अभिमानाने सांगत असत. मात्र बहुतेक भटक्या जमातींतील लोक आपल्या वाटयाला आलेले भटके जीवन हे केवळ दैवी संकेताने मिळालेले आहे, असे सांगत. आणि इतर भटक्या जमातींपेक्षा आपली जमात कशी श्रेष्ठ आहे व वेगळी आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे त्यांच्यामध्येही अंतर्गत स्वजमातीचे विशिष्ट अहंकार पोसले जात आहेत. तीन दगडांच्या चुलीचे हे सारे भाऊबंद असले, तरी प्रत्येकाने आपापल्या चुली वेगवेगळयाच मांडलेल्या आहेत.

जातपंचायत हे भटक्या जमातींचे एक वेगळे वैशिष्टय म्हणून ओळखले जाते. परंपरेने चालत आलेली जमातीची न्यायसंस्था म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे जातपंचायतीचे अलिखित नियम, कायदे किंवा संकेत तंतोतत पाळण्यात प्रत्येक जमातीची व्यक्ती धन्यता मानते. पंचायतीला विरोध करण्याचे धाडस कोणी करीत नाही. उलट, पंचायतीने दिलेली शिक्षा ही नशिबातच लिखित होती,

असे मानले जाते. अनैतिक संबंध ठेवणाऱ्या स्त्रीचे नाक किंवा स्तन कापणे, गुन्हा सिद्ध करण्यासाठी उकळत्या तेलातून पैसा काढणे किंवा अनेक पुरुषांनी लघवी केलेले मातीचे कच्चे मडके डोक्यावर घेऊन स्त्रीने पंचांत फेऱ्या मारणे, झाडाला उलटे टांगून जमातीने जोडे मारणे, एखाद्या गुन्ह्याच्या स्वरूपावरून पै–पैशाचा दंड करणे किंवा जमातीतून बहिष्कृत करणे अशा प्रकारच्या अनेक शिक्षा वेगवेगळ्या जमातींत (गुन्हेगारास) दिल्या जातात. आणि त्या निमूटपणे स्वीकारल्याही जातात. केवळ नशिबाचा भाग, म्हणून. त्यामुळे जमातीतील अंतर्गत भांडणतंटा घेऊन हे लोक कोर्टकचेऱ्यांत जात नाहीत, असे आढळते. आजही काही जमातींतील लोकांचा त्यांच्या जातपंचायतीच्या न्यायदानावर विश्वास असल्याचे पाहावयास मिळते.

स्त्रीचे पावित्र्य आणि योनिशुचिता हे तर भारतीय समाजाचे नैतिक मूल्य समजले जाते. स्त्रीचे पावित्र्य हे पुरुषाच्या पुरुषत्वाचे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. त्यामुळे स्वतःची स्त्री आणि स्वतःचा धर्म, ह्या इथल्या जातीच्या जगण्याच्या मर्यादा ठरलेल्या आहेत. भटक्या जमातीसुद्धा या मर्यादेतून सुटलेल्या नाहीत. उलट, प्रस्थापितांच्यापेक्षाही स्त्रीच्या चारित्र्यशुद्धतेची परीक्षा घेण्याचे कितीतरी कठीण आणि विचित्र प्रकार या समाजांत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून भटक्या-विमुक्तांच्या अवस्थेत बदल होताना दिसतो आहे. याचे श्रेय त्यांच्यांतील कार्यकर्त्यांना दिले पाहिजे. विशेषतः या समाजाला प्रथम स्थिर करण्याचे प्रयत्न अलीकडे सुरू झाले आहेत. त्यांना किमान स्थिर केले, तरी त्यांच्या अनेक प्रश्नांची पकड सैल होणार आहे. या समाजांतील तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात जागृत होतोय्. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय–अत्याचारांबद्दल उघड बोलतोय्, लिहितोय्. खरे तर या समाजातील ही जागृतीची आणि परिवर्तनाची नांदी आहे. प्रस्थापित समाजाने आणि शासनाने त्यांच्या प्रश्नाकडे दयाबुद्धीने अथवा उपकाराच्या भूमिकेतून न पाहता न्यायाच्या आणि कर्तव्याच्या भावनेतून पाहावे.

मला या ठिकाणी नम्रपणे नमूद करावयाचे आहे, की मी सामाजिक चळवळीतला एक कार्यकर्ता म्हणून प्रत्यक्ष पाहणीतून आणि मुलाखतींद्वारा, जाती–जमातींची जी माहिती मिळाली आणि परिस्थिती जाणवली, तीच या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

विशेषतः जाती-जमातींचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना प्राथमिक माहितीसाठी या पुस्तकाचा उपयोग व्हावा, हाच हे पुस्तक लिहिण्यामागील माझा हेतू आहे. पुस्तकाबाबत काही सूचना, उणिवा आढळल्यास वाचकांनी कृपया कळवावे.

या पुस्तकाच्या निमित्ताने अनेकांचे सहकार्य मिळालेले आहे. विशेषतः पुस्तकात

समाविष्ट केलेले जाती-जमातींचे सर्व लेख, पुण्याच्या दैनिक 'तरुण भारत'मधून सप्टें. ८५ ते सप्टें. ८६ अखेर 'ओळख जाती-जमातींची' या सदरात प्रसिद्ध झालेले आहेत. अशा प्रकारचे सदर लिहावे, ही कल्पना त्या वेळचे 'तरुण भारत'चे संपादक मा. चित्तरंजन पंडित यांनी माझ्यासमोर मांडली होती. एक कार्यकर्ता या नात्याने मी लिहीत गेलो. अनेक वाचकांना ते आवडले. त्यासंबंधी काहींनी प्रतिक्रिया कळविल्या आणि हे लेख पुस्तकरूपाने एकत्रित प्रसिद्ध व्हावेत, अशी अनेक चाहत्यांनी इच्छा व्यक्त केली. त्यातूनच हा पुस्तक प्रपंच आपल्या हाती देता आला. श्री. चित्तरंजन पंडित, संपादक मनोहर कुलकर्णी आणि कार्यकारी संपादक बाळ भिडे यांनी या कामी खूप चांगल्या प्रकारे सहकार्य दिले. मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

या ठिकाणी ज्यांचा आवर्जून उल्लेख करावा, ते पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते व माझे मित्र श्री. सुरेश ओहाळ, अजय चांदणे आणि ज्ञानेश्वर भोसले यांनी जाती-जमातींची माहिती मिळविण्यासाठी माझ्याबरोबर सतत भटकंती तर केलीच, परंतु अनेकांना मुलाखतीसाठी प्रवृत्त केलेले आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच मी अधिक पसंत करतो.

विशेषत: काही भटक्या-विमुक्त जमातींची माहिती मिळविण्यासाठी त्या समाजातील प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. शिवलाल जाधव, सिदु शिंदे, विलास वाडेकर आणि लक्ष्मण लोखंडे या मित्रांनी दिलेले सहकार्य मला विसरता येणार नाही.

जाती-जमातींचे माझे लेख 'तरुण भारत'मधून प्रसिद्ध होत असताना आदरणीय डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. भालचन्द्र फडके, मा. विश्वासराव दैठणकर, प्रा. विलास वाघ, मा. माऊली दाभाडे, मा. सा. रा. भंडारी, मा. भीमराव शिरवाळे, प्रा. लहू कानडे यांनी वेळोवेळी माझ्या या लहानशा प्रयत्नाला प्रोत्साहन दिले. त्यांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्रातील थोर विचारवंत व लेखक आदरणीय डॉ. मा. प. मंगुडकर यांनी प्रस्तुत विषयाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली. मी त्यांचा ऋणी आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता यांनी हे पुस्तक प्रकाशित करून चांगल्या प्रकारे सहकार्य दिले. त्यांचा मी आभारी आहे.

माझी पत्नी शीला हिच्या साथीमुळेच हा लेखन-प्रपंच आकाराला येऊ शकला, हे प्रांजळपणे मला नमूद केले पाहिजे.

मार्च १९८९, रामनाथ नामदेव चव्हाण

नवी वसाहत
कात्रज, पुणे ४११०४६

# अनुक्रम

□


| | |
|---|---|
| चर्मकार | १ |
| मेहतर | ९ |
| ढोर | १५ |
| बुरूड | २२ |
| पद्मशाली | २९ |
| कोल्हाटी | ३४ |
| कुडमुडे जोशी | ४३ |
| काशी कापडी | ५० |
| घिसाडी | ५६ |
| परदेशी भोई | ६४ |
| वेडू वाघरी | ७० |
| गोपाळ | ७८ |
| वैदू | ८४ |
| घ्यारे | ९० |
| बेलदार | ९५ |
| सिक्कलगार | १०१ |
| टकारी | १०७ |
| रामोशी | ११३ |
| मांगगारूडी | ११९ |
| रजपूत भामटा | १२६ |
| कंजारभाट | १३२ |
| पारधी | १३८ |
| छप्परबंद | १४५ |
| राजगोंड | १५१ |
| मातंग | १५९ |

# चर्मकार समाज

स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेमध्ये, गावगाड्याशी प्रत्यक्ष संबंधित असलेल्या बारा 'बलुतेदार' जाती आणि गावगाड्याशी अप्रत्यक्ष संबंधांत असलेल्या अठरा 'आलूतेदार' जाती; यांना अनुक्रमे 'कारू' आणि 'नारू' असे म्हणण्याचा प्रघात होता.

चर्मकार हा समाज बारा बलुतेदारांपैकी एक समाज आहे. गावगाड्यातील इतर बलुतेदारांप्रमाणे याही समाजाला एक स्वतंत्र पारंपरिक धंदा आहे. विशेषत: शेतकऱ्यांच्या शेतीव्यवसायाला उपयुक्त असणारी चामड्याची अवजारे, तसेच चप्पल, जोडे, बूट, बैलाच्या गळ्यातील पट्टे आणि 'मोट' तयार करून देण्याची कामे त्याकाळी चर्मकारांची असत. या मोबदल्यात शेतकऱ्यांकडून वर्षाकाठी खळ्यावर सुगीच्या हंगामात त्यांना धान्य दिले जाई. त्याला ते 'बेगमी' म्हणत असत. याशिवाय काही दुरुस्तीची किरकोळ कामे केली, तर त्या मोबदल्यात उरलेलं अन्न दिलं जाई. प्रत्येक सणासुदीला 'सण' मिळत असे. या मिळकतीवरच ते स्वत:ची उपजीविका करीत असत.

चर्मकार हा समाज हिंदू धर्म-जाती-व्यवस्थेमध्ये अस्पृश्य म्हणून गणला गेलेला समाज आहे.

## चेवली दाभोळी

महाराष्ट्रात हा समाज 'चांभार' किंवा 'चर्मकार' या नावाने ओळखला जातो. उत्तर प्रदेशामध्ये त्यांना 'चमार' असे म्हटले जाते. (देशात या समाजाची सर्वांत अधिक लोकसंख्या उत्तर प्रदेशात आहे) तर गुजरातमध्ये हा समाज 'मोची' समाज म्हणून ओळखला जातो. कोकण भागात त्यांना 'चेवली' व 'दाभोळी' या नावाने ओळखतात.

चर्मकार समाजाच्या धंद्याशी संबंधित असलेल्या आणखी दोन स्वतंत्र जाती महाराष्ट्रात आहेत. त्यांना अनुक्रमे 'ढोर' आणि 'होलार' म्हणून ओळखले जाते. मात्र या जातींशी चर्मकार समाजातील लोक रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. कारण या जातींपेक्षा चर्मकार स्वतःला उच्च समजतात. इतर अस्पृश्य जातींसंबंधीही त्या समाजाची अशीच भावना दिसून येते. आजही ती भावना कायम आहे.

## तीन पंथ

इतर जाती-जमातींमध्ये जसे वेगवेगळे जातिअंतर्गत पंथ आहेत; तसेच चर्मकार समाजातही तीन पंथ पाहावयास मिळतात. 'हरळे वैष्णव,' 'रोहिदासी' आणि 'लिंगायत' अशी या पंथांची नावे आहेत. या पंथात असणाऱ्या किंवा स्वतःला विशिष्ट पंथाचे म्हणवून घेणाऱ्या लोकांची श्रद्धास्थाने वेगवेगळी आहेत. एवढंच नव्हे; तर या पंथांतील प्रत्येक जण इतरांपेक्षा स्वतःला वेगळा आणि श्रेष्ठ समजतो. त्यामुळे आपापसात ते बेटीव्यवहार करीत नाहीत.

स्वतःला लिंगायत समजणाऱ्या चर्मकारांच्या गळ्यामध्ये लिंगायत समाजाप्रमाणे लिंग पाहावयास मिळते. त्यांचे रीतीरिवाज इतरांपेक्षा वेगळे आहेत.

इतरांचे तुलनेने हरळे-वैष्णव समाजाची संख्या अधिक आहे. या पंथाचा पूर्वेतिहास पाहाता असे आढळले की, "हरल्लय्या" नावाच्या चर्मकार समाजातील एका पूर्वजाने 'कल्लानम्मा' नावाच्या ब्राह्मण स्त्रीशी विवाह केला. या प्रकरणात 'हरल्लय्या' सवर्णांकडून मारला गेला, त्याची स्मृती म्हणून नंतरच्या काळात 'हरळे वैष्णव पंथ' निर्माण झाला. वरील प्रकरणी हरल्लय्या हुतात्मा झाला, अशी चर्मकार समाजातील हरळे वैष्णव पंथाच्या लोकांची धारणा आहे.

'रोहिदास' हा चर्मकार समाजातील थोर संत म्हणून सर्वांना परिचित आहे. 'मनचंगा तो काटवटमें गंगा' हे रोहिदासाचं प्रसिद्ध वचन; आजही चर्मकार समाजातील काही मंडळी अभिमानाने सांगतात. रोहिदासांना मानणारे या समाजातील काही लोक स्वतःला रोहिदास पंथाचे म्हणवून घेतात, ते इतरांशी संबंध ठेवीत नाहीत.

गावगाड्यातील इतर अस्पृश्य समाजाला गावातील प्रमुख पाटील आणि इतर सवर्ण यांच्या घरांत प्रवेश दिला जात नसे, स्पर्शही केला जात नसे. परंतु चप्पल, बूट अथवा जोडे तयार करण्यासाठी चर्मकार लोकांना सवर्णांच्या पायांची मापे घ्यावी लागत असत, त्या निमित्ताने त्यांच्या पायाला स्पर्श करण्याची संधी फक्त चर्मकारांना मिळत होती. त्यामुळे इतर अस्पृश्यांच्या तुलनेने चर्मकारांना अस्पृश्यता कमी होती, असे त्यांच्यातील काही लोक सांगतात.

## जातपंचायत

पूर्वी चर्मकार समाजामध्ये "जातपंचायत अस्तित्वात होती. जातीचे पारंपरिक रीतिरिवाज आणि जातिअंतर्गत व्यवहार, यावर पंचायतीचें काटेकोरपणे लक्ष असे. या पंचायतीचा प्रमुख म्हणून या समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती न्याय-निवाडयाचे काम पाही. त्या व्यक्तीला त्याकाळी ह्या समाजात पाटील असे म्हटले जात असे. जातीतील स्त्रीचे पाऊल वाकडे पडले किंवा जातीचे नियम (परंपरा) मोडून कोणी आगळीक केली, तर जातपंचायत संबंधित इसमाला जातीबाहेर टाकीत असे, त्याला 'वाळीत' टाकणे असे म्हणत.

विशेषतः, या जातीतील लग्न-सोहळ्याचे वेळी किंवा दहाव्या-तेराव्याच्या कार्य-क्रमाचे वेळी जातपंचायतीचा प्रमुख सहभाग मानला जात असे. जातपंचायतीच्या उपस्थितीशिवाय अगर पंच मंडळीच्या निर्णयाशिवाय लग्न कार्ये होत नसत. विशेषतः अशा लग्नकार्यात, जातीतून बाहेर टाकलेल्या, वाळीत टाकलेल्या किंवा बहिष्कृत केलेल्या लोकांना बोलाविले जात नसे किंवा त्यांना लग्नकार्याच्या समारंभात सामावून घेतले जात नसे. उलट लग्नकार्याचें वेळी जातीतील सर्व लोक एकत्र जमल्यानंतर, अशी वाळीत टाकलेल्या लोकांची प्रकरणे मुद्दाम उकरून काढली जात आणि सर्व लोकांसमक्ष त्या प्रकरणाशी संबंधित असलेल्या इसमास जातपंचायत दंड मागीत असे. या दंडाचे स्वरूप मुख्यतः जातीतील लोकांना जेवणाची पंगत देणे; अशी असे. परंतु ज्या व्यक्तीस पंगत देणे शक्य नसे, ती व्यक्ती जातपंचायती-समोर गयावया करी, पदर पसरून माफी मागी आणि म्हणत असे की, "समींदरात कुत्रं पाणी प्यायलं, समींदर थोडाच बाटला! लेकराला पदरात घ्या, आन् लेकराला सुद् (शुद्ध) करून घ्या."

वरील प्रथा अगर जातपंचायत हल्ली या समाजात अस्तित्वात नाही.

## एक लोककथा

या समाजातील वयोवृद्ध लोकांना त्यांच्या खास रूढी–परंपरेविषयी विचारता असे सांगण्यात आले की, चर्मकार समाजातील स्त्रिया पुरुषांच्या ताटातले उष्टें अन्न कधीही खात नसत, कारण त्या स्वतःला राजकन्या समजतात. या संबंधी या समाजात एक लोककथा रूढ असल्याचे आढळते. ती अशी :

फार प्राचीन काळी कोण्या एका राजकन्येने असा 'पन' मांडला होता की, आकाशातून पडणाऱ्याच पुरुषाशी मी लग्न करीन, अन्यथा करणार नाही. योगा-योग असा घडला की, एके दिवशी त्या राजकन्येच्या संस्थानातील चर्मकार समाजा-तील एक तरुण नुकतंच सोललेलं जनावराचं कच्चं कातडं डोक्यावर घेऊन घरी येत होता. ते आकाशात भक्ष शोधणाऱ्या घारीने पाहिले, आणि तिने त्या तरुणाच्या

कातडयावर झडप घातली. त्या तरुणाने ते कातडे तसेच घट्ट धरून ठेवले. परिणामी त्या घारीने कातडयासकट त्या तरुणाला उंच आकाशात नेले. तो तरुण घाबरला; त्याने कातडे सोडून दिले, तेव्हा तो सरळ राजकन्येच्या राजवाडयात येवून पडला. राजाला आनंद झाला. राजकन्येला आकाशातून पडलेला तरुण मिळाला, तिने त्याला वरमाला घातली, तिचे लग्न झाले.

पुढे एक दिवस तो तरुण; राजकन्येबरोबर बागेत फिरत असताना, त्याचं लक्ष सुंदर फुलांकडे न जाता, तरवडाच्या फुलाकडे गेले आणि तो अस्वस्थ झाला. त्याला घरची आठवण झाली. तरवडाची साल लावून टांगलेल्या कातडयाचं दृश्य त्याच्या डोळयासमोर तरळू लागलं. तो अधिकच अस्वस्थ झाला. राजकन्येनं त्याला अस्वस्थतेचे कारण विचारले. तेव्हा त्याने स्वत:च्या जातीविषयी सर्व सांगून टाकले. राजकन्या खूप चिडली. तिने त्याला शाप दिला,– "तुझ्या जातीतील स्त्रिया (त्यांच्या) पुरुषांच्या ताटातलं उष्टं अन्न कधीही खाणार नाहीत."

या वेळेपासून ही प्रथा चर्मकार समाजात रूढ झाल्याचे सांगितले जाते. खरे खोटे काहीही असले, तरी नवऱ्याच्या ताटातील उष्टे अन्न पत्नीने न खाण्याची प्रथा या समाजात होती. ती आता बंद झाल्याचे सांगितले जात असले, तरी खेडया-पाडयांत आजही ते पाळले जाते, ही वस्तुस्थिती आहे.

## काही अंधश्रद्धा

वरील लोककथेप्रमाणे अनेक अंधश्रद्धाही या समाजात रूढ आहेत. उदा. कोळंब्यात (कुंडात) मुरत ठेवलेल्या कातडयामुळे तयार होणारे लाल रंगाचे पाणी भूत–पिशाच्च असणाऱ्या जागेवर अथवा त्या ठिकाणावर शिंपडले, तर त्या भुताचा नाश होतो, असा समज आहे. तसेच आतडयांपासून काढलेली वादी-सळ (दोरी-सारखे लांब) देवरुषाने गंडादोरीसाठी वापरला आणि गंडादोरा माणसाच्या गळयात बांधला, तर कधीही भूतपिशाच्याची बाधा होत नाही. ही अंधश्रद्धा खेडयापाडयात आजही अस्तित्वात आहे.

## झालझेंडा

हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेमध्ये प्रत्येक जातीत लग्न कार्यात भिन्न प्रकार आढळून येतात. चर्मकार समाजात काही वर्षांपूर्वी "झालझेंडा" नावाची प्रथा अस्तित्वात होती. लग्नाचे दुसरे दिवशी एक समारंभ आयोजित केला जात असे. लग्नाला जमलेले लोक गोल रिंगण करून बसत, त्या रिंगणात वराचे मामा वराला आणि वधूचे मामा वधूला पाठकुळी घेऊन रिंगणात येत. तिथे वधूच्या नि वराच्या हातात चपात्यांचा जुडगा दिला जात असे. मग वाद्याच्या तालावर नाचत, हाता-तल्या चपातीने नवरानवरी एकमेकांना मारीत. हा कार्यक्रम बराच वेळ चाले,

यालाच ' झालझेंडा ' असे म्हटले जात असे.

अलीकडे ही प्रथा बंद झाली आहे असे सांगितले जाते.

## हागारी देणे

विशेषत: चर्मकार समाजामध्ये ' मैत ' झाल्यास, अग्नीसंस्काराचे वेळी हरळी वाहाण्याची प्रथा फार पूर्वीपासून आहे. ती विशेषत: प्रामुख्याने शहरांत आजही पाहावयास मिळते. तसेच भाद्रपद महिन्यात या समाजामध्ये ' पितृ पंधरवडा ' पाळला जातो, त्याला ते ' पितरपाट ' असेही म्हणतात. या पंधरवड्यात मृत आई-वडिलांच्या नावाने जवळच्या चार मित्रांना जेवू घालण्याची प्रथा आहे. त्याला ते ' हागारी देणे ' असे म्हणतात. मात्र जी व्यक्ति गया, काशी, हरिद्वार व अन्य ठिकाणी तीर्थयात्रा करून आली असेल व ती मृत पावली असेल, तर तिच्या नावाने ' हागारी ' देण्याची प्रथा नाही.

कारण तीर्थयात्रा करून आलेली व्यक्ती ही पुण्यवंत, असे समजण्याची प्रथा या समाजात रूढ आहे.

## धार्मिक वृत्ती

चर्मकार समाज हा पूर्वीपासून धार्मिकवृत्तीचा आहे. हिंदू धर्मांच्या रूढी–परंपरा आणि देवदेवतांची तो उपासना करतो. बहुतेक चर्मकार समाजातील लोकांच्या घरामध्ये छोटे-मोठे देवघर किंवा देव्हारे आढळतात. त्यामध्ये देवदेवतांचे मुखवटे आणि काही संत पुरुषांच्या तसबिरी पाहावयास मिळतात. योगीराज ' देवजी बाबा ' हे या समाजातील दैवत मानले जाते. पुण्यातील दारूवाला पुलाजवळ ' देवजी बाबांचा ' मठ आहे. तसेच ' देवजी बाबा संस्थान ' या नावाची धार्मिक संघटनाही आहे.

देवजीबाबा हे संतमालिकेतील थोर पुरुष मानले गेले आहेत. त्यांनी जिवंत समाधी घेतल्याचे सांगितले जाते.

पौष महिन्यामध्ये ' देवजीबाबा, हरळे–वैष्णव संस्थे 'च्या वतीने महिनाभर धार्मिक सप्ताह पाळला जातो, यावेळी महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून चर्मकार समाजाचे अनेक लोक या सप्ताहात सहभागी होण्यासाठी येतात. या काळात धार्मिक कीर्तन, प्रवचन, पोथ्यापुराणांचे पारायण केले जाते.

या समाजातील वेगवेगळ्या कुटुंबांची कुलदैवते मानली गेली आहेत. त्यामध्ये पालीचा खंडोबा, जेजुरीचा खंडोबा, जावलीचे दैवत, मरीआई आणि काळूबाई, भैरोबा यांचा समावेश आहे.

## अंगारेधुपारे, नवस

या देवदेवतांचे नावाने अंगारेधुपारे, नवस करण्याची प्रथा या समाजात आहे.

विशेषत: या समाजातील काही स्त्रियांच्या अंगात देवी काळूबाईचं वारं येतं, अशी कल्पना आहे. पौष पौर्णिमेला काळूबाईची यात्रा मांढरे या गावी वर्षातून एकदा भरते. या यात्रेला चर्मकार समाजातील लोक मोठ्या प्रमाणात जातात. त्या यात्रेत नवस फेडले जातात, कोंबडी, बकरी बळी दिले जातात. ही प्रथा आजही चालू आहे.

महादेवाला या समाजात अत्यंत पवित्र असे स्थान आहे. महाराष्ट्रातील चर्मकार समाजातील लोक महादेवाचे भक्त असल्याचे स्वत: अभिमाने सांगतात. या समाजातील प्रत्येक कुटुंबात महादेवाची तसबीर लावलेली असते. काही खेड्यांत आणि शहरांत जेथे चर्मकार समाजाची वस्ती आहे तेथे, महादेवाचे मंदिर आढळते. हे लोक दर वर्षी महादेवाच्या नावाने भंडारा घालतात आणि उत्सव साजरा करतात.

महाराष्ट्रातील शिंगणापूर येथे महादेवाची जत्रा प्रचंड प्रमाणात दर वर्षी भरते, या यात्रेत चर्मकार समाजातील लोक मोठ्या संख्येने जमतात. या यात्रेत चर्मकार समाजाची मानाची पालखी (काठी) असते.

असा हा चर्मकार समाज अनेक रूढी, परंपरा उराशी बाळगून, महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांत आणि शहरांत मोठ्या संख्येने जगतो आहे. पूर्वीपासून चालत आलेला चर्मकारितेचा व्यवसाय हेच उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून आजही सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे.

खेड्यापाड्यांत इतर मागासवर्गीयांच्या तुलनेने शेती करण्याचे प्रमाण या समाजात अधिक आहे. शेती हेच काही लोकांचे प्रमुख साधन आहे, काही खेडेगावांत तर या समाजातील लोक बागाईतदार म्हणून ओळखले जातात. आधुनिक पद्धतीने शेतीचा व्यवसाय ते करताना आढळतात.

## उतरती कळा

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शैक्षणिक प्रसार जसजसा होत गेला आणि नवनवीन उद्योगधंदे करण्याची संधी मिळाली, तसतशी जातींच्या पारंपरिक धंद्यांना काही प्रमाणात उतरती कळा लागली. बाटा, स्वस्तिक यांसारखे मोठमोठे चर्मोद्योगाचे कारखाने निर्माण झाल्याने, खेड्यापाड्यातील चर्मकारांच्या धंद्यावर परिणाम झाला, त्यामुळे खेड्यापाड्यातील या समाजातील लोकांनी शेतीचा व्यवसाय सुरू केला, तर काही लोक नोकरीधंद्याच्या निमित्ताने शहरात येऊन स्थायिक झाले. त्यांनी आपले स्वतंत्र व्यवसाय सुरू केले, तर काही दुकानदारीकडे वळले आहेत.

## गटई कामगार

दुकानदारीशिवाय; रस्त्याच्या कडेला बसून चप्पल-बूट दुरुस्तीचे किरकोळ काम करणाऱ्यांची संख्या पुष्कळ प्रमाणात आहे. अशाप्रकारच्या दुरुस्तीचे काम करणारांना 'गटई' कामगार म्हणून ओळखले जाते. या कामासाठी वापरल्या

जाणाऱ्या प्रमुख हत्याराना रापी, आरी, हास्ति, इंगा, फरांडी, पलास्नी आणि आंबूर अशी नावे आहेत.

गटई काम करणारांची अर्थातच परिस्थिती हलाखीची आहे. असे किरकोळ काम करणारे लोक शहरातील विविध भागातील झोपडपट्टीत राहातात. त्या लोकांमध्ये अंधश्रद्धा प्रचंड प्रमाणात आहे.

या समाजातील काही महिला चर्मकामासाठी पुरुषांना मदत करतात. त्याशिवाय काही मंडईतून भाजीपाला आणून रस्त्याच्या कडेला बसून विक्रीचा धंदा करतात. तर या समाजातील काही बेकार तरुण; चर्मकार दुकानदारांच्या दुकानांत नोकरी करतात, तर काही रिक्षा, ट्रक चालविण्याचा व्यवसाय करतात.

मागासवर्गीयांना मिळणाऱ्या आर्थिक सवलतीचा फायदा काही लोकांना मिळालेला आहे. मागासवर्गीय विकास महामंडळातर्फे काही तरुणांनी मदत घेऊन स्वतःच्या मालकीच्या रिक्षा घेतल्याचे आढळते. तसेच स्वतंत्र धंद्यासाठीही काहींनी कर्ज घेतल्याचे सांगण्यात आले.

पारंपरिक चर्मव्यवसायाबरोबरच विविध शाखेचे उच्च शिक्षण घेण्याकडे तरुणांचा ओढा अधिक असल्याचे जाणवते. शिपायापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत या समाजातील लोक नोकरीत आहेत. सरकारी, निमसरकारी आणि केंद्र सरकारी कार्यालयांत पाच टक्के लोक नोकरी करीत आहेत.

महाराष्ट्रातील चर्मकार समाजात मागासवर्गीयांच्या तुलनेने शैक्षणिक प्रमाण अधिक आहे. डॉक्टर, वकील, इंजिनियर आणि प्राध्यापक होण्याकडे या समाजातील तरुणांचा कल जाणवतो. विशेषतः मागासवर्गीयांना शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा फायदा हे लोक घेताना आढळतात. पारंपरिक चर्मकारितेच्या धंद्याबरोबरच; शेती आणि शिक्षणाकडे या लोकांनी अधिक लक्ष पुरविले असल्याने, या समाजाची आर्थिक स्थिती इतर मागासवर्गीयांचे तुलनेने बरी आहे.

या समाजातील काही जाणत्या लोकांनी महाराष्ट्रात; विशेषतः शहरात; समाजाच्या शैक्षणिक संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्या संस्थांद्वारे प्राथमिक आणि माध्यमिक शाळा चालविल्या जातात. काही ठिकाणी या समाजाची स्वतःच्या मालकीची वसतिगृहे पाहावयास मिळतात.

स्वातंत्र्योत्तर काळात हा समाज राजकारणात मोठ्या संख्येने पाहावयास मिळतो. राजकारणात या समाजाला प्रतिनिधित्व मिळालेले आहे. मात्र चर्मकार समाज एकत्रित बांधू शकेल असे समर्थ नेतृत्व अद्याप या समाजातून निर्माण होऊ शकलेले नाही, उलट राजकारणामुळे समाजात हेवेदावे खूप प्रमाणात आढळतात. समाज विस्कळीत झालेला आहे.

## चळवळीपासून अलिप्त

पारंपरिक चर्मव्यवसाय आणि सरकारी, निमसरकारी नोकरीत गुंतलेला हा समाज, सामाजिक परिवर्तनाच्या किंवा इतर चळवळींपासून अलिप्त असल्याचे आढळते. सामाजिक अन्याय, अत्याचाराच्यासंबंधी संघर्षात्मक भूमिका न घेता, आहे त्याच परिस्थितीशी जुळते-मिळते घेण्याकडेच बहुतेक लोकांचा कल आढळून येतो. त्यामुळे या समाजात नाव घेण्यासारखी सामाजिक अथवा राजकीय संघटना पाहावयास मिळत नाही. सामाजिक कार्यकर्त्यांचा या समाजात अभाव जाणवतो. विशेषत: चर्मकार तरुणामध्ये सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या बाबतीत उदासीनता आढळते. तरुणवर्ग सामाजिक लढ्यात भाग घेताना आढळत नाही.

चर्मकार समाजांतर्गत सामाजिक जाणिवेने जे काही थोडेफार लोक काम करतात; त्यामध्ये विशेषत: शिक्षकी पेशातील लोकांचा भरणा अधिक आहे. शिक्षकांच्या आणि इतर व्यवसायांतील लोकांच्या प्रयत्नाने आज या समाजाच्या सहकारी तत्त्वावर उभ्या असणाऱ्या काही गृह निर्माण संस्था आहेत.

## सामाजिक स्थान

बदलत्या काळानुसार बदलण्याची प्रक्रिया या समाजात अलीकडे होताना दिसते. विशेषत: महाराष्ट्रामध्ये सुरू असलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींचा परिणाम या समाजातील काही तरुणांवर जाणवू लागला आहे. जातीच्या पारंपरिक धंद्यामुळे आर्थिक स्थिती बरी असली तरी, जातींचे सामाजिक स्थान बदलेले नाही, अस्पृश्य, खालच्या जातीचे, म्हणून आजही दूर ठेवले जाते, ही खंत काही शिक्षित तरुणांमध्ये जाणवते. त्यांनी ती बोलूनही दाखविली.

• • •

# मेहतर समाज

मेहतर समाजाला महाराष्ट्रात " भंगी " या नावाने ओळखलें जाते. देशातील सर्व जाती-धर्मांच्या लोकांचे मलमूत्र साफ करणारा हा समाज; सर्व धर्मीयांकडून पूर्वीपासूनच दुर्लक्षित, उपेक्षित आणि अस्पृश्य म्हणून दूर ठेवला गेलेला आहे. मात्र हे लोक स्वतःला अस्पृश्य वगैरे म्हणवून घेत नाहीत, ते स्वतःला " रजपूत " म्हणवून घेतात.

मेहतर समाज मूळचा महाराष्ट्रातील नाही. उत्तरेकडील प्रदेशात, विशेषतः मध्यप्रदेश, पंजाब, हरियाना आणि राजस्थान या राज्यांतून हे लोक महाराष्ट्रात आले. प्रत्येक राज्यात राहाणाऱ्या या समाजाची भाषा, पेहराव, चालीरिती आणि परंपरा या वेगळ्या आहेत. त्यांना वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते.

हा समाज पूर्वीच्या काळी अत्यंत शूर, धाडसी आणि योद्धा म्हणून प्रसिद्ध होता. परंतु मोगलांच्या काळात त्यांना पराभव पत्करावा लागला. लढाईत या लोकांना मोगलांनी पराजित केले आणि गुलाम बनविले. तेव्हा मेहतर समाजावर सूड घेण्यासाठी; म्हणून त्यांनी मलमूत्र साफ करण्याची शिक्षा त्यांना दिली. अनेक वर्षे त्यांच्याकडून हीच कामे करवून घेण्यात आली. पुढे उपजीविकेसाठी हे लोक अशीच कामे करीत राहिले व नंतरच्या काळात त्यांनी हा व्यवसाय म्हणून स्वीकारला, असे त्या समाजातील काही जाणकार लोक सांगतात.

भारतातील इतर जातीजमातींप्रमाणे या समाजात अनेक पोटजाती आणि छोटे-मोठे पंथ आढळतात. या सर्व पोटजातींचा आणि पंथातील लोकांचा व्यवसाय मात्र एकच असून, पारंपरिक उपजीविकेचे साधन; म्हणून हे लोक आजही मोठ्या प्रमाणात भंगीकाम करताना आढळतात. परंतु जातीपोटजातीत आणि वेगवेगळ्या पंथांत रोटीबेटी व्यवहार होत नसल्याचे या समाजातील काही

लोकांनी सांगितले.

उत्तर भारतामध्ये; भंगीकाम करणारे लोक अनेक जातींमध्ये विभागले गेले आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशामध्ये मेहतर समाजाच्या सहा-सात जाती आजही अस्तित्वात आहेत. यांपैकी काही जाती कालांतराने हिंदू धर्माशी तर काही मुसलमान धर्माशी जोडल्या गेल्या. मुसलमान धर्मात, भंगीकाम करणारांना ‘ शेखा ’ असे म्हटले जाते. शेखा जमातीचे लोक इस्लामला प्रमाण मानतात. एवढेच नव्हे; तर वाल्मीकीला ते पैगंबराचा अवतार समजतात.

हिन्दूधर्मात ज्या मेहतर समाजाचा समावेश आहे, त्यांना भंगी–वाल्मीकी म्हणून ओळखले जाते. या समाजातील लोक वाल्मीकीला आपला आद्य पुरुष व दैवत मानतात, त्याची जयंती साजरी करतात.

वरील जातींशिवाय उत्तर प्रदेशात ‘ चूढा, डोम, डाबर, भुईमाली, बसफोडा, दिमापूरी, रावत, गजीपुरी, धानुक, लालबेगी आणि हेला ’ याही जातींचे लोक भंगीकाम करताना आढळतात. या जातींपैकी काही जातींचे लोक गुगा, मिरा, मसानी, नकटी, नाईन, पवन या देवदेवतांची पूजा करतात. या देवदेवता वेगवेगळ्या राज्यातील ग्रामदेवता म्हणून ओळखल्या जातात.

## रक्त शिंपडण्याची चाल

विशेषत: पंजाबमधील ‘ चूढा ’ जातीचे लोक एकेकाळी स्वतत्र धर्माचे पालन करीत होते, असे आढळते. त्या धर्माचे रीतीरिवाज, पूजा-उपासना, आचारविचार हे हिंदू, मुसलमान धर्मापेक्षा वेगळे होते. ते लोक हिंदूप्रमाणे देवाची मंदिरे उभारीत नसत; तर अडीच विटेच्या चबुतऱ्यावर बौद्ध स्तुपांप्रमाणे गोल छत तयार करण्याचा त्यांचा रिवाज होता.

या जातीत एक विशिष्ट चालही होती. अडीच विटेच्या चबुतऱ्यावर कोंबड्यांचा बळी देत असत आणि त्या कोंबडीचे रक्त एका पसरट भांड्यात घेऊन चुढा जातीच्या प्रत्येक माणसाच्या घरावर शिंपण करीत. त्यामागे त्यांची अशी श्रद्धा होती की, ज्या व्यक्तीच्या घरावर बळी दिलेल्या कोंबड्याचे रक्त शिंपले जात असे, त्या घरातील ‘ इडा-पिडा ’ कायमची नाहीशी होते.

अशा आणि यासारख्या अनेक प्रकारच्या कल्पना, श्रद्धा हा समाज परपरागत जोपासत होता. वेगवेगळ्या प्रांतात या समाजाच्या भिन्न भिन्न दंतकथा, भिन्न परंपरा, श्रद्धा रूढ असल्याचे आढळते.

महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील प्रांतात राहाणाऱ्या मेहतर समाजातील सर्व जाती ‘ वाल्मीकीचा ’ संबंध स्वत:च्या जातीशी जोडताना आढळतात. विशेषत: अलीकडील काळामध्ये म्हैसूर प्रांतातील ‘ अहिरिया ’ जात, आंध्र प्रदेशातील ‘ वाल्मीकीकूड ब्राह्मण ’, बिहारचे ‘ वाल्मीकी कायस्थ ’, पंजाबातील ‘ मुहियाल ’-बाली

आणि महाराष्ट्रात महादेव कोळी, या सर्व जाती 'वाल्मीकीला' संत, महापुरुष मानतात. परंतु या सर्वच जातींमध्ये वाल्मीकीचा जन्मदिन पाळला जात नाही; तर पंजाबमधील ठरावीकच भंगी जमातीत वाल्मीकीचा जन्मदिन पाळतात. या जमातीचे लोक स्वतःला भंगी मेहतर म्हणून घेत नाहीत; तर 'वाल्मीकी' समाज म्हणून घेतात. ते मेहतर समाजाला कमी लेखतात.

## महाराष्ट्रातही स्थायिक

ब्रिटिश काळामध्ये उत्तर प्रदेश, पंजाब, बंगाल आणि गुजरात या प्रदेशांतून मेहतर समाजाचे लोक नोकरीच्या व कामधंद्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाले. विशेषतः महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, जळगाव या ठिकाणी हे लोक वस्ती करून राहिले. इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर काही लोक आले ते तेथेच स्थायिक झाले. खेड्यापाड्यात ही जमात अत्यंत दुर्मिळ. खेड्यात या जातीची विशेष गरज भासत नाही. त्यामुळे हे लोक खेड्यात न जाता शहरातच स्थायिक झाल्याचे आढळते.

पुणे शहरामध्ये असलेले मेहतर समाजातील लोक हे विशेषतः राजस्थानमधून आलेले आहेत. ते स्वतःला रजपूत म्हणवून घेतात व तसे सांगतात.

पेशव्यांच्या काळात गुजरात, काठेवाड या ठिकाणांहून या समाजाचे पुष्कळसे लोक पुण्यात स्थायिक झाले. या लोकांचा पेहराव (विशेषतः स्त्रियांची साडी नेसण्याची पद्धत) गुजराती पद्धतीची आढळते.

**समाजातील श्रेष्ठ पुरुष :** "वीर गुगादेव" हे मेहतर समाजात श्रेष्ठ पुरुष मानले जातात. ते या समाजाचे आराध्य दैवत समजले जाते. भारतात सर्वत्र या समाजामध्ये गोकुळअष्टमीचे दुसरे दिवशी वीर–गुगादेवांचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. हा उत्सव समाजात प्रमुख सण म्हणून मानला गेलेला आहे. ज्याप्रमाणे इस्लाम धर्मामध्ये महिनाभर 'रोजा पाळला जातो, उपवास केले जातात किंवा हिंदु धर्मात श्रावणमास पाळला जातो, तशाच प्रकारे गोकुळ-अष्टमीचे पूर्वी एक महिना, या समाजात वीर गुगादेवांच्या नावाने उपवास केले जातात. त्यांच्या चरित्राचे घरोघर पारायण केले जाते आणि बरोब्बर गोकुळ-अष्टमीचे दुसरे दिवशी या उत्सवाची सांगता होते. त्या दिवशी वीर गुगादेवांची मिरवणूक काढली जाते आणि लहानथोर सर्वजण आनंदोत्सव साजरा करतात.

वीर गुगादेव हे श्रीकृष्णाचे अवतार आहेत, असे या समाजात मानले जाते.

हे लोक इतर जाती–जमातींच्या वस्तीत एकट्याने राहात असताना सहसा आढळत नाहीत. बहुसंख्य लोक वेगवेगळ्या ठिकाणी परंतु एकत्रित (मोहल्ल्याचे स्वरूपात) राहाताना आढळतात. या समाजातील बहुतेक लोकांची मातृभाषा हिंदी आहे. परंतु शालेय शिक्षण मात्र मराठी माध्यमातूनच घेतल्याचे आढळते. या

समाजातील काही कुटुंबांमध्ये राजस्थानी आणि गुजराथी भाषा बोलली जाते.

## जात पंचायत

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जातीजमातींमध्ये जशी 'जात पंचायत' आजही अस्तित्वात आहे; तशाच प्रकारे मेहतर समाजात 'जात पंचायत' ही जातीची संस्था आजही अस्तित्वांत आहे. ही जात पंचायत, मेहतर समाजाची अंतिम सत्ता (सुप्रीम पॉवर) म्हणून ओळखली जाते. या पंचायतीला जातीची म्हणून खास मान्यता आहे. विशेषतः मेहतर समाजातील अंतर्गत कलह, हेवेदावे, कौटुंबिक ताण-तणाव आणि झगडे मिटविण्याचे काम या जात पंचायतीतील पंच मंडळी एकत्र बसून करतात.

या पंचायतीमध्ये विशेषतः समाजातील मान्यवर प्रौढ व्यक्तींचा समावेश आहे. ही पंच मंडळी या समाजातील ठरावीक (प्रतिष्ठित) घराण्यातून परंपरेने पुढे आलेली आहेत. महाराष्ट्रातील खेडयापाडयात ज्या प्रकारे 'पाटीलकी' वंशपरंपरेने चालत होती, तशाच प्रकारे मेहतर समाजात जात पंचायतीमधील पंचाची परंपरा पाहावयास मिळते. याला घराणेशाही असेही म्हटले जाते.

अलीकडे काही वर्षांत, या घराणेशाहीची जाणीव मेहतर समाजातील नव्या पिढीला होऊ लागली आहे. समाजातील जे शिक्षित तरुण आहेत त्यांचा जात पंचायतीला विरोध असल्याचे आढळले, तर काही तरुणांशी चर्चा करताना, जात पंचायत असली तरी चालेल; पण पारंपरिक नेमणुकीला आणि घराणेशाहीला प्रखर विरोध असल्याचे जाणवले.

## चाचा-भतीजा

मेहतर समाजामध्ये धार्मिक कार्ये करणारी एक संस्था (मंडळ) पाहावयास मिळते. नवल साहेब जयंती (मंडळ) या नावाने ती परिचित आहे. हे भजनी मंडळी असून ते 'चाचा-भतीजा' या नावाने ओळखले जाते. नवल साहेब हे या समाजातील थोर संत होऊन गेले असे सांगितले जाते. धार्मिक पारायण, धार्मिक भजनाचे कार्यक्रम हे मंडळ करीत असते. नवल साहेबांच्या स्मरणार्थ वरील कार्यक्रम केले जातात असे सांगण्यात आले.

मेहतर समाजातील पुरुषांच्या तुलनेत या समाजातील महिला मात्र पूर्वीच्याच पारंपरिक बंधनात अडकलेल्या पाहावयास मिळाल्या. या समाजात नव्याण्णव टक्के महिला अशिक्षित आहेत. या समाजाची पारंपरिक घुंघटपद्धत आजही महिला वर्गात अस्तित्वात आहे. या पद्धतीविषयी विचारले असता, "कौटुंबिक आदर आणि वडीलधाऱ्या मंडळींचा मान म्हणूनच केवळ घुंघटपद्धत आज टिकून आहे," असे समजले. काही शिक्षित कुटुंबांतून मात्र ही पद्धत नाहीशी झालेली आहे.

रजपूत वंशाच्या आठवणी म्हणून काही परपरा आजही या समाजात पाळल्या जातात. या परंपराविषयी ही मंडळी अभिमानी असल्याचे दिसते. घुंगट पद्धत ही त्यापैकीच एक असे सांगितले जाते.

देशातील वेगवेगळ्या प्रांतांतून शहरात आलेल्या मेहतर समाजात विवाह आणि इतर धार्मिक विधी त्या त्या प्रांताच्या रीतीरिवाजाप्रमाणे होतात. वातावरणाचा परिणाम म्हणून काही मेहतर कुटुंबात खूपच बदल झाल्याचे आढळले. पूर्वी या समाजात पाच ते सहा दिवस लग्नसोहळा चालत असे. परंतु अलीकडच्या काही वर्षांपासून एक–दोन दिवसांतच लग्नकार्य उरकतात.

## दहेज बंद

पाच–दहा वर्षांपूर्वी या समाजात हुंड्याची प्रथा अस्तित्वात होती, त्याला ते 'दहेज' असे म्हणत. विशेषत: या समाजात नवऱ्यामुलाने मुलीस हुंडा देण्याची प्रथा होती. परंतु गेल्या काही वर्षांत ही प्रथा पूर्णपणे बंद असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. या समाजातील इतर वाईट प्रथा बंद करण्याचे प्रयत्न आज तरुणवर्ग जोमाने करीत आहे.

मेहतर समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. लोक अशिक्षित आहेत, त्यामुळे इतर नोकरी-व्यवसायामध्ये त्यांना संधी मिळत नाही आणि जातीचा पारंपरिक धंदाच बहुतेक लोकांना करावा लागतो. विशेषत: महानगरपालिका, जिल्हा परिषद, सरकारी हॉस्पिटल्स, कॅन्टोन्मेंट बोर्ड, नगरपालिका, रेल्वे आणि केंद्र व राज्य शासकीय कार्यालयांमध्ये मेहतर समाज मोठ्या प्रमाणात चतुर्थ श्रेणीत (स्वीपर, मुकादम, वॉचमन) अशी कामे करताना आढळतो. बहुतेक या समाजातील लोक सफाईचे आणि भंगीकाम करतात.

या समाजात प्रत्येक कुटुंबातील कमीत कमी दोन व्यक्ती या व्यवसायात आहेत. जे लोक महानगरपालिका, हॉस्पिटल आणि रेल्वेमध्ये सेवक आहेत, अशा लोकांना त्या त्या खात्यामार्फत राहण्यासाठी जागा मिळालेल्या आहेत. आणि जे लोक कोणत्याही सरकारी खात्यात नोकरीला नाहीत; असे लोक शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी झोपडपट्टीत आपले तुटपुंजे संसार सांभाळीत, मिळालेल्या मोलमजुरीत पोट भरताना दिसतात. त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. समाजातील काही लोक भंगीकामाव्यतिरिक्त इतरही व्यवसाय करताना आढळतात. त्यामध्ये हॉटेल, पान दुकान, किराणा, मटण शॉप आणि कटलरीच्या व्यवसायात ते आहेत. असे व्यवसाय करणारांची दुकाने व स्टॉल शहरात आहेत. मेहतर समाजाला पारंपरिक धंद्यापासून मुक्त करण्याचे आणि इतर उद्योगधंदे करण्यास प्रोत्साहन देण्याचे काम मेहतर समाजातील तरुण, शिकलेला वर्ग आज जोमाने करताना आढळतो.

या समाजातील काही तरुण कार्यकर्त्यांशी चर्चा करताना त्यांनी त्यांचे आग्रही

मत माझ्यासमोर मांडले. ते म्हणतात, " भंगी व्यवसाय आम्ही पिढ्यान् पिढ्या करतो आहोत. सर्व धर्म, जातीच्या लोकांचं मलमूत्र काढतो आहोत. आता हे काम अन्य समाजाने करावे. "

## काही संघटना

मेहतर समाजातील तरुणांनी सामाजिक जागृतीसाठी काही संघटनाही स्थापन केलेल्या आहेत. ' विद्यार्थी सेवा संघ ', ' अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस ' आणि ' दलित युवा क्रांतिदल ' या नावाने त्या ओळखल्या जातात. मेहतर समाजांतर्गत काही चांगल्या सुधारणा घडवून आणण्याचे काम या संघटना करीत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून, शिक्षणाचा प्रसार या समाजात होऊ लागला आहे. पारंपरिक भंगीकामापेक्षा सरकारी नोकऱ्या आणि उच्च शिक्षण घेणे, तरुण लोक अधिक पसंत करताना दिसतात.

मेहतर समाजातील ज्या कुटुंबात पालक मंडळी सुशिक्षित आहेत, अशा लोकांनी आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून दाखल केली आहेत. काही तरुण डॉक्टर, वकील, इंजिनियर, प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत. विशेषत: उच्च शिक्षणाकडे तरुण पिढीचा ओढा अधिक जाणवतो.

## काही स्थित्यंतरे

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजात अनेक स्थित्यंतरे झाल्याचे आढळून येते. सामाजिक जाणिवेबरोबरच समाजसुधारणा आणि राजकारण यामध्ये हा समाज रस घेताना आढळतो. या समाजातील लोक सत्तारूढ पक्षाच्या पाठीमागे असल्याचे आढळते. तसेच जनता, भाजप, रिपब्लिकन आणि दलित पँथर यामध्येही काम करताना काही मंडळी आढळतात. मात्र त्यांचे प्रमाण अल्प आहे.

मेहतर समाजाचा समावेश हा अनुसूचित जातीमध्ये केलेला असल्याने, शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक आणि नोकरीतील सवलतींचा (रिझर्व्हेशन) फायदा पुरेशा प्रमाणात घेता आलेला नाही. या समाजातील नवी पिढी त्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे.

• • •

# ढोर समाज

'गुरेढोरे' हा शब्दप्रयोग काही ठरावीक प्राण्यांच्या संदर्भात आपण नेहमीच ऐकतो. जनावरांचा उल्लेख ज्या नावाने केला जातो त्याच नावाने "विशिष्ट जातीतील माणसांना किंवा त्या जातीला ओळखण्याचा प्रकार कदाचित् फक्त हिंदू समाज व्यवस्थेतच असेल.

'ढोर' समाजातील प्रतिभासंपन्न साहित्यिक, कलावंत आणि एकेकाळचे आमदार; नामदेवराव व्हटकर यांनी लिहिलेल्या "कथा माझ्या जन्माची" या स्वतःच्या आत्मवृत्तामध्ये 'ढोर' जातीच्या निर्मितीविषयी एक गमतीदार लोककथा सांगितलेली आहे.

## एक लोककथा

फार वर्षांपूर्वी देव आणि दैत्यांच्या लढाईच्या काळात तारकासूर राक्षस फारच माजला आणि त्याने देवांना खूप त्रास द्यायला सुरुवात केली.

तेव्हा देव काळजीत पडले, आणि तारकासुराचा नाश करण्यासाठी शंकराला पुत्र झाला पाहिजे याची त्यांना खात्री पटली. परंतु दुर्दैव असे की, शंकराला कधीही पुत्रप्राप्ती होणार नाही असा शाप होता. तेव्हा देवांसमोर गहन प्रश्न उभा राहिला, तारकासुराला कसे मारावयाचे ?

शेवटी सर्व देवांनी अग्नीला शंकराकडे पाठविले, अग्नीने शंकराला कैलासावर जाऊन सर्व हकिकत सांगितली. आणि शंकराकडे भिक्षा मागितली, तेव्हा शंकराने स्वतःचे वीर्य अग्नीच्या ओंजळीत वाढले. ते खाली पडू नये, म्हणून अग्नीने स्वतःच गिळून टाकले, आणि अग्नी गरोदर झाला.

आपण गरोदर झालो याची अग्नीला लाज वाटली, तो तोंड लपवून गिरीकंदरी आणि नदीकाठी फिरू लागला. योगायोग असा, त्या काळात स्वर्गातील सातही

आसरा (अप्सरा) पाणी भरायला नदीवर आल्या. नग्न होऊन त्यांनी आंघोळी केल्या. अंगाला गारठा झोंबल्याने मध्येच अग्नी पेटवून त्या शेक घेत बसल्या. अग्नीला ही चांगली संधी आहे असे वाटून, त्याने पोटातील गर्भ त्या सातही अप्सरांच्या उदरांत ढकलून दिला.

त्या सातजणी शेकून जेव्हा उठल्या तेव्हा आपली पोटे जड झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग त्यापैकी सहाजणींनी आपला गर्भ काढून एका द्रोणात घातला आणि तो द्रोण नदीत सोडून दिला. (तोच द्रोण पुढे एका माळचाला सापडून, त्याचा सहा तोंडाचा कार्तिकी स्वामी जन्माला आला व पुढे त्याने तारकासुराला मारले. अशी आख्यायिका सांगितली जाते.)

परंतु जी सातवी अप्सरा आपला गर्भ काढून न टाकता तशीच त्या 'डोहात' राहिली, ती डोहातच बाळंत झाली, आणि तिला मुलगा झाला. तो मुलगा मोठा झाल्यावर त्याने आपल्या आईला विचारले की, 'माझा बाप कोण? आणि मी आता काय करू?' तेव्हा तिने सांगितले की, प्रत्यक्ष भगवान शंकर हाच तुझा बाप आहे. त्यालाच जाऊन तू हा प्रश्न विचार.

### उपकथानक

इकडे कैलासावर भगवान शंकराकडे एक वेगळीच हकिकत घडली. शंकराची कामधेनु ही गाय राखायला शंकराने एक मुलगा ठेवला होता आणि पार्वतीला सांगितले होते की, त्या पोराला तू गायीचे दूध कधीही वाढू नकोस. परंतु एकदा ते पोर सर्वांसोबत पंगतीत जेवायला बसले असताना, त्याला एकट्यालाच दूध न वाढणे बरे दिसत नाही, म्हणून पार्वतीने त्या गाईचे दूध त्या पोरालाही वाढले. त्या पोराला वाटले, गाईचे दूध इतके गोड तर गाय किती गोड असेल, म्हणून त्याने दुसरे दिवशी कामधेनु रानात चरावयाला नेल्यावर तेथे कापली, आणि तिच्या मांसाचे वाटे सागाच्या पानांवर घालून प्रत्येक देवाच्या घरी पाठवून दिले.

इतके झाल्यावर त्या पोराने गाईचे कातडे शंकराच्या दारात टाकले. त्यावेळी योगायोगाने सातव्या अप्सरेच्या पोटी डोहात जन्मलेला तो शंकराचा पुत्र आपली ओळख घेऊन— मी तुमचाच पुत्र आहे, मला काम द्या, असे सांगत तेथे उभा राहिला. तेव्हा शंकराने विचार करून आपली नखे काढून त्याला दिली, आणि या नखांची हत्यारे कर व तुझ्या जन्माच्या ठिकाणी (डोहात) हे गाईचे कातडे वनस्पती घालून उत्तम कमवून आण, अशी त्याला आज्ञा दिली.

त्याप्रमाणे शंकराच्या त्या पुत्राने डोहावर परत येऊन ते कातडे कमवून शंकराकडे नेऊन दिले. शंकर आनंदित झाले आणि म्हणाले, बाहेर पाटावर जाऊन बैस. पार्वती तुझ्या पोटापाण्याची आतून बिदागी आणून देईल. तसे त्याने केले. शंकराने आत जाऊन पार्वतीला सांगितले की, बाहेर जो पाटावर बसला आहे त्याला सूपभर

मोहरा नेऊन दे.

बाहेर तोपर्यंत एक ब्राह्मण आला. ब्राह्मणासमोर आपण पाटावर कसे बसावे, म्हणून त्या शंकरपुत्राने तो पाट ब्राह्मणाला बसायला दिला. त्यावेळी सूपभर मोहरा घेऊन पार्वती बाहेर आली आणि पाटावर बसलेल्या ब्राह्मणाच्या ओटीत तिने त्या मोहरा ओतल्या. त्या मोहरा मिळताच ब्राह्मण लगबगीने निघून गेला. शंकरपुत्र तसाच बसून राहिला. थोड्या वेळाने शंकर बाहेर आले आणि त्याला विचारले, पार्वतीने तुला काही दिले नाही का ? ... त्या पुत्राने घडलेली हकिगत सांगितली. तेव्हा शंकर म्हणाले,— तुझे नशीबच तसे दिसते, तू आता परत जा आणि मी जे कातडे तुला कमवायला दिले तेच काम करीत त्या डोहाजवळ राहा.

या दिवसापासून कातडी कमविणाऱ्या लोकांचा एक समूह तयार झाला. डोहाजवळ राहून कातडे कमविणारे, म्हणून त्याना ‘ डोहोर ’ या नावाने ओळखले जाऊ लागले. ‘ डोहर ’ या शब्दाचा अपभ्रंश होऊन ‘ ढोर ’ हे नाव कायम झाले असावे.

आजही या समाजातील लोक प्रत्यक्ष शंकराचे पुत्र; म्हणून स्वतःला ‘ डोहार ’ असे म्हणून घेताना आढळतात.

कातड्याच्या धंद्याशी संबंधित असलेल्या; परंतु स्वतंत्र अशा ‘ चर्मकार ’ आणि ‘ ढोर ’ या जाती आहेत. या दोन जातींमध्ये पूर्वी रोटीबेटी व्यवहार होत नसत, एवढेच नव्हे तर ‘ ढोर ’ समाजाने कमविलेले कातडे पाणी शिंपडून शुद्ध केल्याशिवाय चर्मकार आपल्या घरात घेत नसत. ढोर जातीपेक्षा चर्मकार स्वतःला उच्च समजतात. ढोरांना ते अस्पृश्य मानतात.

अलीकडच्या काही वर्षांमध्ये या दोन समाजामध्ये रोटी व्यवहार होऊ लागले आहेत, तसेच प्रेमसंबंधातून विवाहही होऊ लागले आहेत. परंतु अशी उदाहरणे महाराष्ट्रात अत्यंत अल्प आहेत.

## कक्कय्या-महापुरुष

चर्मकार समाजामध्ये जसा ‘ हरळे वैष्णव ’ या पंथाचा निर्माणकर्ता ‘ हरल्लय्या ’ नावाचा पुरुष होऊन गेला. तसाच ढोर समाजातही ‘ कक्कय्या ’ नावाचा महापुरुष होऊन गेला. ‘ कक्कय्या ’ हे ढोर समाजाचे धर्मगुरु मानले जातात. त्यामुळे ढोर समाजातील लोक स्वतःला ‘ शैव कक्कय्या ’ समाजातील म्हणवितात. ते स्वतःला लिंगायत समजतात.

विशेष म्हणजे, चर्मकार समाजातील ‘ हरल्लय्या ’ आणि ढोर समाजातील ‘ कक्कय्या ’ हे दोघेही कर्नाटकातील बसवेश्वराचे शिष्य आहेत, असे सांगितले जाते. बेळगावाकडील कक्केरी या गावाजवळ ढोर समाजाचे धर्मगुरु धर्मासाठी लढता लढता मरण पावल्याची आख्यायिकाही सांगितली जाते.

पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेत इतर बारा बलुतेदार जातींप्रमाणे, ढोर समाज हा ग्रामव्यवस्थेमध्ये बलुतेदार म्हणून सामावलेला नव्हता. परंतु गावाशेजारी थोड्या अंतरावर नदीच्या किंवा ओढ्याच्या काठी या समाजाची वस्ती अस्तित्वात होती. त्या ठिकाणी पारंपरिक पद्धतीने ते लोक कातडी कमवीत असत, आणि त्यापासून मोट, सोंड, बैलाच्या सापत्या, म्होरक्या, चाळाचे पट्टे, आरुसा (चामड्याची वादी), विणलेले चाबूक या वस्तू तयार करीत. व उरलेले कातडे चप्पल व तत्सम वस्तू तयार करण्यासाठी ते चर्मकाराला देत.

कातडे कमविण्याच्या यंत्राची निर्मिती त्या काळी झालेली नव्हती, त्यामुळे हे काम अत्यंत कष्टाचे आणि सतत घाणीशी संबंधित असे. पारंपरिक देशी पद्धतीने कातडे कमवून पूर्णपणे तयार करण्यासाठी किमान तीन आठवडे ते एक महिन्याचा काळ लागतो. अलीकडे कातडे कमविण्याची यंत्रे निर्माण झाल्याने कमी वेळात उत्तम निर्मिती शक्य झाली आहे.

## ठरावीक शहरांत वस्ती

महाराष्ट्रातील ठरावीकच शहरांमध्ये या समाजाची लोकवस्ती आढळते. विशेषत: पुणे, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नगर, फलटण, कऱ्हाड, सोलापूर आणि मुंबई या ठिकाणी हा समाज अधिक संख्येने आढळतो. त्या त्या शहरामध्ये ढोर समाजाचे कातडें कमविण्याचे व्यवसाय आहेत. विशेषत: फलटण शहरामध्ये कातडी कमविण्याचा पारंपरिक देशी व्यवसाय मोठ्या प्रमाणात आजही केला जातो.

कातडें कमविण्यासाठी मुख्यत: बाभळीची साल, हिरड्याचे कूट आणि चुनखडीचा उपयोग केला जातो. जनावराचे सोललेले कच्चे कातडे प्रथम चुनखडी असलेल्या मोठ्या भांड्यात (कुंडात) आठ ते दहा दिवस भिजत ठेवले जाते. चुन्यामुळे कातड्यावरचे केस गळण्याची प्रक्रिया होते. आठ ते दहा दिवसांनंतर कुंडातले कातडे बाहेर काढून, कातड्यावर चिकटलेले मांस विशिष्ट लोखंडी हत्याराने छिलून काढले जाते. नंतर बाभळीची साल आणि हिरडा यांचे मिश्रण करून एका मोठ्या हौदात या मिश्रणाबरोबर कातडे भिजत ठेवले जाते. बाभळीची साल आणि हिरड्याच्या मिश्रणामुळे कातड्याला विशिष्ट रंग येतो. नंतर हौदातून ते कातडे बाहेर काढले जाते, त्याच्या उभट लांब पिशव्या शिवून, पुन्हा त्यात पाणी भरले जाते. व त्या पिशव्या लाकडाला टांगून ठेवल्या जातात. तीन आठवडे किंवा एक महिन्यानंतर कातडें पूर्णपणे तयार होते. नंतर ते सुकवून विक्रीकरता बाजारात आणले जाते.

या एक महिन्याच्या प्रक्रियेमध्ये अर्थातच संबंधित कामगारांना दुर्गंधीशी तोंड द्यावे लागतें. पिढ्यान् पिढ्या हाच व्यवसाय करीत असल्याने या घाणीचे त्यांना

काही वाटत नाही.

या समाजामध्ये प्रत्येक जनावराच्या कातड्याला वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. म्हशीच्या कातड्याला 'मसडे' म्हणतात, तर बैलाच्या कातड्याला 'बाळदी', गाईचे 'गायवर', मेंढराचे 'मेशी', तर शेळीच्या कातड्याला 'सागळ' असे म्हटले जाते.

सतत घाणीशी संबंध असल्याने हा समाज नेहमीच गावापासून दूर अंतरावर राहात आला आहे. किंवा त्यांना जाणीवपूर्वक दूर अंतरावर ठेवले गेले आहे.

इतर समाजाप्रमाणेच हाही समाज हिंदू धर्माची रूढी, परंपरा, रीतीरिवाज आणि सणवार पाळतो. या समाजात, शंकराला फार महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्याचबरोबर खंडोबा, जोतीबा, यल्लाम्मा ही या समाजाची प्रमुख कुलदैवते. कुलदैवतांना बकरी, कोंबडी बळी देण्याची प्रथा, नवस, उपासतापास आणि गंडे-दोरे बांधण्याची अंधश्रद्धा याही समाजात आढळते.

## वावरजत्रा

विशेषत: या समाजामध्ये लग्नानंतर नव वधूवरांनी कुलदैवताला जाण्याची प्रथा आहे. याला ते 'वावरजत्रा' असे म्हणतात. लग्नाच्या रात्री जाग्रण-गोंधळ घालण्याची प्रथा रूढ आहे.

श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी सोमेश्वर येथील करंजे (ता. बारामती) या गावी सोमेश्वराची प्रचंड यात्रा भरते. त्या यात्रेला ढोर समाज मोठ्या संख्येने येतो. यात्रेहून परत आपल्या गावी गेल्यानंतर 'अंबिल, घुगऱ्या आणि बत्ताशे' वाटण्याची प्रथा या समाजात आहे. तसेच सोमवार, गुरुवार आणि शनिवार हे तीन दिवस देवाच्या नावाने उपवास धरण्याची प्रथा आहे.

या समाजात देवदासी (देवाला मुली सोडणे) प्रथा नसल्याचे काही जाणकार लोकांकडून सांगण्यात आले. मात्र देवदेवतांचे नावाने इतर क्रियाकर्मे याही समाजात आजही केली जातात. त्यामुळे बुवाबाजी आणि अंधश्रद्धेला लोक बळी पडतात. विशेषत: 'भविष्य' पाहण्याची प्रथा या समाजात मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात उद्योगधंद्याच्या निमित्ताने आणि शिक्षण, नोकऱ्यांच्या निमित्ताने या समाजातील लोक शहरात स्थायिक झाले आहेत. या ठिकाणी काही लोकांचे स्वत:च्या मालकीचे कातडे कमविण्याचे छोटे-मोठे कारखाने आहेत. त्याला लेदर टॅनिंग असे म्हणतात. बहुतेक अशा प्रकारच्या टॅनिंगमध्ये याच समाजातील लोक मजूर म्हणून काम करताना आढळतात. काही ठिकाणी अद्ययावत यंत्राद्वारे कातडी कमविली जाते; तर काही ठिकाणी पारंपरिक देशी पद्धतीचाच वापर केला जातो.

इतर जाती–जमातींमध्ये ज्याप्रमाणे काही पोटजाती आहेत; तशाच प्रकारे ढोर समाजातही एक पोटजात असल्याचे सांगण्यात आले. तिला 'बुदले ढोर' या नावाने ओळखले जाते, विशेषत: बीड जिल्ह्यामध्ये या समाजाचे लोक आहेत. ढोर आणि बुदले ढोर या दोन समाजात रोटीबेटी व्यवहार होत नसल्याचे सांगण्यात आले. ढोर 'हे' बुदले ढोरांपेक्षा स्वत:ला उच्च समजतात. त्यांची वस्ती. विदर्भ–मराठवाड्यात काही भागात पहावयास मिळते. त्यांच्यात बेटी व्यवहार होत नाहीत.

अलीकडच्या काळात खेड्यापाड्यातील जातीच्या पारंपरिक धंद्यांना उतरती कळा लागली. तसेच ग्रामव्यवस्थेतील बलुतेदार पद्धतीचे उच्चाटन झाल्याने, चरितार्थ चालविण्यासाठी काही ढोर समाजातील शिक्षित मंडळींनी सरकारी कार्यालयांत नोकऱ्या मिळवल्या आहेत. तर काही मंडळी डॉक्टर, वकील, प्राध्यापक या व्यवसायातही आहेत.

इतर अस्पृश्य दलित समाजाप्रमाणेच ढोर हाही समाज हिंदू समाजव्यवस्थेमध्ये अस्पृश्य म्हणूनच ओळखला जातो. त्यामुळे अनुसूचित जातींना मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या सवलती याही समाजात लागू केल्या आहेत.

सरकारी सवलतींचा (संधीचा) फायदा मुख्यत: या समाजातील सुशिक्षित लोकच घेत आहेत. बहुसंख्याक अशिक्षित लोकांना या संधीचा फायदा घेता आलेला नाही, त्यामुळे याच समाजातील कारखानदारांकडे मजूर म्हणून त्यांना काम करण भाग पडते. यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या मिळकतीमधूनच ते आपली उपजीविका करतात.

## सामाजिक संस्था नाहीत

चर्मकार समाजाप्रमाणेच याही समाजात सामाजिक अथवा राजकीय संस्था नाही. मात्र या समाजातील काही तरुण मंडळी सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्ये काम करतात.

स्वातंत्र्योत्तर काळापासून हा समाज काँग्रेस पक्षाच्या पाठीशी असलेला दिसतो. त्याचा फायदा या समाजातील काही लोकांना झाल्याचे आढळले. समाजातील लोकांना राजकीय स्थैर्य लाभले आहे. सामाजिक चळवळीशिवाय राजकारणात रस घेणाऱ्यांचे प्रमाण या समाजात अधिक आहे.

## परिवर्तनाविषयी अनास्था

हिंदू समाजव्यवस्थेमधील ढोर समाजाच्या स्थानाची जाणीव या समाजातील तरुणवर्गात काही प्रमाणात आढळते. परंतु स्वजातीच्या उपेक्षेविषयी अथवा इतर उच्च वर्गीयांकडून होत असलेल्या जातीच्या निंदेविषयी उघडपणे काही प्रयत्न या

समाजाने केल्याचे आढळत नाही. तसेच समाज परिवर्तनाच्या चळवळीविषयी, समाजात अनास्थाच पाहावयास मिळते.

'ढोर' समाजाची आर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय अस्पृश्यता जाणार नाही, किंवा या समाजाचा सामाजिक स्तर उंचावणार नाही, अशीच या समाजातील बहुतेक लोकांची कल्पना आहे. त्यामुळे कातडे कमविण्याच्या पारंपरिक धंद्याचे प्रमाण वाढविण्याकडे, दुकानदारी वाढविण्याकडे व इतर उद्योग व्यवसाय करून पैसे कमविण्याकडेच लोकांचा कल असल्याचे जाणवते. या दृष्टीने या समाजातील अनेक लोक प्रयत्नशील आहेत. तरीपण स्वतः अस्पृश्य असल्याची खंत मात्र या समाजातील अनेक मान्यवर व्यक्तींच्या मनात सलते आहे. पुण्यातील या समाजातील एका प्रतिष्ठित व्यक्तीची मुलाखत घेत असताना, त्यांनी आपल्या मनातली अस्पृश्यतेची खंत मला बोलून दाखवली. ते म्हणाले, "आम्ही स्वतंत्र धंद्यामुळे अर्थिकदृष्टया प्रबळ असलो, तरी केवळ आम्ही 'ढोर' जातीतले आहोत; म्हणून पुण्यातले काही सवर्ण हमाल कमवलेले कातडे आमच्या दुकानातून हातगाडीवर वाहून नेण्यास नकार देतात."

हिंदु समाजव्यवस्थेत हा समाज अस्पृश्य असला, तरी इतर अस्पृश्य समाजाच्या तुलनेने या समाजाने स्वतःची शैक्षणिक आणि अर्थिक स्थिती सुधारण्याकडे लक्ष दिलेले आहे. हे नाकारून चालणार नाही.

• • •

# बुरूड समाज

महाराष्ट्रातील ज्या जातीजमाती कलावंत म्हणून ओळखल्या जातात, त्यांपैकी ' बुरूड ' ही एक होय. कळक किंवा बांबूपासून घरगुती वापरासाठी छोटयामोठया वस्तू तयार करून, पिढयान् पिढया आपली उपजीविका करणारा ' बुरूड ' समाज सर्वांना परिचित आहे. बांबूपासून वस्तू बनविण्याची कला या समाजाची पारंपरिक हस्तकला असून, ती त्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे साधन आहे. म्हणून ' जिथे बांबू तिथे बुरूड ' असे म्हटले जाते. एवढेच नव्हे तर ' बांबूशिवाय बुरूड म्हणजे पंखा-शिवाय गरुड ' ही प्रसिद्ध म्हण त्याचें महत्त्व पटवून देते.

हा समाज दक्षिण भारतात (विशेषतः कर्नाटकात) ' मेदार ' किंवा ' महेंद्र ' या नावाने ओळखला जातो.

पूर्वी कर्नाटकात मेदार या पर्वताच्या कुशीत आदिवासी म्हणून तो राहत होता, म्हणून तो मेदार किंवा महेंद्र या नावाने ओळखला जाऊ लागला.

त्याची पारंपरिक बांबूकामाची कला इतर समाजाच्या संपर्काचे महत्त्वाचे माध्यम झाले. त्यांचा संपर्क गावगाडयाशी निकटचा येऊ लागला. घरगुती वापरा-साठी लागणारे पाटे, टोपली, हाऱ्या, डुरकुली, सुपे आणि शिडया आदी वस्तू अल्प मोबदल्यात तयार करून देऊ लागला.

पूर्वीच्या काळी हा समाज अस्पृश्य म्हणून ओळखला जात असे. त्याचे मुख्य कारण त्यांचा व्यवसाय. बांबूपासून वस्तू तयार करते वेळी आठ ते दहा दिवस बांबू पाण्याच्या डबक्यात भिजत ठेवावा लागतो. या प्रक्रियेमुळे घाणीशी या लोकांचा नित्याचा संबंध येत असे, त्यामुळे बुरुड त्याकाळी अस्पृश्य म्हणून गावापासून दूर अंतरावर ठेवले गेले. ते नदीकाठी किंवा तळयाकाठी वस्ती करून राहिले. बांबू-पासून तयार केलेल्या तटयाचा आधार देऊन उभारलेली झोपडी किंवा पाल हे या समाजाचे कलात्मक घरकूल म्हणून ओळखले जात असे. आज ही घरकुले

खेड्यापाड्यात सुगीच्या हंगामात पाहावयास मिळतात.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर जेव्हा भाषावार प्रांतरचना करण्यात आली, त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील जवळजवळ १८ जिल्ह्यांत राहणाऱ्या बुरुड समाजाचा समावेश 'इतर मागासलेल्या वर्गात' (ओबीसी) करण्यात आला. परंतु नंतरच्या काळात; म्हणजे १९७७ साली त्यांना खास 'मागासवर्गीय' म्हणून मान्यता मिळून त्यांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केला गेला. आणि मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सर्व सरकारी सवलतींचा फायदा समाजाला मिळू लागला.

## बुरुड समाजाची पुराणकथा

हिंदु धर्म-जातिव्यवस्थेमध्ये प्रत्येक जाती-जमातीच्या निर्मितीची किंवा जातीची म्हणून विशिष्ट पुराणकथा किवा लोककथा सांगितली जाते. बुरुड समाजाच्या पारंपरिक धंद्याविषयी किंवा त्यांच्या व्यवसायाच्या निर्मितीच्या विषयी एक लोककथा रूढ आहे, ती अशी–

देव लोक राज्य करीत असताना, देवयुगामध्ये संक्रांतीच्या सणाविषयी पार्वती आणि शंकर आपापसात चर्चा करीत असताना, पार्वतीला अचानक सुंपल्याची आठवण येते. वाणादाखल देवलोकातील मैत्रिणींना भेट म्हणून सुंपल्या देणे त्या दिवशी महत्त्वाचे असते. म्हणून पार्वतीने शंकराला विनंती केली, "हे प्रभो, संक्रांतीच्या सणादिवशी माझ्या मैत्रिणींना सुंपल्या भेट द्यायच्या आहेत." तेव्हा शंकराने पार्वतीला सांगितले, "हे पार्वती, तू त्याची चिंता करू नको. मी तुला मानाचा बुरुड बनवून देतो, त्याला बांबू (कळक किंवा वेळू) आणण्यास वनात पाठवतो. त्यापासून तो तुला वाणाच्या सुंपल्या तयार करून देईल."

नंतर भगवान शंकराने मानाचा बुरुड तयार केला. त्याला सुंपल्या बनविण्यासाठी बांबूवनात पाठविले. तेथे त्या बुरुडाने भगवान शंकराच्या आज्ञेनुसार बांबूपासून पार्वतीला हव्या तशा सुंपल्या बनवून दिल्या. त्यावर पार्वती संतुष्ट झाली.

सुंपल्या तयार केल्याबद्दल भगवान शंकर संतुष्ट होतील आणि आपणाला काहीतरी मोठं बक्षीस देतील असे बुरुडास वाटले, त्या अपेक्षेने तो बक्षिसाची प्रतिक्षा करीत दारात उभा राहिला.

संक्रांतीच्या सणाला वाणाच्या सुंपल्या केल्या म्हणून शंकरालाही बरे वाटले. ते बाहेर येऊन पाहातात तो बुरुड दारात उभा त्यांना दिसतो. ते त्याला पाटावर बसावयास सांगतात आणि आत जाऊन पार्वतीला म्हणतात, बाहेर जो इसम पाटावर बसलेला आहे त्याला सुपभर मोहरा दे. पार्वती तिच्या सखीला तसेच सांगते.

बराचवेळ बुरुड पाटावर बसून राहातो, थोड्या वेळाने एक ब्राह्मण भिक्षू तेथे येतो. ब्राह्मण भिक्षूला पाहाताच पाटावर बसलेला बुरुड नम्रपणे हात जोडतो

आणि स्वत:चा पाट त्या ब्राह्मणास देतो. ब्राह्मण त्या पाटावर बसतो, बुरुड थोड्या अंतरावर उभा राहतो.

काही वेळाने पार्वतीची सखी सूपभर मोहरा घेऊन येतें आणि पार्वतीने सांगितले-प्रमाणे पाटावर बसलेल्या व्यक्तीस मोहरा देते. सुपभर मोहरा मिळताच ब्राह्मण भिक्षुक संतुष्ट होऊन निघून जातो. बुरुड मात्र बक्षिसाच्या अपेक्षेने तसाच ताटकळत उभा असतो.

थोड्या वेळाने शंकरपार्वती बाहेर येतात, पाहातात तो समोर हात जोडून उभा असलेला बुरुड. त्याला पाहून शंकराला आश्चर्य वाटते, आणि ते विचारतात, 'तुला मोहरा मिळाल्या ना ?' त्यावर तो बुरुड घडलेली हकिकत नम्रपणे सांगतो. ते ऐकून शंकरपार्वती म्हणतात, "तुझं नशीबच उलटे आहे त्याला आम्ही तरी काय करणार ?" त्यावर तो बुरुड भगवान् शंकराला म्हणाला, "हे प्रभो, माझे नशीब उलटे आहे तर मी काय करावे ते सांगा," तेव्हा पार्वती म्हणाली, "इथून पुढे बोट तास आणि पोट भर."

वरील कथेचा आधार देऊन बुरुड समाजातील काही लोक आजही मोठ्या अभिमानाने सांगतात की, "देवी पार्वतीच्या सांगण्यावरून किंवा तिच्या आज्ञे-वरूनच हा व्यवसाय आम्ही आजपर्यंत करीत आहोत."

वरील कथेत शंकरपार्वतीचा संबंध आल्याने किंवा त्यांनी उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिल्याने, शंकरपार्वतीला या समाजात अत्यंत पवित्र असे स्थान आहे. शंकरपार्वती ही या समाजाची श्रद्धास्थाने आहेत, असेही सांगण्यात आले.

महाराष्ट्रातील विशेषत: चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, अमरावती, सांगोला, वर्धा आणि गडचिरोली या ठिकाणच्या डोंगराळ भागात बुरुड समाज आदिवासी म्हणून ओळखला जातो. वरील भागात या समाजाला बांसफोड, बुरड, बसोर किंवा बन्सारे या नावाने ओळखले जाते.

या समाजाचे प्रमुख धर्मगुरु म्हणून कर्नाटकातील 'श्री केतय्या स्वामी' यांना समाजात मानले जाते. ६०० वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले असे सांगण्यात आले.

बुरुड स्वत:ला लिंगायत समजतात. लिंगायत बुरुड असेच आपल्या समाजाचे वेगळे नाव सांगतात. ते शिवभक्त आहेत.

## जातीपंचायत

इतर भटक्या जातीजमातीप्रमाणेच याही समाजात परंपरेने चालत आलेली 'जातपंचायत' संस्था आहे. परंतु खेड्यातील तुलनेने शहरात लोकांमध्ये पंचाय-तीची तीव्रता कमी आढळते.

एखाद्या व्यक्तीने अनैतिक संबंध ठेवले किंवा एखादी स्त्री लग्नापूर्वी गरोदर राहिल्याचे आढळले किंवा कोणी जातीचा रिवाज मोडला, जात पंचायतीचे नियम

डावलले; तर जातीपंचायतीचे पंच संबंधित व्यक्तीस पन्नास ते शंभर रुपयांपर्यंत दंड करतात. कधी कधी व्यक्तीस जातिबहिष्कृत केल्याचे जाहीर केले जाते. अशा बहिष्कृत व्यक्तीस अगर कुटुंबास समाजाच्या सार्वजनिक समारंभात अगर लग्न-कार्यात अगर 'पितर पाठात' (पितृ पंधरवड्यात) होणाऱ्या कार्यक्रमात सहभाग घेता येत नाही.

जात पंचायतीच्या प्रमुखास 'पाटील' म्हणतात. काही ठरावीक आडनावाची कुटुंबे पाटीलकीची घराणी म्हणून ओळखली जातात. यामध्ये सोनावले, कुकडे, पवार, सुरवसे आणि सूर्यवंशी ही घराणी प्रमुख आहेत.

## कुळी आणि देवक

बुरुड समाजात ठरावीक आडनावावरून 'कुळी' आणि 'देवक' ओळखले जाते. उदा. सोनवणे या आडनावामध्ये तेलर, सोनावले, सोनावणे ही कुळे असून, 'सोन तरवड' हे त्यांचे 'देवक' मानले जाते. तर पवार या आडनावामध्ये कोंबडे, कुकडे ही आडनावे कुळे होत. यांचे देवक 'कणकीचा कोंबडा' म्हणून ओळखला जातो. (यांचे वैशिष्टय म्हणजे पवार आणि त्यांच्या इतर कुळांनी कोंबडी किंवा अंडी खाणे पाप समजले जाते. तसे केल्यास डोळे जातात अशी भ्रामक कल्पना या समाजात आहे.)

सूर्यवंशी यांच्यामध्ये डुकरे, सुरवसे, सुर्वे ही कुळे असून 'सूर्यफूल' हे यांचे 'देवक' आहे. तर साळुंखे, कोरडें, सुपेकर, खैरे या आडनावाची अनुक्रमे साळुंखे, सोळंकी, रोहिटे, सपाटे, जगताप, वाडेकर आणि खैरे ही आडनावे कूळ असून, कणकीची साळुंकी, कणकीचा होला आणि खैराचे लाकूड ही त्यांची 'देवके' आहेत.

कुळावरून देवके किंवा देवकावरून आडनावे ओळखण्याची पद्धत या समाजात आहे. विशेषतः लग्न कार्यामध्ये त्या त्या कुळातील 'देवकांना' मान असतो.

## बालविवाहाची प्रथा

बाल विवाहाला या समाजात प्राधान्य दिले जाते. आजही असे विवाह मोठ्या प्रमाणात खेडोपाडी आणि शहरात होतात. वयात आल्यानंतर मुलीचा विवाह केला, तर मुलीचा वंश वाढत नाही किंवा अकाली मृत्यू येतो, अशी कल्पना रूढ आहे.

लग्नकार्यात दारूला महत्त्वाचे स्थान दिले जात असे. लग्नकर्त्याची आर्थिक स्थिती चांगली असो वा नसो, त्याने समाजाला दारू आणि मटणाचे जेवण दिले पाहिजे, असा दंडक होता. या दारूमटणाच्या जेवणाला या समाजात 'तिसरमान' असे म्हटले जात असे. ही प्रथा हल्ली बंद असली, तरी 'विडा पद्धत' आजही पाहा-वयास मिळते.

## विडा पद्धत किंवा वगमान

लग्नाचे वेळी समाजातील पंच मंडळी वधूकडून आणि वराकडून सक्तीने काही रक्कम घेते. त्या रकमेबद्दल कोठेही लेखी पोच मिळत नसल्याचे समजले. अशा प्रकारे गोळा केलेली रक्कम समाजातील विशिष्ट पंचमंडळींच्याकडे दिली जाते. या देण्याघेण्याला ' विडा पद्धत ' किंवा ' वगमान ' असे म्हटले जाते.

## पुनर्विवाह रूढ

पुनर्विवाह किंवा विधवाविवाहाची प्रथा रूढ आहे. अशा विवाहाला ' पाट लावणे ' असे म्हटले जाते. असा विवाह संबंधित वधूवराला पाटावर बसवून केला जातो. या विवाहप्रसंगी सवाष्ण स्त्रियांनी जायचे नसतें अशी प्रथा आहे.

## बुरुडांची मैत

बुरुड समाजामध्ये (विशेषतः सोलापूर भागाकडे) मृत व्यक्तीचे प्रेत स्मशानात नेत असताना बँड लावून आणि फटाके वाजवीत नेण्याची वेगळी पद्धत असल्याचे सांगितले.

तसेच प्रेत खांद्यावर अथवा इतर साधनाने न नेता, बांबूपासून तयार केलेल्या विशिष्ट बैठकीत (रथात) नेले जाते. त्याला ' माड बांधणे ' असे म्हणतात.

या समाजातील लिंगायत समजणारी मंडळी प्रेत दफन करतात; तर इतर लोक प्रेताचे दहन करतात.

सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध पालीच्या खंडोबाचे यात्रेंस या समाजातील लोक मोठ्या प्रमाणात असतात. खंडोबाला या समाजातील लोक कुलदैवत मानतात. खंडोबाचे देव्हारे या समाजातील लोकांच्या घरात प्रामुख्याने पाहावयास मिळतात. खंडोबाचे नावाने उपासतापास आणि नवस केले जातात, तर काही लोकांच्या अंगात खंडोबाचे वारे येत असल्याचेही सांगितले जाते.

## लोकसंख्या

गेल्या अनेक वर्षांपासून हस्तकलाव्यवसायावर आपली उपजीविका करणारा बुरुड समाज महाराष्ट्रात सात लाख लोकसंख्येंच्या जवळपास आहे. महाराष्ट्रातील सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, बार्शी, नगर, औरंगाबाद, पंढरपूर, पुणे आणि सांगली या ठिकाणी तो आढळतो. विदर्भ-मराठवाड्यात या समाजाची लोकसंख्य अधिक आहे. महाराष्ट्रात ज्या ठिकाणी कळक, बांबूची बेटे आहेत त्या ठिकाणी व आसपास बुरूड समाजाची वस्ती आढळते. हे लोक पारंपरिक व्यवसायावर आपली उपजीविका करतात.

या समाजात महिलांना तसे कोणतेही स्थान नाही. कुटुंबात पुरुषांचे वर्चस्व,

आढळते. महिला शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जातीच्या पारंपरिक धंद्यातच आणि पोराबाळांच्या रगाड्यात अहोरात्र कष्ट करताना दिसते. बांबू कलेतील कामाचा पन्नास टक्के वाटा या समाजातील महिलांकडे जातो. टोपली, हारें, डूरकुली, सुपं, करंड्या, उदबत्तीच्या काड्या आदी वस्तू ती स्वत: बनविते आणि विक्रीही करते. अज्ञानामुळे अंधश्रद्धा आणि अंगारेधुपारे व देवभोळेपणाचे प्रमाण अधिक आहे.

लग्नप्रसंगी हुंडा देण्या-घेण्याची चाल या समाजात मोठ्या प्रमाणात असून, समाजातील तरुणांच्या व्यसनी प्रवृत्तीमुळे लग्नानंतर पत्नीला सोडून देण्याचेही प्रमाण अधिक असल्याचे समजले. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून तरुणांना व्यसन-मुक्त करण्यासाठी जाणकार मंडळी प्रयत्न करीत आहेत.

प्लॅस्टिक निर्मितीमुळे बांबूकामावर फार मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. जातीच्या पारंपरिक व्यवसायाला त्यामुळे उतरती कळा लागल्याने काही लोक इतर व्यवसाय करू लागले आहेत. वेतकाम करणारे अनेक तरुण या समा-जात आहेत, तर काही संधन व्यक्ती लाकडाचा, मंगलोरी कौले विकण्याचा किंवा छोट्या व्यावसायिकांकडून ठोक वस्तू घेऊन त्या गरजेप्रमाणे सरकारला पुरविण्याचे काम करतात.

परंतु अशा प्रकारचे ठोक व्यापार करणाऱ्या लोकांचे प्रमाण एकूणच समाजात कमी आहे. शैक्षणिक मागासलेपणामुळे शासकीय नोकऱ्यांचेही प्रमाण कमी आहे. २ ते ३% मंडळी सधन असली तरी उरलेली सर्व मंडळी पारंपरिक धंद्यात काम करत आहेत. शासनाच्या सवलतींचा फायदा मिळाल्यामुळे आणि विशेषत: म. फुले मागासवर्गीय विकास महामंडळातून होतकरू मंडळींना धंद्यासाठी भांडवल मिळाले असल्याने ती मंडळी त्या कर्जाचे आधारे व्यवसाय करीत आहेत.

## प्रमुख कार्यकर्ते

जातीच्या पारंपरिक व्यवसायाला फाटा देऊन, बांबूकलेची वेगळ्या मार्गाने जोपासना करणारे कलावंत या समाजात अधिक पाहावयास मिळतात. शोभेच्या वस्तू किंवा गणेशोत्सवामध्ये खास आरास करण्यासाठी म्हणून वापरल्या जाणाऱ्या शोभिवंत वस्तू ते तयार करतात. प्रसिद्धीपासून विन्मुख परंतु कलारसिकांच्या मनात आदराचे स्थान मिळालेले गुणी कलावंत या समाजात आहेत.

प्लॅस्टिक निर्मितीमुळे बांबूव्यवसायावर परिणाम झाला असला, तरी त्यातून मार्ग काढण्याचे प्रयत्न आणि समाजाला स्थैर्य मिळवून देण्याचे काम या समाजात अनेक कार्यकर्ते करीत आहेत. गेल्या काही वर्षांपासून वाईट रूढी, अंधश्रद्धा, लग्ना-तील विडा पद्धत आणि समाजातील तडे पद्धत नाहीसे करण्याचे प्रयत्न समाजातील जाणती मंडळी करीत आहेत. काळाप्रमाणे समाज बदलायला हवा, शिक्षणाचे

प्रमाण वाढायला हवे, पारंपरिक धंद्याशिवाय इतर नवीन छोटेमोठे धंदे तरुणांनी स्वीकारायला हवेत, असे त्यांना वाटते.

त्याचबरोबर सामाजिक जाणिवा निर्माण करणारे किंवा बुरुड समाजाला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे 'बांबुकला' या नावाचे मासिक; अखिल महाराष्ट्र बुरुड समाज (ट्रस्ट)चे वतीने, पुणे शहरातून प्रसिद्ध केले जाते. या मासिकाच्या माध्यमातून समाजजागृतीचे काम करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या समाजासाठी काम करणारी देशव्यापी संघटना म्हणून 'अखिल भारतीय महेंद्र मेदार बुरुड महासंघ' ही संस्था आहे. तर महाराष्ट्र पातळीवर 'अखिल महाराष्ट्र बुरुड समाज संघटना' समाजाच्या विकासाच्या दृष्टीने आज प्रयत्न करीत आहे.

• • •

# पद्मशाली समाज

देशातील विविध भागांतून जे अनेक समाज व्यवसायाच्या निमित्ताने महाराष्ट्रात आले, त्यापैकी पद्मशाली हा समाज होय. हा समाज मूळचा आंध्र प्रदेशातील असून, तेलंगण आणि नारायणपेठ भागात या समाजाची वस्ती प्रामुख्याने आढळते. यांचा प्रमुख व्यवसाय हातमागावर कापड विणणे हा असून, या समाजातील महिला मुख्यतः विड्या तयार करण्याचा घरगुती व्यवसाय मोठ्या प्रमाणात करताना आढळतात

आंध्र प्रदेशामध्ये हा समाज मागासवर्गीय (बीसी) म्हणून ओळखला जातो· मागासवर्गीयांच्या सर्व सवलती तेथे या समाजाला मिळतात. मात्र महाराष्ट्रामध्ये राहणारा हा समाज राज्य शासनाने इतर मागासवर्गात (ओ. बी. सी.) समाविष्ट केला आहे.

या समाजाची मातृभाषा 'तेलगू' असून हे लोक मराठीही उत्तम बोलू शकतात. कुटुंबात ते तेलगू बोलत असले तरी, व्यवहारात सर्रास मराठीचाच वापर करताना आढळतात. गेली अनेक वर्षांपासून हे लोक महाराष्ट्रात राहत असल्याने महाराष्ट्रीय संस्कृतीचा प्रभाव त्यांच्यावर आढळतो.

या समाजात "कंदळवार" आणि पेद्दारस्वामी" यांना समाजाचे गुरु म्हणून मानाचे स्थान दिले जाते. दरवर्षी श्रावण महिन्यात वरील समाज-गुरूंची पूजा या समाजातील लोक श्रद्धेने करतात.

पूर्वीच्याकाळी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेमध्ये "साळी" या नावाने ओळखला जाणारा तो "आलूतेदार" समाज होता, त्या साळी समाजाचेच पद्म-शाली आणि स्वकुळ साळी हे पोट विभाग आहेत असे सांगितले जातात. "साळी" ही मुख्य जात असून 'पद्मशाली' ही पोटजात असल्याचे सांगण्यात आले. त्यांना "पद्मसाळी" या नावानेही ओळखले जाते.

"पद्मशाली" समाजातही आणखी दोन वेगळे पोटभाग सांगितले जातात. त्यांना तेलंगणातील पद्मशाली आणि नारायणपेठ येथील पद्मशाली म्हणून ओळखले जाते. हे दोन प्रकार मुख्यत: प्रादेशिक आहेत. प्रत्येक विभागातील हे लोक स्वतःला उच्चकुलीन समजतात, त्यामुळे पूर्वी या दोन समाजांत रोटी-बेटी व्यवहार होत नसे. गेल्या काही वर्षांपासून मात्र रोटी-बेटी व्यवहार होऊ लागलेले आहेत. तसा प्रयत्न या समाजातील शिक्षित आणि कार्यकर्ती मंडळी जाणीवपूर्वक करीत आहेत.

## पंचसमिती

भटक्या–विमुक्त समाजाप्रमाणे याही समाजात जात पंचायतीचे अस्तित्व आजही कायम असल्याचे सांगण्यात आले. जात पंचायतीच्या प्रमुखास "सरपंच" नावाने ओळखले जाते, सरपंचाशिवाय न्यायनिवाड्याच्या कामात सहभागी असलेले पाच पंच जातपंचायतीमध्ये असतात, त्यांना "गौडा" असे म्हणतात. याशिवाय न्याय-निवाड्यासाठी जी दुसरी पंच समिती असते.; तीत ११ लोक असतात (सध्या या समाजात पद्मशाली पंच समिती आणि पद्मशाली कृती समिती, अशा दोन सामाजिक संस्था आहेत.)

## दंडाची रक्कम कार्यासाठी

जात पंचायत ही सामाजिक संस्था असून, समाज न्यायासाठी तिला प्रमुख स्थान दिले गेलेले आहेत. लग्न, मृत्यू, समाजांतर्गत भांडणतंटे, पुनर्विवाह, सोडचिठ्ठी आणि समाजातील सार्वजनिक कार्यक्रमात पंचायतीचा सहभाग प्रमुख मानला गेलेला आहे. पंचायतीचे निर्णय हे सर्व समाजाला बंधनकारक आहेत. समाजात एखाद्या व्यक्तीने जर गुन्हा केला आणि पंचायतीमध्ये तो सिद्ध झाला, किंवा संबंधित व्यक्तीने गुन्ह्याची कबुली दिली, तर पंचायत गुन्हेगार व्यक्तीकडून एकशे एकावन्न ते एक हजार रुपयांपर्यंत दंड वसूल करते. परंतु संबंधित व्यक्तीने दंड भरण्यास नकार दिला, तर त्याला जातीबाहेर टाकले जाते. त्या व्यक्तीशी आणि त्याच्या कुटुंबाशी कोणत्याही प्रकारचें व्यवहार केले जात नाहीत.

समाजात अनैतिक संबंध ठेवणाऱ्या स्त्रीपुरुषासमुद्धा वरील प्रकारे शिक्षा केली जाते. त्यांच्याकडून दंड वसूल केला जातो. जात पंचायतीने वसूल केलेल्या दंडाची रक्कम ही सामाजिक कार्यासाठी वापरली जाते. त्यामुळे सहसा कोणी दंड नाकारत नाही.

या समाजातील विवाह पारंपरिक पद्धतीनेच केला जातो. विवाह पंच समितीच जुळवते. दोन्ही पक्षांकडील प्रतिनिधी म्हणून पंच काम पाहतात. पंचाच्या अनु-पस्थितीत जर एखाद्याने विवाह जमविला, तर अशा विवाह संबंधास पंचायतीची मान्यता घ्यावी लागते. त्यांनी विवाहास परवानगी दिली तर दोन्हीकडील लोकांनी

पंचांना मद्य द्यावे लागते. पूर्वी लग्न जमविताना पंचांना ताडी देण्याची पद्धत होती.

या समाजात दोन प्रकारे मैत केली जाते. पेद्यावार स्वामींना मानणारे या समाजातील लोक प्रेताचे दहन करतात. तर कंदळवार स्वामींना मानणारे प्रेताचे दफन करतात. दहा दिवस सुतक पाळले जाते. पूर्वी अंत्यसंस्कार झाल्यानंतर ज्याच्या घरी मृत्यू होईल त्याच्या घरी, समाजातील सर्व लोकांनी एकत्र बसून ताडी पिण्याचा कार्यक्रम होत असे. प्रत्येक येणारा माणूस एक ग्लास ताडी देत असे. ही पद्धत काही प्रमाणात बंद झाली असल्याचे सांगण्यात आले.

पद्मशाली समाज धार्मिक वृत्तीचा असून, परंपरा जपणारा, पण अंग मेहनतीचे काम करणारा समाज आहे. या समाजातील लोक अंधश्रद्धाळू आहेत. देवदेवतांच्या नावाने उपास करणे, बकरे, कोंबडे कापणे, नवस करणे आदी प्रकार करतात. विशेषत: आषाढ महिन्यात मरीआई देवीचा उत्सव या समाजात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

"मरीआई" ही या समाजाचे कुलदैवत असल्याचे सांगण्यात आले. आंध्रप्रदेशात तिला "पोषम्मा" या नावाने ओळखले जाते. देशात विविध ठिकाणी विखुरलेला हा समाज आषाढ महिन्यात "पोषम्माचे" जत्रेला आंध्र प्रदेशात जातो

पूर्वी मरीआईचे नावाने समाजातून गोळा केलेली वर्गणी, जात पंचायतीचे पंच (गौडा) हे आपापसात विभागून घत असत. त्या वर्गणीवर त्यांचाच अधिकार असे. परंतु अशा प्रकारची पंचाच्या अधिकाराची परंपरागत पद्धत गेल्या काही वर्षांपासून बंद करण्यात आलेली आहे, समाजाचा पैसा हा समाजकार्यासाठीच वापरला जावा, असे लोकांचे म्हणणे आहे.

याशिवाय नारळीपौर्णिमा या समाजात पवित्र मानली गेलेली आहे. या दिवशी हे लोक मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा करतात.

मार्कंडेश्वर हेही या समाजाचे दैवत असून, त्यांचा जन्मोत्सव दरवर्षी समाजात साजरा केला जातो. मार्कंडेश्वराची काही मंदिरे या समाजाच्या मालकीची आहेत. शिवराय महोत्सव, गणेशोत्सव, गोकुळाष्टमी आदी उत्सव हा समाज साजरा करतो. श्रावण महिन्यात पूर्ण महिनाभर भजन, कीर्तनाचे कार्यक्रम केले जातात.

## विडी व्यवसाय

या समाजातील स्त्रिया अत्यंत कष्टाळू आणि धार्मिक वृत्तीच्या आहेत. पुरुषांच्या बरोबरीने त्या अंगमेहनतीची कामे करतात आणि कुटुंब चालवतात. समाजातील ७० टक्के स्त्रिया कुटिरोद्योग म्हणून विड्या तयार करतात. दरदिवसाला प्रत्येक स्त्री सरासरी हजार ते दीड हजार विड्या तयार करते. विडी तयार करण्यास दर हजारी १० ते १२ रुपये मिळतात. बरेच वेळा कारखानदारांकडून विड्यांची निकृष्ट पाने मिळतात, त्यामुळे कामगारांना नुकसान सोसावे लागते. काही वेळेस

तंबाखू ओली असते, तेव्हा स्वतःच्या मिळकतीतून तंबाखू आणून विड्या तयार करून घ्याव्या लागतात. काही वेळेस दर हजार मागे शेदोनशे विड्या खराब म्हणून बाजूला काढल्या जातात. अशा खराब विड्या कारखानदार स्वीकारीत नाही, तोही भुर्दंड विडी कामगार स्त्रीला सोसावा लागतो, असे काही महिलांच्या-कडून सांगण्यात आले.

महाराष्ट्रातील ज्या शहरांत या समाजातील विडी कामगार आहेत, त्यांच्या संघटना आहेत. त्या संघटनांमार्फत विडी कामगारांना सहकार्य केले जाते. या समाजातीलच काही लोकांचे विड्यांचे कारखाने आहेत. त्याच कारखान्यातर्फे विड्या बनविण्याचे काम या समाजातील महिलावर्ग करतो.

## स्वतंत्र उद्योग

महाराष्ट्रामध्ये या समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. हे लोक मूळचे आंध्र प्रदेशातील असल्याने, आंध्र प्रदेशाला लागून असलेल्या सीमेवरील शहरांत यांची संख्या अधिक आहे. सोलापूरला हा समाज इतर शहरांच्या तुलनेने अधिक आढळतो. सोलापूर शिवाय नगर, जुन्नर, मुंबई, दादर, कामाठीपुरा, उस्मानाबाद आणि पुणे शहरात या समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. वरील शहरांत या समाजातील काही लोकांच्या मालकीच्या कापड गिरण्या, विडीचे कारखाने आहेत. तर सोलापूरसारख्या ठिकाणी हातमाग कापडाचा स्वतंत्र उद्योग आहे. सोलापूर येथे असलेले हातमागाचे कारखाने बहुतेक या लोकांच्या मालकीचे आहेत, त्यामुळे या समाजातील लोकांना तसा व्यवसाय उपलब्ध झालेला आहे.

सोलापूर येथील हातमागावर तयार केलेल्या चादरी परदेशांतही पाठविल्या जातात. महाराष्ट्रात आणि देशभर सोलापूर चादरींना सतत मागणी असते.

## राजकारण-समाजकारण

हा समाज पारंपरिक व्यवसायात गुंतलेला असला, तरी या समाजातील लोक मोठ्या प्रमाणात राजकारणात आणि समाजकारणात पहावयास मिळतात. राजकारणात या समाजाला महाराष्ट्रात प्रतिनिधित्व मिळालेले आहे. आमदार, खासदार, महापौर, नगरसेवक, म्हणून या समाजातील लोक आढळतात.

राजकारणाबरोबर सुधारणेच्या कार्यात तरुणांचा भरणा अधिक आढळतो. समाजातील अंधश्रद्धा, वाईट रूढीपरंपरा नाहीशी करण्याचे प्रयत्न तरुण मंडळी करीत आहेत. समाज सुधारण्यासाठी पद्मशाली कृतिसमिती नावाची संघटना असून, समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय कपडे, वह्या, पुस्तके आणि शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचे काम ही संघटना करते. लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे, महिलांसाठी शिलाई कामाचे वर्ग चालविणे अशी कामेही

ही संघटना करते.

पद्मशाली समाज एकत्रित करून त्याच्यात शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न, काही वर्षांपासून समाजातील जाणकार लोक करीत आहेत.

या समाजाला स्वतंत्र असा पारंपरिक हातमाग व्यवसाय असल्याने, अर्थातच उत्पन्नाचे एक कायमचे साधन आहे. त्यामुळे या समाजात कुटीर–उद्योगधंद्यांचे प्रमाण दिवसेन् दिवस वाढते आहे. महाराष्ट्र शासनाने या समाजातील कुटीर उद्योगांना आर्थिक मदतीचा हात दिल्यास हा समाज स्वतंत्ररित्या स्वावलंबनाने उभा राहू शकेल.

● ● ●

# कोल्हाटी समाज

परंपरेने चालत आलेल्या विशिष्ट कलागुणांच्या आधारे जे लोकसमूह गावोगावी भटकत चरितार्थ चालवितात; त्या समूहांपैकी 'कोल्हाटी' समाज महाराष्ट्रात आहे. हा कलावंतसमाज म्हणून ओळखला जातो. विशेषत: या समाजातील महिला नाचगाण्याचा व्यवसाय करतात. तर महिला आणि पुरुष मिळून गावोगावी कसरतीचे प्रयोग करताना आढळतात. पारंपरिक कला हेच या समाजाचे चरितार्थाचे प्रमुख साधन मानले जाते.

या लोकांना आपली कला सादर करण्यासाठी वेगवेगळ्या गावांतून आणि शहरांतून सतत भटकत रहावे लागते. त्यामुळे हा समाज कोठेही स्थिर झाला नाही. म्हणून पूर्वी या समाजाचा समावेश भटक्या जातीजमातींत केला गेला. स्वातंत्र्योत्तर काही वर्षांत या समाजातील लोकांनी पारंपरिक व्यवसायाशिवाय इतर अनेक व्यवसाय स्वीकारले आहेत. काही लोक शहरांत स्थिरावले आहेत. परंतु आजही फिरस्त्यांचे प्रमाण मोठे आहे.

कोल्हाटी समाजाचे लोक विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भ मराठवाड्यात मोठ्या संख्येने आढळतात. एकाच नावाने ओळखला जाणारा हा समाज वेगवेगळ्या प्रदेशात रहात असल्याने, रूढी, परंपरा, भाषा आणि चालीरीती वेगवेगळ्या आहेत.

## पोटजाती

पश्चिम महाराष्ट्रातील या समाजातील काही लोक या समाजात पोटजाती मानत नाहीत. एवढेच नव्हे तर 'कोल्हाटी' ही एकच जात असून, त्यात इतर समाजाप्रमाणे पोटजाती नाहीत, असे ते सांगतात. तर विदर्भात राहाणारे कोल्हाटी या समाजातील पोटजाती म्हणून गुजराती डुकरे पाळे, काने, हारके, वले, गोपाळणी

पोटरे आणि मराठी या पोटजाती सांगतात. त्याच भागात काही ठिकाणी डोंबारी-कोल्हाटी, माळी-कोल्हाटी, भोई-कोल्हाटी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पोटजाती असल्याचे सांगतात. तर वऱ्हाडात खांब-कोल्हाटी व डुक्कर-कोल्हाटी असेही पोटविभाग असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय औरंगाबाद आणि परिसरात गोपाळ-कोल्हाटी, भातू-कोल्हाटी, खबूतर-कोल्हाटी अशीही काही पोटजातींची नावे सांगितली जातात.

वरील सर्व पोटजाती मूळ कोल्हाटी जातीपासून निर्माण झाल्या असल्या, तरी त्यांचे आपसात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. प्रत्येक पोटजातीतील लोक स्वतःला इतरांच्यापेक्षा वरचे (श्रेष्ठ) समजतात. त्यामुळे आपापसात एकमेकांविषयी आपुलकीची अथवा आपलेपणाची भावना नाही. त्यामुळे अनेक पोटजातीत विभागलेला कोल्हाटी समाज कोठेही एकत्रित किंवा एकजुटीने राहाताना आढळत नाही.

## लोककथा

कोल्हाटी समाजाच्या निर्मितीविषयी या समाजात एक लोककथा किंवा पुराण-कथा सांगितली जाते. ती अशी–

देवलोकांत इंद्राचा दरबार भरला असताना, एका गंधर्वकन्येची असभ्य वागणूक पाहून इंद्रदेव संतापले आणि रागाच्या भरात त्यांनी त्या गंधर्वकन्येला शाप दिला की, स्वर्गलोकीचे तुझे अश्लील वर्तन पाहून मी तुला शाप देतो की, "क्षणात तू शिळा होशील आणि स्वर्गलोकातून पृथ्वीवर पडशील." त्यावर ती गंधर्वकन्या इंद्रदेवाची क्षमा मागून गयावया करू लागली. आणि म्हणाली, "देवाधिदेव, आपले मनोरंजन करीत असताना माझेकडून अजाणतेपणे असे वर्तन घडले, मला क्षमा करावी, आणि मला उःशाप मिळावा." तेव्हा इंद्रदेवाने तिच्या पूर्वीच्या वर्तनाचा विचार करून तिला उःशाप दिला की, काही वर्षं शंकराचा धावा केलास, तर तुला पृथ्वीवर गंधर्वरूप मिळू शकेल.

इंद्राच्या शापामुळे ती गंधर्वकन्या शिळा होऊन पृथ्वीवर पडली आणि शंकराचा धावा करू लागली.

योगायोग असा : त्यावेळी शंकर आणि पार्वती कैलासाकडे निघाली होती. त्या-वेळी पृथ्वीवर कोणीतरी शापित आत्मा आपला धावा करीत आहे, असे पार्वतीच्या लक्षात आले, आणि तिने शंकराला थांबण्याची विनंती केली. "प्रभो, पृथ्वीवर कोणीतरी तुमचा धावा करते आहे." त्यावेळी पार्वतीला टाळण्याच्या उद्देशाने शंकर महाराज म्हणाले, "या दुनियेत कितीतरी लोक माझे नाव घेत आहेत. प्रत्येकाकडे जाणे आपणाला शक्य नाही." तेव्हा पार्वतीने थांबण्याचा हट्टच धरला, आणि पार्वतीच्या हट्टामुळे शंकर महाराजांना थांबणे भाग पडले. ते दोघे त्या

शिळारूपी गंधर्वकन्येजवळ गेले. त्या कन्येने आपली सर्व हकिकत शंकर-पार्वतीला सांगितली आणि आपला उद्धार करण्याविषयी विनंती केली.

गंधर्वकन्येची पार्वतीला खूप दया आली. हिचा उद्धार केला तर पृथ्वीवरील लोकांचे मनोरंजन तरी करेल, असा विचार करून तिचा उद्धार करण्याविषयी पार्वतीने शंकराला पुन्हा विनवले. तेव्हा शंकराने तिचा उद्धार केला.

गंधर्वकन्येला आनद झाला, तिने शंकराला मनोभावे वंदन केले, आणि पृथ्वीवर आपल्या उपजीविकेसाठी वर मागितला. तेव्हा शंकराने तिला वर दिला की, "तुझ्या पोटी जन्म घेणारी संतती कलावंत होईल आणि लोकांचं मनोरंजन करूनच पोट भरेल." इतके बोलून शंकरपार्वती निघून गेले.

काही दिवस लोटल्यानंतर, शंकराच्या कृपाप्रसादाने गंधर्वकन्येने एका मुलीला आणि एका मुलाला जन्म दिला. जन्मलेल्या मुलीचे सौंदर्य अप्रतिम होते. शंकराच्या कृपाप्रसादाने ती दोन्ही बालके उपजतच कलावंत म्हणून जन्माला आली आणि पुढील आयुष्यात ती आईने सांगितल्याप्रमाणे पृथ्वीवरील लोकांचे मनोरंजन करून पोट भरू लागली.

गंधर्वकन्येची मुलगी नाचगाणी म्हणत असे, तर मुलगा कसरतीचे प्रयोग करून दाखवीत असे– तेव्हा पृथ्वीवरील लोक त्या कन्येचे सौंदर्य पाहून तिच्या सौंदर्यावर भाळून, नाचगाण्याशिवाय; तिच्या शरीराची मागणी करू लागले, तेव्हा त्या कन्येला ते पसंत पडले नाही. तिने नाचगाणी बंद केली आणि घरी येऊन आईला सर्व घडलेली हकिकत सांगितली– आईला खूप वाईट वाटले. तिने आपल्या मुलीला सांगितले की, तुझे पिता कैलासावर राहातात, त्यांना तू ही सर्व हकिकत सांग, म्हणजे ते तुला त्यावर मार्गदर्शन करतील.

ती मुलगी आपल्या भावाला घेऊन कलासावर गेली आणि तिने घडलेली घटना शंकराला सांगितली. तेव्हा शंकर महाराज म्हणाले, "तुझा जन्मच त्याच्यासाठी आहे, तू त्यात काहीही गैर वाटून घेऊ नकोस, पृथ्वीवर जाऊन लोकांचे मनोरंजन कर आणि पोट भर."

अशाप्रकारे शंकराच्या आशीर्वादाने त्या गंधर्वकन्येच्या मुलीने पृथ्वीवर येऊन लोकांचे मनोरंजन करून उपजीविका केली. पुढील काळात त्या मुलीच्या पोटी जन्मलेल्या सर्व संततीने पिढ्यान् पिढ्या हाच व्यवसाय चालू ठेवला आणि कोल्हाटी समाजाचा जन्म झाला, असे या समाजातील काही वयोवृद्ध जाणकार मंडळी सांगतात.

कोल्हाटी समाजनिर्मितीच्या वरील कथेच्या पूर्वभागाशी साम्य असलेली, मात्र कथेचा उत्तरार्ध वेगळा सांगणारी दुसरी एक दंतकथा काही लोक सांगतात की, शंकराने पृथ्वीवर पडलेल्या त्या गंधर्वकन्येचा उद्धार केल्यानंतर ती नाचगाणी करून पोट भरू लागली, परंतु तिचे पोट काही केल्या भरेना, तिची उपासमार होऊ लागली. तेव्हा ती आपल्या भावाला घेऊन पुन्हा इंद्रदरबारात गेली, तेथे तिने

गाणी म्हटली, नाच केला. तिच्या भावाने कसरतीचे आणि विचित्र उड्या मारण्याचे प्रयोग करून दाखविले. तेव्हा इंद्रदेव खूष झाले आणि त्यांनी त्या दोघांना आशीर्वाद दिला. जेव्हा ते दोघे एका नाड्यावरून खाली जाऊ लागले, तेव्हा योगायोग असा की, त्यांच्याबरोबर शंकर महाराज त्याच नाड्यावरून खाली उतरत होते. तें पृथ्वीवर आल्यानंतर त्यांनी नाडा कापला. देवाच्या नावाने एक बोकड कापला आणि त्या दिवशी सोमवार होता. शंकर खूष झाले आणि येथून पुढे दर सोमवारी बोकड कापा, असे सांगून निघून गेले.

पुढे ती दोघे बहीण–भाऊ नाचगाणी करून आणि कसरतीचे प्रयोग करून आपले पोट भरू लागले. तेव्हा त्याना खूप सुख लाभले. पुढे कसरतीच्या प्रयोगाचे वेळी काठीवरून विशिष्ट प्रकारे मारल्या जाणाऱ्या उडीच्या नावाने या समाजास कोल्हाटी हे नाव रूढ झाले. 'कोल्ह' म्हणजे उडी (किंवा 'कोलणे') आणि "हाटी" म्हणजे काठी, म्हणून काठीवरून उड्या मारणारा तो "कोल्हाटी" असे या समाजाला नाव मिळाले असावे किंवा **कोल्ह+हाटी=कोल्हाटी** असा शब्द रूढ झाला असावा.

## समाजातील वेश्यावृत्ती

कोल्हाटी समाजनिर्मितीच्या पहिल्या पुराणकथेचा आधार घेऊन या समाजातील काही जाणकार मंडळी सांगतात की, नाचगाण्याच्या व्यवसायामुळे या समाजातील स्त्रियांचा इतर समाजातील पुरुषवर्गाशी सततचा संबंध आल्याने, स्त्रियांमध्ये वेश्यावृत्तीचा अधिक प्रमाणात प्रसार झाला. या समाजातील स्त्रिया पूर्वी नाचगाण्याबरोबरच वेश्याव्यवसाय करूनच कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असत अशा व्यवसायाला या समाजातील पुरुषांचीही संमती असे. घरातील पुरुष स्वतः होऊन आपल्या कुटुंबातील तरुण मुलींना अशा व्यवसायासाठी प्रवृत्त करीत असत. आणि मुलीसुद्धा स्व-इच्छेने हा व्यवसाय स्वीकारीत असत. किंवा त्यांना बळजबरीने त्यांच्या इच्छेशिवाय घरातली कर्ती पुरुष मंडळी वेश्याव्यवसाय करायला लावत आणि पुरुष आरामात त्यांच्या कमाईवर जगत असत. याचा परिणाम असा झाला की, या समाजातील तरुणांना लग्नासाठी समाजातील मुली मिळणे दुर्मिळ झाले. त्यामुळे परजातीतील स्त्रियांना पळवून नेऊन किंवा फूस लावून त्यांची विक्री केली जाऊ लागली. अशा खरेदी-विक्रीतून मिळालेल्या परजातीतील मुलींबरोबर या समाजातील तरुण मुलें संसार थाटत असत आणि चारपाच मुले झाल्यावर रीतसर लग्न करीत असत. त्याला या समाजात 'कजेरी' पद्धत (किंवा 'कजेरी' पद्धतीचा विवाह) म्हणत असत.

"कजेरी" विवाहपद्धतीमुळे या समाजात विचित्र स्थिती आढळून येते. "बाप कोल्हाटी आणि आई मराठी" अशी आमची अवस्था आहे, असे एक कार्यकर्ता

म्हणाला.

कोल्हाटी समाजातील स्त्रिया जातीबाहेरील पुरुषाशी सबंध ठेवीत आणि कोल्हाटी पुरुष परजातीतील स्त्रियांशी संबंध ठेवीत. त्यामुळे या समाजातील काही लोक अभिमानाने सांगतात, "आम्ही जातीचे कोल्हाटी, आमचे सोयरे मराठी" वगैरे.

कोल्हाटी हा समाज मूळचा महाराष्ट्रातील नसून, आपल्या अंगचे कलागुण दाखविण्याच्या निमित्ताने पोट भरण्यासाठी उत्तर प्रदेशातून भटकत भटकत महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते.

## मूळ ठिकाण मथुरा

कोल्हाटी समाज १२ व्या शतकात महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जातें. मथुरा हे या समाजाचे मूळ ठिकाण असून, तेथील 'नट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या समाजाशी हे लोक आपला संबंध असल्याचे सांगणात. 'नट' या समाजातील लोकांचा पारंपरिक व्यवसाय आणि कोल्हाटी समाजाचा पारंपरिक व्यवसाय यात जवळचे साम्य असल्यामुळेच हे संबंध जोडले असावेत. तसेच कोल्हाटी समाजाची मातृभाषा आणि 'नट' समाजाच्या मातृभाषेत साम्य असल्याचे सांगण्यात येते. याशिवाय व्यवसायासाठी म्हणून जी सांकेतिक भाषा बोलली जाते त्या भाषेला 'पारुषी' असे म्हणतात. त्या भाषेशी नटांचे साम्य आहे असे सांगितले जाते.

## जात पंचायत

इतर भटक्या जातीप्रमाणे याही समाजात जात पंचायत आजही अस्तित्वात असल्याचे सांगण्यात येते. मात्र इतर समाजाप्रमाणे पंचायतप्रमुख या समाजात नसून, समाजातील सर्वांनाच पंचायतीतील कामकाजात सहभाग घेता येतो. समाजातील भांडणतंटे, लग्न, विधी, उत्सव आणि इतर कार्यक्रमात समाजातील वयोवृद्ध जाणकार लोक पंच म्हणून नाममात्र काम पाहातात.

समाजांतर्गत घडलेल्या गंभीर घटनांचा न्यायनिवाडा करावयाची ठिकाणे या समाजाने कायम केलेली आहेत. पौष पौर्णिमेला जेजूरी, रंगपंचमीला मढी; तर अक्षय तृतीयेला सोनारी येथे पंचायत बसते आणि न्यायनिवाडा करते.

या समाजातील न्यायनिवाड्यावेळची पद्धत वैशिष्टयपूर्ण आहे. एखाद्या गंभीर घटनेचा न्यायनिवाडा करायचा असेल तेव्हा या समाजातील पंचायतीमध्ये भाग घेणारे लोक लिंबाच्या झाडाखाली गोलाकार बसतात. (जेजुरी येथील जात–पंचायतीची बसण्याची जागा "बंगाली" या नावाने ओळखली जाते.)

समाजातून बहिष्कृत केलेली व्यक्ती पाणी टाकून, शुद्ध करून समाजात परत घेण्याची पद्धत या समाजात आहे. मात्र अशा तऱ्हेने शुद्ध करून समाजात न

घेतलेल्या व्यक्तीशी जर इतर व्यक्तीने संबंध ठेवले, तर त्याही व्यक्तीला समाज बहिष्कृत करतो.

समाजातून बहिष्कृत केलेल्या व्यक्तीकडून पंच कमिटी नाममात्र एक रुपया घेते, एक रुपया पंचासमोर ठेवल्यानंतरच त्या व्यक्तीवरील आरोपाची चर्चा केली जाते. बहिष्कृत व्यक्तीच्या बाजूने बोलणारे दोन प्रतिनिधी (वकील) त्यांची बाजू मांडतात, ती योग्य असेल तर पंच कमिटी संबंधित व्यक्तीकडून पंचायतीचा जेवणाखाण्याचा खर्च घेऊन, जात पंचायत संबंधित व्यक्तीस त्या गुन्ह्यातून मुक्त करते. तेव्हा त्या व्यक्तीने न्यायनिवाडयासाठी जमलेल्या सर्व लोकास व न्याय-पंचायतीच्या प्रमुखास दारू द्यावी लागते, जेवण द्यावे लागते. संबंधित व्यक्तीने जर परंपरेनुसार दारू, जेवण दिले; तर त्या व्यक्तीस पुन्हा समाजात घेतल्याचे जाहीर केले जाते. तेव्हाच समाजातील इतर लोक त्याच्याशी रोटीबेटी व्यवहार सुरू करतात, किंवा त्याला लग्न, मैत किंवा इतर सामाजिक कार्यात बोलावितात.

## न्यायदानाची पद्धत

या समाजातील न्यायपद्धती ही सदोष असल्याचे सांगितले जाते. समाजातील आर्थिक, शेतीचे अथवा देण्या-घेण्याचे व्यवहार कधीही लेखीटाकी केले जात नाहीत. सर्व व्यवहार तोंडी होत असतात. परंतु जर एखाद्या व्यक्तीने आर्थिक व्यवहारात फसवणूक करण्याचा प्रयत्न केला, तर खरेखोटे पाहाण्यासाठी एक विशिष्ट पद्धत वापरली जाते, तिला ते " हांडी मारणे " असे म्हणतात.

एका मडक्यात तेल अगर शेण किंवा गोमूत्र घालून, ते मडके विस्तवावर ठेवून उकळी येईतोपर्यंत तापविले जाते. नंतर त्या मडक्यात पैसा अगर न विरघळेल असा खडा टाकतात व ज्याचेवर संशय असेल त्या व्यक्तीस उकळत्या आधणातून पैसा किंवा खडा हाताने काढावयास सांगतात. जर त्या व्यक्तीचा हात भाजला, तर तो खोटे बोलतो; म्हणजे तो खोटा आणि जर हात भाजला नाही तर तो खरा.

अशाप्रकारे खरे-खोटे पाहाण्यासाठी अशा विचित्र प्रथा या समाजात रूढ होत्या. आजही काही खेडयापाडयांत वरील पद्धत अंमलात आणली जाते.

## कुलदैवते

कोल्हाटी समाज हिंदु धर्मीय असून, हे लोक धर्मातील रीतीरिवाज पाळतात. त्यांची कुलदैवते शंकर, खंडोबा, अंबाबाई, काळूबाई या नावाने ओळखली जाणारी असून, त्यांचे उत्सव हे लोक साजरे करतात. देवदेवतांच्या नावानें उपासतापास, नवस आदी प्रकार सर्रास केले जातात. वरील देवतांचे देव्हारे राहत्या घरात न ठेवता, घरापासून थोडया अंतरावर ठेवण्याची पारंपरिक प्रथा या समाजात आहे. देवाच्या देव्हाऱ्यात चांदीचे आणि सोन्याचे मुखवटे ठेवलेले असतात. त्याला ते

"टाक" असे म्हणतात. या समाजातील प्रत्येक कुटुंबाचे असे देव्हारे आणि टाक असतात.

देवापुढे बकरे कापण्याची या समाजात विशिष्ट पद्धत आहे. नवसासाठी एखादे बकरे देवीपुढे बळी द्यायचे असेल; तर प्रथम त्या बकऱ्याची पूजा केली जाते. नंतर देवीपुढे त्याला उभे केले जाते. अशावेळी त्या बकऱ्याने जर अंग झाडले तरच ते बकरे बळी दिले जाते, अन्यथा त्याला सोडून दिले जाते. बकऱ्याने अंग झाडले; म्हणजे देवीला ते मान्य आहे असे समजले जाते.

## बालविवाहाची प्रथा

या समाजात बालविवाहाची प्रथा पूर्वीपासून चालत आलेली आहे. लग्न ठरविण्याचे काम समाजातील प्रमुख मंडळी करतात. इतर समाजाप्रमाणे मुलीने मुलाला हुंडा देण्याची पद्धत या समाजात नाही, तर मुलानेच मुलीला सातशे ते एक हजार रुपयापर्यंत रक्कम द्यावी लागते. त्याचे कारण सांगताना एक कार्यकर्ता म्हणाला– आमच्या समाजातील महिला नाचगाण्याच्या निमित्ताने समाजातून बाहेर जातात. त्या समाजात सहसा लग्न करीत नाहीत. त्यामुळे या समाजातील तरुणांना लग्नासाठी समाजातील मुली मिळत नाहीत, आणि जर एखादी मुलगी मिळालीच; तर तिला व्याजापोटी रक्कम द्यावी लागते, किंवा बाहेरच्या जमातीतील मुली फसवून किंवा वेळप्रसंगी पळवून आणून तिच्या बरोबर संसार थाटावा लागतो.

## कोल्हाट्यांची मैत

कोल्हाटी हा समाज हिंदू धर्मीय असला; तरी या समाजात प्रेताचे दहन केले जात नाही. प्रेताचे दफन केले जाते. मृत व्यक्तीस उलटचा बाजेवर ठेऊन प्रेतयात्रा काढली जाते. ज्या ठिकाणी दफन केले असेल त्या ठिकाणी स्वयंपाक करून जेवण केले जाते. व त्या व्यक्तीच्या स्मरणार्थ तिसरे दिवशी कबर बांधली जाते.

मेलेल्या माणसाच्या आत्म्याला शांती लाभावी, म्हणून त्या ठिकाणी दारू ओतली जाते, आणि बकरे कापून समाजाला जेवण दिले जाते. असे केल्याने मृतात्मा शांत होतो, आणि कुटुंबात बरकत येते, अशी या समाजातील लोकांची धारणा आहे.

कोल्हाटी समाजात मृताचे सुतक सहा महिने पाळले जात असे. कधी कधी तर साठ महिने सुतक पाळले जात असे. या काळात, म्हणजे सुतक फिटेपर्यंत पूजा-अर्चा किंवा देवकार्यसुद्धा बंद केले जात असे. सुतकाचा हा साठ महिन्यांचा काळ समाजातील भाऊबंदकीसाठी व एकमेकांची अडवणूक करण्यासाठीच वापरला जात असे, घरातलं शुभकार्य सुतक म्हणून मुद्दाम टाळले जात असे. असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

## मुंजविधी

कोल्हाटी समाजात मुंजविधीस अतिशय महत्त्व आहे. समाजातील प्रत्येक पुरुषाची मुंज केली जाते. मुंज झाल्याशिवाय कोणत्याही पुरुषाला लग्न करता येत नाही, मुंजी शिवाय लग्न केले तर लग्नास समाज मान्यता देत नाही. पश्चिम महाराष्ट्राचे तुलनेने विदर्भ-मराठवाड्यात मुंजप्रथेला सामाजिक प्रतिष्ठा आहे.

पूर्वीच्या काळी वेश्याव्यवसाय स्वीकारणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण या समाजात मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगण्यात आले. १६ वर्षांनंतर असा व्यवसाय स्वखुषीने स्वीकारणाऱ्या तरुणींना पूर्वी समाजमान्यता मिळत असे. हा विधी लग्नासारखा साजरा होई. गेल्या काही वर्षांपासून समाजातील ही अनिष्ट प्रथा पूर्णपणे बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## सत्पुरुष कोल्हाटीबाबा

या समाजात कोल्हाटीबाबा या नावाने ओळखली जाणारी व्यक्ती सत्पुरुष होऊन गेली, असे सांगितले जाते. मौजे नांदगाव (ता. राहुरी जि. अहमदनगर) या ठिकाणी कोल्हाटीबाबांची समाधी आहे. तेथे या समाजातील महाराष्ट्रातील सर्व लोक बाबांच्या दर्शनास जातात.

या बाबाविषयी एक चमत्कारिक कथा या समाजातील लोक सांगतात, ती अशी–

काही वर्षांपूर्वी कोल्हाटीबाबा आपल्या साथीदारांसह कसरतीचे खेळ करण्यासाठी म्हणून मौजे नांदगाव येथे आले. त्यावेळी तेथील गावकऱ्यांनी अशी पैज लावली की, खेळ करीत असताना कोल्हाटीबाबा जिथपर्यंत आभाळी उडत जाईल किंवा उडी मारेल; तेवढी जमीन आम्ही कोल्हाटीबाबाला देऊ. तेव्हा कोल्हाटीबाबाने गावकऱ्यांचे आव्हान स्वीकारले.

खेळ सुरू झाला तेव्हा गावकऱ्यांना वाटले, की दहा-वीस फुटांपलीकडे बाबा उडणार नाही, परंतु प्रत्यक्षात मात्र कोल्हाटीबाबा आकाशात दूरपर्यंत उडत राहिला. गावकऱ्यांना चिंता वाटली. ते म्हणाले,– बाबाने आमच्या गावच्या वेशीपर्यंत उडत जावे, परंतु गावची हद्द सोडून दुसऱ्या गावच्या हद्दीत गेला तर ती जमीन कोणी द्यायची ? आणि घडले तसेच ! बाबा गावची हद्द ओलांडून दुसऱ्या गावच्या हद्दीत उडत जाऊ लागला, तेव्हा गावकऱ्यांनी त्या बाबाला वरचेवरच मारले. बाबा खाली पडले आणि मेले. तेथे बाबाची गावकऱ्यांनी समाधी बांधली. तीच नांदगाव येथील समाधी होय.

(वरील घटनेचा पुरावा कुठेही उपलब्ध नाही. परंतु ही घटना दंतकथा नसून सत्यकथा आहे, असे या समाजातील काही जाणकार विश्वासाने सांगतात.)

शे-सव्वाशे वर्षांपूर्वी या समाजातील लोक एकत्र राहून कसरतीचे खेळ करीत

असत. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. परंतु गेल्या काही वर्षांपासून, स्वातंत्र्योत्तर काळात या समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणात कसरतीचे खेळ बंद केले आहेत. पूर्वीची भटकंती आता थांबलेली आहे. हे लोक गावोगावी स्थाईक झालेले आहेत, मराठवाड्यात क्वचित् ठिकाणी या समाजातील लोक असे खेळ करताना दिसतात.

औरंगाबाद जिल्ह्यात वडगाव या गावी पूर्वी कोल्हाटी समाजाची मोठी वस्ती होती, त्यामुळे हे गाव " कोल्हाट्याचे वडगाव " या नावानेच ओळखले जाते, असे एकाने सांगितले.

बदलत्या काळानुसार या समाजाने आपली उपजीविकेची माध्यमे बदललेली आहेत. विशेषतः या समाजातील स्त्रिया कसरतीचे खेळ करण्यापेक्षा नाच-गाणी करूनच आपली उपजीविका करतात. त्यांनी संगीतबाऱ्या, तमाशा-पार्ट्या काढलेल्या आहेत. पुरुष मंडळीसुद्धा तमाशा, संगीतपार्टीत आज काम करताना आढळतात. काहींनी या कलेत महाराष्ट्रात चांगलेच नाव कमविले आहे.

महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेश भटक्या समाजामध्ये करून त्यांना त्यांच्या विकासाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. शासनाने ' कोल्हाटी ' ही मुख्य जात आणि तत्सम जाती (पोटजाती) म्हणून ' डोंबारी ' समाजाचा समावेश केलेला आहे. इतर कुठल्याही पोटजातींचा उल्लेख नाही. किंवा समावेशही नाही.

या समाजातील जाणकारांच्या मते, ' डोंबारी ' ही कोल्हाटी समाजाची पोट-जात नसून, ती स्वतंत्र जात आहे. कसरतीच्या प्रयोगातील साम्य वगळता इतर कोठेही या समाजात साम्य आढळत नाही. प्रत्येक जमातीची परंपरा, रूढी, चालीरिती, दैवते, भाषा, कुळी, आणि निर्मितीची कल्पना वेगवेगळी आहे. या दोन जमातीत रोटीबेटी व्यवहार होत नाहीत, या जमाती स्वतंत्र आणि वेगळ्या आहेत, म्हणून महाराष्ट्र शासनाने कोल्हाटी आणि डोंबारी या दोन समाजांची स्वतंत्र नोंद करावी.

महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या ८० ते ९० हजाराच्या जवळपास आहे. त्यापैकी पन्नास टक्केचेवर समाजातील लोक आजही फिरस्त्याचे जीवन जगत आहेत.

अनेक रूढी, परंपरा जपणारा आणि पारंपरिक कलेवर गुजराण करणारा हा समाज राजकीय आणि शैक्षणिक स्थानापासून आजही दूर राहिलेला आहे. या समाजात ९६ टक्के लोक अशिक्षित आहेत. मुळातच हा समाज भटका असल्याने त्यांच्यासमोर अनंत अडचणी आहेत. जातीचे दाखले न मिळणे, बँकांनी कर्ज नाकारणे, नोकरीत अडवणूक करणे, राहण्यासाठी कायमचे ठिकाण नसणे, या आणि अशा प्रकारच्या अडचणी समाजाला भेडसावीत आहेत.

• • •

# कुडमुडे जोशी

व्यापाराच्या निमित्ताने गावोगाव सतत भटकत असलेला आणि भिक्षा मागून किंवा काही पारंपरिक कलेच्या आधाराने स्वतःची उपजीविका करणारा लोकसमूह अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वेगवेगळया जाती जमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो. अशा या लोक समूहाला " भटके-विमुक्त " असे म्हटले आहे.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या गावगाडयातील ग्रामव्यवस्थेमध्ये, या भटक्या विमुक्त जाती-जमातींचा समावेश नव्हता, परंतु गावगाडयाबाहेर राहून गावच्या आश्रयाने हा लोकसमूह आपली उपजीविका करीत असे. अर्थात् हे लोक कोणत्याही गावात दीर्घकाळ किंवा कायमचे राहत नसत. त्यांना तसं राहताही येत नसे, काही वेळेला त्यांना मुदतीपेक्षा जास्त राहू दिलं जात नसे, त्यामुळे हे लोक सतत एका गावाहून दुसऱ्या गावाला भटकत असत आणि आपला चरितार्थ भागवीत असत.

अशा या सतत भटकंतीमुळे त्यांना गावात स्वतःच्या मालकीचं घर नाही, शेत-जमीन नाही, काही भटक्या जमातींना तर नाव सांगायला स्वतःचा गावसुद्धा नाही, असे या देशातलेच पण देशातच उपरे ठरलेले, शेकडो भटक्या जाती-जमातींचे समूह आपल वेगळेपण, वेगळी परंपरा आणि वेगळं अस्तित्व आजही टिकवून आहेत.

### स्वतंत्र व्यवसाय

स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या काही वर्षांत कामधंद्याच्या निमित्ताने भटक्या जमातींपैकी काही लोक शहरात येवून राहिले आणि जमेल त्यामार्गाने आपली उपजीविका करीत आहेत. कोणी पारंपरिक कलेच्या माध्यमातून तर कोणी छोटे छोटे स्वतंत्र धंदे करून.

ज्योतिष सांगण्याची कला अवगत असलेल्या किंवा कोणत्याहीं प्रकारे कुंडली न मांडता माणसाच्या चेहऱ्यावरून व हातावरील रेषांच्या आधारे भविष्य सांगणाऱ्या

ज्योतिषांच्या काही भटक्या जाती, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत आणि शहरांत आजही पाहावयास मिळतात. यामध्ये मेंडगी जोशी, सरोदे जोशी, कुडबुडकी जोशी, डवरी जोशी, काशी कापडी जोशी, सहदेव जोशी, सरवदे जोशी, सरोदा जोशी, पिंगळा जोशी, उमऊवाले जोशी आणि कुडमुडे जोशी या जातींचा समावेश आहे.

या शिवाय महाराष्ट्रात, नंदीबैलवाले, तिरमाळी, मेंढगी, मनकवडे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भटक्या जातीचे लोक ज्योतिष-भविष्य, हस्तमुद्रा पाहतात किंवा चेहऱ्यावरून भविष्य सांगतात. यांना महाराष्ट्रातील लोकज्योतिषी या नावानेही ओळखले जाते. ज्योतिष सांगणे हा या जमातींचा पारंपरिक व्यवसाय आहे.

वरील जाती ज्योतिष-भविष्य सांगणाऱ्या जाती असल्या, तरी प्रत्येक समूहाचं (जातीचं) अस्तित्व हे स्वतंत्र आणि वेगळं आहे. त्यांचे रीतिरिवाज, भाषा, चालीरिती, वेषभूषा आणि ज्योतिष-भविष्य सांगण्याची पद्धत वेगवेगळ्या प्रकारची आहे. या वेगवेगळ्या जातींमध्ये रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत, असे सांगण्यात आले.

पूर्वी या समाजातील लोक एका संस्थानातून दुसऱ्या संस्थानात हेरगिरीची कामं करीत असत. त्यावेळी असे काम करण्यासाठी त्यांना वेगवेगळ्या प्रकारचा वेष घ्यावा लागत असे. त्याचबरोबर वेगवेगळ्या आकाराची छोटी-मोठी वाद्ये वापरावी लागत असत. त्या वाद्यांच्या विशिष्ट आवाजावरून जोशी समाजातील जातींना वेगवेगळी नावे रूढ झाल्याचे; त्या समाजातील एका कार्यकर्त्याने सांगितले. (उदा. कुडमुडे, कुडबुडकी, उमऊवाले, पिंगळ्याचा आवाज काढणारे पिंगळा जोशी वगैरे.)

## कुडमुडे जोशी

कुडमुडे जोशी या समाजाला महाराष्ट्रात व बाहेर 'खिवारी' याही नावाने ओळखले जाते. पुणे शहरात राहणारे या समाजाचे लोक मुख्यत: गुलबर्गा आणि त्या आजूबाजूला असलेल्या राहूर, बंकूर, शाहाबादवाडी, बोळेवार, सरगडी, तडकल, रटकल, हर्सूला, तिवनगी, हवनुर, बबलाद, गुसणगी, बोन्नलगी आणि नंदेकूर खेड्यांतून आलेले आहेत.

पोपटाच्या साहाय्याने या समाजातील लोक भविष्य सांगत असल्याने, त्यांना 'राघुवाले जोशी' असेही म्हटले जाते. शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला पोपटाचा पिंजरा आणि त्या त्या राशीची छापील भविष्याची पाकिटे घेऊन हे लोक बसलेले असतात. विशेषत: अशिक्षित लोक आपलं नशीब आजमाविण्याचं काम त्यांच्याजवळ करतात. पन्नास पैशापासून पाच-दहा रुपये घेऊनसुद्धा ही मंडळी भविष्य सांगतात, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

## काही अनुभव

भविष्याविषयी काही अनुभव विचारले असता, या समाजातील एका तरुणाने सांगितले,– वेगवेगळ्या प्रकारचे लोक ज्योतिष पाहण्यासाठी आमच्याकडे येतात. कोणी प्यालेल्या अवस्थेत येतो तर कोणी भविष्य खरं-खोटं पाहण्यासाठी किंवा आमची टिंगल करण्यासाठी येतो. त्या माणसांच्या स्वभावानुसार आम्ही त्याच्याशी 'बोलबच्चन' करतो.

पोपटांच्या साहाय्याने ज्योतिष पाहणे किंवा पोपटाने व्यक्तीच्या संबंधित भविष्याचे पाकिट चोचीने बरोबर पकडून आणणे; याविषयी कुतूहल वाटणे साहजिकच आहे. या कुतूहलापोटी त्या समाजातील एका तरुणाला विचारले असता तो म्हणाला,– पोपटाला अशा प्रकारचं आम्ही ट्रेनिंग देतो. नवीन पोपटाला काही काळ उपाशी ठेवतो. नंतर त्याला खूप भूक लागली की आम्ही शेंगादाणे त्याच्यापासून थोड्या अंतरावर ठेवतो. पोपट शेंगादाणे खाण्यासाठी आला की त्याच वेळेला त्या शेंगादाण्यावर आम्ही पाकिट ठेवतो. पोपट ते पाकीट चोचीत धरून जातो. असे वारंवार केल्याने चोचीत पाकिट धरण्याची त्याला सवय लागते आणि ज्योतिष पाहण्यासाठी म्हणून त्याच्या या सवयीचा आम्ही उपयोग करून घेतो.

कुडमुडे जोशी या समाजात इतरांना उमगणार नाही अशी एक सांकेतिक भाषा बोलली जाते. तिला 'खिवारी' किंवा 'पारसी' भाषा असे म्हणतात. उदा.– वैसलास का (जेवलास का), कुठं निकळला व्हतास (कुठे गेला होतास), बाणगी (बाई), बाणगा (पुरुष), रपकेश-शिपडे (पोलिस), शिपडे गास्कले (पोलिस इकडे आले), गोडसा कुडपिलास का (चहा पिलास का), आज किती खापे भेटले (आज किती धंदा झाला) वगैरे शब्द 'खिवारी किंवा 'फारसी' भाषेतील होत.

## दोन धर्मांचे रिवाज

हा समाज हिंदू आणि मुसलमान धर्माचे रिवाज पाळताना आढळतो. हिंदू धर्मातील सर्व सण, उत्सव पाळत असतानाच काही मंडळी ताबुताचे महिन्यात 'पंजा'ही आपल्या घरात बसवितात, रोजाही पाळतात, मोहरमचे उपवासही धरतात. पीर आणि पैगंबरला मानणारेही काही लोक या समाजात आहेत. त्याप्रमाणेच हिंदूंच्या देवदेवतांच्या तसबिरी आणि देव्हारे काही लोकांच्या घरात पाहावयास मिळतात. मरिआई ही या समाजाची प्रमुख देवी. मरिआईचे देव्हारे बहुतेक लोकांच्या घरी पाहावयास मिळतात.

गुलबर्गा येथे आषाढ महिन्यात मरूबाई (मरिआई) चा उत्सव असतो. त्या उत्सवासाठी या समाजातील लोक मोठ्या संख्येने गुलबर्ग्यास जातात. याशिवाय होळाची आई, देवनूरची आई, जंगल सटवाई, येळमक्कलची आई, ऊत्ताची आई, काळ्या लुगड्याची आई अशाही आणखी काही त्या समाजाच्या देवता आहेत. या

देवतांपुढे बकरी, कोंबडी कापली जातात. नवस केले जातात. दारू, ताडी यांचाही नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. (मरिआईला कर्नाटक भागात मरुबाई म्हणतात.)

या समाजातील स्त्री-पुरुषांच्या अंगात मरीआई आणि 'पीर' येतात असा समज आहे. त्याबरोबरच कुटुंबातील मृत आई-वडीलही अंगात येतात अशी कल्पना आहे. त्यासाठी उपास-तापास आणि नवसाचे विधि करतात.

## पंचायतीचा सहभाग

समाजातील तंटे, लग्नकार्ये आणि समाजाचे इतर रीतीरिवाज यामध्ये पंचायतीचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. परंपरेने चालत आलेली जात-पंचायत ही संस्था आजही या समाजात अस्तित्वात आहे. या जात-पंचायतीच्या प्रमुखाला 'पाटील' असे म्हटले जाते. विशेषत: या समाजातील वाकोडे, भोरे आणि शिंदे या आडनावांचे लोक परंपरेने पाटील म्हणून ओळखले जातात. असे वेगवेगळ्या भागांत वेगवेगळे पाटील आहेत. या पाटील मंडळींना जात पंचायतीच्या कामात मदत करणारे आंबले आणि इगवे या आडनावाचे लोक असतात. त्यांना 'गोते' असे म्हणतात.

जातपंचायतीचा निर्णय डावलून जर कोणी व्यक्ती कोर्टात न्याय मागण्यासाठी गेली, तर जात पंचायत त्याला जातीच्या बाहेर टाकते. त्या व्यक्तीशी रोटीबेटी व्यवहार बंद केले जातात. त्याला 'वाळीत टाकणे' असेही म्हणतात.

'वाळीत' टाकलेली व्यक्ती जर पुन्हा जातीत घ्यावयाची असेल, तर जात-पंचायतीने केलेला दंड त्या व्यक्तीला भरावा लागतो. दंड भरल्यास पुन्हा त्याला जातीत घेतले जाते. एक पैशापासून पाच हजारापर्यंत दंडाची रक्कम असते. एक पैसा दंड म्हणजे अत्यंत नामुष्कीची गोष्ट असे मानले जाते. एक पैसा दंड केलेली व्यक्ती कवडी किंमतीची मानली जाते. ही प्रथा आजही अस्तित्वात आहे.

विशेषत: न्याय निवाड्याच्या कामासाठी पंचायत बसली असताना, 'साक्ष' म्हणून जात पंचायतीमध्ये वादी आणि प्रतिवादी स्वत:च्या हातातील अंगठी काढून पंचासमोर ठेवतात. जो गुन्हेगार असेल त्याला 'बाटगीच्या' म्हणून पाटील वारंवार (त्याचा) उल्लेख करत असतो. हा शब्द या समाजात अत्यंत नीच मानला जातो.

## ताडीची घागर–लगनघडा

या समाजातील लग्न ठरविण्यासाठी बैठक असेल, तर पंच मंडळी आणि इतर लोक ताडी पिऊनच लग्न ठरवण्यासाठी बसतात. लग्न ठरविणारी जी पंच मंडळी असते त्यांना वधूवरांच्या कुटुंबियांकडून खुषीने ताडीची घागर भरून दिली जाते. त्याला ते 'लगन घडा' असे म्हणतात.

ज्या कुटुंबात लग्नकार्य असेल त्या लग्नकार्यात दुसऱ्या कुटुंबातील लोकांनी राबावयाची रीत आहे. अशा राबणाऱ्या माणसाला ‘देवका कुंभार’ असे म्हणण्याची प्रथा आहे. लग्नाचे दिवशी या देवका कुंभाराला दारू व मटण देऊन त्याला ‘मान’ देण्याची प्रथा आहे.

समाजात बाल विवाहाचे प्रमाण जास्त आहे. पण लग्नात हुंडा वगैरे घेण्याची रीत नसल्याचेही सांगण्यात आले. लग्नाला एकूण येणाऱ्या खर्चापैकी दोन भाग नवरदेवाकडील लोकांनी आणि एक भाग नवरीकडील लोकांनी देण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे लग्नाचे वेळी समाजाला जेवण देण्यासाठी मांसाहार आवश्यक मानला जातो. त्यासाठी मुलाकडून दोन आणि मुलीकडून एक बकरे घेऊन पंचांच्या उपस्थितीत ते कापले जाते आणि त्याचे (मांसाचे) समान वाटे करून प्रत्येक घरी एक याप्रमाणे दिले जातात. मात्र जी व्यक्ती वाळीत टाकलेली असेल (बाटगी असेल) अशा व्यक्तीच्या कुटुंबाला वाटा दिला जात नाही.

लग्न ब्राह्मणाच्या साहाय्याने लावले जातें.

या समाजातील मुलीने किंवा मुलाने परजातीतील मुला-मुलीशी लग्न केले, तर संबंधित व्यक्तीस आणि त्याच्या कुटुंबास जात पंचायत वाळीत टाकते. किंवा स्त्रीने वा पुरुषाने जातीत किंवा जातीबाहेर अनैतिक संबंध ठेंवला; तरी त्या व्यक्तीस जातीबाहेर ठेवण्याची प्रथा रूढ आहे.

या समाजातील मुलाचा जन्म झाल्यावर एक विशिष्ट प्रथा पाळण्याची पद्धत आहे. ज्या घरात बाळाचा जन्म होईल अशा कुटुंबातील व्यक्तीने दुसऱ्या बाईच्या हातून, या समाजातील प्रत्येक कुटुंबात एक पैसा देण्याची प्रथा पूर्वी होती. अलीकडे पैशाचे नाणे वापरात नसल्याने पाच पैशाचे नाणे वाटले जाते.

## मरण महागडे

या समाजात ‘मैत’ होणे अत्यंत महागडे. ज्या घरात ‘मैत’ होते त्या कुटुंबाला जात-पंचायतीच्या कठोर नियमांना सामोरे जावे लागते. मेल्यानंतरही मृत व्यक्तीच्या कुटुंबाची आर्थिक पिळवणूक जातपंचायतीकडून आणि परंपरा मानणाऱ्या समाजातील जुन्या लोकांकडून केली जाते, असे तरुण कार्यकर्त्यांनी सांगितले. ते म्हणाले, “आमच्या समाजात माणूस मेल्यानंतर त्याला स्मशानात घेऊन गेल्यावर विसाव्याच्या ठिकाणी (प्रेत विसाव्याला ठेवतात तेथे) मृत व्यक्तीच्या कुटुंबातील प्रमुखाने मैतीला आलेल्या प्रत्येक लहानथोर पुरुष मंडळीस एक एक ‘विडी’ देण्याचा प्रघात आहे. ज्या कोणाला ‘विडी’ ओढण्याची सवय नसेल अशांना आणि मुलांनाही तेथे ‘विडी’ ओढावीच लागते. सर्वांनी विडी ओढून झाल्यावरच मग प्रेत पुन्हा उचलून दहनाच्या किंवा पुरण्याच्या ठिकाणी नेले जाते. प्रेताची विल्हेवाट लावली जाते आणि मैतीवरून परत आल्या-आल्या सर्व मंडळींना ताडीच्या

गुत्त्यात घेऊन जावे लागते. तेथे सर्वांना ताडी पाजावी लागते. तो खर्च ज्या कुटुंबात मैत झाली असेल त्या कुटुंबातील प्रमुखालाच करावा लागतो.

मैत झाल्याचे तिसरे दिवशी एक बकरे कापून मृताच्या नावाने नैवेद्य दाखविण्याची प्रथा आहे. तसेच पाचव्या दिवशी जात पंचायतीतील पंचांच्या म्हणण्याप्रमाणे पुन्हा दोन बकऱ्या खरेदी करून, ती कापण्यापासून सर्व सोपस्कार करण्याचे कॉन्ट्रॅक्ट पंचानाच द्यावे लागते. त्याच्या मोबदल्यात पंचांना ताडी, विडी, काडी, सर्व खर्च मैतीघरच्या लोकांना करावा लागतो. याला "तोंडातली माती काढणे" असे म्हटले जाते.

## देवात मिसळणे

मैताच्या मुलाने करावयाचा एक विशिष्ट विधी त्या समाजातील कार्यकर्त्याने सांगितला. मैताच्या मुलाने टोपलीत पेटता दिवा ठेवायचा. ती टोपली हातात घ्यायची. दिवा विझू नये, म्हणून अंगावर चादर किंवा कापड पांघरून पचांबरोबर मारुतीच्या देवळात जायचे आणि मृत व्यक्तीचे नाव घेऊन 'अमुक तमुक मेला, देवाला मिळाला' असे मोठ्याने म्हणत पाच, दहा पैसे मारुतीसमोर फेकायचे आणि टाळचा वाजवत बाहेर यायचे. या विधीला "देवात मिसळणे" असे म्हटले जाते.

असा विधी करण्याच्या पाठीमागें या समाजात एक अंधश्रद्धा रूढ आहे. असा विधी केला तर मृताचा आत्मा देवामध्ये मिसळला जातो. अन्यथा ती व्यक्ती भूतपिशाच्च योनीत प्रवेश करते, अशी कल्पना आहे.

विशेषत: मैतीचे तिसरे दिवशी जी 'बकरी' मृताच्या नावाने कापावी लागते, ती या प्रेताच्या चार खांदेकऱ्यांच्या समोरच कापावी लागते. ते खांदेकरी झोपले असतील; तर त्यांना झोपेतून उठवून कापलेल्या बकऱ्यांचं रक्त दाखवावं लागतं, तसं जर कोणी केलं नाही तर ते खांदेकरी मृत व्यक्तीच्या कुटुंबाशी प्रचंड भांडण करतात, असे एक कार्यकर्त्याने सांगितले. या मागची कल्पना विचारली असता असे सांगण्यात आले की, असे रक्त दाखवले नाही तर खांदेकऱ्यांना आजार होईल, मृताचा आत्मा खांदेकऱ्यांना त्रास देईल, अशी या समाजात पूर्वापार कल्पना रूढ आहे.

## तरुणांचे प्रयत्न

अशा अनेक विचित्र कल्पना, रूढी, परंपरा उराशी बाळगून हा समाज आजही जगतो आहे. परंतु या समाजातील तरुणवर्ग मात्र या वाईट रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धा समजातून नाहीशा करण्याचे प्रयत्न करताना आढळतो. गेल्या काही वर्षांत प्रामुख्याने समाजातील तरुणांनी समाजातील मैतीच्या वेळची बिडी-पद्धत

किंवा देवात मिसळवण्याची पद्धत, बकरी कापण्याची पद्धत, लगन-घडा देण्याची पद्धत या सर्व पद्धती बंद केल्याचे सांगितले.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाची भटकंती काही प्रमाणात थांबलेली आहे, बहुतेक लोक खेड्यापाड्यांतून शहरांत व्यवसायाच्या निमित्ताने आले आहेत. शहरांतील झोपडपट्टी विभागात हे लोक प्रामुख्याने आढळतात. समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, पारंपरिक वाईट रूढीचे आणि अंधश्रद्धेचे उच्चाटन व्हावे, असे या समाजातील नव्या पिढीला वाटते, तसे ते लोक प्रयत्न करीत आहेत. शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळू लागलेले आहे. काही कुटुंबांतील मुले शाळेत जाऊ लागली आहेत. विशेषत: गेल्या अनेक वर्षांपासून शहरांत राहणाऱ्या तरुणांचा सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी सतत संपर्क येत असल्याने शिक्षण, नोकऱ्या, वेगवेगळे छोटे धंदे करण्याकडे या समाजातील तरुणांचा ओढा दिसतो.

महात्मा फुले विकास महामंडळाकडून काही तरुणांना आर्थिक साहाय्य मिळाले आहे. मंडळातून मिळालेल्या कर्जातून काहींनी स्वत:च्या मालकीच्या रिक्षाही घेतलेल्या आहेत. परंतु त्याचे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

या समाजात अशिक्षितांचे प्रमाण ९९ टक्के असल्याने आर्थिक दारिद्र्य आणि सामाजिक जाणिवेचा अभाव जाणवतो.

विशेषत: या समाजातील महिला जुन्या बाजारात जुने कपडे दुरुस्त करून विकण्याचा व्यवसाय करतात. काही महिला घरोघर हिंडून जुने कपडे घेतात आणि त्या बदल्यात नवीन भांडी देण्याचाही व्यवसाय करतात. तसेच काही महिला जुन्या कपड्यांच्या गोधड्या शिवून त्या बाजारात विकतात. यातून मिळणारी मिळकत ही अत्यंत अल्प असते. परंतु एकट्या नवऱ्याच्या कमाईवर अवलंबून न राहता स्त्रीने स्वत:ही कमवून प्रपंचाला हातभार लावण्याची रीत या समाजात आहे. अशा या तुटपुंज्या मिळकतीत ही मंडळी आज जीवन जगताहेत.

असा हा कुडमुडे जोशी समाज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या अवस्थेत जगतो आहे. परंतु परिवर्तनाच्या नव्या विचाराने भारलेली नवी पिढी, जुन्या विचारांना अंधश्रद्धा आणि रूढी-परंपरांना डावलून जुन्यांशी संघर्ष करीत करीत सुधारणावादी नव्या विचारांची कास धरण्याच्या प्रयत्नात आज उभी आहे. त्यांना इतर समाजांतील सुधारणावादी विचारांच्या लोकांनी साथ देणे आवश्यक आहे. या समाजाच्या सुधारणेसाठी शासनाने आणि बहुजन समाजाने सहकार्य देण्याची गरज आहे.

● ● ●

३३२७
२५९००
निबंध
३०।७।८९

# काशी कापडी समाज

गावगाड्याबाहेर जीवन जगणाऱ्या परोपजीवी, परावलंबी, भटक्या विमुक्त जातींच्या अनेक जातसमूहांपैकी 'काशी कापडी' हा एक समाज आहे. गावगाड्यात कोणतेही स्थान न मिळाल्याने पिढ्यान् पिढ्या चालत आलेला पारंपरिक परंतु इतर समाजाच्या दृष्टीने खालच्या दर्जाचा समजला गेलेला कपडे घेण्याचा आणि विकण्याचा धंदा करताना आढळतो.

भर दुपारच्या वेळी डोक्यावर नवीन भांड्यांची भलीमोठी टोपली आणि काखेत जुन्या कपड्यांचे गाठोडे घेऊन 'घ्यायचीत का भांडीऽऽऽय्... जुन्या कपड्यांवर भांडीऽऽऽ य्!' अशा हाळ्या देत खेड्यापाड्यांतून आणि शहरांतून दिवसभर वणवण फिरणाऱ्या स्त्रिया अनेक वेळा आपण पाहिल्या असतील, जुने कपडे घेऊन नवीन भांडी किंवा काचेच्या बरण्या देणाऱ्या या स्त्रिया काशी कापडी या समाजाच्या होत. त्यांना 'बोहारणी' म्हणूनही ओळखले जाते.

काशी कापडी हा समाज प्रामुख्याने आंध्र प्रदेशातून महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते. या समाजाची मातृभाषा तेलगू असली, तरी गेली अनेक वर्षे काम-धंद्याच्या निमित्ताने हा समाज महाराष्ट्रात भटकत असल्याने मराठी भाषा हीच त्यांची आता मातृभाषा झालेली आहे, क्वचित कुटुंबांत तेलगू बोलली जाते.

## थोडा इतिहास

इतर अनेक जाती-जमातींना मिळालेल्या जातीच्या नावाचा जसा वेगवेगळा इतिहास सांगितला जातो, किंवा पारंपरिक लोककथा सांगितल्या जातात, तशीच याही समाजाला 'काशी कापडी' हे नाव रूढ होण्याच्या कारणपरंपरेचा वेगळा इतिहास सांगितला जातो.

फार वर्षांपूर्वी 'बौरी' (बाबरी) या भटक्या समाजाचे लोक खांद्यावर पाण्याने

भरलेल्या कावडी घेऊन गावोगावी जात असत. आणि गावातील अशिक्षित, भाविक लोकांना हे कावडीतील पाणी काशीहून आणलेले पाणी आहे, असे सांगत. अर्थातच श्रद्धाळू, भाविक लोक 'बौरी' लोकांकडून कावडीतले पाणी तीर्थ म्हणून घेत. आणि त्या मोबदल्यात बौरी लोकांना अन्न, धान्य किंवा जुने कपडे देत असत. अशा प्रकारे लोकांकडून मिळालेल्या अन्नधान्यावरच 'बौरी' लोक आपली उपजीविका करीत. तसेच मिळालेल्या जुन्या कपड्यांतून स्वत:साठी काही ठेवून उरलेले कपडे गरीब लोकांना अल्प मोबदल्यात विकत असत.

तीर्थ म्हणून पाणी द्यायचे आणि त्या बदल्यात जीवनावश्यक वस्तू घ्यायच्या, हा त्या काळी 'बौरी' समाजाचा धंदाच झालेला होता.

थोड्या कष्टावर विनासायास जीवन जगता येणारा बौरी लोकांचा वरील व्यवसाय पुढे भटक्या जमातींपैकी 'कोमटी' या समाजाने स्वीकारला. बौरी लोकांप्रमाणेच हे लोक गावोगावी भटकून लोकांना तीर्थ देऊ लागले. मात्र तीर्थ देण्याच्या प्रकारात कोमटी लोकांनी थोडा बदल केला. पाण्यात गोपीचंद मिसळून ते पाणी 'भागीरथीचे तीर्थ आहे' असे भासवीत. तीर्थक्षेत्राचे ठिकाणी (पंढरपूर, बार्शी, तुळजापूर) येथे गोपीचंदमिश्रित पाणी ते भाविकांना देत.

या धंद्यातून अनेक लोकांशी परिचय झाल्याने प्रथम लोक त्यांना 'काशी कावडी' या नावाने ओळखू लागले. पुढे 'काशी कावडी' शब्दाचा अपभ्रंश होऊन 'काशी कापडी' असा शब्द रूढ झाल्याचे सांगितले जाते. नंतरच्या काळात काशी कापडी हेच या समाजाचे नाव रूढ झाले.

## प्रमुख गुरू

आंध्र प्रदेशातून महाराष्ट्रात आलेल्या काशी कापडी या समाजाचे 'कंदळवार' हे प्रमुख गुरू मानले जातात. कंदळवार हे मूळचे आंध्रातीलच असल्याने तमाम तेलगू भाषकांचेही ते गुरू होते, असे सांगतात. या समाजामध्ये गुरूविषयी असणारी श्रद्धा व आदर दर्शविण्यासाठी गुरूने जेवण घेतल्याखेरीज समाजातील इतर लोकांनी जेवायचे नाही, अशी प्रथा होती. गुरूचे जेवण झाल्यानंतर त्याच्या ताटातून उष्टे अन्न समाजातील लोकांनी गुरुप्रसाद म्हणून खायचे, अशीही चाल या समाजात होती.

'कंदळवार' हे काशी कापडींचे गुरू असले, तरी या समाजातील कोणत्याही व्यक्तीस स्पर्श करीत नसत. मात्र या लोकांनी दिलेले कच्चे किंवा शिजलेले अन्न स्वीकारीत. अशा प्रकारे अन्न स्वीकारताना ते विटाळ मानत नसत किंवा अस्पृश्यताही पाळत नसत.

कंदळवार गुरूंना या समाजात पवित्र स्थान मिळाल्यामुळे त्यांना समाजाचे प्रमुख म्हणून मानले जाई, त्यांचा शब्द समाजात प्रमाण मानला जात असे.

त्यामुळे समाजाच्या अडीअडचणी, भांडण–तंटे या गुरूंच्या पुढे येत. या भांडण–तंट्याचा न्यायनिवाडा करण्याचे काम त्यांच्याकडे असे. त्यामुळे गुरूंच्या जवळचे आणि दूरचे असे गट तयार होत. त्यावरून समाजात त्या काळी, 'आक्करमासे' आणि 'बारमासे' असे दोन वर्ग निर्माण केल्याचे सांगण्यात आले. हे दोन वर्ग आजही या समाजात आहेत.

'कंदळवार' गुरूंच्या नंतरच्या काळात 'आक्करमासे' आणि 'बारमासे' या दोन वर्गांपेक्षा आपण वेगळे आहोत, श्रेष्ठ आहोत, अशी भावना समाजातील काही लोकांच्या मनामध्ये निर्माण होऊन त्या लोकांनी या दोन वर्गांशिवाय 'तिसरी फळी' म्हणून एक वेगळा गट निर्माण केला. तोही अस्तित्वात आहे. विशेष म्हणजे ही तिसरी फळी इतरांच्यापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत असल्याने इतर दोन वर्गांशी बेटीव्यवहार सहसा करताना आढळत नाही.

## जातपंचायत

इतर भटक्या विमुक्त समाजांप्रमाणे काशी कापडी समाजात जातपंचायत पाहावयास मिळते. जातपंचायत ही जातीची सर्वोच्च अधिकार असलेली संस्था समजली जाते. कोणत्याही व्यक्तीस जातपंचायतीशिवाय सामाजिक व्यवहार करता येत नाहीत. लग्नकार्ये करावयाची असल्यासही जातपंचायतीच्याच सल्ल्याने जुळवावी लागतात. एखाद्या व्यक्तीने अथवा कुटुंबाने जातपंचायतीला न विचारता किंवा त्यांचा सल्ला न घेता लग्नकार्ये उरकली, तर संबंधित व्यक्तीस व त्याच्या कुटुंबास जातीबाहेर टाकले जाते, त्याला 'वाळीत' टाकणे असे म्हणतात.

अशा वाळीत टाकलेल्या कुटुंबाबरोबर समाजातील इतर लोक संबंध ठेवीत नाहीत. या समाजावर जातपंचायतीचे वर्चस्व असल्याने या समाजाला पंचायतीचे नियम आणि निर्णय डावलता येत नाहीत.

त्या काळी जातपंचायतीचे नियम अत्यंत कठोर असल्याने सहसा समाजातील व्यक्ती असे नियम डावलत नसत. अगर जातीबाह्य वर्तन करीत नसत. समाजातून बहिष्कृत होणे हे त्या काळी परवडत नसे. त्यामुळे पंचायत हीच समाजाची न्याय-संस्था, संरक्षण-संस्था म्हणून मानली जात असे. जातपंचायतीचे नियम काटेकोर-पणे पाळले जात असत.

या समाजात पूर्वीच्या काळी जातीतीलच व्यक्तीशी लग्न करणे किंवा संबंध ठेवणे बंधनकारक असे, जातीबाह्य विवाहास समाजात मान्यता दिली जात नसे. परंतु एखाद्या व्यक्तीने तसा जातीबाहेर विवाह केल्यास पंचायतीची मान्यता नसल्यामुळे संबंधित व्यक्तीस जातीबाहेर टाकले जात असे.

त्याविषयी समाजातील कार्यकर्त्यांस विचारले असता, 'आमच्या समाजातील तरुणांनी परजातीतल्या मुलीशी लग्न केले, तर आमच्या समाजातील मुलींची

अडचण होईल, असे जातपंचायतीला वाटते,' म्हणून आंतरजातीय विवाहाचे बंधन-असल्याचे सांगण्यात आले. बदलल्या काळाचा परिणाम म्हणून जातपंचायतीच्या या विचाराला विरोध करणारी नवी तरुण पिढी हळूहळू पुढे येत आहे, असेही एकाने सांगितले.

पूर्वी जातपंचायतीचा प्रमुख म्हणून पाटील असे. कंदळवार गुरूने या समाजातील काही घराणी पाटील घराणी म्हणून वेगळी केलेली होती. मात्र अलिकडच्या काळात ही पाटीलकीची घराणी आणि 'पाटील' पद्धती पूर्णपणे बंद झाल्याचे समजले. जातपंचायत अस्तित्वात असली, तरी समाजातील शहाणी, प्रौढ मंडळीच जातपंचायतीतील पंचायतीचे पंच म्हणून काम पाहत आहेत.

## हुंड्याची प्रथा नाही

या समाजात हुंडा देण्या–घेण्याची प्रथा नसल्याचे सांगण्यात आले. तीन-तीन दिवस लग्नसोहळा चालत असे. लग्नदिवशी पाहुण्यांना आणि समाजाला मांसाहार देण्याची प्रथा होती, गेल्या चार-पाच वर्षांपासून या प्रथा बदललेल्या आहेत. हल्ली लग्न एक दिवसात उरकून गोडधोड जेवण देण्याची पद्धत रूढ होताना विशेषत: दिसते.

विशेषत: या समाजातील तरुण कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे लग्नातील खर्चाला पायबंद घालता यावा, म्हणून या समाजात सामुदायिक पद्धतीने लग्नकार्ये होताना आढळतात.

या समाजातील 'सोडचिठ्ठी' प्रकाराला कायदेशीर मान्यता लागत नाही. जातपंचायतीच्या मध्यस्थीने 'सोडचिठ्ठी' दिली जाते. परंतु सहसा जातपंचायत सोडचिठ्ठी देऊ देत नाही, शक्यतो सोडचिठ्ठी मागणाऱ्या उभयतांमध्ये समझोता घडवून आणण्याचे काम पंचमंडळी करतात. त्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण नाहीच. याचे सर्व श्रेय जातपंचायतीला आहे, असेही सांगण्यात आले.

## गंपाजत्रा

आषाढ महिन्यामध्ये या समाजात एक धार्मिक सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याला 'गंपाजत्रा' असे म्हणतात. गंपा म्हणजे टोपली. टोपलीचा उत्सव हा या समाजात पवित्र समजला जातो. गंपाजत्रेकरिता गावोगावची मंडळी एकत्र येतात. भेटीगाठींबरोबरच मुलामुलींची लग्नेही जमतात. या दिवशी जाती-अंतर्गत भांडण–तंट्याचे निवाडे होतात. 'गंपाजत्रेत' जातपंचायतीला प्रमुख स्थान असते. पंचमंडळींना या जत्रेत मान असतो, तर या जत्रेत समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग बंधनकारक असतो. मात्र या पंचायतीने बहिष्कृत केलेल्या कुटुंबाला किंवा त्या व्यक्तीला गंपाजत्रेत कसल्याही प्रकारचा सहभाग दिला जात नाही.

## प्रमुख देवस्थान

या समाजाचे प्रमुख देवस्थान हे 'तिरुपती बालाजी' असून प्रत्येकाच्या घरामध्ये बालाजीचा फोटो देव्हाऱ्यात आढळतो. याशिवाय 'तुळजापूरची भवानी' हेही श्रद्धास्थान मानणारे काही लोक आहेत. देवदेवतांचे फोटो आणि देव्हारे बहुतेकांच्या घरांत पाहावयास मिळतात. ते त्यांची पूजाअर्चा करतात.

हा समाज धार्मिक आणि अंधश्रद्धाळू वृत्तीचा असल्याने दैवी चमत्कार, अंगारे, धुपारे यांवर बऱ्याच लोकांचा विश्वास असल्याचे दिसते. तसेच काही स्त्रियांच्या अंगात 'देवाचं वारं' येतं, अशी कल्पना असल्यामुळे एखाद्या स्त्रीच्या अंगात देव आल्यानंतर अंगारे, धुपारे होतात. त्या स्त्रियांच्या सांगण्यावरून कोंबडी, बकरी बळी दिली जातात आणि नवसही बोलले जातात.

काशी कापडी या समाजातील लोक बहुतांशी अशिक्षित असले, तरी पारंपरिक धंद्यामुळे व्यवहारचतुर असतात. विशेषतः या समाजातील स्त्रिया हा व्यवसाय प्रामुख्याने करताना दिसतात. नव्हे, काशी कापडी समाजातील कुटुंबाची मदार स्त्रियांवरच आहे. कुटुंबाचा कणा म्हणून त्यांना स्थान आहे. या समाजातील बहुसंख्य कुटुंबे ही स्त्रियांच्या कष्टांवर जगत असली, तरी स्त्री मात्र या समाजात दुर्लक्षित, उपेक्षितच अशी पाहावयास मिळते. स्त्री व्यवसायात कितीही चतुर असली, तरी या समाजातील पुरुषांच्याच आज्ञेत त्यांना राहावं लागतं. पारंपरिक रूढीची गुलामगिरी त्यांच्या वाटयाला आली आहे.

दिवसभर वणवण भटकंती करून जुने कपडे गोळा करायचे, संध्याकाळी घरी आणून ते दुरुस्त करायचे, त्यांतील फाटकेतुटके शिवायचे, स्वच्छ धुवायचे, त्यांना इस्त्री करायची आणि मगच आठवडयाच्या बाजारात नेऊन विकायचे, हा या समाजाचा दिनक्रम ठरलेला. घरातली पुरुष मंडळी या कामी स्त्रियांना मदत करतात, एवढेच.

काशी कापडी समाजाच्या कोणत्याही व्यक्तीच्या घरात डोकावलं, तर जुन्या कपडयांची गाठोडी कोपऱ्यात पडलेली आणि शेजारी शिलाईचं एखादं मशीन. प्रत्येकाच्या घरी छोटा मोठा पत्र्याचा डबा, त्यात सुया, रंगीत दोऱ्यांची बंडलं आणि कात्री या वस्तू सापडतात. या वस्तू म्हणजे त्यांच्या मुख्य धंद्याची साधने होत.

सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत रोज कष्टाचे कालचक्र या समाजात चालू आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजात काही बदल झाल्याचे आढळते. शहरी वातावरणाचा परिणाम विशेषतः तरुण पिढीवर अधिक प्रमाणात जाणवतो. जातीचा पारंपरिक व्यवसाय करण्यात तरुणांना रस वाटत नाही. बदलत्या काळाबरोबर तेही बदलत आहेत.

समाजातील काही शिकलेले तरुण अलीकडे सरकारी, निमसरकारी नोकरी करताना आढळतात. परंतु अशा प्रकारची नोकरी करणारांचे प्रमाण तसे अल्प आहे. वकील, डॉक्टर, इंजीनयर या व्यवसायात येणारांचे प्रमाणही खूपच थोडे आहे या समाजातील काही पुरुष पुस्तके विकण्याचा धंदा करतात, तर काही बँड, वाजंत्री ताफ्यात वाजंत्री म्हणून काम करतात. नवी भांडी विकणे, रेडीमेड कपडे विकणे किंवा कपडे शिलाईच्या दुकानात काम करणारीही काही मंडळी आहेत. तर पंढरपूर, नाशिक अशा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी रुद्राक्षांच्या माळा विकण्याचाही व्यवसाय काही लोक करतात, असे सांगण्यात आले.

काशी कापडी ही भटकी जमात म्हणून महाराष्ट्र शासनाच्या भटक्या विमुक्तांच्या यादीत या समाजाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांच्यासाठी काही सवलतीही दिल्या गेलेल्या आहेत. परंतु शासनाच्या सवलतींचा फायदा अत्यंत थोडया लोकांना मिळाल्याचे आढळते.

या समाजातील तरुण सामाजिक कार्यकर्ते समाजाच्या स्थैर्यासाठी, त्यांच्या धंद्याच्या विस्तारासाठी आणि एकूणच समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहेत.

अखिल भारतीय पातळीवर या समाजाची 'अखिल भारतीय काशी कापडी संघटना' काम करते आहे. तसेच महाराष्ट्र लेव्हलवर 'महाराष्ट्र काशी कापडी समाज संघटना' ही स्थापन झालेली आहे. या संघटनांच्या मार्फत या समाजाला सामाजिक न्याय आणि स्थैर्य मिळवून देण्याचे काम कार्यकर्ते करीत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शासनाकडे समाजाच्या विकासासाठी अर्ज, विनंत्या आणि मोर्चे, धरणे या माध्यमांतून मागणी करीत आहेत. समाजाला जुने कपडे विक्रीसाठी कायमस्वरूपी जागा मिळावी, म्हणून कार्यकर्ते झटत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून या समाजातील तरुण कार्यकर्ते, समाजपरिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय भाग घेताना आढळतात. समाजात शैक्षणिक जागृती करण्याचे प्रयत्न करीत आहेत. आपल्या अधिकाराची, हक्काची आणि कर्तव्याची हळूहळू जाणीव होऊ लागलेली आहे. महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरांत या समाजाच्या छोटया छोटया संघटना बांधल्या जात आहेत. त्या संघटनांच्या वतीने समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न आज होतो आहे.

• • •

# घिसाडी समाज

घिसाडी हा समाज मूळचा राजस्थानातील असून, त्यांच्या वेगवेगळचा पारंपरिक जातधंद्यांवरून आणि स्थानांवरून त्यांना महाराष्ट्रात ओळखले जाते. या समाजाचा प्रमुख व्यवसाय लोखंडापासून छोटचामोठचा वस्तू तयार करण्याचा असल्याने त्यांना 'लोहार' याही नावाने ओळखले जाते. घिसाडी ही प्रमुख किंवा मूळ जात (समाज) असून तत्सम किंवा पोटजाती म्हणून, चित्तोडी लोहार, रजपूत लोहार आणि गाडी लोहार असे त्यांच्या स्थानावरून किंवा धंद्यावरून पोटविभाग सांगितले जातात. महाराष्ट्र शासनाने वरील पोटजातींचा आणि मुख्य घिसाडी जातीचा समावेश 'भटक्या' समाजात केलेला आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने केलेले जातींचे वर्गीकरण या समाजातील काही जाणकार लोकांना मान्य नसल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या मते लोहार ही मूळ किंवा मुख्य जात असून, 'घिसाडी' ही पोटजात आहे, एवढेच नव्हे, तर राजस्थानातील चितोडगड येथील राजपूत लोहार या समाजापैकी घिसाडी हा एक प्रमुख समाज आहे, चितोडगड ही त्यांची जन्मभूमी असून भाषा 'मेवाडी' आहे. महाराणा प्रतापसिंहाचे वेळी हे लोक तलवारी, शिरस्त्राण, भाले, जंबिये ही शस्त्रे तयार करीत. तोच त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. श्री सूर्यनारायण आणि श्री एकलिंगजी ही त्यांची प्रमुख कुलदैवते होत. त्यांची आडनावे, कुलनावे, कुलाचार, भाषा, चालीरीती रजपूत लोहारांच्याच आहेत. त्यामुळे घिसाडी हे मूळचे राजपूत लोहारच होत, असे त्यांचे मत आहे.

१५६८ साली अकबर बादशहाने चितोडगड जिंकले. ही घटना तेथील राजपूत लोहारांना अत्यंत अपमानकारक वाटल्याने सर्व समाजाने चितोडगडचा त्याग केला. त्या वेळी काही राजपूत लोहारांनी प्रतिज्ञा केल्याचा उल्लेख आढळतो. या प्रतिज्ञा अशा होत्या, की जोपर्यंत चितोडगड स्वतंत्र होणार नाही, तोपर्यंत चितोडगडावर चढणार नाही, पक्क्या बांधणीच्या घरातून वास्तव्य करणार नाही, पाणी काढ-

ण्याचा दोर जवळ बाळगणार नाही, पलंगावर झोपणार नाही आणि एकाच जागी कायम वास्तव्य करणार नाही, वगैरे.

पुढे चितोडगड स्वतंत्र करण्यासाठी महाराणा प्रतापसिंहजींनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. परंतु त्यात त्यांना यश मिळाले नाही. म्हणून राजपूत लोहारांनी आपल्या जन्मभूमीचा कायमचा त्याग केला आणि ते देशातील गुजरात, सौराष्ट्र, माळवा या ठिकाणी गेले, तर काही लोक महाराष्ट्रात भटकत आले. लोखंडी व्यवसाय करून ते आपली उपजीविका करू लागले. त्या काळच्या शत्रूंना आपला सुगावा लागू नये किंवा आपली जन्मभूमी, मूळ जात आणि प्रतिज्ञा या लोकांना माहिती होऊ नयेत, म्हणून त्यांनी स्वतःची ओळख 'घिसा' या गावचे रहिवासी आणि लोहार–काम करणारे अशी करून दिली असावी. या गावाच्या नावावरूनच त्यांना 'घिसाडी' असे संबोधले गेले असावे, असेही सांगण्यात येते.

## मुख्य व्यवसाय

या समाजाचा मुख्य व्यवसाय लोखंडापासून वस्तू बनविण्याचा असल्याने 'लोहार' याच नावाने हे लोक महाराष्ट्रात परिचित आहेत. गावगाड्याच्या ग्राम-व्यवस्थेमध्ये त्या काळी महत्त्वाचा 'बलुतेदार' (कारू) म्हणून सामावले गेले होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी व इतर उपयुक्त अशा लोखंडी वस्तू त्यांनी पुरविल्या. त्यांमध्ये प्रामुख्याने नांगराचे फाळ, पाभरीचे फाळ, मोटेचे कडे, कण्याच्या आऱ्या, कुदळ, खुरपे, लहान कुऱ्हाडी, विळी, उलथणे, जात्याचे खुंटे, सांडस, चमचे, सुऱ्या, हातोडे, सोनाराची ऐरण वगैरे धंद्यांसाठी आणि घरगुती वापरासाठी म्हणूनही लोखंडी वस्तू त्या काळात त्यांनी गावाला पुरवल्या आहेत. आजही प्रत्येक खेड्यात या समाजाची एक-दोन कुटुंबे आढळतात.

भाता, ऐरण, घण ही यांची दैवते आहेत. प्रत्येक घिसाडी कुटुंबात या वस्तू पाहावयास मिळतात. एवढेच नव्हे, तर या समाजातील एखाद्या स्त्रीच्या पतीचे निधन झाले, तर ती इतर कोठेही धंद्याला न जाता 'हातोडा' हाच पती मानून जातीचाच पारंपरिक धंदा उपजीविकेसाठी करताना आढळते. छोटी खुरपी, विळे, चिमटे, नाचकंडे, खुळखुळे, उलथणे, पळे अशा छोट्या गृहोपयोगी वस्तू तयार करून विकते आणि त्यातून मिळणाऱ्या अल्पशा मोबदल्यातच उपजीविका करीत असते.

पूर्वीच्या काळी अस्तित्वात असणाऱ्या ग्रामव्यवस्थेमधील 'लोहार' हा समाज, घिसाड्यांशी संबंधित नाही, असेही बोलले जाते, गावगाड्यातील लोहार, हा 'पांचाळ विश्वकर्मा लोहार' या नावाने ओळखला जातो. परंतु गेल्या काही वर्षांपासून या समाजातील लोक स्वतःला 'गाडी लोहार' म्हणवून घेतात किंवा आपल्या जातीचे नाव 'पांचाळ विश्वकर्मा लोहार' न लावता 'गाडी लोहार'

लावून ते गाडी लोहारांना मिळणाऱ्या शासकीय सवलती लाटतात, असा घिसाडी आणि इतर लोहार समाजांचा आक्षेप आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, मूळचे 'घिसाडी' किंवा गाडी लोहार आणि गावगाड्यातील लोहार (पांचाळ विश्वकर्मा) यांच्या स्थानांत भाषेत, पेहरावांत आणि रूढी-परंपरांमध्ये खूपच फरक आहे. तो खालीलप्रमाणे सांगितला जातो :

| घिसाडी (गाडी लोहार) | लोहार (पांचाळ विश्वकर्मा) |
| --- | --- |
| १. मूळचे चितोड (राजस्थान) येथील राहणारे | १. मूळ महाराष्ट्रातील राहणारे |
| २. यांची मातृभाषा मेवाडी | २. यांची मातृभाषा मराठी |
| ३. ग्रामव्यवस्थेत समावेश नव्हता | ३. ग्रामव्यवस्थेत समावेश होता |
| ४. सतत भटकत उपजीविका करणारे म्हणून परिचित | ४. स्थिर राहून उपजीविका करणारे म्हणून परिचित |
| ५. भात्यावर काम करतेवेळी यांच्या स्त्रिया घण मारतात | ५. या समाजातील स्त्रिया घण मारत नाहीत |
| ६. स्त्रिया आडवे कुंकू लावतात | ६. गोल कुंकू लावतात |
| ७. पुरुष जानवे घालत नाहीत | ७. पुरुष जानवे घालतात |
| ८. स्वतःला राजपूत समजतात | ८. हे स्वतःला राजपूत समजत नाहीत |
| ९. आर्थिकदृष्ट्या मागासलेला समाज | ९. आर्थिकदृष्ट्या बरा समाज |

वरील प्रकारे या दोन समाजांमध्ये काही फरक असल्याचे या समाजातील जाणकार सांगतात.

देशाच्या विविध भागांत घिसाडी समाज आढळतो. त्यांना वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. उदा. कर्नाटकात–बैलकंबर, गुजरातमध्ये–गाडी लोहार, हरियाणात–बंजारा लोहार, आंध्रमध्ये–लोहार, महाराष्ट्रात–घिसाडी लोहार, पांचाळ विश्वकर्मा लोहार, गाडी लोहार, चितोडी लोहार आणि राजपूत लोहार या प्रमुख नावांनी ओळखले जाते.

## पोशाख

'घिसाडी' समाजाचे जे लोक शहरांत स्थायिक झालेले आहेत, त्यांच्यावर महाराष्ट्रीय संस्कृतीचा थोडा प्रभाव जाणवतो; परंतु जे गावोगाव भटकत आहेत, ते मात्र मूळ राजस्थानी पद्धतीने जगताना आढळतात. विशेषतः पुरुषांमध्ये आजही पगडी, अंगात राजस्थानी कुर्ता, केस, दाढी, मिशा ठेवलेल्या, कानात मोठ्या आकाराची रिंग, हातात चांदीचे कडे, गळ्यात ताईत आणि पायांत राजस्थानी जोडा असा वेष पाहावयास मिळतो. तर स्त्रिया साडी, गळ्यात बारीक नक्षीकाम

केलेले चांदीचे दागिने, हातांत चुडा (आठ बांगड्या), पायांत चांदीचे कडे, बोटांत अंगठ्या, कपाळावर चंद्रकोर कुंकू आणि अंगावर मात्र गोंदवून घेण्याची हौस असल्याचे दिसते.

## कुलनामे

इतर समाजांप्रमाणे घिसाडी समाजातही कुलनामे किंवा प्रमुख गोत्रे आढळून येतात. त्यांत पोवार, चौहान (चहुवान), पडियाल, सोळंखी, सूर्यवंशी ही आडनावे प्रमुख होत. परंतु महाराष्ट्रात कालांतराने त्यांच्या मूळ नावांमध्ये बदल झाल्याचे दिसते. ते असे : पोवार–पवार, चौहान–चव्हाण, पडिया–पडवळ, सोळंखी–साळुंखे, सूर्यवंशी–सुरवसे वगैरे.

साधारणत: या समाजातील प्रत्येक प्रमुख आडनावांत १५ ते २० कुळे आहेत. काही उच्च कुळे, तर काही हलकी, त्यांपैकी काते आणि गुरसुळे ही गोत्रे सर्वांत हलकी मानली जातात. उच्च समजली जाणारी कुळें त्यांच्याशी बेटीव्यवहार करीत नाहीत.

स्त्रिया धार्मिक वृत्तीच्या असून पूजाअर्चा, सण, व्रतवैकल्ये करताना आढळतात. रक्षाबंधनाचा सण अत्यंत महत्त्वाचा आणि मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. हा समाजाचा प्रमुख आणि अत्यंत प्रवित्र असा सण समजला जातो.

सणावाराला अथवा सुखदु:खाच्या प्रसंगाला या समाजात दारूला फार महत्त्व दिले जाते. दारूशिवाय कोणतेही कार्य पार पडत नाही. अलीकडे ही प्रथा थोडी कमी होताना दिसते.

पूर्वी पतिनिधनानंतर सती जाण्याची प्रथा रूढ होती. तसेंच मुलगा होणे हे शुभ मानले जाई, तर मुलगी ही अशुभ मानली जाई.

## जातपंचायत

घिसाडी समाजामध्ये जातपंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. पंचायतीचे निर्णय सर्वांना बंधनकारक असतात. समाजांतर्गत भांडणे, तंटा, लग्नविधी, सोडचिठ्ठी किंवा जातगुन्हे यांसंबंधी (जातपंचायत) न्यायनिवाडा करते. जातीतील बाईने किंवा पुरुषाने परजातीशी अनैतिक संबंध ठेवला किंवा लग्न केले, तर अशा व्यक्तीला जातीबाहेर टाकले जाते. अशा जातीबहिष्कृत व्यक्तीशी इतर लोक संबंध ठेवीत नाहीत. अशा व्यक्तीला ५१ ते २०१ रुपयांपर्यंत दंड केला जातो. त्याला 'टच्चा' देणे (समज देणे) असे म्हणतात.

अशा प्रकारे दंड केलेल्या किंवा टच्चा दिलेल्या व्यक्तीने दंड भरला, तर विशिष्ट विधी करूनच पुन्हा समाजात घेतले जाते. जातीत घेतलेल्या अशा इसमाकडून दारू आणि मांस किंवा गोडधोड जेवण घेतले जाते. ही प्रथा आजही पाळली जाते.

परंतु जातपंचायतीचा प्रभाव हळूहळू कमी होताना दिसतो, असे सांगण्यात आले.

या समाजात मानपानाला महत्त्वाचे स्थान आहे. विवाहित व्यक्तींनाच मानाचे स्थान दिले जाते. मात्र अशी व्यक्ती निधन पावली, तर त्याच्या थोरल्या मुलास तो हक्क मिळतो. तो अविवाहित असला, तरी चालतो. हक्कदार व्यक्तींना खोबऱ्याची वाटी आदराने दिली जाते. हक्कदार हे समाजातील प्रतिष्ठित समजले जातात.

## लग्नातील बोळवण

समाजातील लग्नसोहळा पूर्वी चार-चार दिवस चालत असे. लग्नाला आलेल्या वऱ्हाडाला जेवणासाठी बकरी कापली जात असत. अशा जेवणाला 'मांडवजेवण' म्हणत. मांडवाला देव कल्पून मांडवात अशी बकरी पडत असत. शक्यतो अशा जेवणाचा खर्च दोन्ही बाजूंच्या मंडळींनी करावयाचा, असा रिवाज असे. हुंडा देण्याघेण्याची चाल पूर्वी नव्हती आणि आजही नाही. मात्र लग्नखर्चासाठी हुंडा उसना घेण्याची पद्धत या समाजात आहे.

लग्नाच्या रात्री मंडपात पाळणा ठेवून त्यात छोटी बाहुली ठेवली जाते. ती रडते, ओरडते, रागावते, असे कल्पून तिला समजावण्यासाठी एकमेकांकडे दिली जाते. तिला खोटं खोटं समजावलं जातं. हा खेळ बराच वेळ चालतो. त्यात प्रामुख्याने स्त्रियांचा सहभाग असे. या खेळाला 'गोपा खेळणे' असे म्हणतात.

लग्नानंतर जर नवरदेवाकडील लोकांनी मटणाचे जेवण दिले नाही, तर मुलीकडील लोक मुलीला नांदावयास पाठवत नसत. अशा जेवणाला 'बोळवण' असे म्हणतात. अशी बोळवण जर केली नाही आणि नवरी मुलगी जर निधन पावली, तर मुलीच्या घरच्या लोकांनी समाजाला मटणाचे जेवण द्यावे लागते. असे जेवण समाजाला मिळाले नाही, तर अशा घरची मयत समाज उचलत नाही. अलीकडे ही प्रथा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## ओवा किंवा सुंठवडा

या समाजातील कोणत्याही कुटुंबात मूल जन्माला आल्यानंतर एक विशिष्ट पारंपरिक विधी केला जातो. विशेषतः मुलाच्या जन्माचे तिसरे दिवशी समाजातील प्रमुख हक्कदारांना आणि प्रत्येक कुटुंबाला खोबऱ्याची वाटी देण्याचा रिवाज आहे. त्याला ते 'ओवा' किंवा 'सुंठवडा' अथवा 'वव्' असे म्हणतात. असा सुंठवडा जातीतून बहिष्कृत केलेल्या लोकांना दिला जात नाही.

मूलजन्माचे पाचवे दिवशी बोकड कापून समाजाला जेवण देण्याची प्रथा या समाजात आहे. त्याच दिवशी बाळाची पाचवी साजरी केली जाते. आनंदोत्सव साजरा केला जातो

## खिळा मारणे

पुर्नविवाहाला या समाजात ' खिळा मारणे ' असे म्हणतात. ज्या व्यक्तीचा पुर्नविवाह असेल, अशा व्यक्तीच्या मुख्यत: नवरीच्या घरी लोखंडी खिळा मारण्याचा कार्यक्रम होतो. नंतर ज्यांचा पुर्नविवाह करावयाचा त्यांना बोलावले जाते. समाजातील लोक आणि पंचमंडळी या वेळी हजर असतात. अशा लग्नात वधूवरांना मुंडावळ्या बांधल्या जात नाहीत. लग्नप्रसंगी जमलेल्या समाजाला जेवण द्यावे लागते. त्या जेवणाला ' पाटपोळी ' असे म्हणतात. असे पाटपोळीचे जेवण दिल्याशिवाय त्या उभयतांना जातीत (समाजात) बसण्याचा अधिकार नसतो. असे न केल्यास जातपंचायत संबंधित व्यक्तीला दंड करू शकते.

## मयतीचा विधी

ज्या कुटुंबात मयत होते, ती मयत त्या घरातील एक पुरुष आणि इतर कुळातील तीन पुरुष असे चार लोक खांदेकरी म्हणून उचलतात. मयतीनंतर समाजातील लोक भाजी-भाकरी आणून देतात. परंतु मृत व्यक्ती जातपंचायतीने दोषी ठरविलेली असेल, तर अशा प्रेतास जातपंचायत दंड करते. पंचायतीने केलेला दंड जर त्या मृत व्यक्तीच्या कुटुंबातील लोकांनी भरला नाही, तर प्रेत उचलले जात नाही, दंड भरल्यावरच प्रेत उचलले जाते.

किंवा मयताच्या तिसरे दिवशी सावडताना जातपंचायत अशा मृत व्यक्तींचा न्यायनिवाडा करते. त्याला ' हडप ' असे म्हणतात. न्यायनिवाडा झाल्यानंतर पंचांनी केलेला दंड भरावा लागतो. असा दंड भरल्यानंतरच मृताची राख गोळा केली जाते. अशा दंड भरण्याला ' काटी कटाई ' असे म्हणतात. विशेषत: ज्यांच्या-कुटुंबात मयत होते, त्या कुटुंबातील लोकांनी मयतीच्या तिसरे दिवशी, दहाव्या दिवशी आणि अकराव्या दिवशी समाजातील सर्व लोकांना जेवण देण्याची प्रथा आहे. तर मयतीचे सुतक फिटण्यासाठी म्हणून बारावे दिवशी बकरे कापून समाजाला जेवण द्यावे लागते. असे जेवण दिले, तरच मयतीचे सुतक फिटते, असे सांगितले जाते. या प्रकाराला ' रोटा ' असे म्हणतात.

## भाषा

घिसाडी समाजामध्ये चार भाषा बोलल्या जातात. त्यांची मातृभाषा राजस्थानी आहे; पण ही मंडळी आता सवयीने मराठी चांगली बोलतात. याशिवाय घरी बोलायची चालू भाषा व धंद्यासाठी म्हणून सांकेतिक भाषा बोलली जाते. त्या भाषेला ते ' आरसी पारसी ' असे म्हणतात.

मराठी, चालू आणि सांकेतिक भाषेतील काही वाक्ये अशी :

| मराठी | चालू भाषा | सांकेतिक भाषा |
| --- | --- | --- |
| १) जेवलास का | १) तुम जम्या का ? | १) तुम दूतल्या का ? |
| २) चहा प्या | २) च्या पिओ | २) घ्या पितिलो |
| ३) माणसं आली | ३) लोक आयाचं | ३) नाल्टा आरकल्याच |
| ४) त्याचं लग्न झालं | ४) वनु लगीन व्हूथी | ४) वनु बगीन व्हारकलिच |
| ५) गिऱ्हाइकाकडून पैसे घ्या | ५) गिरायककडतीन पैसा ल | ५) नाल्टा कनतीन बलबा लेकलस |
| ६) आज किती धंदा झाला | ६) आज कितलो धंदो हूयो | ६) आज कितलु रामत हूय् |
| ७) काम पाठवू नको | ७) काम घलाई देऊ नको | ७) नाल्टानु रामत घलाव चूल नको |
| ८) शाळेत गेला होता का | ८) परिओ शालम गयो का | ८) टेरिओ शालम गचूलयो का ? |

अशा प्रकारे या समाजातील त्यांच्या भाषेतील शब्द आहेत. आजही घिसाडी कुटुंबात या भाषा बोलल्या जातात. जातीची भाषा बोलणे प्रतिष्ठित समजले जाते.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजातील लोकांनी आपली प्रगती करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या मार्गांनी प्रयत्न चालू केलेले आहेत. विशेषत: या समाजातील तरुण पिढी परिवर्तनाच्या दृष्टीने अधिक अनुकूल असल्याचे जाणवते. समाजातील अंधश्रद्धा, वाईट परंपरा नष्ट करण्यासाठी तरुण लोक प्रयत्न करताना आढळतात. परंतु जुनी मंडळी तरुणांना साथ देत नाही, असे आढळते. त्यामुळे या समाजात सुधारणावादी आणि परंपरावादी असे दोन गट निर्माण झालेले आहेत. सुधारवादी गटाला 'शाकाहारी', तर परंपरावादी गटाला 'मांसाहारी' या नावांनी ओळखले जाते.

१९३७ साली पुणे शहरात सुधारणावादी गटाची एक पार्टी सुरू झाल्याचे सांगितले जाते. त्या पार्टीतील काही लोक आज हयात नाहीत, परंतु त्यांची परंपरा चालवणारे खूप नवीन लोक आज महाराष्ट्रात पाहावयास मिळतात. त्यांनी समाजाचे संघटन करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. परंतु मुळातच हा समाज वेगवेगळ्या नावांनी स्वत:चे अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करीत असल्याने, त्यांच्यांत एकीची भावना अभावानेच पाहावयास मिळते. यांच्यांतील रजपूत लोहार हा समाज इतर चितोडी आणि गाडी लोहारांपेक्षा स्वत:ला वेगळा आणि उच्च समजत असल्याने त्यांच्यांत सामाजिक दरी कायम आहे. उलट वरील तीन समाजांपेक्षा 'घिसाडी' हा सर्वार्थाने उपेक्षित असा समाज राहिलेला असून आजही या समाजाची भटकंती थांबलेली नाही. गावोगावी भटकतच तो आपली उपजीविका करतोय्. इतरांच्या दृष्टीने तो खालचा किंवा अतिमागासलेला समाज राहिलेला आहे. त्यामुळे या

समाजातील विशेषत: शहरांत स्थायिक झालेले काही सुशिक्षित जाणकार लोक 'घिसाडी' या नावाऐवजी आम्हांला 'गाडी लोहार' असे नाव मिळावे, यासाठी प्रयत्न करीत आहेत. कारण महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या भटक्या समाजाच्या सवलतीचा लाभ घिसाडी समाजाला घेता आलेला नाही. उलट, घिसाडी या नावामुळे त्यांना इतरांकडून खालच्या दर्जाची वागणूक मिळते, असे सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षांपासून या समाजात राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक जागृती होत आहे. त्यांना बहुजन समाजाने समजावून घेऊन, समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्या भटक्या जीवनाला, काही प्रमाणात का होईना, स्थैर्य लाभेल.

• • •

# परदेशी भोई

नदीनाल्यांतील मासे पकडणारा आणि त्यावर स्वतःची उपजीविका करणारा समाज म्हणून भोई समाज महाराष्ट्रात परिचित आहे. मासे पकडणे हा या समाजाचा पारंपरिक व्यवसाय असून प्राचीन काळापासून हे लोक हा व्यवसाय जातधंदा म्हणून करतात.

देशातील जवळ जवळ सर्व राज्यांत या समाजाचे लोक आढळतात. विशेषतः शहरांत आणि नदीकाठच्या खेड्यापाड्यांत भोई समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळते. व्यवसायाच्या निमित्ताने या समाजातील लोक सतत भटकत असल्याने कदाचित महाराष्ट्र शासनाने या समाजाचा आणि त्याच्या तत्सम किंवा पोटजातीचा समावेश भटक्या समाजांत केलेला असावा.

देशातील वेगवेगळ्या राज्यांत भोई समाजाच्या एकूण पंचवीस तत्सम किंवा पोटजाती पाहावयास मिळतात. त्यांना त्या त्या ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. त्यांत प्रामुख्याने झिंगा भोई, राज भोई, कहार, गोडीया कहार, धूरिया कहार, किरात, मछूआ, गाझी, जानिया, केवट, धोवर, ढोवर, घोमर, पालेवार, मच्छेंद्र, नावाडी, मल्हार, मल्हाव, भोई, गाढव भोई, खाडी भोई, खारे भोई, ढेवरा आणि परदेशी भोई, इ. पोट किंवा तत्सम जातींचा समावेश होतो.

वरील पोटजातींची नावे ही त्यांच्या निरनिराळ्या स्थानांवरून, व्यवसायांवरून रूढ झालेली आहेत. त्यांची भाषा, पेहराव, कुलदैवते, रूढी आणि परंपरा भिन्न आहेत. प्रत्येक पोटजात ही स्वतंत्र असल्याचे सांगितले जाते. त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार होत नाहीत, असेही सांगण्यात आले. वरील प्रत्येक समाजातील लोक स्वतःला इतरांच्यापेक्षा श्रेष्ठ समजतात किंवा आपले अस्तित्व वेगळे असल्याचे सांगतात.

महाराष्ट्रामध्ये मराठा भोई या नावाने ओळखला जाणारा आणखी एक स्वतंत्र

समाज आहे. प्राचीन काळापासून तो महाराष्ट्रात वास्तव्य करून आहे. पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या संस्थानांमध्ये, राजेरजवाडयांच्या दरबारी आश्रयाला भोई समाजाचे लोक होते. ते प्रामुख्याने मेणापालखी उचलण्याचे काम करीत असत. त्यांना 'राजभोई'च्या नावानेही ओळखले जाते. राजाश्रय मिळाल्याने अर्थातच इतर भोई समाजांपासून (जातींपासून) हा समाज वेगळा राहिला. इतर भोई समाजाशी त्यांचे रोटीबेटी व्यवहार होत नसत. त्यांनी आजही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवलेले आढळते.

भोई समाज आणि त्यांच्यांतील पंचवीस पोटजाती या मूळच्या महाराष्ट्रातील नसून, व्यवसायाच्या निमित्ताने त्यांच्यापैकी काही महाराष्ट्रात आलेल्या आहेत. त्यामुळे मूळ महाराष्ट्रातील लोकांचा जनजीवनाशी त्यांचा तसा अर्थाअर्थी संबंध नव्हता. त्यांची भाषा, रूढी, परंपरा, दैवते, पोशाख भिन्न असल्याने ते मूळ महाराष्ट्रीयन लोकांपासून वेगळे समजले गेले. एवढेच नव्हे, तर हे लोक बाहेरच्या राज्यांतून आल्यामुळे ते परके आणि दूरचे असेच राहिले. त्यांना परदेशी म्हणूनच त्या काळात लोक ओळखू लागले. परिणामी हा समाज परदेशी भोई याच नावाने महाराष्ट्रात नोंदला गेला. आजही हे लोक परदेशी भोई याच नावाने ओळखले जातात. तेही स्वत:ची ओळख परदेशी म्हणूनच सांगतात.

## परदेशी भोई आणि त्यांची जातपंचायत

परंपरेने चालत आलेली आणि जातसमूहावर सामाजिक नियंत्रण करणारी संस्था म्हणून जातपंचायत आजही अस्तित्वात आहे. जातपंचायतीचे नियम अलिखित असले, तरी त्यांचे गांभीर्य जाणून आजही पंचाच्या साक्षीनेच लग्नकार्ये किंवा तत्सम विधी पार पाडले जातात. पंचायतीला डावलून समाजबाह्य वर्तन केल्यास त्याला वाळीत टाकण्याची प्रथा पूर्वीपासून रूढ आहे.

समाजातील गुन्हेगारास शिक्षा म्हणून जातपंचायत संबंधित व्यक्तीला दही-पुरीचे जेवण समाजाला देण्याचा दंड करीत असे. अशा प्रकारे संबंधित व्यक्तीने जेवण दिले नाही, तर त्यास जातीबहिष्कृत केले जाते. समाजातील इतर लोक त्याच्याशी कसलेही संबंध ठेवीत नाहीत.

या समाजातील विवाहाचे प्रसंगी जातपंचायतीला अत्यंत महत्त्वाचे असे स्थान आहे. समाजातील विवाहाला पंचायतीची मान्यता असावी लागते.

पंचांनी विवाहाला मान्यता दिल्याशिवाय तो होऊ शकत नाही. मुलीकडून पाच रुपये आणि मुलाकडून साडेबारा रुपये पंचायतीकडे द्यावे लागतात. पंचायतप्रमुखास पान-सुपारीचा मान देण्याची प्रथा रूढ आहे.

जातपंचायतीच्या प्रमुखास 'नायक' असे म्हटले जाते. समाजातील न्याय-

निवाडा करण्याच्या कामी नायकाचे निर्णय अंतिम समजले जातात.

पूर्वीच्या काळी १२ भोई, त्यावर एक नायक, अशी प्रथा अस्तित्वात होती, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

परदेशी भोई समाजातील एखाद्या व्यक्तीने जातपंचायतीचे नियम डावलून समाजात एखादे कृत्य केल्यास जातपंचायत संबंधित व्यक्तीस समाजातील गुन्हेगार ठरवून त्याच्या नावाने समाजात दवंडी दिली जात असे, उद्देश असा, की संबंधित व्यक्तीचा गुन्हा सर्व लोकांना कळावा आणि त्यास सर्व समाजाने जातीबाहेर टाकावे, जातपंचायत अशा व्यक्तीस त्या काळी जातीबहिष्कृत करण्याची शिक्षा देत असे.

अशा प्रकारे जातीतून बहिष्कृत केलेल्या व्यक्तीशी समाजातील इतर लोक रोटीबेटी व्यवहार करत नसत, किंवा समाजातील कोणत्याही कार्यक्रमास अगर विधिउत्सवास बोलावीत नसत, आणि जर अशा बहिष्कृत व्यक्तीबरोबर एखाद्या व्यक्तीने चोरटेपणाने काही व्यवहार केल्यास किंवा संबंध ठेवल्यास जातपंचायत अशा व्यक्तीला सुद्धा जातीबहिष्कृत करीत असे.

पूर्वी व्यक्तीच्या गुन्ह्याविषयी समाजात दवंडी देणाऱ्या इसमास २५ रुपये मानधन दिले जात असे. या व्यक्तीला समाजात अशा वेळी मान असे.

गावगाड्याच्या समाजरचनेमध्ये प्रत्येक समाजाला किंवा व्यक्तीला विशिष्ट प्रकारची कामे विभागून दिलेली असत. त्याप्रमाणेच परदेशी भोई समाजात काही ठरावीक व्यक्तींना किंवा घराण्यांना पिढ्यान् पिढ्या समाजातील काही विशिष्ट कामे दिलेली होती. विशेषत: समाजातील जात-पंचायत न्यायनिवाड्या-साठी बसणार असेल, तर समाजातील प्रत्येक कुटुंबाला समजावे, म्हणून त्या समा-जात घरोघर जाऊन तसा निरोप देण्याचे काम काही ठरावीक व्यक्ती करीत असत अशा निरोप देणाऱ्या व्यक्तीस ' न्हावी ' असे म्हटले जात असे. अशा न्हाव्यांची ठरावीक घराणी परंपरेने निरोप्याचेच काम करीत, त्यांना समाजात मान मिळत असे. अर्थात अशी घराणीही समाजातील असली, तरी वेगळी समजली जात असत.

गेल्या काही वर्षांपासून समाजात दवंडी देण्याची प्रथा बंद झाल्याचे सांगण्यात आले, मात्र निरोप्याचे काम करणारे लोक किंवा त्यांची घराणी आजही या समाजात पाहावयास मिळतात.

## लग्नातील ' जामा ' आणि ' मोर '

भोई समाज हा हिंदू असला, तरी लग्नसमारंभातील काही रीतीरिवाज महा-राष्ट्रातील हिंदुधर्मीयांपेक्षा वेगळे आहेत.

विशेषत: या समाजात लग्नविधीसाठी ब्राह्मण आवश्यक नसतो. या समाजातीलच व्यक्ती लग्नविधी पार पाडते. त्या व्यक्तीला ' पांड्ये ' म्हणतात. लग्नात आंतर-

पाट धरण्याची प्रथा नाही. लग्नातील वधूवरांचे बाशिंग हा उत्कृष्ट कलेचा नमुना असतो. विविध रंगांच्या मण्यांनी आणि प्लॅस्टिकच्या फुलांनी सजवलेले व रंगीत काचांनी सुशोभित केलेले आणि फ्लॉवरपॉटसारखे दिसणारे असे गोल टोपीच्या आकाराचे 'बाशिंग' तयार केले जाते. त्याला 'मोर' म्हणतात. 'मोर' तयार करण्यासाठी ३०० रुपये खर्च येतो.

## लग्नातील जामा

लग्नप्रसंगी नवरदेवाने खास पारंपरिक पद्धतीने तयार केलेला बाराबंदी-सारखा पांढरा शुभ्र अंगरखा परिधान करावयाचा असतो. त्याला 'जामा' असे म्हणतात. 'जामा' असल्याशिवाय लग्न लावले जात नाही. जामा हे या समाजातील लग्नप्रतीक आहे.

या समाजात हुंड्याची प्रथा नाही. लग्नखर्च दोन्हींकडील मंडळींनी करावयाचा असतो. दारूशिवाय पूर्वी शुभ-अशुभ कार्याचे पान हलत नसे. हल्ली ही प्रथा बंद आहे. लग्नप्रसंगी समाजात दारूला अतिशय महत्त्वाचे स्थान होते.

पति-पत्नींत बेबनाव झाला, तर जातीरिवाजाप्रमाणे सोडचिठ्ठी पंचायतीच्या संमतीनेच घ्यावी लागते. मात्र एखाद्या पुरुषाने पत्नीला सोडचिठ्ठी दिली, तर तिचे दुसरे लग्न होईपर्यंत त्या पुरुषाने दुसरा विवाह करावयाचा नाही, असे बंधन घातले जाते. ही प्रथा आजही पाळली जाते. त्यामुळे, पति-पत्नींत बेबनाव झाला किंवा भांडण-तंटा झाला, तरी शक्यतो उभयतांत समेट घडवून आणण्याचे प्रयत्न केले जातात. सोडचिठठी सहसा दिली जात नाही, असे सांगण्यात आले.

भोई समाजात लग्नवेळी काही गमतीदार प्रथा पाळल्या जातात. त्यांत 'लुटूपुटूचा' स्वयंपाक हा एक प्रकार आहे, या लुटूपुटूच्या स्वयंपाकात मांडवाच्या ठिकाणी चूल मांडून लग्नघरचे लोक खोटा खोटे स्वयंपाक करतात, आणि खोटे-खोटेच जेवण करण्याचा बहाणा करतात. त्यात लग्नप्रसंगी जशा जेवणाच्या पंगती बसतात, तशा खोट्या पंगती बसवून लुटूपुटूचे जेवण पाहुण्यांना दिले जाते.

या समाजातील विवाहप्रसंगी दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या पंगतीत जर दुसऱ्या जातीची व्यक्ती आली, तर हे लोक जेवणाच्या पंगतीतून उठत. त्याचे कारण विचारले असता या समाजातील कार्यकर्त्याने सांगितले, की पूर्वी जेवणाच्या पंगतीत जेवायला बसणारे लोक उघड्या अंगाने जेवण करीत, अशा प्रकारे जेवणे हे सोवळ्यातील जेवण समजले जात असे. त्यामुळे परजातीच्या व्यक्तीने अशा पंगतीत येणे म्हणजे सोवळे बाटणे असे समजले जात असे.

## रूढी मानणारा

भोई समाज हा धार्मिक रूढीपरंपरा मानणारा आहे. दुर्गामाता हे त्यांचे कुल-

दैवत असून दुर्गामातेचा उत्सव दसऱ्याचे दिवशी मोठ्या प्रमाणात साजरा करतात. राखी पौर्णिमेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. राखी पौर्णिमा हा सण या समाजात अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र असा सण मानला जातो. मोठ्या प्रमाणात हा सण या समाजात साजरा केला जातो.

मासे पकडणे हा या समाजाचा पारंपरिक आणि प्रमुख व्यवसाय असल्याने नारळी पौर्णिमेच्या दिवशी गंगामातेला शांत करण्यासाठी महाराष्ट्रातील या समाजाचे गावोगावचे लोक गावाशेजारील नदी-नाल्यांवर जाऊन गंगामातेची पूजा करतात. या दिवशी कोणीही मासे पकडीत नाही. तो दिवस पवित्र दिवस म्हणूनच मानला जातो.

## रंगपंचमीचे महत्त्व

इतर सणावारांप्रमाणे रंगपंचमीला या समाजात एक विशिष्ट महत्त्व आहे. रंगपंचमी या समाजात मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. या दिवशी समाजातील तरुण-तरुणी समाजातील प्रत्येक घरोघरी रंग घेऊन जातात, तेथे दुर्गामातेची गाणी म्हणतात. घरातील लोकांच्या अंगावर रंग उधळतात. त्या वेळी घरातील लोक तरुण-तरुणींना गोड फराळ आणि चहा देतात. याशिवाय समाजकार्यासाठी आपल्या इच्छेनुसार आर्थिक मदत करतात आणि नंतर मगच तरुण-तरुणींचा तो जथा दुसऱ्या घरी जातो, गाणी म्हणतो, रंग उधळतो आणि वर्गणी घेऊन जातो.

अशा प्रकारे या दिवशी प्रत्येक कुटुंबाकडे जाऊन समाजकार्यासाठी वर्गणी गोळा केली जाते. याचे कारण सांगताना या समाजातील एका कार्यकर्त्याने सांगितले, की अशा प्रकारे समाजात एकोपा राखण्याचे काम रंगपंचमीच्या सणाच्या निमित्ताने केले जाते.

अनेक रूढीपरंपरा जपणारा भोई समाज अलीकडे महाराष्ट्रातील लोकजीवनाशी मिसळून गेलेला आढळतो. विशेषत: खेड्यापाड्यांतील या समाजातील लोक मराठी संस्कृतीशी एकजीव झाल्याचे दिसतात, कालानुरूप या समाजाने खूपच बदल समाजात घडवून आणल्याचे पाहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळात भोई समाजात अनेक स्थित्यंतरे झालेली आहेत. विशेषत: शासनाने भटक्या विमुक्त समाजांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सवलतींचा फायदा काही लोकांना मिळाला आहे. त्यामुळे हा समाज हल्ली भटक्या अवस्थेत आढळत नाही. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये भोई समाज मोठ्या संख्येने वास्तव्य करून आहे. त्यामुळे या शहरांतील सामाजिक, राजकीय चळवळींचा परिणाम या समाजावर झाला आहे. राजकारणात त्यांना प्रतिनिधित्व मिळाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून शहरातील उद्योगीकरणामुळे भोई समाजाच्या पारंपरिक मासे पकडणाऱ्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. मच्छीमारीपेक्षा

मच्छीविक्री करणे हाच प्रमुख व्यवसाय होऊ पाहत आहे. या समाजातील ५० टक्के लोक मुंबईसारख्या ठिकाणाहून ठोक व्यापाऱ्यांकडूनच मासे खरेदी करतात आणि किरकोळ विक्री करतात. शिकलेली तरुण पिढी पारंपरिक धंद्याकडे न वळता खाजगी व्यवसाय व सरकारी-निमसरकारी नोकरीकडेच वळत आहे.

तरुणवर्ग समाजपरिवर्तनासाठी प्रयत्नशील आहेत. वाईट चालीरीती, अंधश्रद्धा नाहीशा करण्याचा प्रयत्न तो करतो आहे. शैक्षणिकदृष्टया जागृती होऊ लागल्याने वैद्यकीय, इंजीनिअरिंग किंवा कायदेविषयक उच्च शिक्षणाकडे तरुणांचा कल वाढतो आहे.

● ● ●

# वेडू वाघरी समाज

महाराष्ट्रात इतर राज्यांतून कामधंद्याच्या निमित्ताने अनेक जमातींचे लोक आले आहेत. 'वेडू वाघरी' हा त्यांपैकी एक समाज आहे.

हा समाज मूळचा गुजरात राज्यातील असून महाराष्ट्रात त्याला 'वाघरी' या नावाने ओळखतात. हे लोक मुख्यत: शहरात समूहाने किंवा गटागटाने एकत्र राहतात. त्यांत वेगवेगळ्या प्रकारचे अनेक छोटे धंदे करणारे लोक आहेत. या समूहांचे त्यांच्या विशिष्ट धंद्यावरून पोटविभाग तयार झाले आहेत. त्यांच्या धंद्यांवरून–किंवा पोटविभागांवरूनच त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते.

या समाजातील जे लोक घरोघर जाऊन दहीतूप विकतात, त्यांना 'घी-वाले' वाघरी म्हणतात. तर मसाला विकणारे 'मसालेवाले' वाघरी, जुन्या कपड्यांचा धंदा करणारे कपडेवाले वाघरी, भांड्यांचा धंदा करणारे भांडीवाले वाघरी, मध विकणारे मधवाले वाघरी, तर तेलाचे मोकळे डबे, लोखंडी छोटेमोठे बॅरल व ड्रमचा धंदा करणारे 'वेडू वाघरी' म्हणून ओळखले जातात.

## स्थळावरूनही पोटविभाग

वरील प्रकारांशिवाय, त्यांच्या मूळ स्थळावरूनही ते ओळखले जाते. उदा., मध, मसाला, दही, तूप विकणारे हे काठेवाडी–वाघरी, तर जुने कपडे घेणारे व विकणारे हे गुजराती–वाघरी आणि डबे, बॅरलचा धंदा करणारे ते वेडू वाघरी म्हणून परिचित आहेत.

वेडू या समाजामध्ये आणखी तीन पोटविभाग आढळतात, 'कंककोडे', 'दातवणवाले' आणि 'घीवाले' हे त्यांतील मुख्य प्रकार होत.

'वेडू वाघरी' या समाजातील मुख्य आणि पोटविभाग विस्ताराने देण्याचे कारण असे, की या सर्व प्रकारांतील समूह स्वतंत्र असून यांमध्ये आपापसांत रोटी-

बेटी व्यवहार होत नाहीत. हे सर्व लोक गुजरातमधील अस्पृश्य म्हणून ओळखले जातात.

गुजरात येथे या समाजातील लोकांना अस्पृश्यता तीव्रतेने जाणवते. एखादी सवर्ण व्यक्ती काही कामानिमित्त वेडू समाजातील व्यक्तीच्या घरी आली आणि त्या वेळी जर या समाजातील लोक खाटेवर बसलेले असतील, तर ते चटकन् उठून जमिनीवर बसतात. या संदर्भात विचारणा केली असता एकजण म्हणाला, आमी खटलेपर बसले त त्येचे अपमान होते. त्यांचा मान राखण्यासाठी हे करावे लागते.

वरील प्रकाराशिवाय, अस्पृश्य म्हणून महाराष्ट्रातील जातींना ज्या प्रकारे उच्च-वर्णीयांकडून तुच्छतेने वागविले जाते किंवा त्यांच्याकडे पाहण्याच्या जसा पारं-परिक, विकृत दृष्टिकोण आहे, तसाच गुजरातमध्ये वेडू वाघरी समाजाकडे तेथील सवर्णांचा पाहण्याचा दृष्टिकोन आहे, असे एकाने सांगितले.

## जातपंचायत

महाराष्ट्रातील इतर भटक्या विमुक्त जमातींप्रमाणे, याही समाजात 'जात-पंचायत' आजही अस्तित्वात आहे. जातसमूहावर लक्ष ठेवणारी, जातसमूहाचे भलेबुरे पाहणारी, जातीअंतर्गत भांडणतंट्यावर नियंत्रण ठेवणारी, आणि न्याय देणारी अशी ही न्यायसंस्था आहे. शासनव्यवस्थेमध्ये जसे न्यायालयाचे सत्र-न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय असे प्रकार आहेत, तसेच या समाजात जातपंचायतीमध्ये कनिष्ठ-वरिष्ठ असे प्रकार आढळतात.

एखाद्या व्यक्तीने जातीचा रिवाज मोडला किंवा परजातीतली बाई जातीत आणली, किंवा जातीतल्या बाई–पुरुषाने परजातीतील व्यक्तीशी विवाह किंवा काही अनैतिक व्यवहार केला, तर जातपंचायत संबंधित व्यक्तीला जातीबाहेर टाकते, बहिष्कृत करते. जर त्या व्यक्तीने आपली चूक मान्य केली, तर संबंधित व्यक्तीस जातपंचायत १०० ते २०० रुपये दंड करते. त्या व्यक्तीने दंड भरला, तर ती दंडाची रक्कम समाजकार्यासाठी वापरली जाते आणि त्या व्यक्तीस पुन्हा जातीत घेतले जाते.

परंतु जर एखाद्या व्यक्तीस असे वाटले, की आपण गुन्हेगार नसताना स्थानिक जात–पंचायतीने आपल्याला अन्यायाने बहिष्कृत केले आहे, तर ती व्यक्ती राहते तिथल्या जात–पंचायतीचा निर्णय डावलून दुसऱ्या शहरात असणाऱ्या त्यांच्या जातीच्या वरिष्ठ जातपंचायतीकडे अपील करते आणि न्याय मागू शकते. परंतु तेथेही जर त्या व्यक्तीच्या मनाविरुद्ध निर्णय मिळाला, तर ती व्यक्ती मूळ गावातील सर्वोच्च जात-पंचायतीकडे न्याय मागू शकते.

अशी ही चढत्या क्रमाने असणारी जात-पंचायतीची न्यायव्यवस्थेची साखळी पद्धत 'वेडू' समाजामध्ये फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे, आणि आजही तिचे

अस्तित्व कायम असल्याचे सांगितले जाते.

त्यामुळे या समाजातील लोक सहसा न्यायालयात जात नाहीत, या समाजात प्रत्येक घटनेचा न्यायनिवाडा करण्याची पद्धत वेगवेगळी आहे. विशेषत: या समाजातील लग्न आणि काडीमोड या पद्धती वेगळ्या आहेत. उदा.; या समाजातील एखाद्या व्यक्तीचे त्याच्या पत्नीशी पटत नसेल, तर सोडचिठ्ठीसाठी ती व्यक्ती कोर्ट-कचेऱ्यांत जात नाही. आपले म्हणणे मांडण्यासाठी किंवा न्याय्य बाजू सांगण्यासाठी संबंधित व्यक्तीने स्वत:च्या बाजूची पाच–पाच माणसे पंच म्हणून (वकील म्हणून) नेमावी लागतात. नंतर हे पंच पंचायतीमध्ये संबंधित व्यक्तीची (नवरा किंवा नवरीची) बाजू मांडतात. मगच पंचायत त्या घटनेचा न्यायनिवाडा करते. पंचायतीने दिलेला न्याय संबंधितांवर बंधनकारक असतो.

## देव-देवता

वेडू समाज हा अत्यंत मागासलेला आणि श्रद्धाळू असा समाज आहे. या समाजामध्ये देवदेवतांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. अनेक देवदेवतांचे देव्हारे या लोकांच्या घरामध्ये आढळतात. यांमध्ये प्रामुख्याने मगरीवर स्वार असलेली ' खोडियार माता, ' कोंबड्यावर बसलेली ' बेचराजी माता ', उंटावरची ' हडकमय माता, ' रेड्यावर स्वार असणारी ' विहत माता ' आणि बकरीवरील ' मेलडी माता ' या प्रमुख देवता आहेत. याशिवाय हे लोक कालीमातेचीही पूजा करतात. काही लोकांच्या अंगात वरील देवता संचार करतात, असा त्यांचा समज आहे. या देवदेवतांना नवस करण्याची प्रथाही रुढ आहे, नवसासाठी म्हणून कोंबडी, रेडा व बकरीही देवतांना बळी देण्याची प्रथा पाहावयास मिळते. विशेषत: कार्तिक महिन्यामध्ये गुजरातमधील सीतापूर या ठिकाणी देवीची मोठी यात्रा भरते, या यात्रेसाठी अनेक गावांहून वेडू समाजाचे लोक नवस करण्यासाठी आणि फेडण्यासाठी जमतात.

वर्षाकाठी एकदा येणारा नवरात्र महोत्सव या समाजात मोठा सण मानला जातो, या उत्सवाचे वेळी पुरुष आणि स्त्रिया देवाच्या नावाने नऊ दिवस उपवास करतात. या उपवासामध्ये रोज संध्याकाळी फक्त एक वेळ जेवण घेतले जाते, मात्र नऊ दिवसांनंतर हा उपवास दारू पिऊन आणि मटण खाऊनच सोडावा, असा संकेत आहे.

गुजरातमधून महाराष्ट्रात आलेला मेहतर समाज आणि त्याच राज्यातून आलेला वेडू समाज यांच्यामध्ये व्यक्तींची आडनावे सारखीच आढळतात. यांमध्ये परमार, वाघेला, सोळंकी आणि चौहान ही आडनावे प्रमुख आहेत. या आडनावांवरून या समाजात ' गोत्रे ' किंवा ' कुळे ' ठरविण्यात आली आहेत, त्याचप्रमाणे देवदेवतांचीसुद्धा विभागणी आडनावांप्रमाणेच केली गेली आहे. त्यांमध्ये परमारांची खोडियार माता, दगाव, आणि मेलडी माता, वाघेला या आडनावाच्या लोकांची विहत माता,

मेलडी माता, ही देवस्थाने होत. सोळंकी यांनी हडकमय माता घेतली आहे, तर चौहान यांची सोळंकीप्रमाणेच देवस्थाने आहेत, प्रत्येक आडनावात मेलडी माता ही श्रेष्ठ समजली जाते, सर्व आडनावांचे लोक तिला मानतात.

## लग्नविधी

या समाजामध्ये बालविवाह पद्धती फार पूर्वीपासून चालत आली आहे. लग्न-कार्यामध्ये पंचायतीचा सहभाग प्रमुख असतो. त्यांच्या साक्षीनेच लग्नविधी पार पाडला जातो.

विशेषत: नवऱ्यामुलाने मुलीला दोनशे रुपये 'दहेज' देण्याची प्रथा आहे. लग्न मुलीच्याच घरी होत असल्याने त्या खर्चाची व्यवस्था म्हणून वरील रक्कम देण्यात येते, असे सांगण्यात आले. समाजातील लग्ने लावण्यास कोणा ब्राह्मण व्यक्तीची गरज नसते, तर समाजातील कोणतीही प्रौढ व्यक्ती लग्न लावू शकते. लग्नाचे वेळी होम पेटविला जातो, त्या होमाच्या चारी बाजूंना चार कळश्या (घागरी) ठेवल्या जातात. नवरा-नवरी त्या पेटत्या होमाच्या भोवती फेऱ्या मारतात. नंतर नवरी दूर एका बाजूला जाऊन बसते. नवरदेव लग्नाला आलेल्या सर्व मंडळींना गुलाल लावतो. त्या वेळी उपस्थित लोक नवरानवरीच्या अंगांवर फुले उधळतात. त्यानंतर नवरीमुलीच्या केसांतील एक बट त्या समाजातील प्रौढ मनुष्य कातरीने कातरतो आणि हा लग्नसोहळा संपतो.

लग्नाचे दुसरे दिवशी ऐपतीप्रमाणे बुंदी किंवा सरबत पाहुण्यांना दिले जाते. तर जे कोणी लग्नाची वरात घेऊन येतील, त्यांना नवरीकडील लोकांनी आळूचपातीचे जेवण देण्याचा रिवाज आहे.

लग्नानंतर या समाजात मंगळसूत्र वापरत नाहीत. परंतु विवाहित स्त्रिया हत्तीच्या दाताचे कंगन, लग्नखूण म्हणून हातात घालतात. अविवाहित स्त्रिया कंगन वापरीत नाहीत.

या समाजात विधवाविवाहाची प्रथा रूढ आहे. त्याला ते गाठ बांधणे किंवा त्यांच्या भाषेत 'गोधडी उपर ब्याहाडवानी' असे म्हणतात. विवाहाच्या वेळी एका घरात गोधडी अंथरलेली असते, त्या गोधडीवर ज्या स्त्रीची गाठ बांधायची असेल, अशा विधवेला बसविले जाते, तिच्या शेजारी तिच्याशी गाठ बांधणारा पुरुष बसविला जातो. पंचमंडळी आणि इतर लोक एका बाजूला बसतात. उपस्थितांच्या साक्षीने ती दोघे एकमेकांना हार घालतात आणि हा गाठ बांधण्याचा कार्यक्रम संपतो. अशा कार्यक्रमात कोणतेही धार्मिक विधी केले जात नाहीत, असे सांगण्यात आले. गोधडीवर गाठ बांधली जाते, म्हणून त्याला गोधडीउपर ब्याहाडवानी असे म्हणतात.

### मर्तिकाचा विधी

ज्या कुटुंबात मयत होते, त्या कुटुंबाने मयतीचा कोणताही खर्च न करण्याची प्रथा रूढ आहे. तो खर्च समाजाने करायचा, असा संकेत आहे. जेथे मृत व्यक्तीला ठेवलेले असते, त्या ठिकाणी एक रिकामे भांडे (ताट) ठेवले जाते. त्या ताटात विडयाचे बंडल किंवा सुट्ट्या विडया आणि काडेपेटी ठेवलेली असते. मयतीला जमलेल्या या समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे त्या ताटात पैसे ठेवायचे आणि ताटातील विडी घेऊन ओढायची. अशा प्रकारे जमा झालेल्या पैशातून मयतीचा खर्च करावयाचा, अशी पद्धत पूर्वीपासून चालत आलेली आहे. ती आजही चालू आहे.

मृत व्यक्तीचा अंत्यविधी संपल्यानंतर त्याच्या नावाने गोड शिरा केला जातो आणि तो पाच अविवाहित मुलींना खाऊ घातला जातो. मृताचे दहन करण्याची प्रथा या समाजात आहे.

### अंधश्रद्धा ' मुडो बाळवानो '

अस्थिरता व पराकोटीचे दारिद्र्य यांमुळे देवभरोसेपणा आणि त्यातून निर्माण होणारी टोकाची अंधश्रद्धा पाहावयास मिळते. विशेषत: एखादी व्यक्ती आजारी पडली, तर औषधोपचार न घेता देवदेवतांना साकडे घालून उपासतापास आणि नवस करण्याकडेच लोकांचा कल दिसून येतो. ज्या कुटुंबात व्यक्ती आजारी असेल, त्या व्यक्तीवरून एक रुपयाचे नाणे उतरायचे आणि स्वत:च्या आडनावाच्या कुलदैवताला नवस बोलायचा : ' मला बरं वाटू दे '.

नवसानंतर चुकून ती आजारी व्यक्ती बरी झाली, की नवस फेडण्याचा एक विशिष्ट विधी केला जातो, या प्रकारामध्ये १। मीटर नवे कापड आणले जाते. नवस फेडणाऱ्या व्यक्तीने हाताच्या मुठीत गहू किंवा ज्वारी असे धान्य घ्यायचे आणि मनात कुलदेवतेचे नाव घेऊन तिच्या नावाने किती धान्य पडेल, तो अंक (म्हणजे चार दाणे पडले, तर खोडियारमाता, दहा पडले, तर मेलडी माता असे) धरायचा. त्याप्रमाणे मुठीतले धान्य अंथरलेल्या नव्या कपडयावर टाकायचे, ते पडलेले धान्य मोजायचे, आणि आपल्या मनाची खात्री होईपर्यंत तसे धान्य टाकत राहायचे, म्हणजे केलेला नवस फिटतो, अशी भावना आहे. या सर्व प्रकाराला ते ' मुडो बाळवानो ' असे म्हणतात.

याशिवाय अंधश्रद्धेचा दुसराही एक विचित्र प्रकार या समाजात आढळतो, तो म्हणजे समाजातील लोक आठआठ दिवस आंघोळ करीत नाहीत, कारण कोणी आंघोळ केली किंवा कपडे धुतले, तर देवीचा कोप होईल, (अवकृपा होईल), असा समज आहे. अलिकडच्या काही वर्षांत समाजातील तरुणांनीच ही पद्धत बंद करावी, असे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे ही प्रथा काही प्रमाणात या समाजातून बंद

होत चाललेली आहे. परंतु अशा पूर्वापार चालत आलेल्या प्रथा या समाजातील जुनी माणसे सहसा बंद करायला तयार होत नाहीत, अशा प्रथा देवाने निर्माण केलेल्या आहेत, अशी त्यांची भावना आहे. जर या या प्रथा बंद झाल्या, तर समाजाचे अस्तित्व राहणार नाही, असे त्यांचे मत आहे. या समाजातील काही तरुणांनी वरील प्रथा बंद केली असली, तरी वर्षानुवर्ष डोक्यावरची पगडी न धुण्याची प्रथा मात्र आजही पाळली जाते, असे सांगण्यात आले.

## पुरुषांना मदत करणाऱ्या महिला

पुरुषांच्या बरोबरीनें महिला आणि लहान मुलेही डबे-दुरुस्ती करतात. किंवा ज्या ठिकाणी ते राहतात, त्या राहत्या घरासमोरही मोठमोठे डांबराचे रिकामे बॅरल, तेलाचे डबे ठोकूनठाकून दुरुस्त करताना दिसतात. तर काही लोक तेल व्यापाऱ्यांकडून तेलाचे रिकामे डबे खरेदी करून, ते स्वच्छ धुऊन ऑईल मिल किंवा इतर ठिकाणी ठोक भावाने विकतात. या समाजाचा हाच प्रमुख व्यवसाय असल्याचे आजतरी पाहावयास मिळते. डबेदुरुस्ती हेच त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असून कुटुंबातील लहानथोर या व्यवसायात रमलेले दिसतात.

वेडू वाघरी समाजातील लोक अत्यंत कष्ट करणारे आणि प्रामाणिक म्हणून ओळखले जातात. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना घरासाठी लागणारे जुने पत्रे हे लोक पुरवतात, किंवा या समाजातील काही लोक घरोघरी जाऊन भंगार गोळा करतात आणि व्यापाऱ्याला विकतात, काही मंडळी दातवण, दात घासण्याच्या बाभळीच्या काड्या, लिंबाच्या काड्या आणि जुन्या कपड्यांचा व्यवसाय करतानाही आढळतात. हा व्यवसायातील बदल त्यांनी गरजेपोटी आणि परिस्थित्यनुसार केलेला आहे.

## सरकारी नोकरी नाही

शैक्षणिकदृष्ट्या हा समाज अत्यंत मागासलेला असा आहे. या समाजातील एकही व्यक्ती सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयात नोकरीस नाही. कुटुंबातील सर्वच्या सर्व लोक घरगुती व्यवसायात गुंतलेले आहेत. उत्पन्न अत्यंत अल्प असल्याने आर्थिकदृष्ट्याही हे लोक अत्यंत मागासलेले आहेत. अलिकडच्या काही वर्षांत या समाजातील तरुण पिढी धंद्याच्या बाबतीत, शैक्षणिक बाबतीत जागृत होत आहे, पारंपरिक व्यवसायाशिवाय इतर वेगळे छोटेमोठें व्यवसाय हे लोक करू लागले आहेत, शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळू लागल्यामुळे या समाजातील काही कुटुंबांतील लहान मुले शाळेत जाऊ लागली आहेत. परंतु शाळेत जाणाऱ्यांचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे.

शहरातील एकूणच वातावरणाचा परिणाम तरुण पिढीवर आढळतो. पारंपरिक

रूढी आणि अंधश्रद्धा घालविण्याचे दृष्टीने तरुण मंडळींनी काम सुरू केले आहे. अनेक वर्षांपासून समारंभात किंवा लग्नकार्यात दारू पिण्याची जी प्रथा होती, ती तरुणांनी बंद केल्याचे या समाजातील कार्यकर्त्यांनी सांगितले.

## सौंदर्य कमी करावे, म्हणून

काही प्रथा बंद करण्याचे प्रयत्न झाले असले, तरी पुरेसे यश येत नसल्याचे एका तरुणाने सांगितले. विशेषत: स्त्रियांची पारंपरिक घुंगट पद्धत, सर्व शरीरभर गोंदून घ्यायची पद्धत किंवा पुरुषाने डोक्याला बांधण्याचे पागोटे न धुण्याची पद्धत आजही चालू आहेच.

या समाजातील स्त्रिया जात्याच सुंदर असल्या, तरी त्या शरीरभर गोंदून शरीर विद्रूप करतात. याविषयी त्या समाजातील कार्यकर्त्यांस विचारले असता तो म्हणाला, 'स्त्रियांनी असे गोंदले नाही, तर मूळ सौंदर्य अधिक खुलून दिसेल आणि शील धोक्यात येईल, म्हणून सौंदर्य कमी करण्यासाठी स्त्रिया सर्वांगावर वेडेवाकडे गोंदून घेतात.'

महिला वर्गात दागदागिन्यांची हौस खूप असल्याचे आढळते, कोपरापर्यंत चांदीच्या बांगड्या घालतात. त्याला ते 'सुडो' असे म्हणतात. याशिवाय गळ्यातही चांदीचे दागिने वापरण्याकडे महिलांचा कल दिसतो. परंतु अलिकडच्या काळात महागाई आणि अल्पप्राप्ती यांमुळे हल्ली चांदीचे दागिने मिळणे अवघड झाले आहे, असे एका महिलेने सांगितले. परंतु दागिन्यांची हौस भागविण्यासाठी चांदी-शिवाय हस्तिदंतासारख्या दिसणाऱ्या पांढऱ्याशुभ्र बांगड्या आणि नकली मण्यांच्या माळा महिला आवडीने घालतात.

## भाषा

वेडू समाज हा मुळचा गुजरातमधील असल्याने त्यांची भाषा ही गुजराती आहे, असे वाटले, परंतु हे लोक, गुजराती, हिंदी, राजस्थानी अशी संमिश्र भाषा बोलताना आढळतात. त्या भाषेला 'ग्रामीण गुजराती' म्हणतात, याशिवाय धंद्यासाठी म्हणून खास वापरली जाणारी दुसरी एक सांकेतिक भाषाही ते बोलतात. त्या भाषेला ते पारसी भाषा असे म्हणतात, या भाषेमध्ये पैशाला 'लकडिया', चहाला 'खटाळे', जेवणाला 'खोबलवा', झोपण्याला 'लोकावा', तर पोलिसाला 'सोलेल' असे म्हणतात.

## स्त्रीला स्वातंत्र्य नाही

इतर समाजांप्रमाणे याही समाजात स्त्रियांना पुरुषांच्या आज्ञेत राहावे लागते. चूल आणि मूल यांपलीकडे स्त्रियांचे स्थान नाही. वाघरी समाजातील परंपरेने

चालत आलेली घुंगट पद्धत आजही त्यांच्यांत पाहावयास मिळते. समाजातील प्रौढ व्यक्ती, किंवा कुटुंबातील वडीलधाऱ्या पुरुष मंडळींसमोर शक्यतो स्त्रिया चेहरा उघडा ठेवीत नाहीत, चेहऱ्यावरून हनुवटीपर्यंत पदर ओढला जातो. त्याला ते घुंगट असे म्हणतात.

स्त्रियांना शिक्षण देण्याच्या बाबतीत या समाजातील पुरुषांचा विरोध असल्याचे सांगण्यात आले. याविषयी एकाला विचारले असता तो म्हणाला, 'बायची जात दुसऱ्याचं देनं, परघरी जाणारी. तिला काय शिकवायचं ?'

## कुटुंबनियोजन अमान्य

देवदेवतांच्या भीतीने लोकांचा कुटुंब नियोजनावरही अजिबात विश्वास नाही. त्यांना असे काही नियोजन होऊ शकते, ही कल्पनाच मान्य नाही. त्यामुळे समाजातील एकाही व्यक्तीने असे नियोजन केल्याचे आढळले नाही. प्रत्येक कुटुंबात पाच तें सहा नागडी उघडी मुले पाहावयास मिळतात. त्यामुळे छोटया धंद्यातून मिळणारे अल्प उत्पन्न आणि कुटुंबाची संख्या याचा मेळ न बसल्याने त्यांच्या घरात अठराविश्व दारिद्र्य पाहावयास मिळते.

असा हा दारिद्र्यरेषेखाली जगणारा आणि अत्यंत मागासलेला वाघरी समाज वेगवेगळ्या छोटया धंद्यांत आज राबताना दिसतो. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या काही वर्षांत समाजातील काही तरुणांवर सभोवतालच्या वातावरणाचा परिणाम जाणवतो आहे. काही तरुण आपल्या समाजातही सुधारणा करण्यासाठी धडपडत आहेत. इतर समाजांतील कार्यकर्त्यांच्या मदतीने काही सुधारणा करू पाहत आहेत. कुटुंबनियोजन आणि शिक्षण याचे महत्त्व या समाजातील जाणत्या तरुणांना अलीकडे जाणवले आहे, तसा प्रयत्न आणि प्रसार काही तरुण करीत आहेत. त्यांना इतर समाजांतील जाणत्या समाज-कार्यकर्त्यांनी सहकार्य केले, तर ही मंडळी अल्पावधीत सुधारू शकतील, असे वाटते, विशेषतः या समाजातील तरुणांकडून या अपेक्षा आहेत. त्यांना शासनाने आणि समाजाने साथ देणे आवश्यक आहे.

• • •

# गोपाळ समाज

प्राचीन काळापासून गाई-म्हशींचा व्यापार करणारा 'गोपाळ' म्हणून समाज महाराष्ट्रात ओळखला जातो. हा समाज मूळचा महाराष्ट्रातील असल्याचे सांगण्यात येते. गाई-म्हशी पाळणे आणि त्या योग्य वेळी गरजू लोकांना हवी ती किंमत घेऊन विकणे हाच या समाजाचा परंपरागत प्रमुख व्यवसाय. हा व्यवसाय किंवा व्यापार करण्याच्या निमित्ताने या समाजातील लोकांना सतत गावोगावी भटकावे लागते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेशही 'भटक्या' समाजांच्या यादीत केला आहे.

गोपाळ हा भटका समाज असला, तरी किंवा पूर्वी अस्तित्वात असणाऱ्या ग्रामव्यवस्थेत या समाजाचा सहभाग नव्हता, तरी परंतु गावगाड्यातील प्रमुख शेतकरीवर्गाचा या समाजाशी गाईम्हशींच्या व्यापारामुळे सततचा संबंध येत असे. मात्र अशा प्रकारचे संबंध असले, तरी 'गोपाळां'ना कोणत्याही गावात कायम स्वरूपी राहता येत नसे, तर त्यांना गावाबाहेर पाले ठोकून गावपाटलाच्या परवानगीनेच काही दिवस राहता येत असे, बरोबर त्यांचा संसार असे. त्यामुळे त्यांची पूर्ण चौकशी करून आणि पालांची व पालांत राहणाऱ्या लोकांची, त्यांच्या गुराढोरांची, कुत्र्यांची, कोंबड्याची, पूर्ण नोंद करूनच त्यांना गावाबाहेर राहण्याची परवानगी दिली जात असे. विशेष म्हणजे तीन दिवसांपेक्षा जास्त राहण्याची परवानगी दिली जात नसे. त्यामुळे गोपाळ समाजातील प्रत्येक कार्य, तीन दिवसांतच उरकले जात असे. लग्न, मृत्यू, बाळंतपण अथवा अन्य कार्ये तीन दिवसांत उरकून त्या गावच्या पाटलाचे ओळखपत्र घेऊन त्यांना पुढच्या गावी मुक्कामाला जावे लागत असे.

## तीन दिवसांचे महत्व

तीन दिवसाला या समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या प्रमुख रूढी, प्रथा या तीन दिवसांतच घडू लागल्या. पुढे ही प्रथा त्या समाजाची रूढी बनली. आजही या समाजात लग्न असो किंवा कोणाचा मृत्यू झालेला असो, तीन दिवसांतच सारे सोपस्कार करावे लागतात.

महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या पाऊण लाखाचे जवळपास आहे. महाराष्ट्रात उसाचे कारखाने आणि बागायती परिसरात हे लोक मोठ्या-प्रमाणात आढळतात. नगर, नाशिक, धुळे, जळगाव, मालेगाव, अकोला, औरंगाबाद, बीड आणि पुणे या जिल्ह्यांतील काही भागांत या समाजाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ, मराठवाड्यात राहणाऱ्या गोपाळांच्यांत काही चालीरीती, रूढी आणि परंपरा थोड्याफार प्रमाणात भिन्न आहेत. प्रदेशानुरूप त्या त्या लोकांनी स्वतःवर काही जातबंधने लादून घेतलेली आहेत. त्यामुळे गोपाळ या एकाच नावाने ओळखला जाणारा महाराष्ट्रातील हा समाज आपला परिचय वेगवेगळा सांगतो. एवढेच नव्हे, तर विदर्भ-मराठवाड्यातील 'गोपाळ' हे समाजात काही पोटजाती असल्याचे सांगतात, तर पश्चिम महाराष्ट्रातील गोपाळ दोनच पोटजाती असल्याचे सांगतो. गोपाळ ही मुख्य जात असून 'खेळकरी गोपाळ' ही पोटजात असल्याचे सांगतात.

## खेळकरी गोपाळ

या समाजातील ज्यांना गाई-म्हशींचा व्यापार करता आला नाही किंवा जे अशा व्यवसायात रमले नाहीत, त्या लोकांनी वेगवेगळ्या प्रकारचे खेळ करून किंवा डोंबाऱ्यासारखे कसरतीचे प्रयोग करून गुजराण केली, ते लोक नंतरच्या काळात 'खेळकरी' गोपाळ या नावाने परिचित झाले. त्यांनी 'खेळकरी गोपाळ' असेच स्वतःच्या जातीचे नाव स्वीकारले.

पुणे जिल्ह्यातील बारामती शहराच्या आसपास आणि माळेगाव या ठिकाणी गोपाळ समाजाची वस्ती पूर्वीपासून आहे. मात्र तेथील गोपाळ स्वतःची ओळख बागडी म्हणून सांगू लागले आहेत. इतर गोपाळ हे यांना बागडी म्हणूनच ओळखतात. गोपाळ म्हणूनच संबोधतात. मात्र त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार होत नाहीत.

मूळचे गोपाळ नंतरच्या काळात बागडी कसे झाले, याविषयी विचारले असता एका कार्यकर्त्याने सांगितले, की फार वर्षांपूर्वी गाई-म्हशी विक्रीच्या व्यवसायाच्या निमित्ताने काही गोपाळ समाजातील कुटुंब बारामतीचे आसपास राहणाऱ्या बागडी नावाच्या इसमाच्या जागेत आश्रयाला राहिली. त्या इसमाने त्यांची राहती जागा नंतरच्या काही वर्षांत गोपाळ कुटुंबांनाच देऊ केली, मात्र या जागेच्या

मोबदल्यात मी मेल्यानंतर माझे नाव समाजात जिवंत ठेवावे, असे सांगितले. त्यामुळे बागडी इसमानंतर मूळचे गोपाळ स्वत:ला बागडी म्हणून घेऊ लागले.

आजूबाजूला राहणारे इतर जातीजमातींचे लोकही त्यांना 'बांगड्याचे' जागेत अनेक वर्षांपासून वहिवाट करणारे अगर पक्की घरे बांधून राहणारे ते मूळच्या 'बागडी' इसमाचेच वंशज असावेत, असे समजून तेही (मूळच्या) गोपाळांना 'बागडी' या नावानेच ओळखू लागले. ते आजपर्यंत 'बागडी' या नावानेच ओळखले जातात.

बारामतीचे शेजारी, माळेगावचे शिवारात आजही 'बागडी' किंवा 'बगाडे' वस्ती प्रसिद्ध आहे. तेथे मूळचे 'बागडी' आणि नंतरचे (गोपाळांचे) बागडी हे एकाच जातीचे म्हणून अनेक वर्षांपासून एकत्र राहत आहेत. त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार होतो, असेही सांगण्यात आले.

## जातपंचायत

गोपाळ समाजातही जातपंचायत आजही अस्तित्वात आहे. समाजातील अंतर्गत कलह, विवाह, प्रमुख विधी यांत पंचायतीचा सहभाग असतो. पंचायतीच्या प्रमुखास या समाजात 'पाटील' या नावाने ओळखले जाते. पंचायतीचे प्रमुखपद हे परंपरेने चालत आलेले आहे. विशेषत: गव्हाण आडनावाच्या कुटुंबात हे प्रमुख पद दिले जाते. पंचायतीचे अलिखित नियम हे समाजातील सर्व लोकांवर बंधनकारक असतात.

एखाद्या व्यक्तीने जातपंचायतीचे (अलिखित) नियम मोडले, डावलले, तर संबंधित व्यक्तीस पंचायत बहिष्कृत करते. त्याला 'पावली बंद' करणे असे म्हटले जाते. 'पावली बंद'च्या भीतीने या समाजात सहसा जातींच्या रूढी-परंपरेला, किंवा पंचायतीला विरोध केला जात नाही. पावली बंद होणे हे समाजात अप्रतिष्ठेचे अथवा नामुश्कीचे समजले जाते. पावली बंद इसमास समाजात कवडी किंमत नसते. तो समाजातून बहिष्कृत समजला जातो. त्यामुळे पावली बंद इसम कितीही श्रीमंत असला, तरी गरिबांतला गरीबसुद्धा अशा पावली बंद श्रीमंताशी कसलेही संबंध ठेवीत नाही. असा गरीब त्या श्रीमंतापेक्षा स्वत:ला भाग्यवान समजतो.

## गोपाळांचा विवाह

गोपाळ समाजात विवाहाला अत्यंत पवित्र असे स्थान दिलेले आहे. लग्नसोहळा तीन दिवस चालतो. या तीन दिवसांना एक वेगळे महत्त्व आहे. लग्नविधी उरकल्या-नंतर जातपंचायत बसते. त्या वेळी वधूवरांकडून प्रत्येकी २५ रुपये घेतले जातात. या ५० रुपयांना महत्त्व आहे. लग्नाला आलेल्या लोकांची आणि त्यांच्या गावाची यादी तयार केली जाते व वधूवरांकडून घेतलेले पन्नास रुपये प्रत्येकाला एक या-

प्रमाणे वाटले जातात. एक रुपया मिळेतोपर्यंत कोणीही व्यक्ती मांडवाबाहेर जात नाही. रुपया न घेता मांडवातून बाहेर गेले, तर ती व्यक्ती जातीबहिष्कृत आहे, असे समजले जाते. अशा इसमास या समाजात 'पावली बंद इसम' म्हणून ओळखले जाते. पावली बंद होणे या समाजात अप्रतिष्ठित समजले जाते.

कितीही श्रीमंत अगर प्रतिष्ठित व्यक्ती असली, तरी आणि त्याची पावली बंद केली असेल, तर या समाजातला कोणीही माणूस त्या माणसास कवडीची किंमत देत नाही. त्यांच्या लग्नकार्यात अथवा कोणत्याही कार्यक्रमास जात नाही.

या समाजातून बहिष्कृत केलेल्या पुरुष व्यक्तीस पुन्हा जातीत घेण्याची सोय आहे. मात्र स्त्रियांना एकदा बहिष्कृत केले, तर पुन्हा जातीत घेतले जात नाही. समाजातील व्यक्ती सहसा न्याय मागण्यासाठी न्यायालयात जात नाही. जातपंचायत हेच या समाजाचे मुख्य न्यायालय. नगर जिल्ह्यातील 'मढी' हे ठिकाण या समाजातील सर्वश्रेष्ठ न्यायालय मानले गेले आहे. दरवर्षी पौष पौर्णिमेला मढी येथील कान्होबाच्या यात्रेत, या समाजातील महाराष्ट्रातील सर्व गोपाळ एकत्र जमतात व अंतिम न्यायनिवाडे केले जातात.

गोपाळ समाजातील लोक आपण हिंदूधर्मीय असल्याचे सांगतात. हिंदूंच्या चालीरीती, परंपरा आणि सणवार ते मानतात. जोतीबा आणि कान्होबा ही यांची मुख्य कुलदैवते असून प्रत्येक गोपालाचे घरात त्यांचे मुखवटे देव्हाऱ्यात ठेवलेले आढळतात. जेजुरी, पाली तसेच कान्होबाच्या यात्रेला ही मंडळी उत्साहाने एकत्र जमतात. या समाजात अंधश्रद्धेचे प्रमाण खूपच असल्याचे दिसते. विशेषतः या समाजातील स्त्रिया देवभोळ्या आणि अंधश्रद्धाळू आहेत.

## गोपाळ स्त्रियांची वेषभूषा

या समाजात विशेषतः स्त्रियांमध्ये नाकातल्या नथीला वेगळे महत्त्व दिले जाते. समाजातील प्रत्येक स्त्री नाकात नथ घालते. याशिवाय दंडातील बाजूबंद हा त्यांचा आवडता दागिना आहे. त्याला ते 'दंडोळ्या' म्हणतात. दंडोळीवरून त्या त्या स्त्रीची समाजातील प्रतिष्ठा ठरविली जाते. दंडोळ्या चांदीच्या असतात. याशिवाय चांदीचे तोडे घालण्याची प्रथा आहे.

लग्नप्रसंगी या समाजातील महिलांना मानाचे स्थान दिले जाते. कुटुंबात लग्न असेल, तर लग्न झालेली स्त्री सुवासिनी प्रमुख असते. तिला त्या प्रसंगी 'सवासीण' म्हणतात, तर तिच्या पतीला 'सव्वाशा' म्हणून मान दिला जातो. लग्नाकरिता आलेल्या पाहुण्यांची करमणूक म्हणून ते दोघे मातीचा चिखल करून नाचतात. एकमेकांच्या अंगांवर चिखल फेकतात. या समाजात चर्मकार समाजा-

प्रमाणे नवरानवरीला पाठकुळी घेऊन एकमेकांना चपाट्यांनी मारण्याचाही खेळ पाहुण्यांच्या करमणुकीसाठी खेळला जातो. त्याला 'लाल झेंडा' असे म्हणतात.

याशिवाय बाळाच्या पाचवीला बोकड कापून समाजाला जेवण दिले जाते, असेही एकाने सांगितले.

## वर्षभर दुखवटा

गोपाळ समाज स्वतःला हिंदू धर्मीय समजत असला, तरी हिंदू धर्मीयांप्रमाणे या समाजातील मृत व्यक्तीचे दहन केले जात नाही, तर दफन करण्याची प्रथा या समाजात असल्याचे सांगण्यात आले. अंत्यविधीच्या तिसऱ्या दिवशी मृताचे 'दफन' केलेल्या ठिकाणी शेंदूर लावून तेथे दगड ठेवतात.

समाजातील मृत व्यक्तीचा दुखवटा वर्षभर पाळला जातो. या काळात कोणतेही सणवार साजरे केले जात नाहीत. अगर धार्मिक विधी केले जात नाहीत. एवढेच नव्हे, तर ज्या कुटुंबातील व्यक्ती मृत झाली असेल, त्या कुटुंबाच्या आडनावाच्या इतर कुटुंबातही वर्षभर दुखवटा पाळला जातो.

हिंदू धर्मीयांच्या देवदेवतांबरोबरच हे लोक मुस्लिमांच्या दर्यांनाही मनोभावे भजतात. विशेषत: जालन्याशेजारी असलेल्या 'सखलादी बाबा'च्या दर्याला हे लोक दरवर्षी जातात.

## समाजातील प्रमुख कुळी

गोपाळ समाजात काही प्रमुख कुळी मानल्या गेल्या आहेत. त्यांत धनगर, गव्हाणे, गिऱ्हे, पवार, कुऱ्हे, ब्राह्मणे, लोणोर, कोळी, गायकवाड, नवघरे, नवगिरे या आडनावांचा समावेश आहे. ही सर्व कुळे समाजात सारख्या प्रतिष्ठेची मानली जातात. कुळात आपापसांत रोटीबेटी व्यवहार होतो. फक्त अपवाद म्हणून धनगर आणि गिऱ्हे या दोन कुळांत बेटी व्यवहार होत नसल्याचे सांगण्यात आले.

## व्यवहारचातुर्य

नित्याच्या भटकंतीमुळे हा समाज शिक्षणापासून दूर गेला आहे. या समाजात ९९ टक्के लोक अशिक्षित आहेत. परंतु व्यापार हाच पिढीजात व्यवसाय असल्याने या समाजात व्यवहारचातुर्य पाहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजात विशेष असा सामाजिक बदल आढळत नाही. राजकारण आणि सामाजिक चळवळीपासून हा समाज अलिप्त आहे. या समाजाला राजकारणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही. शासनाने भटक्या विमुक्तांना दिलेल्या सवलतींचा लाभही त्यांना घेता आलेला नाही. पारंपरिक व्यापार–उद्योगामुळे या

समाजातील काही लोकांनी चांगली आर्थिक प्रगती केली आहे.

गेल्या काही वर्षांत या समाजातील ९० टक्के लोक महाराष्ट्रात स्थिर झाले आहेत. त्यांच्यामध्ये शैक्षणिक आणि सामाजिक जाणिवा येऊ लागलेल्या आहेत. काही शिक्षित तरुण या समाजाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

● ● ●

# वैदू समाज

भर दुपारच्या रणरणत्या उन्हात तीन-चार महिन्यांचे तान्हे पोर पाठकुळी बांधून, काखेत झोळी, एका हातात रंगीबेरंगी मण्याची पोत, मणी, मनगटी, पाळे, आडव्या काठीला अडकविलेले, डोक्यावर कसल्याशा मळकट गोधडीवजा चंबूसारखे वरती बांधलेले गाठोडे. दुसऱ्या हातात कुत्र्यांना हटकण्यासाठी एखादी वेडीवाकडी लांबसडक काठी घेऊन अनवाणी पायाने 'सुया घे, पोत घे, बिब्बं घे गऽऽबाई' अशा हाळया देत फिरणाऱ्या अनेक स्त्रिया आपण पाहिल्या असतील. किंवा 'तुंबडी लावणार, वाईवर, वातावर औशीद!' असे ओरडत फिरणारा एखादा दुसरा बाप्या किंवा काखोटीला भलीमोठी पत्र्याची ट्रंक आणि तिला लोंबकळत बांधलेले चार-दोन पत्र्याचे तुकडे घेऊन 'डबे करणार, बुडे बसविणार' असे म्हणत जाणारे लोक आपण पाहिले असतील. हे लोक बहुश: 'वैदू' समाजातील होत.

पिढयान् पिढया झाडपाल्याचे औषध विकणारे म्हणजेच वैद्यकीय व्यवसाय करणारे म्हणून ते 'वैद्य' किंवा ग्रामीण भाषेत 'वैदू' या नावाने ओळखले जातात.

हा समाज प्रामुख्याने आंध्र प्रदेशातून पोट भरण्याच्या निमित्ताने भटकत आल्याचे सांगण्यात येते. त्यांची मातृभाषा तेलगू असून त्या प्रदेशाच्या रूढी, परंपरा पाळताना ते आढळतात. वैदू समाजाचा समावेश महाराष्ट्र शासनाने भटकी जमात म्हणून केला आहे. महाराष्ट्रातील छोटया शहरांत काही लोक वस्ती करून रहात आहेत. तरी भटकंती थांबलेली नाही, असे या समाजाचे आजचे चित्र आहे.

### वस्तूविक्रीही

या लोकांचा प्रमुख व्यवसाय औषधविक्रीचा असला, तरी त्याशिवाय डबे, चाळण्या करणे, दुरुस्ती करणे, मणी, पोत, दाभण, बिब्बे, वाळे, मनगटी, अशा

छोटया छोटया गृहोपयोगी वस्तू घरोघर जाऊन विकणे आणि त्या बदल्यात मिळेल ते शिळेपाके अन्न, जुने कपडे किंवा पैसे स्वीकारणे. दिवसभरात मिळालेले अन्न वेळ मिळेल तेव्हा खाणे, उरलेले घरच्या पोराबाळांसाठी नेणे अशी या समाजातील लोकांची उपजीविका चालते.

विशेषत: खेडयापाडयांतील अशिक्षित लोक, वातावर, जळवांवर किंवा सांधे-दुखीवर त्यांच्याकडून अल्प किमतीत झाडपाल्याची औषधे विकत घेतात. वेळप्रसंगी या लोकांच्या महिला गर्भपातावर जालिम दवा देतात. क्वचित प्रसंगी रोग्याला गुण येतो, तर गर्भपाताचे वेळी मृत्यूसुद्धा ओढवला जातो. अशा प्रसंगी अब्रूचा प्रश्न म्हणून बोभाटा केला जात नाही, त्यामुळे औषध देणारा आणि घेणारा नामानिराळा राहतो. कोणी कोणाला दोष देत नाही.

## वैदू आणि पोटजाती

या समाजातही पोटजाती आढळतात. वैदू ही मुख्य जात असून 'दासर वैदू', नंदीबैलवाले वैदू, मदचोड वैदू, नंदलोड वैदू, असे चार पोटजातींचे प्रकार आहेत. प्रत्येक पोटजातीचे व्यवसाय वेगवेगळे असून यांच्यामध्ये रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. प्रत्येक पोटजात ही दुसऱ्या पोटजातीपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजते. त्यांच्या व्यवसायावरूनही जातीचे वर्गीकरण सांगितले जाते, ते असे : 'दासर वैदू' लोक प्रामुख्याने सुया, पोत, बिब्बे विकतात, तर नंदीबैलवाले वैदू नंदीबैलाचा खेळ करून आपली उपजीविका करतात. तर डबे, बादल्या तयार करणारे, डबे-बादल्यांची दुरुस्ती करणारे ते मदचोड वैदू म्हणून ओळखले जातात. नंदलोड हे औषधविक्रीचा प्रमुख व्यवसाय करतात.

पूर्वी हे लोक मुख्यत: डोंगराळ भागात पाले ठोकून राहत. जंगलात औषधी वनस्पती गोळा करीत. त्यांना शिकारीचा मोठा नाद असल्याने तरस, घोरपडी, ससे, आदी प्राण्यांची शिकार करीत. शिकार करणे, कुस्त्या करणे हे त्यांचे आवडीचे छंद.

## जातपंचायत

परंपरागत चालत आलेली आणि जातसमूहावर नियंत्रण करणारी जात-पंचायत ही संस्था याही समाजात अस्तित्वात आहे. समाजातील कोणीही हुशार वयोवृद्ध जातपंचायतीचा प्रमुख होऊ शकतो. प्रमुखास 'नायगाड' (न्याय देणारा) असे म्हटले जाते.

जातीअंतर्गत तंटे अथवा अनैतिक संबंधांतील झगडे किंवा लग्नकार्यसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार पंचायतीला असल्याने लोक न्याय मागण्यासाठी कोर्ट-कचेऱ्यांत जात नाहीत. जातपंचायत अशा घटनांचा न्यायनिवाडा जातीत करते.

ज्या व्यक्तीने गुन्हा केला असेल, त्याला वाळीत टाकले जाते किंवा एक पैशाचा दंड वसूल केला जातो किंवा संबंधित व्यक्तीची गाढवावरून धिंड काढली जाते.

एखादी व्यक्ती जर गुन्हा कबूल करीत नसेल आणि जातपंचायतीला जर त्याच्याविषयी जर संशय असेल, तर त्याला देवापुढे उभे केले जाते. त्याला आंघोळ घातली जाते. नंतर स्वच्छ केलेले मूठभर तांदूळ त्याच्या तोंडात ठेवले जातात. संबंधित व्यक्ती ते चघळते. नंतर त्याच्यासमोर पिंपळाचे पान ठेवले जाते. आणि त्या व्यक्तीला तोंडातले तांदूळ पानावर थुंकावयास सांगितले जाते. जर त्या व्यक्तीने गुन्हा केला असेल, तर तांदळाबरोबर तोंडातून रक्त पडते, असे सांगण्यात आले. ही प्रथा आजही अस्तित्वात असल्याचे एका कार्यकर्त्याने सांगितले.

या समाजातील जातपंचायतीचे नियम हे अलिखित आहेत. स्थानिक ठिकाणी जर न्यायनिवाडा झाला नाही, तर जेजुरी येथे पौर्णिमेस गाढवांचा बाजार भरतो, तेव्हा किंवा तेथेही निकाल लागला नाही, तर रंगपंचमीच्या वेळी ' मढी ' येथे भरणाऱ्या कानिफनाथाच्या यात्रेत न्यायनिवाडा होतो. ' मढी ' हे सर्व भटक्या विमुक्तांचे सर्वोच्च न्यायालय समजले जाते. दहा ते पंधरा दिवस ' मढी'ची यात्रा असते. सर्व जाती-जमातींच्या जातपंचायती त्या ठिकाणी एकत्र येतात आणि न्यायनिवाडा करतात.

पुरुष गुन्हेगाराला माफी मागून किंवा दंड भरून पुन्हा जातीत घेतले जाते, परंतु स्त्रीने अनैतिक गुन्हा केला आणि तो शाबीत झाला, तर तिने त्याबद्दल माफी मागितली अथवा दंड भरण्याची तयारी दर्शविली, तरीही अशा स्त्रीला जातीत घेतले जात नाही, असे एकाने सांगितले.

## अंधश्रद्धाळू समाज

वैदू समाज हा अत्यंत मागासलेला आणि अशिक्षित असा असल्याने अंधश्रद्धेचे प्रमाण या समाजात मोठे आहे. कुटुंबातील प्रत्येक घटनेला देव कारणीभूत असतो, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे घरातील लग्नकार्ये, मयत किंवा बाळाचा जन्म या वेळी देवाला अंगारेधुपारे केले जातात.

एखाद्या कुटुंबातील व्यक्ती आजारी असेल, तर देवदेवरुषाशिवाय इतर डॉक्टरी उपाय करणे पाप समजले जाते. इतर समाजाला शारीरिक रोगांवर औषध देणारा वैदू समाज स्वतः मात्र त्या औषधाचा उपयोग न करता देवावर हवाला ठेवून जगत असतो.

वैदू समाज हा हिंदूधर्मीय समाज आहे. याच्या प्रत्येक कुटुंबात हिंदू देव-देवतांचे देव्हारे आढळतात. पितळेचे अथवा चांदीचे मुखवटे देव्हाऱ्यात ठेवलेले

असतात, त्यांना ' टाक ' असे म्हणतात.

देव्हाऱ्यातील ' टाकां'वरून त्या कुटुंबाची समाजातील प्रतिष्ठा ठरविली जाते. या समाजातील एखाद्या व्यक्तीने देवाला नवस केला असेल, तर घरात जेवढे टाक असतील, तेवढी बकरी देवासमोर कापावी लागतात. मग संबंधित व्यक्ती गरीब असो अगर श्रीमंत असो, घरातील टाकांच्या हिशेबात बकरी ही कापावीच लागतात. अन्यथा त्या कुटुंबाला समाजातून बहिष्कृत व्हावे लागते.

## बालविवाहाची प्रथा

फार पूर्वीच्या काळापासून बालविवाहाची प्रथा या समाजात रूढ आहे. एवढेच नव्हे, तर स्त्री गरोदर असताना तिच्या गर्भातील बाळाचा विवाह ठरविला जातो. गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावले, की उदरातल्या गर्भाचा विवाह नक्की झाला, हे गृहीत धरले जाते.

विशेषत: बालविवाहात साटेलोटे करण्याची पद्धत कटाक्षाने पाळली जाते.

बहुपत्नीकत्वाची चाल या समाजात पूर्वीपासून अस्तित्वात आहे. वैदू पुरुष आपली कुवत असो नसो, दोन ते तीन बायका सांभाळीत असतो. प्रत्येक वैदू कुटुंबात पुरुषाला कमीत कमी दोन बायका आढळतात. याविषयी विचारले असता, अनेक बायका करण्याची चाल आमच्यांत आहे म्हणून आम्ही करतो, असे सांगण्यात येते.

या समाजात पुनर्विवाहाला जातपंचायतीची मान्यता आहे. स्त्री किंवा पुरुष दोघेही आपल्या आवडीप्रमाणे पुनर्विवाह करतात. मात्र ज्याचा पुनर्विवाह असेल, त्या व्यक्तीने समाजाला दारू आणि मटणाचे जेवण देणे सक्तीचे असते, अशा पुनर्विवाहाला वैदू लोक ' उडकी ' असे म्हणतात.

## पोटावर डाग देण्याची प्रथा

बाळाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी बाळाच्या पोटाला सुई तापवून सात डाग देण्याची विचित्र प्रथा रूढ आहे. (एका कार्यकर्त्याने असे पोटावरचे डाग मुलाखतीच्या वेळी दाखविले) मिळेल त्या घरचे शिळेपाके अन्न खात असल्याने पोटदुखीचा विकार होऊ नये, म्हणून जन्मत:च पोटावर डाग दिले जातात, असे तो म्हणाला.

जन्माला येणाऱ्या बाळाला कुटुंबातील मृत व्यक्तीचेच नाव दिले जाते. असे नाव दिले नाही, तर घरात काहीतरी विपरीत घडते, बाळावर संकट येते, अशी कल्पना आहे.

## मयतीचा विधी

समाजात मृताला पुरण्याची प्रथा आहे. प्रेत पालखीत बसवून स्मशानात नेले जाते. (विदर्भ-मराठवाड्यात झोळीत प्रेत नेण्याची प्रथा आहे) गोलाकार खड्डा खणला जातो व पुरले जाते.

## गोत्र आणि कुलदैवत

वैदू समाजात गोत्रांना आणि कुलदैवतांना मान देतात. कालीमाता, शंकर, म्हसोबा, खंडोबा, कानिफनाथ, यल्लम्मा या देवदेवता महाराष्ट्रात आल्यानंतर कुलदैवते म्हणून समाजाने स्वीकारलेल्या आहेत. ते या देवदेवतांची पूजाअर्चा करतात. त्यांच्या नावाने उपवास, नवस करतात, वरील देव-देवींचे देव्हारे वैदूच्या प्रत्येक कुटुंबात पाहावयास मिळतात. देव-देवता अंगात येतात, अशी कल्पना या समाजात आहे. कुटुंबातील अथवा समाजाच्या प्रत्येक अडीअडचणीला साकडे घातले जाते व देवदेवतांच्या नावाने बकरे, कोंबडे कापले जाते.

## गोत्र आणि आडनावे

वैदू समाजात कुळांना आणि गोत्रांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. लग्न, मयत, अथवा समाजातील इतर महत्त्वाच्या प्रसंगी व्यक्तीचे गोत्र आणि कूळ पाहूनच संबंध ठेवले जातात. या समाजातील काही गोत्रांची नावे माशोळ, वाडपुलोर, शांकोटोड, कठोड, आणि आम्मोच्छोड अशी सांगितली जातात.

वरील गोत्रांवरूनच वैदू समाजातील व्यक्तींच्या घराण्याची किंवा आडनावांची वर्गवारी केलेली आहे. माशोळ या गोत्रामध्ये धनगर, जाधव, शिंदे ही आडनावे आहे, तर शांकोटोड या गोत्रात लोखंडे आणि पवार या आडनावांचा समावेश होतो आणि काठोड या गोत्रात लाकडे, तर आम्मोच्छोड या गोत्रात आंत्रे ही प्रमुख आडनावे आहेत.

## पंजे बसविण्याची प्रथा

वैदू समाज हा हिंदू धर्मीय असला, तरी हिंदू देवदेवतांबरोबरच मुसलमान धर्मातील काही श्रद्धास्थाने सुद्धा हे लोक मानतात. विशेषत: मुसलमान समाजातील पवित्र समजले जाणारे 'पंजे' वैदू लोक घरात बसवितात. मुसलमानांप्रमाणेच उपवास करतात, पंज्यांची मिरवणूक काढतात. त्या दिवशी मुसलमानांप्रमाणे मोठा सण साजरा केला जातो.

याशिवाय महाशिवरात्रीच्या दिवशी महादेवाच्या नावाने मोठा सण साजरा करतात, उत्सव मानतात. महाराष्ट्रातील ज्या शहरात वैदू समाजाची वस्ती आहे, तेथे हमखास शंकराचे (महादेवाचे) मंदिर आढळते. वैदू हे स्वत:ला शिवाचे वंशज

समजतात. ते शिवाची भक्ती करतात. शिवाच्या नावाने उपास–तापास आणि नवस करतात.

## स्वातंत्र्योत्तर काळातील वैदूंची स्थिती

स्वातंत्र्योत्तर काळात वैदू समाजातील काही लोक शहरांत येऊन स्थायिक झालेले आहेत. त्यांनी आपल्या समाजाच्या वेगवेगळचा शहरांत छोटचा छोटचा वस्त्या केलेल्या आहेत, त्या 'वैदूवाडी' या नावाने ओळखल्या जातात. या वस्त्यांतून राहणारे पाच ते दहा टक्के लोक सोडले, तर जवळ जवळ नव्वद, पंच्याण्णव टक्के लोक आजही महाराष्ट्रातील खेडचापाडचांत, घरोघर भीक मागून चरितार्थ चालवीत आहेत. सतत भटकंतीमुळे हे लोक शिक्षणापासून खूपच दुरावलेले आहेत. शहरांत जे काही थोडेफार वैदू लोक राहतात, त्यांच्यांत बदलत्या परिस्थितीचे भान येऊ लागले आहे. त्यांची मुले शाळेत जाऊ लागली आहेत, या समाजातील काही थोडे-फार शिकलेली तरुण मंडळी, पिढीजात औषधविक्रीच्या व्यवसायापासून दूर गेली आहेत, आणि त्यांनी इतर व्यवसाय स्वीकारलेले आहेत.

शहरांतील सामाजिक चळवळीचा परिणाम तरुणांवर जाणवतो. समाज-सुधारणेच्या चळवळीत, त्याचप्रमाणे राजकारणात लोक उतरत आहेत. काँग्रेस, जनता, भाजप या राजकीय पक्षांमध्ये अनेक तरुण काम करीत असल्याचे सांगण्यात आले.

समाजात आर्थिक–सामाजिक मागासलेपणाचे प्रमाण ९९ टक्के आहे. वयोवृद्ध मंडळी आजही रूढी-परंपरेला घट्ट चिकटून आहेत. शिक्षणापासून समाज वंचित राहिलेला आहे. शिक्षित स्त्रियांचे प्रमाण शून्य आहे. स्त्रीला समाजात कोणतेही स्थान नाही; परंतु पुरुषाच्या बरोबरीने दिवसभर वणवण करीत पोटाला घास-तुकडा मिळवण्यासाठी किंवा चार पैसे मिळवण्यासाठी दारोदार भटकते. अंधश्रद्धा देवभोळेपणा, उपास, तापास आणि नवसाच्या फेऱ्यात ती पूर्णपणे अडकून पडली आहे.

महाराष्ट्र शासनाने वैदूंचा भटक्या विमुक्त जाती–जमातींत समावेश करून त्यांना विकासाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र ९५ टक्के समाज शासनाच्या सवलतीपासून अद्याप दूरच राहिलेला आहे. त्यामुळे पोटासाठी वणवण आणि पिढ्यान् पिढ्यांचे त्यांचे भटकेपण अजूनही थांबलेले नाही. त्यांच्या वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा आणि दारिद्र्य-रेषेखालचे जीवन आजही कायम आहे.

• • •

# घ्यारे समाज

घ्यारे समाज हा मूळ राजस्थानातील असल्याचे सांगितले जाते. महाराणा प्रतापांच्या वेळी मोगलांच्या सतत होणाऱ्या हल्ल्यांमुळे, किंवा महाराणा प्रतापांना त्या काळी पराभव पत्करावा लागल्याने, त्यांना मानणारे जे अनेक लोक समूह त्या काळात, राजस्थानातून परागंदा झाले, त्यांपैकी 'घ्यारे' हा समाज आहे. त्यांना 'गॅहरा' या नावानेही महाराष्ट्रात ओळखले जाते.

या समाजाचा मूळ व्यवसाय हातमागावर कापड तयार करताना धाग्यांना गंजी लावण्याचा होता, असे सांगण्यात आले, कालांतराने हे लोक, (प्रामुख्याने महिला) सुतळचा, दोरखंड, कुंचे, वगैरे वस्तू तयार करून त्यावरच उदरनिर्वाह करीत. पुढे या समाजातील 'अल्ली' नावाच्या इसमाने उपजीविकेकरिता इतर व्यक्तींच्या कानातला मळ काढण्याचा व्यवसाय सुरू केला. त्या व्यवसायात त्याला त्या काळी गरजेपेक्षा जास्त पैसे मिळत गेले. त्यामुळे या समाजातील इतर लोकांनाही हा व्यवसाय करावा, असे वाटले, आणि अल्लीबरोबर इतर लोकांनी तो व्यवसाय स्वीकारला. पुढे कानातला मळ काढणे, हाच या समाजाचा प्रमुख व्यवसाय झाला. तो आजपर्यंत टिकून आहे, असे या समाजातील काही लोकांनी सांगितले.

## भटकंती

राजस्थान सोडून या समाजातले जे लोक परागंदा झाले, ते त्या काळात देशातील वेगवेगळ्या प्रांतांत, उपजीविकेकरिता भटकत राहिले, त्यांना कायम वस्ती करण्यास ठिकाण मिळाले नाही. तसेच कायमचा असा वेगळा व्यवसाय न मिळाल्याने त्यांनी आपला मूळचाच पारंपरिक धंदा महाराष्ट्रात आणि इतर प्रांतांत आजही कायम ठेवला आहे. उत्तर प्रदेश, पंजाब, आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रात प्रामुख्याने या समाजाची वस्ती पाहावयास मिळते. या समाजातील लोक आपण हिंदूधर्मीय

असल्याचे सांगतात.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर (भटक्या विमुक्त) जाती-जमातींचा समावेश महाराष्ट्र शासनाने राजपत्रित यादीत केलेला आहे, परंतु 'घ्यारे' समाजाची नोंद मात्र त्यात आढळत नाही, त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून घ्यारे समाजातील लोक स्वतःची ओळख 'कंजर' या नावाने करून देऊ लागले आहेत. इतर भटक्या जमातींप्रमाणे आमचीही नोंद घ्यारे याच नावाने, महाराष्ट्र शासनाने करावी, असे त्यांना वाटते, तशा प्रकारे त्यांच्यांतील काही कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

## मळ काढण्याचा व्यवसाय

कानातला मळ काढणे, आणि त्यावर मिळणाऱ्या अल्प मोबदल्यात उपजीविका करणे हाच या लोकांचा नित्याचा उपक्रम झालेला आहे. या व्यवसायासाठी या समाजातील काही लोक कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत विनातिकीट प्रवास करतात, असे एकाने सांगितले.

## पाच पोटजाती

इतर समाजांप्रमाणे याही समाजात पोटजाती आढळतात. त्यांची संख्या पाच असल्याचे सांगण्यात आले. त्यात सनकत, भैंस, मळय्या, गोहेर आणि लूय्या हे प्रमुख पोटविभाग आहेत. पोटप्रकारांची ही नावे त्या समाजातील प्रमुख आडनावे म्हणूनही सांगितली जातात. याशिवाय पोटजातींत इतर आडनावांचाही विभाग वार समावेश केल्याचे सांगण्यात आले. उदा., मळय्यांमध्ये चव्हाण, सनकतमध्ये माळी, भैंसमध्ये पवार, लुय्यामध्ये शिंदे, तर गोहेरमध्ये जाधव, इ.

## जातपंचायत

याही समाजात जातपंचायतीचा प्रभाव आढळतो. जातपंचायत ही न्यायसंस्था म्हणून या समाजात ओळखली जाते. इतर जातपंचायतींच्या प्रमुखाप्रमाणे, या समाजातील जातपंचायतीला प्रमुख नाही. समाजातीलच व्यवहारी, जाणकार पाच लोक पंच म्हणून न्यायनिवाडा करतात. जातपंचायतीचे परंपरेने चालत आलेले अलिखित नियम, समाजातील सर्वांना बंधनकारक असतात. समाजात भांडणतंटा झाला, तर हे लोक न्यायालयात जात नाहीत. पंचायत बसवून त्याचा न्यायनिवाडा केला जातो.

या समाजात एखाद्या व्यक्तीने महिलेला पळविले, तर सर्व समाज संबंधित व्यक्तीच्या कुटुंबावर बहिष्कार टाकतो, त्याच्या लग्नविधीस किंवा मयतास समाजातील लोक जात नाहीत. त्याच्याशी रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत. संबंधित बहिष्कृत व्यक्तीविषयी गावोगावच्या या समाजातील लोकांना कळविण्यात येते, त्याला वाळीत टाकले जाते.

बहिष्कृत व्यक्ती आणि त्याचे कुटुंब ओळखण्याची खूण म्हणून संबंधित व्यक्तीच्या वडिलांचा चिंध्याचा बनविलेला पुतळा वस्ती जवळच्या झाडाला टांगला जातो. आणि समाजातील सर्व लोकांस त्याविषयी माहिती दिली जाते.

या समाजातून जी व्यक्ती समाजाने बहिष्कृत केलेली असते किंवा जातपंचायतीने संबंधित व्यक्तीस दोषी ठरवून बहिष्कृत केले जाते. अशी व्यक्ती समाजातील सर्वांना माहीत व्हावी, गावोगावच्या लोकांना तिच्या बहिष्कारासंबंधी जाणीव व्हावी, आणि समाजातील इतर लोकांनी अशा बहिष्कृत व्यक्तीशी अगर त्याच्या कुटुंबाशी रोटी–बेटी व्यवहार करू नये किंवा अन्य संबंध ठेवू नये, यासाठी संबंधित व्यक्तीचा चिंध्यांचा पुतळा, (त्याच्या नावाने) झाडाला टांगण्याची प्रथा या समाजात पूर्वीपासून आहे.

## पंचायतीचा दंड

वरील गुन्हा केलेल्या व्यक्तीने जर गुन्ह्याची कबुली दिली, माफी मागितली, तर पंचायत संबंधित व्यक्तीला माफ करते आणि त्याच्याकडून सदर गुन्ह्याच्याबद्दल मुलीच्या वडिलांना १६ शे रुपये आणि पंचायतीला ७५ रुपये देण्याची आज्ञा करते. त्याप्रमाणे त्या व्यक्तीने न केल्यास, समाजाला व पंचायतीला पुढील निर्णय होई-पर्यन्त रोज दारू पाजावी लागते. पंचाने त्या व्यक्तीस दोषमुक्त केले, तर त्या व्यक्तीला पळवून नेलेल्या स्त्रीबरोबर मोहतूर लावावा लागतो. आणि पत्नी म्हणून तिचा स्वीकार करावा लागतो. जर त्या व्यक्तीने ऐनवेळी, मोहतूर लावण्याचे टाळले, तर तिच्या वडिलांना (मुलीच्या वडिलांना) ८०० रु. दंड द्यावा लागतो, त्याबरोबरच पंचायतीचा दंड म्हणून समाजाला मेंढरू कापून जेवण द्यावे लागते. त्याला ‘ मंडा ’ करणे असे म्हणतात.

## लग्नविधी

लग्न हे पंचायतीच्या साक्षीने ठरले जाते. मुलाने मुलीला १६०० रुपये हुंडा देण्याची पद्धत आहे. लग्न लावण्यास ब्राह्मण बोलावला जात नाही. जमातीतीलच एखाद्या इसमास ब्राह्मण केले जाते.

लग्नानंतरच्या प्रत्येक दिवसाला या समाजात एक वेगळे महत्त्व आहे. लग्नाचे दुसरे दिवशी हळदी खेळतात. त्याला ‘ बरना ’ असे म्हणतात. त्याच दिवशी समाजाला गोड जेवण दिले जाते. त्याला ‘ महादर्या ’ असे म्हणतात. तिसरे दिवशी शंख आणि शेंदराचा दिवा नवरा-नवरीने आपल्या घरात ठेवायचा. देवाला दहीभाताचे जेवण द्यायचे, दोघांच्या घरच्यांनी मातीच्या पाच लोटया आणून, त्यांत पाणी ठेवून, समाजातील पाच पोटजातींच्या लोकांना द्यायच्या, त्याला ‘ भोवर ’ असे म्हणतात.

## अंत्यविधी

या समाजात अंत्यविधीचे दोन प्रकार सांगितले जातात, विवाहित व्यक्तींना जाळण्याची, तर अविवाहितांचे दफन करण्याची पद्धत या समाजात आहे.

या समाजातील अंत्यविधी हिंदू धर्मीयांप्रमाणे केला जातो. ज्या कुटुंबात मयत होते, त्या कुटुंबातील लोकांनी अंत्यविधीस येणाऱ्या समाजातील सर्व लोकांना दारू पाजावी लागते. दुसरे दिवशी, समाजातील लोक वर्गणी काढून कुटुंबाला दारू पाजतात. आणि डाळ-भाकरीचे जेवण देतात, त्याला ' खोटी रोटी ' असे म्हणतात. तिसरे दिवशी, सावडण्याचा कार्यक्रम होतो. सावडायला आलेल्यांना दहीभाताचे जेवण दिले जाते. आणि संध्याकाळी वस्तीपासून दूर जंगलात जाऊन गोडधोड जेवण होते. त्याला ' तिसरा साजरा करणे ' असे म्हणतात. पुरुषाचे निधन झाले असेल, तर त्या दिवशी रात्री कोंबडा कापला जातो, आणि स्त्री मृत झाली असेल, तर कोंबडी कापून समाजाला जेवण दिले जाते. वर्षानंतर मृताचे नावाने कोंबडा कापण्याची पारंपरिक रीत या समाजात असल्याचे सांगण्यात आले.

## स्त्रियांचा राजस्थानी पेहराव

हा समाज मूळचा राजस्थानी असल्याने त्यांच्यावर राजस्थानी रीतीरिवाजांचा प्रभाव जाणवतो. विशेषत: महिला राजस्थानी पद्धतीचे दागिने वापरताना आढळतात. कानांत बाळ्या, हातांत चांदीचे कडे, नाकात कुडी, काही स्त्रिया घुंगट वापरताना आढळतात. या समाजातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले जाते. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कष्ट करतात आणि कुटुंबाचे पोषण करतात. अंधश्रद्धेचे प्रमाण महिलांमध्ये अधिक पाहावयास मिळते.

या समाजात मुंज करण्याची पद्धत आहे. सीतला देवीची पूजा करून मुंज केली जाते. मुंज केल्यावर मुला-मुलीचे कान टोचले जातात. त्याला ' मातासुस्ता ' असे म्हणतात. मुलीचे कान टोचलेले असतील, तरच तिचा विवाह होतो. अन्यथा होत नाही, असे एकाने सांगितले.

## घ्यारी भाषा

घ्यारे समाजातील लोक एक विशिष्ट प्रकारची भाषा बोलतात. तिला ' घ्यारी ' किंवा ' पारसी ' असे म्हणतात. मराठी, गुजराती आणि हिंदीची भेसळ असलेली भाषा हे लोक बोलतात. उदा., आज कित कमारो (आज धंदा किती झाला), झुकल्या आरो (पोलीस आले), घ्यारा (पुरुष), घ्यारी (स्त्री) वगैरे शब्द ' घ्यारी ' भाषेतील होत.

या समाजातील प्रत्येक कुटुंबात हिंदू देवदेवतांचे फोटो आढळतात. तसेच छोटे-

मोठे देवांचे देव्हारे पाहावयास मिळतात. त्याला ते 'लगड' असे म्हणतात. त्यांच्या देव्हाऱ्यातील देव दगडांचे असतात. त्यांची ते मनोभावे पूजाअर्चा करतात. देवाच्या नावाने उपासतापास, नवस, आदी केले जातात, देवाच्या नावाने उत्सव साजरे करतात, त्यांना कोंबडे किंवा बकऱ्याचे नैवेद्य दाखवले जातात, देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी त्याच्या नावाने पूजा बांधली जाते, मुले होत नसतील, धंद्याला बरकत नसेल किंवा कुटुंबात सुखशांती नसेल, तर देवाला साकडे घालून नवस केले जातात, आणि इच्छापूर्तीनंतर बोलल्याप्रमाणे ते फेडले जातात.

असा हा अनेक रूढी, परंपरा जपणारा घ्यारे समाज महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांत पारंपरिक व्यवसाय करताना आढळतो. सोलापूर, कोल्हापूर, मिरज, मुंबई आणि पुणे या शहरांत या समाजाची लोकवस्ती प्रामुख्याने आढळते. महाराष्ट्रात १० हजारांचे जवळपास या समाजाची लोकसंख्या आहे.

## दुर्लक्षित समाज

शहरी वातावरणाचा परिणाम या समाजातील तरुण पिढीवर प्रामुख्याने जाणवतो. स्वातंत्र्योत्तर काळात हा समाज तसा इतर समाजांच्या तुलनेने सर्व बाजूंनी दुर्लक्षित असा समाज आहे. त्यामुळे, शैक्षणिक मागासलेपण प्रामुख्याने आढळते. गेली कित्येक वर्षे हा समाज महाराष्ट्रात असूनही राजकारणापासून आणि सामाजिक चळवळीपासून खूपच दूर राहिल्याचे पाहावयास मिळते, राजकारणात या समाजाला अद्याप कोणतेही विशष असे स्थान मिळाले नाही. सामाजिक जाणिवांचा तसा अभाव असल्याने, स्वतःच्याच जातीपुरते मर्यादित विश्व आजही हा समाज निर्माण करताना आढळतोय्. शिक्षण नसल्याने, सरकारी अथवा निमसरकारी कार्यालयात या समाजातील एकही व्यक्ती नोकरीस नाही, महिला रोज पहाटे उठून, मंडईच्या परिसरात रस्त्यावर फेकून दिलेली टाकाऊ बारदानें, पोती गोळा करतात, त्यांपासून दोरखंड मुसकी, भोरकी, घुंगराचे कडे, शिंके, दोर, काढण्या, इ. वस्तू बनवून घरोघर किंवा एस्. टी. आणि रेल्वे स्थानकावर जाऊन विक्री करतात.

## समाजसुधारणेचे कार्य

गेल्या काही वर्षांपासून, मुख्यतः तरुणांवर शहरांतील इतर सामाजिक, राजकीय चळवळींचा परिणाम जाणवत आहे. समाजसंघटन करून त्यांना सुधारण्याचे प्रयत्न तरुण करीत आहेत. पारंपरिक व्यवसायाला फाटा देऊन काही तरुणांनी वेगवेगळे व्यवसाय स्वीकारले आहेत. काही शहरांत या समाजातील तरुणांनी सामाजिक संघटनास सुरुवात केलेली आहे, समाजाच्या नावाने काही शहरांत संघटना स्थापन केलेल्या आहेत, समाजावरील अन्यायाला या संघटनांमार्फत वाचा फोडली जात आहे; किंवा समाजाच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. ● ● ●

# बेलदार समाज

फार पूर्वी राजस्थान आणि आसपासच्या प्रदेशांतून काही जातीजमातींचे लोक महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाले आणि गावोगाव भटकत राहून आपली उपजीविका करीत राहिले. त्यांमध्ये 'बेलदार' समाजाचा समावेश होतो. मूळ राजस्थानात राहणारा हा समाज मोगलांच्या काळात धर्मांतराच्या भीतीने राजस्थानातून परागंदा झाल्याचे सांगण्यात येते.

त्यांची मातृभाषा मेवाडी आहे. त्यांची कुलदैवते, त्यांचे सणवार, श्रद्धास्थाने, पेहराव, चालीरीती आणि परंपरा त्यांच्या मूळ प्रदेशानुरूप आहेत. महाराणा प्रतापसिंह हे त्यांचे श्रद्धास्थान असून ते स्वतःला रजपूत समजतात.

पूर्वी राजेलोकांचे रक्षक म्हणून ते काम करीत. त्या काळच्या सेनादलात त्यांचा भरणा असे. विशेषतः युद्धोपयोगी शस्त्रास्त्रे बनविणे, राजवाड्यांचे संरक्षण करणे ही प्रमुख कामे ते लोक करीत. याशिवाय नक्षीकाम, मूर्तिकाम, आदी कलाकुसरीची कामे करण्यातही ते तरबेज होते.

## मातीकाम–दगडी वस्तू

मोगल-काळात बेलदार समाजाचे लोक जे राजस्थानातून परागंदा झाले, त्यांपैकी महाराष्ट्रात आलेल्या लोकांची संख्या सर्वांत अधिक आहे. नंतरच्या काळात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांत उपजीविकेसाठी विविध व्यवसाय त्यांनी स्वीकारले. महाराष्ट्रातील काही खेड्यांत मातीकामाचा प्रमुख व्यवसाय करताना ते आढळतात. याशिवाय पाटे, वरवंटे, जाते, उखळ वगैरे गृहोपयोगी दगडी वस्तूही तयार करून विकतात आणि त्यांवर आपली उपजीविका करतात.

महाराष्ट्र शासनाने बेलदार समाजाची लोकसंख्या २७,७५० इतकी दिलेली असली, तरी आज ती दोन ते तीन लाखांचे आसपास असावी. महाराष्ट्र शासनाने

या समाजाचा समावेश भटक्या जातींमध्ये करून त्यांना विकासाच्या सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

## पोटजाती

महाराष्ट्र शासनाने जी भटक्या, विमुक्त जातीजमातींची यादी प्रसिद्ध केलेली आहे, तीमध्ये 'बेलदार' ही मुख्य जात असून तत्सम जाती 'ओड' नावाच्या जमातीचा समावेश करण्यात आला आहे. परंतु याशिवाय नाईक बेलदार, परमार, बेलदार, ओड राजपूत बेलदार, कुंभार बेलदार आणि गवंडी बेलदार असेही या जातीतील पोटविभाग असल्याचे या समाजातील एका कार्यकर्त्याने सांगितले. या पोटप्रकारांत बेटी व्यवहार होत नसल्याचेही तो म्हणाला.

बेलदार समाजातील वरील पोटप्रकार प्रामुख्याने त्यांच्या स्थानांवरून आडनावांवरून आणि बदललेल्या व्यवसायावरून ओळखले जातात.

## प्रमुख कुळी

इतर समाजांप्रमाणे बेलदार समाजातही काही प्रमुख कुळी आढळतात. त्यांमध्ये गोंधळे, कुदळे, चव्हाण, काटे, नवले, बोरेडे, भसाटी, निवते, तुरे, हराडे या आडनावांच्या कुटुंबांचा समावेश होतो. त्यांना कुलवंत समजले जाते. समाजात त्यांना मानपान आणि प्रतिष्ठा दिली जाते. यांशिवाय काही मंडळी राजस्थानातून (परप्रांतातून) आलेली म्हणून 'परदेशी' याही आडनावाने परिचित आहेत.

## संस्कृतीचा परिणाम

चारपाचशे वर्षांपासून हा समाज महाराष्ट्रात राहत असल्याने या समाजातील लोकांवर महाराष्ट्रातील संस्कृतीचा परिणाम जाणवतो. त्यांच्या राहणीमानात आणि कुलदैवतात बदल झाल्याचे आढळते. त्यांच्या प्रमुख कुलदैवतांमध्ये तुळजा भवानी, कानिफनाथ आणि खंडोबा या देवदेवतांचा समावेश आहे. जेजुरीच्या खंडोबाला किंवा 'मढी' येथील कानिफनाथाला हे लोक मनोभावे भजताना दिसतात. त्यांच्या यात्रेत ते मोठ्या प्रमाणावर सहभागी होतात. नवस करणे, जाग्रण, गोंधळ घालणे, बकरी-कोंबडी कापणे, अंगात येणे, आदी अंधश्रद्धेचे प्रकारही पाहावयास मिळतात. रंगपंचमीस मढी येथे कानिफनाथाच्या यात्रेत महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी या समाजातील विखुरलेले लोक एकत्र येतात. तेथे लग्न जमविणे, ठरविणे, काडीमोड घेणे, भांडणतंट्यांच्या संदर्भात विचार करणे किंवा जातपंचायत बसवून जातीअंतर्गत प्रकरणांचा निकाल देण्याचे काम केले जाते. 'मढी' हे महाराष्ट्रातील सर्व भटक्या विमुक्त जातीजमातींचे 'सुप्रीम कोर्ट' समजले जाते. तसे ते बेलदार समाजाचेही सुप्रीम कोर्ट आहे.

ज्या ठिकाणी हा समाज राहतो, तेथे जर समाजातील एखाद्या व्यक्तीने जातीच्या पारंपरिक नियमांच्या किंवा रूढींच्या बाहेर वर्तन केले किंवा समाजाची बदनामी होईल, असे इतर जमातींत वर्तन केले, तर त्या ठिकाणची (मूळ राहत्या ठिकाणची) जातपंचायत संबंधित व्यक्तीस दोषी धरून, पंचायतीच्या नियमा-प्रमाणे शिक्षा करते. अशा प्रकारे पंचायतीने केलेली शिक्षा जर संबंधित व्यक्तीस अमान्य असेल, तर त्याचा न्याय मढीच्या जत्रेत मागण्याची परवानगी त्याला दिली जाते. म्हणजेच स्वत:वरील अन्यायाची दाद मागण्यासाठी तो मढीच्या जत्रेत (त्यांच्या भाषेत) अपील करू शकतो.

मढी येथे या समाजाचे गावोगावचे पंचायतीचे प्रमुख येतात. ते सर्वजण अशा अपिलांच्या खटल्याची सुनावणी तेथे करतात व न्यायनिवाडा करतात. त्यांनी दिलेला न्याय हा अंतिम मानला जातो. म्हणून मढी हे या समाजाचे सुप्रीम कोर्ट मानले गेले आहे.

## जातपंचायत व शिक्षा

शहरांत कायम वस्ती करून राहिलेल्या बेलदार समाजामध्ये जातपंचायतीचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. परंतु खेड्यापाड्यांत आजही अधिकांश लोकांच्यावर जातपंचायतीचा प्रभाव आढळतो.

जातपंचायतीतील शिक्षेचा प्रकार सांगताना एका कार्यकर्त्याने सांगितले, की एखादी व्यक्ती गुन्हेगार ठरविली असेल, तर जमलेल्या 'पंचमंडळीचे' जोडे त्या व्यक्तीच्या डोक्यावर देऊन 'मी गुन्हा केला, मला माफ करा' असे वदवून घेण्याची प्रथा आहे. त्याने माफी मागितली, तरच त्याला पुन्हा जातीत घेतले जाते. मात्र 'स्त्रीने' गुन्हा केल्यास माफी न करता जातीबहिष्कृतच केले जाते.

## लग्नातील 'बहुरी'

बेलदार समाजातील लग्नप्रसंगी मडक्याच्या उतरंडीला महत्त्वाचे स्थान आहे. एकावर एक अशी पाच मडकी ठेवली जातात. पाचव्या मडक्याला पाचवी 'बहुरी' असे म्हटले जाते. लग्नवेळी लग्न लावणारी व्यक्ती किंवा ब्राह्मण उतरंडीतील प्रत्येक मडक्याला हात लावून संबंधित विवाहास उपस्थितांपैकी (समाजातील) कोणाची हरकत आहे का, असे चार वेळा विचारतो. पाचव्या वेळेस मात्र कुणाचे कर्ज आहे का आणि असल्यास कोणाची हरकत आहे का, असे विचारतो. समाजातील लोकांची हरकत नसेल, तरच लग्नविधी पार पाडला जातो. या वेळी एकशेपन्नास रुपयांपर्यंत हक्क देण्याची प्रथा समाजात आहे.

## पोशाखातील वैशिष्ट्य

विवाह–प्रसंगातील वधूवरांच्या पोशाखांतील वेगळेपण हे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. बाराबंदीसारखा अर्धा पिवळा आणि अर्धा पांढरा झगा आणि डोक्याला गुंडाळलेली चाळीस हात पगडी हा नवरदेवाचा, तर नवरीसाठी अर्धी पिवळी, अर्धी पांढरी साडी हा पोशाख असे. परंतु गेल्या काही वर्षांपासून अशा पोशाखाची ही प्रथा हळूहळू नाहीशी होत आहे. सुधारलेली, सुशिक्षित व आर्थिक-दृष्ट्या समृद्ध अशी मंडळी आधुनिक पद्धतीने मंगल कार्यालयातच विवाह करतात.

शैक्षणिकदृष्ट्या हा समाज खूपच मागासलेला आहे. परंपरेने चालत आलेली बालविवाहाची प्रथा गेल्या काही वर्षांपासून बंद केलेली आहे.

बेलदार समाजात विधवाविवाहाला स्थान नाही. असा विवाह करणे, म्हणजे गुन्हा करणे असे समजले जाते. त्यामुळे या समाजातील स्त्रियांना पतिनिधनानंतर एकाकी आयुष्य काढावे लागते; परंतु जर एखाद्या कुटुंबात विधवाविवाह घडवून आणला, तर अशा कुटुंबास जातपंचायत समाजातून बहिष्कृत करते. समाजातील लोक अशा बहिष्कृत कुटुंबाबरोबर रोटीबेटी व्यवहार बंद करतात. त्यामुळे विधवा-विवाहाचे धाडस कोणीही करीत नाही.

## गाढव : लोकप्रिय प्राणी

या लोकांमध्ये गाढव हा प्राणी उपयुक्त समजला जातो. मोठमोठ्या रस्त्यांची कामे व घरबांधणीच्या कामाकरिता माती वाहण्यासाठी गाढवांचा उपयोग होतो. बहुतेक कुटुंबांकडे चार-पाच गाढवे दावणीला आढळतात. गाढवांप्रमाणेच घोड्यांचाही वापर केला जातो. उत्पन्नाचे दुसरे साधन म्हणून म्हशी पाळण्याचा व्यवसाय ते करतात.

गेल्या काही वर्षांपासून जे पारंपरिक व्यवसाय म्हणून रस्ते-दुरुस्ती किंवा बांध-कामावर मातीकाम करत आहेत, तेच लोक किंवा त्यांच्या कुटुंबातील जाणती तरुण मंडळी अलीकडे बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरच्या व्यवसायात काही प्रमाणात स्थिर दिसतात. तसेच बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या दगडविटा आणि वाळूची वाहतूक करणारेही काही आढळतात. समाजातील जवळजवळ पन्नास टक्के लोक हे मातीकामच करतात, असे समजले. हे लोक स्वतःला ‘गवंडी’ असे म्हणवून घेतात.

या व्यवसायाशिवाय रिक्षा-चालकाचा व्यवसाय करणारे, स्वतःच्या मालकीच्या वीटभट्ट्या असणारेही काही, तर काही तेथे मजुरीचे काम करणारे आहेत. मजूर-काम करणारांची संख्या या समाजात अधिक आहे.

शिक्षणापासून ९० टक्के समाज आजही दूर असल्याने सरकारी अथवा निम-

सरकारी नोकरीमध्ये प्रमाण अत्यल्प आहे. छोटे स्वतंत्र व्यवसाय करण्याकडेच तरुणांचा कल जाणवतो. सायकल रिपेअर, मोटार मेकॅनिक, सुतारी काम अशीही कामे काही तरुण करीत आहेत. जे काही लोक थोडेफार शिक्षित आहेत, पदवीधर आहेत, असे खाजगी कारखान्यांत काम करताना आढळतात.

या समाजातील जे शिक्षित आहेत, व्यवसायाने श्रीमंत झालेले आहेत, असे लोक समाजासाठी काहीही करीत नाहीत, समाजापासून फटकून वागतात, असे एकाने सांगितले.

शहरी वातावरणाचा आणि एकूणच समाजसुधारणेच्या चळवळीचा परिणाम या समाजातील तरुण पिढीवर जाणवतो. त्यामुळे काही मंडळी अशा चळवळीत काम करताना आढळतात. तर बेलदार समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक सुधारणेसाठी काही लोक प्रामाणिकपणे समाजात काम करीत आहेत.

पूना राजपूत पंच ट्रस्ट (बेलदार समाज, पूना) ही या समाजाची सामाजिक संस्था असून संस्थेमार्फत सामाजिक अडीअडचणी सोडविण्याची कामे केली जातात.

बेलदार समाज गेली अनेक वर्षांपासून सत्तारूढ पक्षाच्या मागे असूनही कोणत्याही प्रकारे राजकारणात त्याला स्थान मिळाले नसल्याची खंत एका कार्यकर्त्याने बोलून दाखविली. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्रातील या समाजाच्या एकूण लोकसंख्येच्या २० टक्के शहरांत स्थायिक झालेला समाज सोडल्यास सत्तर ते ते ऐंशी टक्के लोक आजही भटक्या अवस्थेतच आपली उपजीविका करीत आहेत.

इतर समाजांप्रमाणे या समाजातील स्त्रियांना विशेष असे कोणतेही स्थान नाही. मुले आणि चूल यांपलीकडे तिची मजल गेलेली नाही. मात्र पुरुषांच्या बरोबरीने अंगमेहनतीची कामे करण्यात किंवा रस्ता-दुरुस्तीचे मातीकाम करण्यात ती राबते आहे. शिक्षणापासून दुरावलेली, अंधश्रद्धा आणि विचित्र रूढी-परंपरेच्या विळख्यात आजही ती गुरफटून गेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजात जो काही थोड्याफार प्रमाणात बदल जाणवतो, तो केवळ या समाजातील जागृत तरुणांच्यामुळे होय. गेल्या काही वर्षांपासून या समाजातील तरुण, बेलदार समाजसुधारणेच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत. या समाजातील ज्या लोकांनी शासकीय शैक्षणिक आणि आर्थिक सवलतींचा फायदा घेतलेला आहे, असे लोक समाजातील अशिक्षित आणि प्रामुख्याने मजूर वर्गापासून दूर गेले आहेत. एवढेच नव्हे, तर या समाजातील काही शिक्षित आणि उद्योगधंद्याने आर्थिकदृष्ट्या व्यवस्थित स्थिर झालेले लोक स्वतःला 'बेलदार' म्हणून घ्यायला तयार नाहीत, तर ते स्वतःची ओळख बेलदारऐवजी 'क्षत्रिय' समाज या नावाने सांगू लागले आहेत. पुण्यात 'क्षत्रिय कुमावत ज्ञाती मंडळ'

नावाची संस्था स्थापन झाली असून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रित जाती–जमातींच्या यादीतून समाजाचे 'बेलदार' हे नाव वगळून त्याऐवजी 'क्षत्रिय कुमावत समाज' असे नाव नोंद करण्याविषयी प्रयत्न करीत आहेत.

बेलदार समाजातील नव्वद टक्के लोक हे मोल-मजुरी करून जगणारे असल्याने या लोकांना वरील प्रकारचा जातीच्या नावाचा बदल त्यांना नको आहे, ते बेलदार म्हणूनच राहू इच्छितात. कारण वरील प्रकारे जातीच्या नावाचा बदल झाल्यास शासनाकडून सध्या मिळत असलेल्या सर्व सवलतींना मुकावे लागेल, अशी भीती त्यांना वाटते. त्यामुळे या समाजात जुन्या पिढीचा आणि नव्या पिढीचा समाजांतर्गत सुप्त संघर्ष चालू असल्याचे आढळते.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# सिकलगार समाज

शीख धर्मातील मागासलेला आणि भटक्यांचे जीवन जगणारा समाज म्हणून 'सिकलगार' या जमातीचा उल्लेख केला जातो. विशेषत: लोखंडापासून तवे, झाऱ्या, घमेली, चाकू, सुऱ्या, चिमटे आणि तत्सम वस्तू राहत्या घरी हाताने तयार करून लोकांना घरोघर जाऊन विकून त्यापासून मिळणाऱ्या अल्प उत्पन्ना-वर हा समाज उपजीविका करतो.

## नाव कसे पडले ?

'सिकलगार' या जमातीचा पूर्वेतिहास पाहता असें आढळते, की हा समाज पूर्वीच्या काळी हिंदू म्हणूनच ओळखला जाई. महाराष्ट्रात येण्यापूर्वी हे लोक राज-स्थान आणि शेजारच्या राज्यांमध्ये वास्तव्य करून होते. पूर्वी लढाईसाठी वापरल्या जाणाऱ्या तलवारी, भाले, बिचवे अशा हत्यारांना धार लावून देण्याचे आणि चक-चकीत करण्याचे प्रमुख काम हे लोक त्या काळात करीत. त्यांच्या या धंद्यावरूनच समाजाला 'सिकलगार' हे नाव रूढ झाले, असे सांगितले जाते. या समाजामध्ये जी एक विशिष्ट भाषा बोलली जाते, त्या भाषेला 'सिकलगार' किंवा 'पारसी' असे म्हणतात. या भाषेत 'सिकल' या शब्दाचा अर्थ चकचकीत करणे, पॉलिश करणे असा आहे. या अर्थानुरूप असे काम करणाऱ्या या जमातीचे नाव पडले असावे, असाही एक अंदाज वर्तविला जातो. धंद्यावरून जातींची निर्मिती ही हिंदू समाज-व्यवस्थेत फार प्राचीन काळापासून आहे. या प्रथेला अनुसरून 'सिकलगार' हे नाव रूढ झाले असण्याची शक्यता आहे.

नंतरच्या काळात शीख धर्म स्वीकारून 'शीख सिकलगार' म्हणून हा समाज आज ओळखला जातो. या समाजाच्या शीख धर्मांतराच्याविषयी माहिती गोळा करीत असताना असे आढळते, की ज्या काळामध्ये हा समाज हिंदू म्हणून जगत

होता, त्या काळी मुसलमानांच्या स्वाऱ्या होत असत. सक्तीने मुसलमान धर्म स्वीकारायला भाग पाडले जात होते, तेव्हा मुस्लिम धर्मांतराच्या भीतीने 'सिकलगार' समाजाने जंगलांचा आश्रय घेतला. पुढे काही वर्षे लोटल्यानंतर या समाजातील 'भौंड' नावाच्या त्यांच्या समाजातील प्रमुख व्यक्तीने सामाजिक सुरक्षिततेसाठी इतरांसह शीख धर्म स्वीकारल्याचे सांगितले जाते.

आज हा समाज शीख धर्मानुसार बदलल्याचे आढळून येते. शीख धर्मीयांप्रमाणे पोशाख, पूजा, अर्चा, आचारविचार पाळण्यात येतात. परंतु शीख धर्मामध्ये ज्या परंपरा किंवा प्रथा कधीही पाहावयास मिळत नाहीत, अशा काही जुन्या प्रथा हा समाज आजही पाळताना दिसतो. विशेषत: दसऱ्याच्या वेळी नवरात्र उत्सवासाठी म्हणून या समाजातील काही लोक कालीमातेच्या उत्सवासाठी कलकत्त्याला जातात, तर काही स्वत:च्या घरात देवीची पूजा करून बकरे, कोंबडे कापतात.

## काही इतर प्रथा

गुढीपाडव्यानंतर येणाऱ्या रविवारी किंवा सोमवारी 'चैत' मानून रविवारच्या दिवशी गोड स्वयंपाक करायचा. तो त्या दिवशी न खाता दुसरे दिवशी शिळा खाण्याची प्रथा या समाजात आहे. या दिवशी पुरुष मंडळी 'साळवदे' देवीच्या नावाने डुक्कर कापून त्याचा प्रसाद खातात. पुरुषाने डुकराची पूजा करावयाची असते, तर स्त्रियांनी बोराच्या झाडाची पूजा करायची असते. ही प्रथा फक्त (शीख धर्मातील) सिकलगार याच जमातीमध्ये आढळते.

याशिवाय आणखी एक वेगळी प्रथा या समाजात पाहावयास मिळते. ती अशी : गोकुळअष्टमीच्या दुसरे दिवशी 'गुगा नवमी' मानली जाते. (या दिवशी मेहतर समाजात 'वीर गुगादेव' यांचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.) या दिवशी तूप आणि दुधामध्ये चपाती कुस्करून त्याचा 'मलिदा' तयार केला जातो व तो गुगा नवमीचा प्रसाद म्हणून श्रद्धेने खाल्ला जातो. तर या समाजातील महिला या दिवशी वारुळात नागासाठी म्हणून दूध ओततात. ही प्रथा शीख धर्म स्वीकारण्याआधीपासूनची असल्याचे सांगण्यात आले. अलीकडे शीख धर्माप्रमाणेच आचरण करण्याचे प्रमाण वाढत आहे. विशेषत: गुरूनानक यांच्या जयंतीच्या आधी दोनतीन दिवस प्रचंड मिरवणूक काढली जाते, मिरवणुकीच्या पुढे लाठ्याकाठ्या, तलवारी फिरविण्याची प्रात्यक्षिके या समाजातील लोक करून दाखवितात. अन्य शीख धार्मिक विधी, पूजापाठ किंवा ग्रंथ पठन करतात. सिकलगार समाजात देवाचा लंगर (भंडारा महाप्रसाद) म्हणून लोकांना जेवण देण्याची प्रथा आहे.

## पंचायतीला महत्त्व

या समाजात परंपरागत चालत आलेली जातपंचायत आजही काही प्रमाणात

पाहावयास मिळते. इतर भटक्या-विमुक्त समाजांप्रमाणेच जातपंचायतीचे महत्त्व विशेष आहे. समाजांतर्गत तंटे, लग्नकार्ये अगर सामाजिक अडचणीच्या वेळी जातपंचायतींला महत्त्व मिळते. घटस्फोटाची प्रकरणे जातपंचायतीच्या पंचमंडळीसमोर येतात. पंचाने दिलेला निर्णय हा संबंधित व्यक्तींना बंधनकारक असतो. अशा वेळी जी व्यक्ती पंचाच्या दृष्टीने दोषी ठरते, त्या व्यक्तीला ३॥, ७, १४ आणि २८ रुपयांच्या प्रमाणात दंड केला जातो. साडेतीन रुपये दंड होणे हे या समाजात अत्यंत नामुश्कीचे समजले जाते. ज्या व्यक्तीस फक्त साडेतीन रुपये दंड होतो, त्या व्यक्तीच्या सात पिढ्या बदनाम होतात. त्यामुळे ही माणसे हजारो रुपये दंड खुशीने द्यायला तयार होतील; पण साडेतीन रुपये दंड भरणार नाहीत, अशी माहिती मिळाली.

शीख धर्माच्या रिवाजाप्रमाणे केस, दाढी जन्मल्यापासून ठेवलीच पाहिजे, असा दंडक आहे. चुकून एखाद्या व्यक्तीने केस, दाढी काढून टाकल्यास त्याला समाजातून बहिष्कृत केले जाते, परंतु अशा बहिष्कृत व्यक्तीने आपली चूक कबूल केल्यास तीर्थ प्राशन करावयास देऊन शुद्धीकरण केले जाते व समाजात पुन्हा समाविष्ट करण्यात येते.

## मयतीचा विधी

सिकलगार समाजातील व्यक्ती मृत पावली, तर त्या मृत व्यक्तीस शीख पद्धतीप्रमाणे नवीन पोशाख केला जातो. आणि गुरू नानकांच्या पवित्र ग्रंथाचे पठन करीत त्या मृतास अग्नी दिला जातो. दुसरे दिवशी रक्षा एकत्रित करून ती नांदेड येथे गोदावरी नदीत किंवा नाशिकला पंचवटी नदीत विसर्जनासाठी नेली जाते. (नांदेड हे महाराष्ट्रातील शीखांचे पवित्र स्थान आहे.) मयतीच्या तिसरे दिवशी ज्या ठिकाणी राख वेचली, त्या ठिकाणी मृताचे घरचे लोक स्मशानात आलेल्या समाजाला मृताच्या नावाने लाडू वाटतात. त्याच वेळी प्रेताला खांदे देणाऱ्या खांदेकऱ्यांच्या खांद्यांना तूप चोळले जाते. त्याला 'खांदा उतरवणे' असे म्हटले जाते. हा विधी झाल्यानंतर त्याच दिवशी रात्री सर्व समाजाला प्रेताच्या नावे गोड किंवा मांसाहारी जेवण दिले जाते. याच विधीचा भाग म्हणून पुढे दिवाळीच्या वेळी मृताचा भार उतरवून टाकण्याचा विधी केला जातो. या वेळी मृताच्या घरच्या लोकांनी सर्व समाजामध्ये लहानथोरापर्यंत सर्वांना घरोघर अन्नवाटप करण्याची पूर्वी प्रथा होती. अलीकडे अन्नाऐवजी एक शेरी, दोन शेरी असे स्वतःच्या ऐपतीप्रमाणे धान्य वाटण्याची प्रथा चालू आहे.

## प्रमुख गोत्रे

या समाजामध्ये आजही प्रत्येक घराण्याची कुटुंबाची वेगवेगळी स्वतंत्र अशी

'गोत्रे' पाहावयास मिळतात. यामध्ये प्रामुख्याने 'भौंड, कल्याणी, दुधानी, ज्युनी, भाद्दा, बावरी आणि टांक ही प्रमुख गोत्रे होत. 'बावरी' या गोत्रात एक पोट-प्रकार 'आंद्रेली बावरी' म्हणून ओळखला जातो, तर 'टांक' या गोत्रात चार प्रकार आहेत. टांक, सुरटांक, गोकेटांक, बिछूटांक हे होत.

वरील वेगवेगळ्या गोत्रप्रकारांमध्ये प्रामुख्याने बेटी व्यवहार होत नाहीत. आणि तसा प्रयत्न कोणी व्यक्तीने केला, तर जातपंचायतीच्या नियमाप्रमाणे त्या व्यक्तीस आणि त्याच्या कुटुंबीयांस जातीबाहेर बहिष्कृत म्हणून जाहीर केले जाते. त्यामुळे जातपंचायतीच्या भीतीपोटी शक्यतो असे नियमबाह्य प्रकार कोणीही करावयास तयार होत नाही.

## झोपडपट्ट्यांत वस्ती

असा हा अनेक गोत्रांचा, वेगवेगळ्या पारंपरिक रूढी–परंपरा जपणारा, आणि मिश्रपरंपरा जगणारा शीखधर्मीय सिकलगार समाज शहरातील वेगवेगळ्या विभागांत आणि झोपडपट्ट्यांत राहत असताना पाहावयास मिळतो.

पारंपरिक धंद्याबरोबरच डुकरे पाळण्याचा व्यवसाय हे लोक मोठ्या प्रमाणात करताना आढळतात. डुकराच्या विक्रीतून आणि तवे, झाऱ्या, कढई, आदी लोखंडी वस्तूंच्या धंद्यातून उपजीविका चालते.

हा समाज अत्यंत मागासलेला, आणि मोठ्या प्रमाणात अशिक्षित आहे. त्यामुळे शासकीय, निमशासकीय आणि इतर तत्सम कार्यालयांतून अथवा कारखान्यांतून नोकरी करताना आढळत नाही. झोपडपट्ट्यांमध्ये अत्यंत अडचणीत दाटीवाटीनें हा समाज राहतो. अलीकडे काही कुटुंबांतील लहान मुले शाळेत जाताना दिसतात.

या समाजातील बहुतेक महिला, पुरुषांना लोखंडी वस्तू बनविण्याच्या कामात मदत करतात आणि घरोघर जाऊन त्या विकतात. महिलांचे मागासलेपणा भयानक आहे. एकही महिला शिक्षित आढळत नाही. मात्र कष्टाळू आणि प्रामाणिक म्हणून समाजात महिलांना मानाचे स्थान आहे. एवढेच नव्हे, तर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला वागविले जाते.

इतर समाजांप्रमाणे याही समाजात स्त्रिया अत्यंत श्रद्धाळू आणि भाविक आहेत. पूर्वी स्त्रिया राजस्थानी पद्धतीप्रमाणे पोशाख करीत. त्यात प्रामुख्याने, घागरा, घुंघट, वेण्यांना मोठमोठे रंगीबेरंगी गोंडे लावणे, गळाभर चांदीचे दागिने घालणे ही प्रथा होती. अलीकडे खास पंजाबी पद्धतीचा सलवार कुडता हाच पोशाख आढळतो.

शीख धर्मानुसार पगडी, कंगन, कंगवा, कच्छा, आणि कृपाण या पाच वस्तू या समाजात मानल्या जातात. प्रत्येक व्यक्तीकडे त्या पाहावयास मिळतात. तसेच, तलवार ही अत्यंत पवित्र मानली जाते. प्रत्येक कुटुंबात रोज सकाळी अगरबत्ती

लावून तलवारीची पूजा केली जाते. अशी पूजा करण्याची पद्धत या समाजात पूर्वीपासूनच असल्याचे सांगण्यात आले.

पूर्वी या समाजामध्ये लग्नानंतरची एक प्रथा अस्तित्वात होती. लग्न झाल्यावर मुलाने मुलीच्या घरी (सासऱ्याचे घरी) एकत्रित राहयचे, किंवा शेजारी राहून आपला संसार करून दाखवायचा आणि सासऱ्याचे समाधान झाल्यावर नंतरच इतर ठिकाणी कोठेही पत्नीला घेऊन स्वतंत्रपणे संसार करायचा, असे बंधन पुरुषावर होते. परंतु अलीकडे ही प्रथा या समाजातील काही कार्यकर्त्यांनी बंद केल्याचे सांगण्यात आले. याशिवाय पारंपरिक अंधश्रद्धा व शीख धर्माशिवाय आज अस्तित्वा-असणाऱ्या काही प्रथा मोडण्याचे प्रयत्न होत आहेत. तसेच, मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी ते प्रयत्नशील आहेत. ते ज्या वस्तीत राहतात, तेथे त्यांचे कार्य सतत चालू असते. मुख्यतः या समाजातील जे डुकरांचे मालक आहेत, त्यांच्या संघटनेत त्यांचा सहभाग मोलाचा आहे. डुकरांसाठी वेगळ्या ठिकाणी प्रशस्त जागा मिळावी, म्हणून इतर प्रमुख लोकांच्या बरोबर तेही प्रयत्न करीत आहेत. डुकरे पाळणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. सिकलगार हा समाज शीखधर्मीय असल्याने अर्थातच शीख धर्माच्या पवित्र ग्रंथाला हे लोक मानतात. इतर शीखधर्मीयां-प्रमाणे, गुरुद्वारात नियमित प्रार्थनेसाठी जातात, असे एका कार्यकर्त्याने सांगितले. विशेष म्हणजे हा समाज धर्मांतरित असूनही मूळचे शीखधर्मीय आणि सिकलगार असा भेदभाव गुरुद्वारात केला जात नाही. सर्व शीखांना समानतेची वागणूक मिळते. एवढेच नव्हे, तर पुढारलेला शीख समाज सिकलगार समाजाच्या सुधारणेसाठी काही प्रयत्न करू इच्छितो आहे. परंतु आमचा समाज एकत्रित नाही. तो विस्कळीत आणि भटकंती करणारा असल्याने त्यांना काही करता येत नाही, असे या समाजातील पुण्याचे तरुण कार्यकर्ते जोहरसिंग भौंड याने सांगितले.

असा हा अशिक्षित आणि अत्यंत मागासलेला समाज अनेक अडीअडचणींना तोंड देत जगतो आहे. शिक्षण नसल्याने नोकऱ्या मिळत नाहीत. काही स्वतंत्र नवीन उद्योगधंदा करायचा म्हटला किंवा बँकेकडून कर्ज काढायचे म्हटले, तर तेथे जातीच्या दाखल्याची अडचण निर्माण होते. रिक्षा धंदा करावा, म्हणून या समाजातील काही तरुणांनी परवाना काढण्याचा प्रयत्न केला, तर तेथेही जातीच्या दाखल्याची अडचण भासते, आणि तशा प्रकारे जातीचा दाखला मागावयास गेलो, तर 'हिंदू सिकलगार' असे कोर्टात प्रतिज्ञापत्र करून आणा असे सांगितले जाते. त्यामुळे धंद्याला बँकेकडून कर्ज मिळत नाही. रिक्षा चालवायला परवाना मिळत नाही. अशा अनेक अडचणी कार्यकर्त्यांनी सांगितल्या.

वरील अडचणींमुळे नाइलाजाने चरितार्थ भागविण्यासाठी, पारंपरिक क्लिष्ट लोखंडाचा धंदा करणे भाग पडते. त्या धंद्यात म्हणावी तशी प्राप्ती नाही. त्यामुळे पराकोटीचे दारिद्र्य पाहावयास मिळते, दारिद्र्यामुळे शिक्षण नाही, अशी लोकांची

अवस्था आहे.

या समाजातील काही तरुणांनी, हाच पारंपरिक लोखंडी व्यवसाय मोठ्या प्रमाणात आधुनिक पद्धतीने करण्यासाठी परवानगी मिळावी, म्हणून महापालिकेकडे अनेक वेळा अर्ज–विनंत्या केल्या. परंतु तेही शक्य झालेले नाही. काही तरुणांनी डुकरांची आधुनिक पद्धतीने पैदास करण्याच्या योजना सादर केल्या आहेत. परंतु याही उपक्रमाला कोणी साथ देत नाही, असे एका कार्यकर्त्याने सांगितले. एवढेच नव्हे, तर काही राजकारणी लोकांनी शीखांचे प्रतिनिधित्व म्हणून आम्हांला राजकारणात घेतले. मन मानेल तसा आमचा वापर करून घेतला. मात्र आमच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी काहीही मदत केली नाही, अशी तक्रारही एकाने केली.

अनेक अडचणींतून जाणारा हा सिकलगार समाज स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवून आज जगतो आहे. इतरांवर अवलंबून न राहता समाजाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी या समाजातील अनेक तरुण आज कामाला लागले आहेत.

महाराष्ट्र शासनाने विमुक्त–भटक्या जातींची जी अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे, त्यात या जमातीचा ' सिक्कलगर ' या नावाने समावेश केलेला आहे. परंतु या समाजातील काही जाणकार लोक ' सिक्कलगार ' या नावाला आक्षेप घेताना आढळतात. त्यांचे म्हणणे असे आहे की, आमच्या जातीचे नाव महाराष्ट्र शासनाने चुकीचे नोंदलेले आहे. ते ' सिक्कलगार ' नसून ' सिक्कलकर ' असे आहे. तसे ते शासनाने दुरुस्त करावे, यासाठी या समाजातील जाणकार लोक प्रयत्न करीत आहेत.

● ● ●

# टकारी समाज

पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या गावगाड्याच्या ग्रामव्यवस्थेत ज्या जाती आणि जमातींना सामावून घेतले गेले नाही, किंवा ज्या जातींची गरज त्या काळच्या रयतेला भासली नाही, अशा महाराष्ट्रातील काही जाती ( समाज ) गावाच्या आश्रयाने परंतु गावगाड्यापासून दूर राहून आपले अस्तित्व स्वतंत्रपणे जोपासत होत्या आणि स्वतःच्या उपजीविकेसाठी त्यांना पारंपरिक व्यवसाय नसल्याने चोरी करणे हाच जातधंदा मानून ते उपजीविका करीत होत्या. त्या अनेक समाजांपैकी, 'टकारी' या नावानें ओळखला जाणारा महाराष्ट्रातील एक समाज आहे.

त्या काळात हे लोक छोटचामोठचा चोऱ्या करणे, लूटमार करणे, खजिने लुटणे, किंवा गावातील काही प्रमुखांच्या सांगण्यावरून, अथवा त्या काळच्या संस्थानिकांसाठी, दुसऱ्या संस्थानांतील शस्त्रास्त्रे लुटण्याचे काम करीत असत. त्या मोबदल्यात संबंधितांकडून त्यांना काही बिदागी मिळत असे. याशिवाय या समाजातील काही ठरावीक लोकांना अशा कामासाठीच नेमून त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांची पालनपोषणाची जबाबदारी त्या काळच्या संस्थानिकांनी स्वीकारलेली होती. त्यांना संरक्षण दिले जात होते, म्हणजे त्या काळात या समाजातील लोकांचा वापरच अशा कामासाठी करून घेण्यात येत असे. त्यामुळे, या लोकांना उपजीविकेसाठी वेगळा व्यवसाय करण्याची गरजच भासली नाही. चोऱ्या करणे, लूटमार करणे, हाच त्यांनी आपला जातधंदा म्हणून स्वीकारला. त्यामुळे, लोक त्यांना चोर, भामटे, उचले, या नावानेही ओळखत असत. परिणामी हीच नावे पुढील 'जातनावे' म्हणून रूढ झालेली आहेत.

इंग्रजांच्या काळात या लोकांच्या व्यवसायाचा उपद्रव इंग्रज सरकारला होऊ लागला. त्यामुळे त्यांनी या जमातीलाच गुन्हेगार ठरवून १८७१ साली काळा कायदा तयार केला व त्यांची नोंद गुन्हेगार जमाती म्हणून केली. अशा या गुन्हेगार

जमातींच्या लोकांना देशातील वेगवेगळ्या सेटलमेन्टमध्ये इंग्रजांनी एकत्र बंदिस्त केले आणि त्यांच्यांत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले.

अशा प्रकारे गुन्हेगार जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रमुख तेरा जमाती होत्या. त्यांना ५२ सेटलमेन्टस्‌मध्ये बंदिस्त करण्यात आले. अशा गुन्हेगार जमातीं-मध्ये प्रामुख्याने कैकाडी, पामलोर, कंजारभाट, छप्परबंद, फासेपारधी, बेस्तर, रजपूत, भामटा, रामोशी, मांगगारूडी, टकारी वगैरें जमातींचा समावेश करण्यात आलेला होता.

इंग्रजांची सत्ता संपुष्टात आल्यानंतर सेटलमेन्टमध्ये बंदिस्त करण्यात आलेले लोक मुक्त करण्यात आले आणि या जमातींना ' विमुक्त जमाती ' असे संबोधिण्यात आले. परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा इतर समाजाचा दृष्टिकोन मात्र पूर्वीचाच असल्याचे आढळतें.

महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्त समाजाची जी अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे, त्या यादीत ' टकारी ' समाजाचा समावेश विमुक्त समाजात केलेला असून, त्यांना विकासाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विमुक्त समाज म्हणून त्यांना ओळखले जाते.

## दोन प्रकार

टकारी समाजात मुख्यत: दोन प्रकार पाहावयास मिळतात. महाराष्ट्रात जे पूर्वी-पासून स्थायिक आहेत किंवा ज्यांची मातृभाषा मराठी आहे, त्यांना टकारी, टकारी भामटा, उचले किंवा कामाठी या नावाने ओळखले जाते. तर दुसऱ्या प्रकारामध्ये मोडणारे किंवा जे मूळचे धारवाड, विजापूर, बेळगाव, हुबळी येथील राहणारे आहेत, अशा टकारी समाजातील लोकांना कर्नाटकामध्ये ' घंटीचोर ' या नावानें ओळखले जाते. या दोन प्रकारांमध्ये, रोटीबेटी व्यवहार क्वचित आढळतात. प्रत्येक विभागातील लोक दुसऱ्या विभागातील लोकांना (पोटजातींना) आपल्यापेक्षा कमी लेखतात, त्यामुळे हा समाज तसा वरवर एक दिसला, तरी समाजांतर्गत असलेल्या पोटजातीत, किंवा वरील दोन प्रादेशिक प्रकारांत दुरावाच पाहावयास मिळतो.

## कोनाळी येथील दैवत

कर्नाटक राज्यामध्ये ' कोनाळी ' या ठिकाणी अतिप्राचीन असलेली देवता हे या समाजाचे दैवत मानले जाते. दरवर्षी या ठिकाणी देवीची यात्रा मोठ्या प्रमाणात भरते. महाराष्ट्रातूनही यात्रेसाठी लोक कोनाळी येथे एकत्र जमतात.

कोनाळी येथील देवीच्या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणून ' शिडी ' खेळण्याचा प्रकार सांगितला जातो. देवीला नवस केलेली व्यक्ती नवस फेडण्यासाठी ' शिडीचे

खिळे ' स्वतःच्या पाठीत रोवून घेऊन शिडीभोवती इतर लोकांच्या मदतीने फिरते, त्याला शिडी खेळणे असे म्हणतात. शिडी खेळल्यामुळे नवस फिटतो आणि देवीची कृपादृष्टी लाभते, असा समज आहे.

## जातपंचायत

या समाजातही जातपंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. परंतु गेल्या काही वर्षांत या समाजातील जे लोक स्वतंत्र उद्योगव्यवसाय करतात किंवा शिक्षित आहेत, सरकारी नोकरीत आहेत आणि ज्यांचा सामाजिक दर्जा स्वातंत्र्योत्तर काळात उंचावलेला आहे, ते लोक जातपंचायतीला मान्यता देत नाहीत. परंतु अशिक्षित व वृद्ध लोक आजही जातपंचायतीला मानतात. जातपंचायतीच्या प्रमुखास 'सरपंच' असे म्हटले जाते. सरपंच पद पिढ्यान् पिढ्या विशिष्ट घराण्यात देण्याची प्रथा आजही या समाजात अस्तित्वात आहे.

जातपंचायतीच्या प्रमुख सरपंचाशिवाय इतर पाच पंच नेमले जातात. सरपंचाला सल्ला देण्याचे किंवा न्यायनिवाडा करण्याच्या कामी मदत करण्याचे काम जे लोक करतात, त्यांना ' पंचायत ' असे म्हणतात.

समाजबाह्य वर्तनास किंवा अनैतिक संबंधात दहा हजार रुपये दंडाची शिक्षा जातपंचायत संबंधित व्यक्तीला करू शकते. किंवा गुन्ह्यात खरेखोटे पाहण्यासाठी कढईतील उकळत्या तेलातून पैसा काढावयास सांगितले जाते. किंवा कुलदैवताला स्पर्श करावयासही सांगण्यात येते. उद्देश हा, की गुन्हेगार हा सहजासहजी कुलदैवताला स्पर्श करीत नाही, असा समज आहे.

टकारी समाज हा हिंदू असल्याने, हिंदू देवदेवतांची पूजाअर्चा, उपासतापास, सणवार, ते करतात. त्यांच्या घरात देवदेवतांचे देव्हारे आढळतात. लग्नकार्ये, मयत किंवा इतर धार्मिक विधी हिंदू पद्धतीप्रमाणेच केले जातात. मात्र इंग्रजांच्या काळात जे या समाजातील लोक धर्मांतर करून खिस्ती धर्मात गेलेले आहेत, ते खिश्चन धर्माचेच पालन करताना आढळतात. मात्र त्यांचे सगेसोयरे आजही हिंदू असले, तरी त्यांना जवळ करतात, असे सांगण्यात आले.

## प्रमुख कुळी

या समाजात जाधव आणि गायकवाड या दोन प्रमुख कुळी मानल्या गेल्या आहेत. त्या दोन कुळांमध्ये रोटीबेटी व्यवहार होतो. या समाजात पूर्वी लग्नप्रसंगी हुंडा घेण्याची प्रथा अस्तित्वात नव्हती. मात्र अलिकडच्या काही वर्षांपासून शिक्षण, आणि आर्थिक परिस्थितीच्या प्रतिष्ठेनुसार हुंडा घेतला जातो. हुंड्याची पद्धत वाढत असलेली खंत एका कार्यकर्त्याने बोलून दाखविली.

लेखाच्या सुरुवातीला सांगितलेप्रमाणे हा समाज गावगाड्यात नसला, तरी

गावाच्या आश्रयाने आणि विश्वासाने राहत असल्याने, इतर भटक्या जमातींप्रमाणे यांच्या वाटचाला भटके जीवन आले नाही, तर त्यांना स्थिर जीवन त्या काळापासून लाभले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील काही गावांमध्ये या समाजाची लोकसंख्या इतर समाजाइतकी किंवा त्यांच्यापेक्षांही अधिक प्रमाणात झाल्याने परिणामी अशी गावे, 'टकाऱ्यांची गावे' म्हणूनच ओळखली जात होती. आजही ती ओळखली जातात. उदा., बारामती तालुक्यात आजचे 'वडगाव निंबाळकर' हे गाव गेल्या काही वर्षांपूर्वी 'टकाऱ्यांचे' वडगांव म्हणून ओळखले जात होते. तसेच कर्जत तालुक्यातील शिंदेगाव हे 'उचल्यांचे शिंदेगाव' म्हणून आजही ओळखले जाते. (टकाऱ्यांना काही भागांत 'उचले' या नावाने ओळखतात.)

इंग्रजांच्या काळात हा समाज गुन्हेगार म्हणून नोंदला गेलेला असला, तरी या समाजातील काही लोक त्या काळात, इंग्रजांच्या विरुद्ध स्वातंत्र्य–लढ्यात भूमिगत होऊन काम करीत होते. बारामतीचे मल्हारराव गायकवाड, पुण्याचे बळवंतराव पवार, भीमराव जाधव मास्तर, असे अनेक लोक स्वातंत्र्य–लढ्यात होते. १९४२–४७ दरम्यान सिदराम जाधव नावाच्या या समाजातील तरुणाने वयाच्या सतराव्या वर्षी सोलापूरच्या कोर्टावर हातबाँब टाकल्याची घटना या समाजातील लोक सांगतात. त्यानंतर गोवामुक्तीच्या लढ्यातही या समाजातील अनेक लोकांनी भाग घेतलेला होता. विठ्ठलराव सखा गायकवाड, बाजीराव पवार हे लोक स्वातंत्र्य-सैनिक म्हणून ओळखले जातात. त्यांना स्वातंत्र्य-सैनिक म्हणून सरकारने मान्यता दिलेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाने आपली प्रगती केल्याचे दिसते.

इतर विमुक्त समाजांच्या तुलनेने टकारी समाजाचा विकास अधिक जाणवतो. ह्या समाजातील लोक मोठ्या प्रमाणात शहरांत स्थायिक झाल्याने सामाजिक जाणिवा लोकांच्यांत प्रकर्षाने आढळतात. शिक्षण, नोकऱ्या, आणि खाजगी उद्योगधंद्यांत या समाजातील ५० ते ६० टक्के लोक असून, केवळ स्त्रियांचे प्रमाण महाराष्ट्रात ५० टक्केंच्या वर आहे, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाने शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे आढळते. शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा फायदा या लोकांनी घेतल्याचे दिसते. डॉक्टर, वकील, इंजिनियर या व्यवसायात अनेक लोक आज पाहावयास मिळतात. खेड्यापाड्यांतही शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण इतर विमुक्त समाजांच्या तुलनेने अधिक असल्याचे पाहावयास मिळते.

विशेषतः खेड्यापाड्यांत, शेती व्यवसायाकडे आपले लक्ष अधिक केंद्रित केल्याने या समाजातील काही लोक बागाईतदार म्हणून ओळखले जातात. शेतीव्यवसाय लोक करीत आहेत, त्याबरोबरच, कपडे शिलाईच्या व्यवसायात, या समाजातील लोकांचे प्रमाण मोठे आहे. रिक्षा, ट्रक्स, टेम्पो, किंवा इतर छोट्यामोठ्या व्यव-

सायांत लोक काम करीत आहेत.

दहा वर्षांपूर्वी पुणे येथे 'क्षत्रिय कुलवंत टकारी समाज मंडळ' ही या समाजाची सामाजिक संस्था स्थापन झाली. मंडळाच्या मालकीची जागा बोपोडी येथे असून, समाज मंदिरही बांधण्यात आले आहे. तेंथे लोकांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम केले जाते.

महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेश भटक्या विमुक्त समाजांत केलेला असला, तरी स्थिर जीवन जगणारे व कायम वस्ती करून खेड्यापाड्यांत, आणि शहरांत राहणाऱ्यांचे प्रमाण ९० टक्के आहे. इतर भटक्या विमुक्तांच्या तुलनेने अधिक प्रमाणात तो स्थिरावला असला, तरी शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक सवलतींचा लाभ मूठभर लोकांनाच मिळालेला आहे. सवलतीचा फायदा घेऊन, आर्थिक परिस्थिती उंचावलेले काही लोक समाजापासून फटकून वागतात, अशी खंत एका कार्यकर्त्याने बोलून दाखवली.

अनेक तरुण समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहेत. पुणे येथील श्री. शिवलाल जाधव या समाजातील तळमळीचे आणि लोकप्रिय आणि तरुण कार्यकर्ते आहेत. होतकरू तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्लॅस्टिक प्रकल्प व कागदी नळ्या तयार करण्याचा छोटा व्यवसाय त्यांनी सुरू केला आहे.

महाराष्ट्र समाजकल्याण खात्याच्या वतीने आणि शिवलाल जाधव यांच्या प्रयत्नांमुळे मुंढवा येथे कमला नेहरू टेलरिंग ट्रेनिंग सेंटर सुरू झाले झाले आहे. त्या केंद्राचा फायदा २० ते २५ महिलांना होतो. या उपक्रमातूनच स्वतंत्र व्यवसाय मिळवून देण्याची कल्पना आहे.

श्री. शिवलाल जाधव हे आदिवासी जाणीव केंद्राचे वतीने आणि श्री. शरद कुलकर्णी यांच्या सहकार्याने टकारी समाजावर संशोधन करीत असुन, फर्ग्युसन कॉलेजचे उपप्राचार्य श्री. व्ही. एम्. बाचल यांच्या मार्गदर्शनाखाली 'विमुक्त आणि भटक्या समाजांतील राजकीय व आर्थिक बदल आणि त्यांची सुधारणा' (सोशिओ पोलिटिकल चेन्जेस ऑफ डिनोटिफाइड ट्राइब्ज विथ् स्पेशल रेफरन्स टु मुंढवा सेटलमेन्ट) या विषयावर पीएच्. डी. साठी संशोधन करीत आहेत.

गेली काही वर्षे अनेक शिक्षित तरुण भटक्या विमुक्तांच्या चळवळीत काम करीत असून, राजकारणात तसे सक्रिय भाग घेत आहेत. १९६०–६५ चे दरम्यान सोलापूर शहराचे महापौर होण्याचा मान श्री. भीमराव जाधव (मास्तर) यांना मिळालेला आहे. श्री. परशुराम जाधव हे सोलापूर शहरातील चांगले कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. तर बारामती शहरात सध्या दोन नगरसेवक असल्याचे समजते.

शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्नशील असलेल्या या समाजात पुरुषांच्या बरोबरीने महिलांनाही स्थान दिले जाते. एवढेच नव्हे, तर

समाजातील पारंपरिक वाईट रूढी, चालीरीती, अंधश्रद्धा, नवस आणि उपासतापास या चक्रातून स्त्रीला मुक्त करण्याचा प्रयत्न आज होत आहे. महिलांचा शिक्षणाकडे अधिक ओढा आहे. या समाजातील महिला विशेषत: शिक्षकी पेशात अधिक संख्येने आहेत. सरकारी कचेऱ्यांत महिला काम करू लागल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर भटक्या विमुक्तांच्या तुलनेने टकारी समाजाने आपली प्रगती खूपच वेगाने केलेली आहे. आज ९९ टक्के समाज स्थिर झालेला आहे. त्यांनी आपल्या उपजीविकेची वेगवेगळी साधने उपलब्ध केलेली आहेत. खेड्यापाड्यांत या समाजातील काही लोकांनी शेतीचा व्यवसाय चांगल्या प्रकारे करून बागाईतदार म्हणून प्रतिष्ठा मिळविली आहे. आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक दृष्ट्या हा समाज जागृत असला, तरी सामाजिकदृष्ट्या अजूनही हा समाज तितकासा जागृत असतांना आढळत नाही. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके तरुण लोक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत काम करताना किंवा मिसळताना आढळतात. समाजकारणापेक्षा राजकारणाची ओढ या समाजातील लोकांना अधिक असल्याचे जाणवते. या समाजाला सामाजिक जाणिवा आलेल्या आहेत. राजकीय आणि सामाजिक चळवळीत तरुण पिढी आघाडीवर आहे.

• • •

# रामोशी समाज

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या भटक्या विमुक्तांच्या यादीत रामोशी समाजाचा 'विमुक्त समाज' म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. वस्तुतः हा समाज स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मोठ्या संख्येने खेड्यापाड्यांत स्थिर झाल्याचे पाहावयास मिळते. परंतु इंग्रजांच्या काळात हा समाज गुन्हेगार म्हणून नोंदला गेल्यामुळे आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ब्रिटिश गुन्हेगारी कायद्यातून त्यांना मुक्त केल्याने, हा समाज आजही विमुक्त म्हणूनच ओळखला जातो.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेत या समाजाकडे महत्त्वाचे काम सोपविण्यात आलेले होते. रामोशी समाजातील लोक धाडसी, बेडर वृत्तीचे आणि करारी बाण्याचे म्हणून ओळखले जात असल्याने, गावाचे रक्षण करण्याची प्रमुख जबाबदारी या समाजाची होती. बाहेरच्या लोकांपासून गावाचे रक्षण करणारा रामोशी हा त्या काळी गावचा रक्षणकर्ता म्हणून ओळखला जात असे. आजही खेड्यापाड्यांत अशी कामे करताना हे लोक आढळतात.

या समाजाला गावगाड्यामध्ये इतर बलुतेदारांप्रमाणे खास पारंपरिक धंदा नसल्याने गावासाठी पडेल ते काम करण्याची त्यांची तयारी असे. त्यामुळे त्यांचा उपयोग शस्त्रासारखा करण्यात आला.

## रामाचा आदर्श

विशेषतः शिवकालामध्ये किल्ल्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी या समाजाकडे होती. ३८ पैकी १४ किल्ल्यांवर या समाजातील लोक किल्लेदार म्हणून काम करीत होते. त्याच्या मोबदल्यात त्यांना त्या काळी, काही जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या. सातारा, कोल्हापूर, पुरंदर, सोलापूर या भागांत अशा प्रकारच्या

इनामी जमिनी आजही त्या समाजाकडे आहेत. याच काळात नाईक ही पदवी त्यांना देण्यात आली. त्यामुळे नाईक समाज या नावानेही ते ओळखले जाऊ लागले. रामोशी समाजातील लोक स्वतः रामवंशी असल्याचे सांगतात. जे गुण रामामध्ये होते, तेच गुण आमच्या समाजात आहेत, असे या समाजातील लोक सांगतात; तर आम्ही रामाचे सेवक असून, एकपत्नीत्व, एकवचन आणि त्याग, हे गुण आजही आम्ही जोपासतो, असे एकाने सांगितले. राम हा या समाजाचा आदर्श आहे.

रामोशी हा समाज मूळचा उत्तर प्रदेशातील अयोध्येतील असल्याचे सांगितले जाते. रामराज्यात हा समाज मुख्यतः लढवय्या म्हणून ओळखला जात असे. त्या काळी सैन्यातील प्रमुख पदांवर या समाजातील लोक असत. ते स्वतःला रामाचे वंशज समजत असत. नंतरच्या काळात, म्हणजे मोगल काळात, यवनांच्याकडून या समाजाचा पराभव झाल्याने हे लोक अयोध्येतून परागंदा झाले आणि दक्षिण भारतात, टोळचा टोळचांनी येऊन राहिले.

त्या काळी मूळ महाराष्ट्रातील लोकांना हे लोक तसे परके किंवा दूरचे असे राहिले. ते स्वतःची ओळख 'रामवंशी' समाज या नावाने करून देत असत. पुढे या शब्दाचा अपभ्रंश होऊन, रामवंशाचे ते 'रामोशी' झाले आणि पुढील काळात याच नावाने महाराष्ट्रात ओळखले जाऊ लागले.

मुळातच हे लोक धाडसी, शूर आणि लढवय्ये असल्याने, इतर समाज त्यांना घाबरत असे. त्या काळी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेत, त्याच्या मूळच्या गुणांमुळे किंवा धाडसामुळेच ते सामावले गेले. गावाचे रक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. तेव्हा त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि इमानदारीने ती जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे ते ग्रामव्यवस्थेत समाविष्ट होऊ शकले. मात्र उत्तरेतून आलेल्या सर्वच रामवंशीयांना किंवा रामोश्यांना त्या काळचा गावगाडा सामावून घेऊ शकला नाही. त्यामुळे ज्यांना गावगाडचात स्थान मिळाले नाही, ते लोक उपजीविकेसाठी चोऱ्यामाऱ्या करून, वेळप्रसंगी मोठमोठ्या जमीनदारांच्या आणि सावकारांच्या वाडचावर दरोडे घालून लूटमार करीत व आपला चरितार्थ भागवीत. त्या काळी चोरी करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय झालेला होता. त्यामुळेच इंग्रजांच्या काळात हे लोक गुन्हेगार म्हणून नोंदले गेले.

त्या काळी रामोशी समाजाचा प्रमुख व्यवसाय चोरी करणे हा असल्याने या व्यवसायाला उपयुक्त अशी परंतु इतरांना न कळणारी अशी एक सांकेतिक भाषा या समाजात बोलली जात असे. तिला 'बुएल भाषा' म्हणून ओळखले जात असे. 'बुएल' ही रामोशी समाजाची खास सांकेतिक भाषा होय. तिला ते 'पारशी' असेही म्हणतात. उदा., मुलवड–(मुसलमान), बनगड–(गुजर), गोरेल–(बकरे), बोलम–(गूळ), गोन–(मार), उकन–(पळ) वगैरे शब्द 'बुएल' भाषेतील आहेत.

फासेपारधी किंवा इतर गुन्हेगार जमातींप्रमाणे रामोशी समाजातही त्या काळी मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या पाचवीच्या वेळी ‘ बेडी ’ पुजण्याची रीत होती, असे सांगितले जाते.

बाळाच्या पाचवीला बेडी पुजणे म्हणजे त्या बाळाला चोरी करण्याची शिक्षा देणे, असे समजले जात असे.

रामोशी समाजाचे एक वेगळेपण असेही सांगितले जाते, की इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे रामोशी हा समाज, इंग्रजांच्या काळात अस्तित्वात असलेल्या सेटलमेन्टमध्ये, बंदिस्त स्वरूपात ठेवण्यात आलेला नव्हता. तर या समाजातील लोक जंगलांत आणि डोंगरदऱ्यांत निवारा शोधत असत आणि रात्री-अपरात्री ठरलेल्या ठिकाणी दरोडा घालून पसार होत असत.

दुसरें असे, की हा समाज अस्पृश्य म्हणून ओळखला जात नव्हता किंवा तो वेशीच्या बाहेरही वस्ती करून राहत नव्हता. गावच्या प्रमुख वेशीला लागूनच या समाजाचे लोक राहत असत. गावात त्यांचा दबदबा असे, गावचे प्रमुख लोक त्यांच्या साहाय्याने, त्यांची बरीवाईट कामे करवून घेत असत. त्या बदल्यात त्यांना इनाम दिले जात असे.

## प्रमुख कुळी

रामोशी समाजात कुळांना अतिशय महत्त्वाचे स्थान दिले जाते. प्रत्येक कुळाचे कुळाचार वेगवेगळे आहेत. मात्र खंडोबा हे महाराष्ट्रातील देवस्थान सर्व कुळांचे प्रमुख कुलदैवत मानले जाते.

या समाजातील प्रमुख कुळी म्हणून चव्हाण, खोमणे, भंडलकर, शेळके, बोडरे, मदने, जाधव, शितोळे, सितकल, गोपणे, माकर, गोरगल, लांडगे, मसुगडे, गावडे, पाटोळे, बुधावळे, इ. कुळे सांगितली जातात. या कुळांत आपापसांत रोटीबेटी व्यवहार केला जातो. प्रत्येक कुळात कुलदैवताचा देव्हारा आढळतो. वरील सर्व कुळे ही महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत आजही पाहावयास मिळतात. कुळांची नावे हीच या समाजातील प्रमुख आडनावे म्हणून ओळखली जातात. महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यापाड्यात या आडनावाचे लोक समाजात पाहावयास मिळतात. मात्र एकाच कुळात किंवा आडनावात लग्नसंबंध केले जात नाहीत, असे सांगण्यात आले.

इतर जाती–जमातींप्रमाणे रामोशी समाजातही पोटजाती असल्याचे सांगण्यात आले. यांमध्ये प्रामुख्याने कोळी रामोशी, व्हलगे रामोशी, भिल्ल रामोशी आणि मांग रामोशी असे चार प्रकार आढळतात. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात कोळी रामोशी, सोलापूर भागात व्हलगे रामोशी, नगर जिल्ह्यात भिल्ल रामोशी आणि मराठवाडा, विदर्भात मांग रामोश्यांची वस्ती प्रामुख्याने आढळते. कोळी रामोशी आणि भिल्ल रामोशी त्या त्या भागामध्ये आदिवासी म्हणून ओळखले जातात. या

पोटजातींमध्ये किंवा पोटप्रकारांत कसल्याही प्रकारचे रोटीबेटी व्यवहार होत नसल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्रात रामोशी या नावाने ओळखला जाणारा समाज कर्नाटकामध्ये 'बेरड' नावाने ओळखला जातो.

या समाजातील काही घराण्यांत 'जंगम' आढळतो. विशेषतः लिंगायत रामोशी समाजामध्ये 'जंगमा'चे प्रस्थ अधिक पाहावयास मिळते. जंगम हा या समाजातील प्रमुख मानला गेला असून, समाजात त्याला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

वेगवेगळ्या नावांनी ओळखला जाणारा हा समाज हिंदू धर्मीय असला, तरी कर्नाटक आणि विजापूर भागातील लिंगायत रामोशी समाजात प्रेताचे दहन न करता प्रेत पुरण्याची प्रथा असल्याचे सांगण्यात आले.

या समाजातील कुटुंबामधील प्रमुख–कर्ती व्यक्ती जर मरण पावली, तर त्याच्या नावाने देव्हाऱ्यात छोटी मूर्ती ठेवली जाते. त्यास 'टाक' करणे असे म्हणतात.

## 'वार' खेळविण्याची प्रथा

पूर्वजांच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून या समाजामध्ये लग्नाच्या वरातीमध्ये दोन्हींकडील तरुणांनी हातांत काठ्या घेऊन खोटी खोटी लढाई खेळली जाते. त्याला ते लोक 'वार खेळणे' असे म्हणतात. विशेषतः वरातीचे वेळी, काही लोकांच्या अंगात येते, अंगात येणाऱ्या माणसावर वरातीतील इतर लोक काठ्या घेऊन खोटा हल्ला चढवतात व त्यांचा प्रतिकार अंगात येणारी व्यक्ती करीत असते. अंगात येणारी व्यक्ती ही त्या वेळी वीर समजली जाते. या लढाईत वीराचा नेहमीच विजय झाल्याचे दाखविण्यात येते.

## खंडोबा कुलदैवत

महाराष्ट्रातील खंडोबा हे या समाजाचे कुलदैवत असून 'जय मल्हार' म्हणूनच समाजातील कोणत्याही कार्याला सुरुवात केली जाते. जाग्रण, गोंधळ घालणे, मुरळी सोडणे, नवस, उपासतापास, आदी अंधश्रद्धेचे प्रकार या समाजात मोठ्या प्रमाणात आढळतात. महाराष्ट्रातील प्रसिद्ध खंडोबाच्या यात्रेत, सोमवतीला, देवाची पालखी उचलण्याचा मान या समाजाचा असतो. धनगर आणि रामोशी लोकांनी खंडोबाच्या पालखीला खांदा दिला नाही, तर पालखी जागेवरून हलविली जात नाही.

या समाजात जशी कुटुंबातील जाणती–अजाणती मुलगी खंडोबाला मुरळी म्हणून सोडण्याची प्रथा आहे, तशी कुटुंबातील जाणता–अजाणता पुरुष 'वाघ्या' म्हणून सोडण्याची प्रथाही आहे. 'वाघ्या' सोडण्यामध्ये दोन प्रकार सांगितले जातात. घरवाघ्या आणि दुसरा संन्याशी वाघ्या. घरवाघ्या प्रपंच संभाळून वाघ्या म्हणून खंडोबाची सेवा करणारा तो घरवाघ्या. तर आयुष्यभर अविवाहित राहून

वाघ्या म्हणून समाजात वावरणारा तो संन्याशी वाघ्या !

पूर्वजांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून या समाजातील जवळ जवळ प्रत्येक कुटुंबात भाले, तलवारी आणि कुऱ्हाडी असल्याचे सांगण्यात आले. या शस्त्रांची घरोघर पूजा केली जाते. शूरांचे प्रतीक म्हणून काही घरांतील देव्हाऱ्यांत अशी शस्त्रास्त्रे ठेवण्याची पद्धत आहे.

इतर भटक्या विमुक्त जाती–जमातींप्रमाणे या समाजातही पूर्वी जातपंचायत अस्तित्वात असल्याचे सांगण्यात आले. जात-पंचायतीचे प्रमुख म्हणून 'पाटील' असत. चव्हाण आणि जाधव ही या समाजातील पाटीलकीची प्रमुख घराणी म्हणून ओळखली जातात. अलिकडच्या काही वर्षांत या समाजातील जात–पंचायतीचे अस्तित्व संपलेले असले, तरी वरील आडनावांच्या लोकांना समाजात स्थान आहे.

रामोशी समाजाकडे पाहण्याच्या इतर समाजाचा दृष्टिकोन वेगळा आहे. हे लोक धाडसी आणि इमानी म्हणून प्रसिद्ध आहेत. देशाच्या स्वातंत्र्य–लढ्यात हा समाज प्रामुख्याने आढळतो. क्रांतिवीर वासुदेव फडके यांचा एक सेनापती दौलत रामोशी हा बंडात पराक्रम करून फाशी गेल्याचे आठवण काही लोक सांगतात. त्यापूर्वी म्हणजे १७९१ ते १८३२ या काळामध्ये रामोशी समाजाचे स्फूर्तिस्थान असलेले नरवीर उमाजी नाईक हे त्या काळी प्रतिशिवाजी म्हणून ओळखले जात असत.

## विस्कळीत समाज

अशा या क्रांतिपुरुषाला आराध्य दैवत मानून, आज महाराष्ट्रातील रामोशी समाज, एकत्र येण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु पराकोटीचे दारिद्र्य, टोकाची अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव असल्याने या समाजाला एकत्र येणे त्रासाचे होत आहे. योग्य नेतृत्व न लाभल्याने हा समाज महाराष्ट्रात विस्कळीत अवस्थेत पाहावयास मिळतो.

महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या चार ते पाच लाखांचे जवळपास असल्याचे आढळते. शिवकालामध्ये मिळालेल्या इनामी, वतनी जमिनी असूनही आर्थिक दारिद्र्यामुळे या समाजाला आपल्या जमिनी बड्या बागायतदारांकडे गहाण ठेवून मिळेल त्या अल्प मोबदल्यात किंवा मोलमजुरी करून उपजीविका करावी लागते.

स्वातंत्र्योत्तर काळात हा समाज विमुक्त म्हणून समाविष्ट केलेला असून, विमुक्तांना मिळणाऱ्या शासकीय सवलतींचा फायदा या समाजाला उपलब्ध करून दिलेला आहे. परंतु या शासकीय सवलतींचा फायदा ठरावीक व्यक्तींनाच मिळाल्याने उरलेला समाज सवलतींपासून वंचित राहत असल्याचे दिसते. या समाजातील जे कोणी उच्च शिक्षित आहेत, किंवा आर्थिकदृष्ट्या चांगले आहेत, असे लोक समाजाला कोणत्याही प्रकारे मार्गदर्शन अथवा सहकार्य करीत नसल्याचे एका कार्य-

कर्त्यांनी सांगितले. परंतु अशा व्यक्तींच्याकडे दुर्लक्ष करून बाकी समाजाला एकत्र आणण्याचे प्रयत्न अलीकडे केले जात आहेत. ' नरवीर उमाजी नाईक समाज सुधार मंडळ ' या नावाची सामाजिक संस्था या समाजात कार्य करीत आहे.

## एकोप्याचा प्रयत्न

महाराष्ट्रातील खेडयापाडयांमध्ये या समाजातील काही कार्यकर्ते एकोप्याचे काम करीत आहेत. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांत हा समाज सामाजिक संघटना निर्माण करून, त्या संघटनेद्वारे समाजाचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करीत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेती आणि शेतमजुरी हाच प्रमुख व्यवसाय असल्याचे आढळते. याशिवाय सरकारी नोकरी आणि खाजगी छोटयामोठ्या व्यवसायांतही हे लोक आढळतात. महाराष्ट्रात या समाजाचे शैक्षणिक प्रमाण २० टक्के आहे. पैकी चार ते पाच टक्के शिक्षित महिला आहेत. शिक्षक, तलाठी, पोलीस आणि कारकून म्हणून नोकरी करणारे या समाजात अधिक आहेत. विशेषतः सातारा जिल्ह्यात सैन्यात भरती झालेल्या या समाजातील तरुणांचे प्रमाण अधिक आहे.

गेल्या काही वर्षांपासून समाज सुधारण्याच्या दृष्टीने अनेक तरुण कार्यकर्ते काम करीत आहेत. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती समाजात दिसून येत आहे. विशेषतः या समाजाचा महाराष्ट्र शासनाने केलेला ' विमुक्त ' समाजातील समावेश रद्द करून हा समाज अनुसूचित जमातींमध्ये समाविष्ट करावा, अशी या समाजातील प्रमुख लोकांची मागणी असल्याचे सांगितले जाते. त्याचप्रमाणे या समाजाचे स्फूर्तिस्थान किंवा दैवत म्हणून समजले जाणारे, वीर उमाजी नाईक यांचे राष्ट्रीय स्मारक करावे, त्यांच्या स्मरणार्थ ते स्मारक असावे, त्यांचा पुतळा, त्यांना ज्या ठिकाणी इंग्रजांनी फाशी दिले, त्या ठिकाणी उभारला जावा, त्यांचे स्मरण म्हणून टपाल तिकीट प्रसिद्ध करावे, त्यांचा परिचय पाठ्यपुस्तकांतून देण्यात यावा, अशा प्रकारच्या या समाजाच्या आजच्या मागण्या आहेत.

• • •

# मांगगारूडी समाज

मांगगारूडी हा समाज मातंग समाजाची पोटजात म्हणून ओळखला जातो. हा समाज ब्रिटिशांच्या राजवटीत गुन्हेगार समाज म्हणून ओळखला जात असे. ब्रिटिशांनी क्रिमिनल ट्राइब्ज अॅक्ट अमलात आणून या देशातील ज्या भटक्या जमाती गुन्हेगार म्हणून बंदिस्त केल्या होत्या, त्यांमध्ये मांगगारूडी या जमातीचा प्रामुख्याने समावेश केलेला होता.

मांगगारूडी हा समाज त्या काळी अत्यंत कडवा, चपळ आणि गुन्हेगारीत हुशार समजला जात असे. या समाजातील गुन्हे करणारे लोक इंग्रज अधिकाऱ्यांना सहसा सापडत नसत; परंतु जे लोक इंग्रजांना सापडले, त्या लोकांच्या बायका-मुलांना आणि नातेवाइकांना गुन्हेगार म्हणून त्या काळी अस्तित्वात असलेल्या सेटलमेन्टमध्ये (गुन्हेगार वसाहतीत) तारेच्या कुंपणात बंदिस्त केलेले होते. त्यांना रात्रीतून तीन वेळा हजेरी ठेवलेली होती. परगावी जायचे असेल, तर स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांचे ओळखपत्र घेऊन जावे लागत असे. तेथील पोलीस ठाण्यावर तीन वेळा त्यांना हजेरी द्यावी लागत असे. वेळ प्रसंगी इंग्रज अधिकाऱ्यांच्या छळाला त्यांना बळी पडावे लागत असे. कारण दुर्दैवाने ही माणसे गुन्हेगार म्हणून त्या काळात नोंदली गेलेली होती.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ब्रिटिशांचा क्रिमिनल ट्राईब्ज अॅक्ट रद्द करून सर्व गुन्हेगार जमातींना मुक्त केले. त्यांत मांगगारूडी समाजही मुक्त झाला. आणि तो 'विमुक्त' (डी-नोटिफाईड) या नावाने नोंदण्यात आला.

## नवीन पोटजातच

मांगगारूडी हा समाज मूळचा महाराष्ट्रातील असून महाराष्ट्रातील मांग किंवा मातंग या समाजाशी त्यांचा संबंध आहे. मांगगारूडी हा मूळ मातंग समाज असून,

फार पूर्वीच्या काळी मातंगांतील काही लोकांनी स्वत:च्या उपजीविकेसाठी 'गारूडी' समाजाचा व्यवसाय स्वीकारला. त्यांच्याप्रमाणे भानामतीचे (जादूचे) खेळ करून लोकांची करमणूक करीत राहिला, त्यामुळे त्यांना 'मांगगारूडी' या नावानेच लोक ओळखू लागले. पुढे हे लोकसुद्धा स्वत:ची ओळख 'मांगगारूडी' याच नावाने सांगू लागले. परिणामी हे लोक मूळ मांग समाजापासून दूर गेले आणि 'मांगगारूडी' या नावाची नवीन पोटजात निर्माण झाली.

मातंगांतील इतर पोटजाती आणि मांगगारूडी यांच्यामध्ये एक प्रमुख फरक पाहावयास मिळतो. तो असा : मातंग समाजामध्ये असलेल्या मांग, मिनिमादिग, दखनी मांग, मांग–म्हशी, राधे–मांग या पोटजातींप्रमाणे मांगगारूडी समाज हा स्थिर समाज नाही, त्यांना पारंपरिक जातधंदा नाही, हे लोक सतत भटके आणि अस्थिर असेच राहिले. त्यामुळे मातंग आणि त्यातील पोटजातीने मांगगारूडी समाजाला थोड्या अंतरावरच ठेवले. खालच्या दर्जाचा समाज म्हणून तो सतत दुर्लक्षित राहिला. त्यामुळे हे लोक आपले स्वतंत्र अस्तित्व जोपासत राहिले.

मातंग समाजाच्या 'मागल्या जाती' किंवा तत्सम जाती म्हणून 'उक्कलवार' आणि 'कोकलवार' या आणखी दोन स्वतंत्र (परंतु मातंगांशी संबंधित) जातींचा उल्लेख केला जातो. मांगगारूडी समाजातील लोक वरील दोन जमातींपेक्षा आपण श्रेष्ठ असल्याचे सांगतात. म्हणजे मातंगांपेक्षा खालचे परंतु उक्कलवार आणि कोकलवारांच्यापेक्षा वरचे म्हणून मांगगारूडी आपली ओळख सांगतात. मात्र मातंगांना ते आपले भाऊ किंवा राजे मानतात.

मांगगारूडी समाजाचे दुसरे वैशिष्टच असे सांगितले जाते, की या समाजातील लोक मातंग समाजाप्रमाणे घायपातापासून दोरखंड, चऱ्हाटे, केरसुण्या, शिंकी किंवा वाखाचा धंदा करीत नाहीत. ते मातंगाप्रमाणे ग्रहण मागत नाहीत किंवा मरिआईला पोतराजही सोडीत नाहीत.

### भाषा, परंपरा आणि व्यवसाय

मांगगारूडी समाजाची भाषा, चालीरीती आणि परंपरा या वेगळ्या आहेत. पूर्वीच्या काळी, मातंग समाजाबरोबर या समाजाचे रोटीबेटी व्यवहार होत असत. मात्र हल्ली असे व्यवहार होत नसल्याचे एका कार्यकर्त्याने सांगितले.

मूळ मातंग समाजापासून व्यवसायाच्या निमित्ताने दूर गेलेला किंवा स्वतंत्र अस्तित्व सांगणारा मांगगारूडी हा समाज परिस्थित्यनुसार आपले उपजीविकेचे व्यवसाय बदलत गेलेला आढळतो. महाराष्ट्रातील काही भागांत हा समाज म्हैस भादरण्याचा आणि शिंगे तासण्याचा व्यवसाय करतो. यांना 'म्हशीभादरे' या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्रातील काही भागांत सर्रास हाच व्यवसाय करणारे या समाजातील लोक आढळतात. याशिवाय भाकड म्हशी घेऊन गावोगावी जाऊन

त्या विकण्याचाही व्यवसाय हे लोक करतात. त्यांच्या वेगवेगळ्या व्यवसायांनुसार त्यांना विशिष्ट नावाने त्या त्या भागात ओळखले जाते. उदा., रंगकाम करणारे रंगीत मांग, काकऱ्या करणारे काकऱ्या मांग, शिंदीच्या झाडापासून नीरा काढणारे शिंदी मांग अशा अनेक धंद्यांपासून पडलेल्या पोटजाती या समाजातील लोक सांगतात.

मांगगारूडी समाजामध्ये काही भागांत वाहक म्हणून प्रामुख्याने म्हशींचा वापर केला जातो. जसे कैकाडी गाढवाचा, धनगर घोड्याचा वाहतुकीसाठी वापर करतात, तसेच या समाजातील लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी अथवा सामान वाहून नेण्यासाठी म्हशीचा वापर करतात. म्हैस हा या समाजात उपयुक्त प्राणी समजला जातो.

मांगगारूडी समाजामध्ये अक्षय तृतीयेला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते. त्या दिवशी या समाजात मोठ्या प्रमाणात सण साजरा केला जातो. त्याला ते 'आखितीचा' सण असे म्हणतात. आखितीच्या सणाचे वैशिष्ट्य सांगताना एक कार्यकर्ता म्हणाला, त्या दिवशी समाजातील सर्व लोक अंघोळ करतात. नवीन कपडे घालतात. प्रत्येक कुटुंबात पुरणपोळीचे जेवण केले जाते. त्या दिवशी घरातील मृत लोकांचे फोटो अथवा मुखवटे देव्हाऱ्यात ठेवले जातात. त्यांच्यासमोर केळीची पाने अंथरली जातात. त्यावर एकएक पुरणपोळी ठेवली जाते. त्या पोळ्यांवर छोटी दोन मडकी ठेवतात. नंतर घरात केलेला गोड नैवेद्य केळीच्या पानावर आणि मडक्यात ठेवला जातो. तसेच दारू, ताडी ठेवतात व मृत आत्म्यास हात जोडून जेवणास या म्हणून विनविले जाते.

या पाठीमागची कल्पना विचारली असता तो कार्यकर्ता म्हणाला, अक्षय तृतीयेच्या दिवशी स्वर्गाची दारे खुली असतात व त्यामुळे मृत आत्मे स्वर्गातून पृथ्वीवर येतात, अशी फार पूर्वीपासून या समाजातील लोकांची श्रद्धा आहे.

## जातपंचायतीचे महत्त्व

मांगगारूडी समाज पूर्वीपासूनच उपजीविकेसाठी भटकत राहिल्यामुळे अर्थातच इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे याही समाजात जातपंचायतीचे महत्त्व आढळते. जातपंचायत ही जातीची न्यायपंचायत मानली गेलेली आहे. समाजातील भांडण-तंटे, लग्नकार्ये, सोडचिठ्ठी, पुनर्विवाह अगर महत्त्वाच्या सामाजिक कार्याचे निर्णय जातपंचायत घेते, जातपंचायतीने केलेले अलिखित नियम सर्वांना बंधनकारक असतात. हे नियम अर्थातच परंपरेने चालत आलेले आहेत. आजही या समाजातील लोक जातपंचायतीचे अस्तित्व मानतात. पंचायतीचे नियम पाळताना आढळतात. प्रदेशानुसार जातपंचायतीचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी जातपंचायतीचा विलक्षण प्रभाव या समाजात पाहावयास मिळतो.

या समाजातील जातपंचायतीच्या प्रमुखास 'पाटील' असे म्हणतात, समाजातील काही ठरावीकच आडनावांच्या लोकांना (प्रमुख कुळांना) पाटीलकीचा मान दिला जातो. अर्थातच पाटील हे पद परंपरेने चालत आलेले असते, पाटलाला समाजात मान असतो.

विदर्भ, मराठवाड्यात 'अंकुशी' या कुळात पाटीलकीचा मान दिला जातो, तर पश्चिम महाराष्ट्रात 'लोंढे' कुळांकडे (आडनावाच्या घराण्यात) हा मान पूर्वी दिला जात होता. गेल्या काही वर्षांपासून लोंढे कुळाचा मान काढून घेण्यात आला आणि तो 'सकट' या कुळात देण्यात आला. या बदलाचे कारण विचारता एका कार्यकर्त्याने सांगितले, की पूर्वी या समाजात जर एखाद्याचे लग्न झाले, तर पहिल्या रात्री नववधू पाटलाकडे पाठविण्याची चाल होती, त्यामुळे काही ठरावीक लोक आपली पाटीलकी टिकवून होते. पुढे ही प्रथा बंद केली आणि 'सकट' यांच्याकडे पाटीलकी देण्यात आली व नववधू पाठविण्याचे बंद करण्यात आले.

या समाजातील जातपंचायतीचे दुसरे वैशिष्ट्य असे, की पंचायतीच्या न्याय-निवाड्यांच्या कामात या समाजातील स्त्रियांनाही सहभाग घेता येतो, आपल्यावर झालेल्या अन्यायाची दाद मागता येते. आपली बाजू निर्भीडपणे मांडता येते व न्याय मिळवता येतो.

या समाजातील जातपंचायतीचे वेगळे वैशिष्ट्य सांगताना एक कार्यकर्ता म्हणाला, पंचायतीमध्ये 'आक्करमाशी आणि बारमाशी' असे प्रमुख भेद केलेले आहेत. या दोन भेद प्रकारांतील लोक एकमेकांना कमीअधिक प्रमाणात लेखतात. त्यामुळे समाजात दुही निर्माण झाली आहे. अशा प्रकारची आक्करमाशी आणि बारमाशी जातपंचायत इतर भटक्या विमुक्त समाजांत आढळत नाही.

इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे या समाजातील गुन्हेगारांना समाजातून बहिष्कृत केले जाते. त्याला ते 'वाळीत टाकणे' असे म्हणतात. अशा वाळीत टाकलेल्या व्यक्तीबरोबर आणि त्याच्या कुटुंबीयांबरोबर समाजातील लोक कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवीत नाहीत किंवा त्यांच्याशी मैत्रीला अगर लग्नकार्यात जात नाहीत, किंवा त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत आणि जर एखाद्याने वाळीत टाकलेल्या व्यक्तीशी संबंध ठेवले, तर संबंधित इसमासही समाज बहिष्कृत करतो.

बहिष्कारापेक्षाही कठोर शिक्षा म्हणून 'एक पैसा' दंड करण्याची पद्धत या समाजात आहे. पैसा दंड हा नामुश्कीचा दंड समजला जातो. त्यामुळे 'मला वाळीत टाका, पण पैसा दंड करू नका', अशी विनंती गुन्हेगार पंचायतीला करतो. गुन्ह्याचे स्वरूप पाहून पंचायत शिक्षेत बदल करते.

या समाजातील लोक सहसा कोर्टकचेऱ्यांत जात नाहीत. जातीअंतर्गत सर्व न्यायनिवाडे जातपंचायतीतच होतात. कोर्टात जसे वादी–प्रतीवादीच्या बाजूने बोलणारे वकील असतात, तसेच या समाजात जाणकार आणि हुशार लोक आहेत.

ते या समाजातील वकील म्हणून ओळखले जातात. त्यांना आपली बाजू मांडल्याबद्दल दारू आणि मटणाचे जेवण देण्याचा रिवाज आहे. अशा वकिलांना समाजात मोठा मान दिला जातो.

## कुळांचे स्थान

मांगगारूडी समाजात कुळांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक कुळाचे श्रेष्ठत्व आजही समाजात जोपासले जाते. लोंढे, सकट, कांबळे, पाथरे, काळे, उमाप, राखपसरे, उफाडे, कसबे, जगताप, उपाध्ये, इंचूरकर आणि खंदारे, ही या समाजातील प्रमुख कुळे असून यांना समाजात मान दिला जातो. कुळात आपापसांत रोटीबेटी व्यवहार होतात. मात्र प्रत्येक कुळाची कुलदैवते वेगवेगळी आहेत. लोंढे, माथरे, खंदारे, उमाप या कुळांचे खंडोबा हे कुलदैवत असून, सकट यांची सवास्नी, कसबे यांची वाघूरआई आणि कांबळे यांची भवानीआई ही वेगवेगळी कुलदैवते आहेत. प्रत्येक कुळाच्या घरात त्यांच्या कुलदैवतांचे देव्हारे आहेत. देवीचे पितळेचे किंवा चांदीचे मुखवटे आणि काहींच्या देव्हाऱ्यांत 'टाक' पाहावयास मिळतात. ते त्यांची पूजा करतात.

हा समाज एके ठिकाणी स्थिर नसल्याने आणि पूर्वीचा गुन्हेगार समाज असल्याने अर्थातच गुन्हेगार जमातींप्रमाणे इतरांना समजू नये, म्हणून समाजात एक विशिष्ट सांकेतिक भाषा बोलली जाते. त्या भाषेला ते 'पारशी' भाषा असे म्हणतात. ही भाषा फक्त मांगगारूडी समाजातीलच लोकांना समजते. मात्र मातंग समाजाच्या 'अंबुजवाय' नावाच्या सांकेतिक भाषेशी यांच्या पारशी भाषेचे थोडे साम्य आढळते. उदा., सोलपा (लहान), चिंगडा (पोलीस), मरवणी (पत्नी), झपी (भाकरी), झुंकल (कुत्रा), खमुस (पैसा), खावडी (चोरी), चिंगोली (दारू) हे शब्द पारशी भाषेतील आहेत.

वरील सांकेतिक भाषा शक्यतो चोरी करण्याचे वेळी अथवा म्हशींची विक्री करतेवेळी इतरांना समजू नये, म्हणून बोलली जाते. अन्यथा मराठी भाषेतच सर्व व्यवहार केले जातात. मराठी ही या समाजाची मातृभाषा आहे.

## टोपलीत लग्न

मांगगारूडी हा समाज हिंदू धर्मीय असून या समाजातील लग्नकार्ये हिंदू धर्माचे स्मरण करूनच केली जातात. मात्र लग्न लावण्याची पद्धत ही वेगळी आहे. पूर्वी तीन दिवस लग्न–सोहळा चालत असे. लग्नाला येणाऱ्या सगेसोयऱ्यास लग्नदिवशी गोड जेवण दिले जाते. तत्पूर्वी दारू, मटण पाहुण्यांना देण्याचा रिवाज होता. गेल्या काही वर्षांपासून हा रिवाज बंद केल्याचे सांगितले जाते.

या समाजातील लग्नप्रसंग सांगताना एक कार्यकर्ता म्हणाला, लग्नाचे वेळी

समाजाचे पाच पंच बसतात. त्यांना लग्नप्रमुखांच्याकडून दारू दिली जाते. लग्नाचा ठराव केला जातो. पूर्वी मुलाकडून मुलीला सात रु. किंवा सोळा रु. ' दयाज ' दिले जात असे. त्याला ते ' दयाजमान ' असे म्हणतात. लग्नाचा ठराव झाल्यानंतर नवरानवरीला टोपलीत (वेताचे विणलेले टोपले) उभे करतात व समाजातील प्रमुख व्यक्ती (त्या व्यक्तीला समाजातील ब्राह्मण म्हणतात) खालील मंगलाष्टक म्हणून लग्न लावते.

काळचा वावरात पेरली तुराटी
नवरीची अक्षदा नवऱ्यावर पडो
नवऱ्याची अक्षदा नवरीवर पडो
लग्न लागले शुभमंगल साम धाम

हीच या समाजातील लग्नवेळची मंगलाष्टका होय. हे मंगलाष्टक म्हटल्याशिवाय लग्न पूर्ण होत नाही, असे एकाने सांगितले.

मांगगारूडी हा समाज हिंदू धर्मीय असला, तरी हिंदू धर्मीयांप्रमाणे हे लोक प्रेताचे दहन करीत नाहीत, तर ते दफन करतात.

मातंग किंवा मांगगारूडी या समाजाचा ' मागता ' किंवा त्याच्या आश्रयाला राहाणारा ' उक्कलवार ' आणि ' कोकलवार ' यांना समाजात एक वेगळे स्थान दिले जाते. कारण ' उक्कलवार ' हा समाज कोठेही गेला, तरी तो मातंग किंवा मांगगारूडी याच समाजाच्या शेजारी आपले पाल ठोकतो. त्यांच्याच हातचे खातो आणि त्यांचीच फक्त करमणूक करतो. हे त्या समाजाचे वैशिष्टच आहे. जर मांगगारूडी समाजातील एखाद्या व्यक्तीने उक्कलवारांना जेवण दिले नाही, तर तो उक्कलवार संबंधित व्यक्तीचा चिंध्यांचा (बाहुलीसारखा) पुतळा तयार करून गावोगावी जाऊन त्या व्यक्तीच्या नावाने बदनामी करीत राहतो. असे एका कार्यकर्त्याने सांगितले. कारण ' उक्कलवार ' आणि ' कोकलवार ' या जाती मातंगाच्या पोटजाती किंवा तत्सम जाती मानल्या आहेत.

## महाराष्ट्रात दोन लाख वस्ती

मूळ मातंगांतीलच परंतु व्यवसायाने वेगळे नाव धारण केलेला हा समाज महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत आणि खेड्यापाड्यांत पाहावयास मिळतो. विशेषतः ब्रिटिश काळात ज्या ज्या भागात गुन्हेगार वसाहती होत्या (सेटलमेन्ट), त्या ठिकाणी या समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. सोलापूर, विजापूर, मुंबई या ठिकाणी हे लोक एकत्रित आणि अधिक संख्येने आहेत. याशिवाय नागपूर चाळीसगाव, लातूर, अवसर, बीड, धुळे, मालेगाव, कोल्हापूर, सातारा, हुबळी, सांगली, नाशिक, बारामती आणि पुणे या ठिकाणी हे लोक काही प्रमाणात स्थायिक

झालेले आहेत. महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या अंदाजे दीड–दोन लाख आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजातील लोक काही प्रमाणात स्थिर झालेले आढळतात. महाराष्ट्रातील शहरांत हा समाज मोठ्या प्रमाणात आल्याने त्यांच्या पारंपरिक व्यवसायांतही बदल झालेला आहे. काही लोक वेगवेगळ्या कारखान्यांत आज काम करीत आहेत, तर काही महानगरपालिकेत चौथ्या श्रेणीत कामाला आहेत. शिक्षणाचे प्रमाण या समाजात अत्यंत कमी असल्याने बहुसंख्याक लोक म्हशी भादरणे, जनावरांची शिंगे तासणे, आणि कागद गोळा करून आपली उपजीविका करीत आहेत, तर काही मिळेल ती मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवीत आहेत. ज्यांनी सरकारी शैक्षणिक सवलतींचा फायदा घेऊन शिक्षण घेतलेले आहे, असे फारच थोडे लोक सरकारी कार्यालयांत नोकरी करीत आहेत. अशा लोकांची संख्या अत्यंत अल्प आहे.

महानगरपालिकेत सफाई करणारे लोक आहेत, तसे एस्. टी. डेपोमध्ये हेल्पर म्हणूनही काही लोक काम करतात. सोलापूर, बार्शी, आणि पंढरपूर येथील पालिकेच्या हद्दीत या समाजातील जे लोक उपजीविकेसाठी आले, त्यांनी महापालिकेत ड्रेनेज साफ करण्याचे काम स्वीकारले आहे. मात्र त्याचा परिणाम असा होऊ लागलेला आहे, की असे काम करणाऱ्या लोकांची एक नवीनच पोटजात निर्माण होऊ पाहत आहे. ड्रेनेज सफाईचे काम करणाऱ्या या लोकांना ‘ मांग भंगी ’ किंवा ‘ पळीवाले मांग ’ या नावाने संबोधिले जात आहे. एवढेच नव्हे, तर मातंग आणि मांगगारूडी समाजातील लोक त्यांना अस्पृश्य समजतात. त्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार करण्यास धजावत नाहीत, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

## आशादायक बदल

शहराच्या आश्रयाने हा समाज स्थिर होऊ लागल्याने या समाजातील नव्या पिढीत शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय जाणिवा येऊ लागल्या आहेत. मुले शाळेत जाऊ लागलेली आहेत. काही तरुण सामाजिक चळवळीत काम करू लागले आहेत. मांगगारूडी समाजाच्या सुधारणेसाठी या समाजातील काही जाणकार कार्यकर्ते काम करीत आहेत.

पिढ्यान् पिढ्यांच्या भटकंतीमुळे शिक्षणापासून दूर राहिलेला आणि टोकाच्या अंधश्रद्धा जोपासणारा हा समाज दारिद्र्य-रेषेखाली, उपेक्षित जीवन जगत आहे. या समाजाला सुधारण्यासाठी 'अखिल महाराष्ट्र मांगगारूडी समाज ' या नावाची संस्था या समाजातील काही जाणकारांनी स्थापन करून संस्थेच्या वतीने कार्य सुरू केलेले आहे. इतर समाजाने या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि सहकार्याचा हात दिला, तर हा समाज अल्पकाळातच समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकेल. ● ● ●

# रजपूत भामटा समाज

महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून भटक्यांचे जीवन जगणारा आणि विमुक्त जमातीं-मध्ये समाविष्ट केलेला ' रजपूत भामटा ' हा एक समाज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या जमातीचा समावेश गुन्हेगार म्हणून केला गेलेला होता. देशातील विविध ठिकाणी त्या काळी अस्तित्वात असलेल्या सेटलमेन्टमध्ये हा समाज बंदिस्त करण्यात आलेला होता. आजही हे लोक मोठ्या प्रमाणात पूर्वीच्या सेटलमेन्टच्या जागेवर राहात आहेत.

## मूळ राजस्थानातील

हा समाज मूळचा राजस्थानातील असल्याचे सांगितले जाते, राजस्थानमध्ये शेती व्यवसाय करणारा हा समाज महाराणा प्रतापांच्या काळात यवनांच्या होणाऱ्या सततच्या हल्ल्यांमुळे, आणि त्यांच्या बळजबरीच्या मुस्लिम धर्मांतरांच्या भीतीने राजस्थानातून परागंदा झाल्याचे सांगितले जाते. जयपूर, उदेपूर, कोटाबुंदी, (बुंदेलखंड) या ठिकाणी राहणारा बहुसंख्याक हा समाज, आपली शेतीवाडी, घरे सोडून, स्वत:च्या सुरक्षिततेसाठी आणि विशेषत: स्त्रियांच्या अब्रूरक्षणासाठी राजस्थान सोडून देशातील वेगवेगळ्या प्रांतांत आश्रयाला आला, विशेषत: गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रात हे लोक मोठ्या प्रमाणात आल्याचे सांगितले जाते, इतर प्रांतांच्या ( राज्यांच्या ) तुलनेने महाराष्ट्रात या लोकांची वस्ती अधिक प्रमाणात पाहावयास मिळते.

## भटकंतीमुळे परकेपण

राजस्थान सोडल्यामुळे आणि परठिकाणी आल्यामुळे अर्थातच त्यांच्या उपजी-विकेसाठी निश्चित असा व्यवसाय त्यांना मिळाला नाही, राहण्यास स्वत:चे घर

नाही, शेतजमीन नाही, किंवा आपले म्हणून स्वीकारणारे परप्रांतांत त्यांना कोणीही भेटले नाही, एवढेच नव्हे, तर त्यांना निश्चित धंदा नसल्याने किंवा त्या काळी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेमध्ये या समाजाला सामावून न घेतल्या-मुळे गावगाड्याच्या आश्रयानेच परंतु गावगाड्याबाहेर राहून वेळ प्रसंगी चोऱ्या माऱ्या करून हे लोक आपली उपजीविका करीत राहिले. त्यांची भाषा, पेहराव, चालीरीती या अर्थातच महाराष्ट्रातील लोकांपेक्षा भिन्न असल्याने हे लोक पर-प्रांतातून आलेले, म्हणून मराठी लोकांना ते परकेच राहिले. त्यात गावोगावी भटकंती करीत, आणि लोकांना फसवीत राहिल्याने महाराष्ट्रात हे लोक भामटेगिरी करणारे म्हणून ' भामटे ' या नावाने ओळखले जाऊ लागले. मूळचे राजस्थानातील असल्याने आणि ' राजपूत ' म्हणून स्वतःची ओळख सांगितल्याने ' रजपूत भामटा ' याच नावाने ते पुढे परिचित झाले, असे सांगण्यात येते. या लोकांना परदेशी भामटा किंवा परदेशी ' भामटी ' याही नावाने ओळखले जाते.

या समाजाची लोकसंख्या देशात पन्नास ते साठ हजार असावी, असा अंदाज आहे. देशात ज्या विविध राज्यांत हे लोक राजस्थानातून आले, त्यात महाराष्ट्रात आलेल्या या लोकांची संख्या इतर राज्याच्या तुलनेने मोठी असल्याचे आढळते. महाराष्ट्रात अंदाजे वीस ते पंचवीस हजार लोकसंख्या असावी. प्रामुख्याने हे लोक शहराच्या आश्रयाने राहताना आढळतात.

## मिश्र भाषा

गेल्या अनेक वर्षांपासून हे लोक महाराष्ट्रात असल्याने वेगवेगळ्या ठिकाणी कायम वस्ती करून राहत असल्याचे आढळतात. यांची भाषा ही मिश्र भाषा असून राजस्थानी, गुजराती, हिंदी आणि मराठी या भाषा एकत्रित करून ते बोलतात, त्याला ते पारसी भाषा असे म्हणतात. महाराष्ट्रात दीर्घकाल राहिल्याने मराठी हीच आपली मातृभाषा आहे, असेही त्यांच्यापैकी काही लोक सांगतात. याशिवाय एक विशिष्ट ' सांकेतिक ' भाषा या समाजात बोलली जाते. तिला ते ' पारसी ढोमणी ' भाषा असे म्हणतात. ती त्यांची गुप्त भाषा म्हणूनही सांगितली जाते. विशिष्ट धंद्याच्या वेळीच ही भाषा बोलली जाते, असे सांगण्यात आले.

या समाजाच्या भाषेचे दुसरे वैशिष्ट्य असे सांगितले जाते, की यांच्या भाषेत ' व्रजहिंदी ' भाषेचे शब्द मोठ्या प्रमाणात असून हे लोक हिंदी, मराठी आणि गुजराती अशी एकत्रित भाषा बोलतात. उदा., कथा (सांगणे), खाई (जेवणे), सुडी (पत्नी), सुडा (पती), टिपरे (पैसा), सुकल (पोलिस), कानस (शिपाई), निऱ्या (पाणी) वगैरे. शब्द ' पारसी ढोमणी ' या भाषेतील होत.

## प्रसिद्ध घराणी

राजपूत भामटा या समाजात काही प्रसिद्ध घराणी असल्याचे सांगण्यात आले, त्यांमध्ये गौड, सोळंखी, पोवार, राठोड, भाटी, कच्छेवाय, भैयसडे (बायस) परमार, वाणी किंवा भारद्वज, बागडे आणि रजपूत ही होत, या नावांनाच हे लोक समाजातील कुलनामे किंवा कुळी असेही म्हणतात. या कुळांमध्ये आपापसांत रोटीबेटी व्यवहार होतो, असे सांगण्यात आले. वरील कुलनामे ही या समाजातील काही लोकांची आडनावे असल्याचे पाहावयास मिळतात. दोन वेगवेगळ्या कुळांतच सोयरसंबंध होत असल्याचे एकाने सांगितले.

वरील कुळांच्याशिवाय किंवा घराण्यांच्याशिवाय अक्करमासे आणि बारमासे असेही दोन प्रकार या समाजात आहेत. या दोन प्रकारांत मात्र बेटी व्यवहार होत नसल्याचे सांगण्यात आले.

या समाजात प्रत्येक कुळात काही कुलदैवते मानली जातात. दुर्गामाता, भवानीमाता, यांचा प्रामुख्याने यात समावेश जाहे, दुर्गामातेचा उत्सव या समाजात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. प्रमुख सण म्हणूनही हे लोक हा उत्सव मानतात.

## जातपंचायत

परंपरेने चालत आलेली आणि समाजाची एक प्रमुख न्यायसंस्था म्हणून जात–पंचायतीला या समाजात आजही महत्त्वाचे स्थान दिले जाते.

या समाजात आजही जातपंचायतीचे अस्तित्व टिकून असल्यामुळे किंवा मानले जात असल्यामुळे समाजातील व्यक्ती न्याय मागण्यासाठी कोर्ट-कचेऱ्यांत जात–नसल्याचे सांगण्यात आले. आणि जर चुकून एखादी व्यक्ती न्याय मागण्यासाठी कोर्टात अथवा कचेरीत गेली, तर अशा व्यक्तीला जात–पंचायत आणि सर्व समाज जातीबहिष्कृत करतो.

## नाक कापण्याची शिक्षा

एखाद्या स्त्रीने जर व्यभिचार केला, किंवा जातीत अथवा जातीबाहेर अनैतिक संबंध ठेवले, तर अशा स्त्रीला जात-पंचायत गुन्हेगार ठरवून संबंधित स्त्रीचे नाक कापण्याची शिक्षा दिली जाते, असे एकाने सांगितले.

अशा प्रकारच्या भयानक शिक्षेमुळे या समाजातील लोक जातीअंतर्गत गुन्हे करीत नाहीत, किंवा नाक कापले जाईल, या भीतीने समाजातील स्त्रिया अनैतिक संबंध ठेवीत नाहीत, असेही सांगण्यात आले.

जातपंचायतीच्या प्रमुखास चौधरी या नावाने ओळखले जाते, चौधरी हे या समाजात परंपरेनेच पंचायतीचे प्रमुख नेमले जातात. त्यांना समाजात मान असतो.

## लग्नविधी आणि तीर मारणे

रजपूत भामटा या समाजातील लोक स्वत:ला हिंदू धर्मीय म्हणून मानतात. पूर्वी या समाजात नऊ दिवस लग्न–सोहळा चालत असे. परंतु अलीकडे काही वर्षांपासून तीन दिवसांतच लग्नकार्ये उरकली जातात. तीन दिवस वेगवेगळे तीन कार्यक्रम साजरे केले जातात.

लग्नाचे पहिल्या दिवशी 'देव'कार्य केले जाते. या कार्यात कुलदैवताला संतुष्ट ठेवण्यासाठी बकरे कापून त्याचा नैवेद्य देवीला दाखविला जातो. याला 'देवतेची शांती करणे' असेही म्हणतात. दुसरे दिवशी खास हळदीचा कार्यक्रम केला जातो. त्या रात्री लग्नापूर्वी रात्रभर वधूवरांची वरात काढली जाते. वरात संपल्यानंतर सकाळी लग्नविधी पार पाडण्याचा कार्यक्रम होतो, या समाजात संध्याकाळी लग्न लावले जात नाही, असे सांगण्यात आले.

लग्नवेळी शिंदीच्या पानांपासून तयार केलेले खास बाशिंग बांधण्याची प्रथा या समाजात आहे. (राजस्थानात) खजुराच्या झाडाचे बाशिंग बांधतात. सकाळी लग्नवेळी मांडवात पेटत्या होमाला सात फेऱ्या मारल्यानंतर नवरीला पाटावर बसविले जाते. नवरीपासून साधारण पाच फुटांच्या अंतरावरून नवरदेवाने तिच्या भोवती फिरत सात तीर किंवा बाण तिच्या बाशिंगात मारण्याचा विधी होतो. खास तयार केलेल्या धनुष्यातून नवरदेव नवरीच्या बाशिंगात बाण मारत असतो.

बाण मारण्याचा विधी संपल्यानंतर नवरानवरीचे हात एकत्र बांधून त्यांना पाटावर बसविले जाते. मंगलाष्टके होतात. त्या वेळी मुलामुलींच्या घराण्यांतील (वंशावळीतील) वडीलधाऱ्यांचे नाव घेऊन शेवटी 'सावधान' असे म्हटले जाते. या विधीला 'पडपोता' असे म्हणतात.

लग्नप्रसंगी समाजाला दोन प्रकारचे जेवण द्यावे लागते. लग्नाच्या पहिल्या दिवशी मांसाहार, तर दुसऱ्या दिवशी शाकाहार अशी विभागणी केलेली असते. या वेळच्या जेवण-पदार्थांवर अर्थातच जातपंचायतीचा हक्क असतो. त्यांच्या इच्छे-प्रमाणेच जेवणावळी उठविल्या जातात.

रजपूत भामटा या समाजात पुरुषांना अनेक स्त्रियांशी लग्न करता येते. आजही ही प्रथा या समाजात चालू असल्याचे सांगण्यात येते.

या समाजातील स्त्रीला पुनर्विवाह करता येतो. त्याला ते 'पाट लावणे' असे म्हणतात. जातपंचायतीच्या परवानगीशिवाय कोणत्याही स्त्रीला समाजात पाट लावता येत नाही. पाट लावण्याचा विधी हा खाजगी स्वरूपाचा असतो. या प्रसंगी ठरावीकच लोक उपस्थित असतात, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

या समाजात हुंडापद्धत नसल्याचे सांगण्यात आले. परंतु मुलीला लग्नखर्चासाठी

दोन किंवा दोनशेपेक्षा जास्त रुपये देण्याची पारंपरिक रीत आहे. त्याला ते ' दहेज ' (मराठीत द्याज) असे म्हणतात.

## मयतविधी

या समाजात हिंदू धर्माप्रमाणे प्रेताचे दहन केले जाते. काही भागांत विशेषतः मराठवाड्यात पालथे निजवून मृताचे दहन केले जाते. उपस्थित लोकांवर प्रेताची नजर पडू नये, हा त्याचा उद्देश असतो. तिसरे दिवशी समाजात दहीभाताचे, पाचवे दिवशी मटणाचे जेवण द्यावे लागते. स्मशानात मृताचे नावे नैवेद्य करण्याची प्रथा आहे.

असा हा रजपूत भामटा समाज महाराष्ट्रातील छोट्या मोठ्या शहरांत कायम वस्ती करून राहत आहे. विशेषतः सोलापूर, सांगली, ठाणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती आणि पुणे या ठिकाणी मोठ्या संख्येने तो आढळतो.

महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेश विमुक्त भटक्या जमातींमध्ये केलेला असला, तरी साठ ते सत्तर टक्के लोक शहरांच्या आश्रयाने निरनिराळे व्यवसाय करीत आपली उपजीविका करीत आहेत. महाराष्ट्र शासनाने जी विमुक्त भटक्या जातीजमातींची यादी प्रसिद्ध केलेली आहे, त्यामध्ये रजपूत भामटा ही मुख्य जात आणि तत्सम जाती म्हणून परदेशी भामटा व परदेशी भामटी यांचा समावेश केलेला आहे.

इतर भटक्या विमुक्त समाजांच्या तुलनेने या समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक असल्याचे पाहावयास मिळते. एकूण लोकसंख्येच्या नव्वद टक्के लोक साक्षर आणि शिक्षित असल्याचे सांगण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाने शिक्षणाकडे जास्तीत जास्त लक्ष दिल्याने हा समाज शिक्षित आणि सरकारी नोकऱ्यांत असल्याचे पाहावयास मिळते. या समाजातील अनेक तरुण मुले-मुली महाविद्यालयांत शिकत आहेत. विशेषतः स्त्रियांचे बाबतीत हा समाज अधिक काळजी घेताना दिसतो. स्त्रियांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले जात असल्याचे एका कार्यकर्त्याने सांगितले. पुरुषांप्रमाणेच या समाजात स्त्रियासुद्धा सरकारी नोकरीत काम करताना दिसतात.

## परंपरेचे बंधन

या समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिलेले असले, तरी रूढी – परंपरेतून, अंधश्रद्धेतून अजूनही या समाजातील स्त्री मुक्त झालेली नाही. भांगात कुंकू टाकणे किंवा नाक न टोचणे यांसारखे अनेक संकेत महिला पारंपरिक रूढी म्हणून कटाक्षाने पाळताना दिसतात. नाक टोचणे या समाजात अशुभ समजले जाते. या व अशा रूढी-परंपरेतून साक्षर किंवा पदवीधर महिलाही मुक्त झालेल्या नाहीत.

इतर समाज या समाजाकडे आजही पारंपरिक नजरेतून पाहत असल्याने बहुजनसमाजाचा हा दृष्टिकोन बदलविण्याचे प्रयत्न या समाजातील होतकरू तरुण कार्यकर्ते आज करीत आहेत. समाजसुधारणा व्हावी, समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढावे आणि समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी अनेक कार्यकर्त्यांची धडपड सतत चालू असते.

स्वतःच्या समाजाचा विकास करीत असतानाच या समाजातील कार्यकर्त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समाजातील पुढारलेले किंवा आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेले रजपूत लोक रजपूत भामटा या नावाने जातीचे दाखले मिळवितात व इतरांच्या आर्थिक आणि शैक्षणिक सवलती लाटतात, असे एका कार्यकर्त्याने सांगितले. तसेच या समाजाकडे इतरांची पाहण्याची दृष्टी पारंपरिक असलेने, हवे त्या प्रमाणात त्यांना सहकार्य होत नाही. स्वतंत्र धंद्यासाठी बँका आर्थिक सहकार्य करीत नाहीत, असेही सांगण्यात आले. मात्र म. फुले मागासवर्गीय महामंडळाने धंद्यासाठी या समाजातील काही तरुणांना अर्थसाहाय्य केल्याचे एकाने सांगितले.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर भटक्या विमुक्तांच्या तुलनेने ' रजपूत भामटा ' या समाजात झपाट्याने बदल झाल्याचे दिसते. विशेषतः शिक्षणाकडे अधिक प्रमाणात हे लोक लक्ष देत आहेत. महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरांत सरकारी कचेरीतील अधिकाराचे जागेवर काही लोक काम करीत आहेत. मात्र जे लोक सरकारी सवलतींचा फायदा घेऊन शिकले किंवा ज्यांनी सरकारी मदतीवर स्वतःची आर्थिक स्थिती चांगली केलेली आहे, असे या समाजातील लोक समाजातील इतर मागासलेल्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य देत नाहीत, अशीही कार्यकर्त्यांनी तक्रार केली.

पूर्वाश्रमीचा हा गुन्हेगार समाज असल्याने आणि चोरी हाच जातधंदा मानल्याने इतर समाज आजही त्यांच्याकडे संशयाचे दृष्टीनेच पाहत आहे. त्यांच्याकडे पाहण्याची ही संशयवृत्ती बहुजन समाजाने बदलायला हवी. त्याप्रमाणेच हा समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकेल, असे वातावरण तयार व्हायला हवे.

● ● ●

# कंजारभाट समाज

इंग्रजांच्या काळात गुन्हेगार जमाती म्हणून त्या काळच्या सेटलमेन्टमध्ये ज्या काही जमाती बंदिस्त करण्यात आलेल्या होत्या, त्यांमध्ये प्रामुख्याने ' कंजारभाट ' समाजाचा समावेश होता. हा समाज त्या काळी गावगाड्याच्या ग्रामव्यवस्थेत नसला, तरी गावगाड्याच्या आश्रयाने गावाबाहेर दूर अंतरावर पालांत तात्पुरते वास्तव्य करून राहत होता. चोरी करणे हा या समाजाचा उपजीविकेचा मुख्य व्यवसाय म्हणून त्यांनी त्या काळी स्वीकारल्याने अर्थातच या समाजाकडे गावगाड्यातील लोक नेहमीच चोर, भामटे म्हणून संशयी वृत्तीने पाहत असत. ज्या गावाशेजारी हे लोक पाले ठोकून वास्तव्य करीत, त्या गावचे लोक आणि गावप्रमुख त्यांच्यावर सतत पाळत ठेवून असत.

कंजारभाट हे नाव कानांवर पडताच चोरी करणारे आणि हातभट्टीचा व्यवसाय करणारे लोक म्हणून ते सर्वांना परिचित होते. चोरीबरोबर दारू गाळण्याचा आणि विकण्याचा व्यवसाय हे लोक करीत असल्याने दारू पिण्याच्या निमित्ताने गावगाड्यातील लोकांचा त्यांच्याशी संबंध येत असे. परंतु तो संबंध पिण्यापुरताच मर्यादित होता. या लोकांच्या वरील धंद्यांमुळे इतर समाजांतील लोकांना त्यांची सुप्त भीती वाटत असे. त्यांचा व्यवसाय, त्यांचा पेहराव, रूढी-परंपरा, भाषा आणि एकूणच वर्तणूक ही संशयास्पद आणि विचित्र वाटत असल्याने हे लोक गावगाड्याला परके आणि दूरचे असेच राहिले. ते गावगाड्यात मिसळू शकले नाहीत किंवा या समाजातील लोकांनीही कधी गावगाड्यात मिसळण्याचा प्रयत्न केला नाही.

या समाजाचे चोरी करणे आणि दारू गाळणे हे व्यवसाय असल्याने पोलिस खात्याचाही ससेमिरा त्यांच्यामागे असे, त्यामुळे कोणत्याही गावी हे लोक दीर्घकाळ वास्तव्य करीत नसत. सतत भटकंती हा यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग होता.

त्यांची भटकंती ही सुद्धा तितकीशी सुखकर नसे. एका गावाहून दुसऱ्या गावाला जायचे झालेच, तर ज्या गावाहून ते जात, त्या गावपाटलाचे लेखी पत्र दुसऱ्या गावपाटलाला घ्यावे लागत असे. त्याच पत्रात या समाजाच्या प्रत्येक कुटुंबाची, माणसांची, जनावरांची, मुलांची, वस्तूंची आणि महिलांची ओळखवजा माहिती दिलेली असे. त्याचे कारण असे होते, की त्यांनी पहिल्या गावातून, काही वस्तू, जनावरे, किंवा काही ऐवज चोरून आणलेला नाही, याची खात्री करून घेतली जात असे.

अशा प्रकारचे संशयी, परके आणि उपेक्षित जीवन हा समाज स्वातंत्र्यपूर्व काळात जगत होता. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या जगण्यास तो निर्ढावलेला होता.

## पूर्वेतिहास

कंजारभाट हा समाज मूळचा राजस्थानातील असून, महाराणा प्रतापसिंहाचा, एकनिष्ठ, लढवय्या आणि धाडसी सेवक म्हणून त्या काळी ओळखला जात असे. तो राजपूत धर्माचा कट्टर अभिमानी समजला जात असे, यवनांच्या काळात धर्मांतराच्या भीतीने काही लोक राजस्थानातून परागंदा झाल्याचे सांगितले जाते. त्या वेळी याही समाजातील लोक परागंदा झाले व जंगलाच्या आश्रयाने भटकंती करीत, उत्तर प्रदेश, गुजरात, तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रात आले. त्यांना वेगवेगळ्या प्रांतांत निरनिराळ्या नावांनी ओळखले जाते.

मूळ राजस्थानात 'भाट' या नावाने ओळखला जाणारा हा समाज महाराष्ट्रात कंजारभाट, गुजरातमधे 'छोरा', कर्नाटकात 'लोल्यार', तर उत्तर प्रदेशात 'कंजर' या नावांनी ओळखला जातो.

## चौरासी भाषा

चौरासी भाषा हे या समाजाचे वेगळे वैशिष्ट्य सांगितले जाते. त्याची मातृभाषा ही राजस्थानी असली, तरी हे लोक राजस्थान सोडून आल्यानंतर हिंदी, गुजराती, राजस्थानी आणि मराठी एकत्रित बोलत असत, त्यामुळे चार भाषांचे मिश्रण त्यांच्या एकाच बोलीभाषेत आढळतें. चार भाषा एकत्रित करून तें लोक बोलतात, त्याला ते 'चौरासी' भाषा असे ते म्हणतात. याशिवाय व्यवसायासाठी म्हणून एक वेगळी सांकेतिक भाषा हे लोक बोलताना आढळतात. त्या भाषेला ते लोक 'फारसी' भाषा असें म्हणतात. त्यांच्या चौरासी भाषेत आणि 'फारशी' भाषेत जवळचे साम्य आढळते.

## पोटजाती-कुळी आणि मंत्रिमंडळ

इतर जाती-जमातींप्रमाणे या समाजातही कुळे, पोटकुळे किंवा पोटजाती आहेत.

त्यांची संख्या ८ असल्याचे समजते. त्यांत रावळ, माछेर, तमाईचे, गुमाने, गागडे, अभंगे, नेताळे, मिणेकर, बजरंगे, घमंडे, कराळे, टिकेकर, गारे, मलखे, इंद्रेकर आणि 'बांटूंगे' यांचा समावेश आहे. पोटजातींतील लोकांच्या कामावरून त्यांना दर्जा दिला जातो. 'नेताळे' हे राजे किंवा प्रथम क्रमांकाचे संस्थानिक समजले जातात, तर 'मलखे' हे दुसऱ्या क्रमांकाचे संस्थानिक मानले गेलेले आहेत. 'रावळ' हे देशमुख असून माछेर–सुप्रिडेन्ट, तमाईचे–वजीर, गुमाने–बातमीदार, गागडे–इनामदार, अभंगे–कोतवाल, मिनेकर–टपाली, गारे–वजीरांचे मदतनीस, तर बजरंगे हे समाजातील सवर्ण, अशी प्रतिष्ठेची वर्गवारी आहे. नेमून दिलेल्या कामा-प्रमाणे किंवा हुद्द्याप्रमाणेच लोक वावरतात. पोटजातींची वर्गवारी म्हणजेच कुळ किंवा परंपरेने नेमलेले मंत्रिमंडळ समजले जाते. वरील पोटकुळांना या समाजातील लोक पोटजाती समजतात.

पोटजातींत रोटी–बेटी व्यवहार केला जातो, परंतु त्याविषयी अलिखित नियम आहेत. तीन कुळे सोडून चौथ्या कुळात विवाह करण्याची पद्धत रूढ आहे. या प्रकाराला 'माल्ला' आणि 'बिट्टू' असे म्हटले जाते. ही पद्धत खास राजस्थानी असून पवित्र मानली जाते.

## जातपंचायत

जातपंचायत पवित्र न्यायसंस्था मानली जाते. जातीअंतर्गत कलह, अनैतिक संबंधांविषयीचा न्यायनिवाडा पंचांनीच करावयाचा, असा अलिखित नियम आहे.

न्यायनिवाडा करावयाचा, तेव्हा पंच परमेश्वराला स्मरून शपथ घेतात किंवा 'गुळाची' अथवा कोंबडे कापून त्याच्या रक्ताची शपथ घेऊनच निवाड्याला बसतात. निवाड्याचे काम वस्तीपासून दूर अंतरावर केले जाते. वादीप्रतिवादीचे जबाब लिहून घेतले जातात. त्यांची छाननी होते, गुन्हा शाबीत झाला, तर दंड केला जातो. दंडाची रक्कम पंचांचा खर्च वजा जाता निरपराध व्यक्तीला भरपाई म्हणून दिली जाते. न्यायनिवाडा आठ ते दहा दिवस चालतो. जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत न्याय देणाऱ्या पंच लोकांनी स्वतःच्या घरात झोपायचे नसते, असा संकेत आहे. हे लोक या काळात घराबाहेर किंवा पंचायत बसते, त्या ठिकाणी उघड्यावर झोपतात. आणि संबंधित खटल्याचा जेव्हा निकाल होईल, तेव्हापासून ते स्वतःच्या घरात झोपतात. आजही काही ठिकाणी या जमातींत हा संकेत पाळला जातो.

या समाजात समाजातील गुन्हेगाराला अत्यंत कठोर शिक्षा दिली जाते, असे सांगण्यात आले.

## कुऱ्हाडीची शिक्षा

अनैतिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला या समाजात विचित्र शिक्षा देण्याची पद्धत रूढ आहे. जर एखाद्या पुरुष व्यक्तीने समाजातील एखाद्या स्त्रीवर बलात्कार केला, तर अशा व्यक्तीला पंचायत ताब्यात घेते, त्याने गुन्हा कबूल केला, तर १०० ते ४०० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा दिली जाते, मात्र गुन्हा कबूल करीत नसेल, तर सूर्योदयानंतर त्या व्यक्तीला ताब्यात घेतात. पाचशे गोवऱ्या आणून पेटवितात, पेटत्या गोवऱ्यांमध्ये ५ किलो वजनाची लोखंडी कुऱ्हाड ठेवली जाते. पहाटेपर्यंत ती कुऱ्हाड तापवली जाते, पहाट झाल्यावर गुन्हेगार व्यक्तीला पाणी आणि दूध एकत्र करून अंघोळ घातली जाते. पाच हात नवे कापड नेसायला दिले जाते. नंतर त्याच्या गळयात जानवे घालून, त्याच्या हातात पिंपळाची सात पाने दिली जातात. ती पाने तळहातांवर दोऱ्याने गुंडाळली जातात, नंतर पंचायतीचा प्रमुख परमेश्वराला हाकारतो (विनंती करतो), की 'हा गुन्हेगार आहे, याच्या हातांवर आम्ही तप्त कुऱ्हाड ठेवतो, तुम्ही न्याय द्या.' अशा प्रकारे परमेश्वराला हाकारल्यावर जळत्या गोवऱ्यांत तापलेली कुऱ्हाड त्या व्यक्तीच्या हातांवर ठेवतात, आणि ती कुऱ्हाड हातांत धरून सात पावले चालायला लावतात. जर गुन्हा केला असेल, तर त्या व्यक्तीचे हात भाजून निघतात आणि जर ती निरपराध असेल, तर हाताला गुंडाळलेला दोरासुद्धा जळत नाही, असे सांगण्यात आले. ही प्रथा आजही रूढ आहे.

पूर्वी गुन्हेगाराच्या कानाची पाळी तोडण्याची किंवा कवडीचा डाग देण्याची प्रथा या समाजात होती, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

## लग्नविधी

लग्नविधीला अत्यंत पवित्र स्थान आहे. विवाह पंच कमिटीशिवाय ठरविला जात नाही, लग्नकार्यात पंचांचे निर्णय अंतिम मानले जातात. पंच हेच समाजातील ब्राह्मण समजले जातात. हुंडा पद्धत रूढ असल्याचे सांगण्यात आले. मुलाने मुलीला सव्वापाचशे रुपये दहेज देण्याची पद्धत आहे.

विधवा-विवाह आणि 'मोहतूर' लावणे या पद्धती रूढ असून, पंच कमिटीचा त्यात सहभाग असतो. असे विवाह या समाजात उघडपणे होऊ शकतात.

या समाजात कुळांची क्रमवारी ठरलेली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक कुळाला समाजात मान, प्रतिष्ठा आहे. ठरलेल्या कुल-क्रमानुसार तीन कुळे सोडून चौथ्या कुळात सोयरसंबंध करण्याची पद्धत या समाजात आहे. या कुळात आठ आणि बारा असे विभाग पाडले आहेत, ते परंपरेने चालत आलेले आहेत. त्यांना अनुक्रमे 'माल्ला' आणि बिट्टू असे म्हटले जाते.

वरील कुळक्रमांची पद्धत ही खास राजस्थानी असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

ती आजही कायम आहे. कुळक्रमांची प्रथा मोडणारास किंवा नाकारणारास जातीबहिष्कृत केले जाते अथवा नाक, कान कापण्याची जबर शिक्षा केली जाते, त्यामुळे शिक्षेच्या भीतीने कुळांना अथवा पारंपरिक कुळक्रमांना कोणीही विरोध करीत नाहीत, असे सांगण्यात आले.

## मयतीचे दोन प्रकार

या समाजात मयत दोन प्रकारे केली जाते. पहिल्या प्रकारात इतर समाजांप्रमाणे दहनक्रिया केली जाते; परंतु दहनानंतर दुसरे दिवशी राख पाण्यात सोडून हाडांचा उरलेला भाग मटक्यात भरून मटके जमिनीत पुरले जाते आणि त्यावर थडगे बांधले जाते. तर दुसऱ्या प्रकारात मृताला स्मशानात नेण्यासाठी खास काथ्याची चारपाई–बाज तयार करतात आणि बाज उलटी ठेवून त्यावर प्रेत नेतात.

## यादीत समावेश

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या विमुक्त भटक्या जातीजमातींच्या यादीत कंजारभाट समाजाचा समावेश असून कंजारभाट ही मुख्य जात आणि तत्सम जाती म्हणून ' छरा ', ' कंजर ' आणि ' नात ' या तीन जमातींचा समावेश केला आहे.

कंजारभाट आपण हिंदू धर्मीय असल्याचे सांगतात, हिंदूंचे सणवार, चालीरीती आणि परंपरा मानतात. त्यांची कुलदैवते महाकाली, दुर्गामाता, हनुमान ही असून ग्रामदैवते म्हणून मेलडीमाता, रामदेवपीर, खोडियार माता आणि जीनमाता या नावांची असल्याचे सांगतात.

या समाजात दुर्गामातेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. तसेच हनुमानजयंती आणि तत्सम उत्सव स्वतंत्रपणे वस्तीत साजरे करीत असल्याचे सांगण्यात आले. अंधश्रद्धा, देवभोळेपणा या समाजात मोठ्या प्रमाणात आढळतो. उपास–तापास, नवस असे प्रकार सर्रास केले जातात, देव–देवता अंगात येण्याचे प्रमाणही आढळते, नवसाला कोंबडी·बकरी बळी देण्याची पद्धतही यांच्यांत रूढ आहे.

## लोकवस्ती

महाराष्ट्रात सोलापूर, कोल्हापूर, सातारा, जळगाव, धुळे, इचलकरंजी, दोंडाईचा, ठाणे, अंबरनाथ, मुंबई आणि पुणे या ठिकाणी समाजाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात सुरुवातीपासूनच हा समाज मोठ्या संख्येनें सत्तारूढ पक्षाच्या पाठीमागे असल्यामुळे राजकारणामध्ये विशेषत: महाराष्ट्रात व्यक्तींना राजकीय प्रतिनिधित्व मिळाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून या समाजातील लोक शहरांत येऊन स्थायिक होत

आहेत. त्यांच्यांत सामाजिक परिवर्तनाच्या जाणिवा येऊ लागल्या आहेत. सामाजिक चळवळीत काही तरुण काम करीत आहेत, महाराष्ट्र पातळीवर समाजाचे संघटन सुरू आहे, समाजात शिक्षणाचा प्रसार होत आहे, शाळा–कॉलेजांतून तरुण शिकत आहेत. काही लोक सरकारी, निमसरकारी नोकरीत कायम झाले आहेत, समाजाची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न काही जाणती शिक्षित मंडळी करीत आहेत. परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र आजही पूर्वीप्रमाणेच संशयी असल्याने बहुजनसमाजाने त्यांना सामावून घेतलेले नाही किंवा इतर समाजांप्रमाणे त्यांच्याशी विश्वासाने अगर आपलेपणाने व्यवहार केले जात नाहीत. पूर्वीप्रमाणेच हे लोक परके आणि दूरचेच राहिले आहेत.

गेल्या काही वर्षांपासून हा समाज अधिक अधिक प्रमाणात महाराष्ट्रातील शहरांत आश्रयाला येऊ लागलेला आहे. पूर्वीच्या पालातले जीवन संपवून त्यांनी चार भिंतींच्या पक्क्या घरातले जीवन सुरू केले आहे. या समाजातील तरुणवर्ग, समाजासाठी काही करू पाहतोय्, समाजबदलाची प्रक्रिया होते आहे. मात्र समाजातील जुनी मंडळी तरुणांना साथ द्यायला तयार नाहीत. त्यामुळे नव्या पिढीचा आणि जुन्या पिढीचा वाद आणि संघर्ष याही समाजात पाहावयास मिळतोय्, तरुण लोक सामाजिक चळवळीत येत आहेत, समाजात नवनवीन कार्यकर्ते पुढे येत आहेत. शिक्षणाचा प्रसार होत आहे, राजकारणात रमणारे तरुण दिसत आहेत. महाराष्ट्रात काही शहरांतील नगरपालिकांवर या समाजातील तरुणांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. एकूण समाजबदलाची प्रक्रिया या समाजात हळूहळू होऊ लागली आहे. बहुजनसमाजाने त्यांच्या या बदलत्या प्रक्रियेला साथ देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घ्यायला हवे.

● ● ●

# पारधी समाज

गल्या अनेक वर्षांपासून गावगाड्याशी कसल्याही प्रकारचा संबंध न ठेवता उपजीविकेकरिता स्वतंत्रपणे सतत भटकंती करीत फिरणारे जे भटक्या जातीजमातींचे समूह महाराष्ट्रात आहेत, त्यांपैकी पारधी हा एक समाज आहे. या समाजाचा प्रमुख पारंपरिक व्यवसाय छोट्या मोठ्या प्राण्यांची आणि पक्ष्यांच्या शिकारी करणे हा आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्य हा समाज मोठ्या संख्येने पण विखुरलेल्या अवस्थेत आढळतो. तो 'फासेपारधी' या नावाने सर्वांना परिचित आहे. परंतु 'फासेपारधी' ही पारधी समाजातील एक पोटजात असून गावपारधी, भिल्लपारधी, हरणपारधी, राजपारधी, पालपारधी, चित्तापारधी आणि गायपारधी या अन्य पोटजाती या समाजात आहेत.

गावपारधी हे गावाच्या आश्रयाने राहतात, तर भिल्लपारधी जंगलाच्या आश्रयाने राहतात. फासेपारधी, हरणपारधी, पालपारधी व चित्तपारधी हे रानोमाळ भटकत, मिळेल त्या मार्गाने आपली उपजीविका करतात. ते एका ठिकाणी दीर्घकाळ वास्तव्य करीत नाहीत.

पारधी समाजातील वरील पोटजाती स्वतंत्र असून त्यांच्यांत आपापसांत कोणत्याही प्रकारे रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. प्रत्येक पोटजातीची भाषा, पोशाख, व्यवसाय, कुलदैवते आणि रूढी, परंपरा या भिन्न आहेत. प्रत्येक जातसमूह दुसऱ्या समूहापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतो.

इंग्रजांच्या काळात हे लोक गुन्हेगार म्हणून नोंदले गेलेले होते. त्या काळी जे पारधी लोक गुन्हेगार म्हणून इंग्रजांनी बंदिस्त केले होते, ते आजही त्याच ठिकाणी स्थिर झालेले आढळतात. नंतरच्या काळात गावगाड्याशी ज्या पारधी जमातींचा संबंध आला, किंवा गावाशेजारीच ज्यांनी आपली वस्ती कायम केली, ते गावपारधी

म्हणूनच स्वतःची ओळख सांगतात. पुणे शहराबाहेर मुंढवा येथे राहणारे पारधी हे ' गावपारधी ' म्हणून ओळखले जातात. ते मूळचे विजापूर जिल्ह्यातील ' इंडी ' आणि ' होडगी ' या गावांचे. इंग्रजांनी भटक्या विमुक्तांसाठी दिलेली २२७ एकर माळरान जमीन मुंढवा येथे असून त्यातील काही भाग मुंढव्याचे गावपारधी स्वतः कसतात व त्यावरच त्यांची उपजीविका चालते.

गायपारधी हा समाज स्वतःची ओळख राजपारधी म्हणूनही करून देतो. हे लोक गाईला अतिशय पवित्र मानतात. गाय हे यांचे वाहन असून, गाईच्या साथीने हे लोक ससे, तरस, चित्तर, पारवा, होला यांची शिकार करतात. हे गावाच्या बाहेर पाले ठोकून तात्पुरत्या निवाऱ्याला राहतात.

यांच्यांतील दुसरी पोटजातही भिल्लपारधी ! हे लोक जंगलाच्या आश्रयाने राहतात. शिकार हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असून, गुन्हेगारीत हे लोक अत्यंत तरबेज आहेत. त्यांना ' चोरशा ' किंवा ' पठाणपारधी ' असेही म्हटले जाते. हल्ली लोक स्वतःला ' धनगरपारधी ' असेही म्हणवून घेतात.

महाराष्ट्रात फासेपारधी म्हणून ओळखला जाणारा समाज हा प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या शिकारीबरोबरच अलीकडे मोलमजुरी करून किंवा शेतीराखण करून त्यापासून मिळणाऱ्या धान्यावरच जीवन कंठीत आहे. शेतकऱ्याला विश्वास वाटावा, म्हणून स्वतःच्या मिशीचे केस तो शेतकऱ्याकडे गहाण ठेवतो, आणि ' मी माझी मिशी गहाण ठेवलीय्, बेईमानी करणार नाही ' असे वचन देतो.

पारध्यांची लोकवस्ती विदर्भ, मराठवाड्याच्या भागात मोठ्या प्रमाणात आहे. याशिवाय नाशिक, सोलापूर, पंढरपूर, विजापूर, आणि पुणे जिल्ह्यांत हे लोक आढळतात. वेगवेगळ्या ठिकाणी राहत असलेले हे लोक अर्थातच वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातात. महाराष्ट्रात फासेपारधी म्हणून ओळखला जाणारा हा समाज विजापूर भागात ' आटवीसंचार ' या नावाने ओळखला जातो.

पारध्यांची वस्ती मुख्यतः माळरानावर आढळते. दहा ते पंधरा ताडपत्राची पाले ठोकून ही मंडळी एकत्र राहतात. त्यांत बहुतेक एकमेकांचे नातेवाईक किंवा एकाच पोटजातीचे लोक असतात. मळकट, फाटलेल्या, लक्तरासारख्या दिसणाऱ्या गोधड्या, जुन्या कपड्यांची चार-दोन गाठोडी, जर्मनची काळीकुट्ट झालेली दोन-तीन भांडी पत्र्याचे डबे, एक मातीचे मडके, आणि शिकारीसाठी ठेवलेल्या निरनिराळ्या ' फासांची ' भेंडोळी, दहा-बारा शिकारी कुत्री व प्रत्येक पालासमोर एक दोन गाई असा यांचा संसार.

हे लोक वेगळ्या प्राण्यांच्या शिकारीकरिता वेगवेगळे ' फासे ' तयार करतात आणि या फाशांच्या साहाय्याने पक्ष्यांची व प्राण्यांची शिकार करतात. म्हणून त्यांना ' फासेपारधी ' या नावाने महाराष्ट्रात ओळखले जाते.

वरील फास प्रामुख्याने घोडयाच्या केसांपासून तयार केलेले असतात. हरणाचा, लाहोरीचा आणि चित्तराचा फास हा वेगवेगळया प्रकारचा असतो.

पारध्यांची पुरुष मंडळी दिवसभर शिकारीला बाहेर आडरानात जातात, तर त्यांच्या बायका शेजारच्या गावात भीक मागून शिळेपाके अन्न गोळा करतात. पुरुष माणसाला किंवा पतीला एकेरी नावाने हाक मारण्याची पद्धत या समाजात आहे. पती स्वतःच्या बायकोचा उल्लेख 'रांड' या नावानेच करतो.

याशिवाय चोरी करताना वेगळया सांकेतिक भाषेचाही ते उपयोग करतात. त्या भाषेचे नाव त्यांना सांगता आले नाही.

## जातपंचायत

इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे पारधी समाजात जातपंचायतीला मान्यता आहे. पारध्यांच्या वेगवेगळया पोटजातींत जातपंचायतीचे स्वरूप, संकेत, नियम आणि शिक्षांचे प्रकार निरनिराळे आहेत. गावपारध्यांमध्ये 'पवार' आडनावाचे घराणे प्रमुख असून पंचायतीचे प्रमुख पद परंपरेने पवारांच्याकडे असते. तर फासेपारध्यांमध्ये पंचप्रमुख म्हणून तखलेदार पाटील असतो. जातीअंतर्गत अनैतिक संबंध ठेवणाऱ्या पुरुष किंवा स्त्रीस जातीबहिष्कृत करण्याची शिक्षा दिली जाते. किंवा हजार ते बाराशे रुपयांचा दंड केला जातो.

गावपारध्यांमध्ये कवडीचा दंड हा नामुश्कीचा समजला जातो. स्त्रीने व्यभिचार केल्यास उकळत्या तेलातून पैसा काढण्याची शिक्षा देतात किंवा खरे-खोटे करण्यासाठी तापलेली कुऱ्हाड हातांत घ्यायला लावतात. पूर्वी नाक, कान कापून धिंड काढण्याची शिक्षा दिली जात असे.

गुन्ह्याच्या स्वरूपावरून संबंधित व्यक्तीस शिक्षा करण्याची पारंपरिक रीत या समाजात आहे. मारामारी केल्यास ४०० ते ५०० रुपये दंड, जोडा मारल्यास १० रु. दंड, तर लाथ मारल्यास ६०० रुपयांपर्यंत दंड केला जातो.

## देवदेवता आणि उत्सव

पारध्यांनी आपल्या पोटजातींत निरनिराळया कुळांच्या नावाने देवतांची विभागणी केलेली आहे. पवार, भोसले, शिंदे, काळे ही या समाजातील चार प्रमुख कुळे मानली गेली असून, पवार, शिंद्यांनी महालक्ष्मी, मरीआई, भोसल्यांनी भवानी, तर काळयांनी काळूबाई आणि दुर्गादेवी कुलदैवते म्हणून स्वीकारली आहेत.

दसऱ्याचे वेळी पारधी समाजात, भवानीमातेची जत्रा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. जत्रेत ३ ते ४ हजार रुपयांपर्यंत खर्च केला जातो. जत्रा ३ दिवस चालते. मात्र ही जत्रा ४ कुळांतले लोक एकत्र करीत नाहीत. प्रत्येक कुळासाठी ठरावीक

दिशा वाटून देण्यात आलेली आहे. त्या त्या दिशेप्रमाणे कुळातले लोक जाऊन देवीची यात्रा करून येतात. जत्रेत स्त्री अशुभ मानतात. त्यामुळे जत्रेच्या वेळच्या स्वयंपाकाची सर्व कामे पुरुषच करतात.

## जत्रेचे स्वरूप

दसऱ्याच्या पूर्वी ९ दिवस उपवास केले जातात. दहाव्या दिवशी रात्री बारा वाजता होम पेटविला जातो. भक्ताच्या अंगात देवी येते. रात्रभर पूजापाठ करीत हे लोक बसतात. सूर्योदयापूर्वी होमाजवळ रेडा आणतात. देवीचा भक्त रेड्याच्या अंगावर पाणी टाकतो. पाणी अंगावर पडताच रेड्याने अंग झाडले, तर त्याचे चार पाय बांधून त्याच्या मानेवर धारदार हत्याराने मारले जाते. मानेतील मांसाचा तुकडा काढून पेटत्या होमात देवीला नैवेद्य टाकला जातो. नंतर रेड्याच्या मानेला ज्या ठिकाणी कापलेले असते, तेथून वाहणारे रक्त देवाचा भक्त त्या जखमेला तोंड लावून पितो. यात्रेला आलेले लोकही ते रक्त देवीचा प्रसाद म्हणून पितात. नंतर होमाजवळ आणून रेड्याला ठार मारले जाते, आणि त्याचे मांस देवीचा प्रसाद म्हणून वाटले जाते. याला ' टोणगा मारणे ' असे म्हणतात. हा विधी या समाजात अत्यंत पवित्र मानला जातो. दसऱ्याच्या दिवशी, कर्ज काढून का होईना, पण देवीपुढे टोणगा बळी दिला जातो. बळी दिलेले ठिकाण हे या समाजात देवीचे ठाणे किंवा पवित्र ठिकाण म्हणून जाहीर केले जाते. अशा ठाण्यात किंवा पवित्र ठिकाणी लोकांना वस्ती करण्यास मनाई आहे.

## विवाहाच्या विचित्र प्रथा

पारधी समाजातील पोटजातींचे विवाहाचे प्रकार आणि नियम वेगवेगळे आहेत. फासेपारध्यांमध्ये मुलगी उपवर झाल्यानंतर लग्न करत असल्याचे सांगण्यात आले, तर गावपारधी, भिल्लपारधी यांच्यांत बालविवाहाची प्रथा रूढ आहे.

लग्नप्रसंगी मुलाने मुलीला मागणी घालावी लागते. मुलाकडून मुलीला ४ ते ५ हजार रुपये ' द्याज ' म्हणून घण्याची पद्धत आहे. असे द्याज घेऊन जर एखाद्या मुलीचा विवाह झाला, आणि विवाहानंतर काही दिवसांनी ती मुलगी जमातीतल्या अन्य पुरुषाला आवडली आणि तिच्या पहिल्या नवऱ्याला सोडून येण्याची इच्छा असेल, तर संबंधित पुरुष त्या बाईच्या नवऱ्याला तिने विवाह वेळी ' द्याज ' म्हणून घेतलेले पैसे देऊन ती बाई पत्नी म्हणून घेऊन जातो. त्या बाईला मुले असतील, तर ती मुले तिच्या पहिल्या पतीकडे ठेवली जातात. याशिवाय पतीने ठरल्याप्रमाणे मुलीच्या वडिलांना ' द्याज ' दिले नाही, तरी सुद्धा लग्नानंतर मुलीचा बाप दुसऱ्याकडून पैसे घेऊन तिचे दुसरे लग्न करतो, एवढेच नव्हे, तर स्त्रीला गहाण

किंवा 'उसने' ठेवण्याची पद्धत, किंवा कर्जाच्या मोबदल्यात कर्ज फिटेपर्यंत कर्ज देणाऱ्या इसमास मुलगी वापरण्यास देण्याची पद्धत या समाजात होती.

कर्जापोटी मुलगी किंवा पत्नी एखाद्या इसमाकडे गहाण ठेवली आणि कर्ज फिटेपर्यंतच्या काळात जर त्या इसमाकडून त्या बाईला मुले झाली, तर कर्ज पूर्ण-पणे फिटल्यानंतर मुले त्या इसमाकडे ठेवून ती बाई आपल्या बापाच्या अथवा नवऱ्याच्या घरी येत असे.

पारधी समाजात लग्न ठरल्यानंतर जर मुलीच्या किंवा मुलाच्या चारित्र्या-विषयी एकमेकांना अथवा पंचांना संशय असेल, तर लग्नविधीपूर्वी कढईतील उकळत्या तेलात टाकलेला पैसा नवरा–नवरीला हाताने काढायला पंच सांगतात. कढईतून पैसा काढताना ज्याला भाजेल, त्याच्या अंगी दोष आहे, असे समजून ठरलेले लग्न मोडले जाते व नंतर त्यांचा मोहतूर लावला जातो. पारधी समाजात बहुपत्नीकत्वाची चाल आहे. तसे बायका सोडण्याचे प्रमाणही मोठे आहे.

## मयतीचा विधी

पारधी समाजात दोन प्रकारे मयत करतात. गावपारधी मृताचे दफन करतात. त्या वेळी खोल खड्डयात प्रेताला बसण्यास छोटी देवळी केली जाते. त्या देवळीत प्रेताला बसवून मगच अंत्यविधी होतो. दहाव्या दिवशी मृत व्यक्तीच्या आवडीचे पदार्थ आणि दारू ठेवली जाते. त्या ठिकाणी प्रेताच्या नावाने थडगे बांधले जाते.

फासेपारधी या पोटजातीत प्रेताचे दफन होते. परंतु प्रेत वाहून नेण्याची पद्धत थोडी विचित्र आहे. हे लोक प्रेत मोठ्या काठीला अडकविलेल्या झोळीत नेतात. कुटुंबातील जवळच्या नात्याचीच (बाप किंवा भाऊ) दोन माणसे प्रेताचे खांदेकरी असतात. या समाजात प्रेतयात्रेत येण्यास स्त्रियांना बंदी असते, तेराव्याला बोकड कापून मृत आत्मा शांत करण्याची रीत यांच्यांत आहे.

प्रेत जाळणे या समाजात निषिद्ध मानले गेले आहे. याचे कारण विचारता एकाने सांगितले, की प्रेत जाळणे म्हणजे स्वतःचा वंश जाळणे, असे आम्ही मानतो. पिंड न जाळण्याचा अलिखित नियम या समाजात आहे. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी मयत होते, त्या ठिकाणी हे लोक राहत नाहीत, तर लगेच ठिकाण सोडून ते दुसऱ्या ठिकाणी राहायला जातात.

## बाळंतपण

या समाजातील बाळंतपण पुरुष करतात, असे सांगण्यात आले. बाळंतपणा-साठी या समाजातील स्त्रिया दवाखान्यात जात नाहीत. राहत्या घरीच किंवा

उघड्यावर पारधी स्त्री बाळंत होते. बाळंत होतेवेळी संबंधित महिलेचा पती किंवा उपस्थित असावाच लागतो. एखादी महिला लौकर बाळंत होत नसेल, तर पतीने किंवा बापाने तिच्या पोटावर पाय देण्याची पद्धत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पारधी समाज महाराष्ट्रात भटकत आहे. अनेक वाईट रूढी-परंपरेचा, चालीरीतींचा तो बळी ठरलेला आहे. सतत भटकंतीमुळे शिक्षण नाही, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नाही. पराकोटीचे दारिद्र्य आणि मागासलेपणा यांतच तो जगतो आहे.

## दयनीय अवस्था

पुण्यातील मुंढवा येथील राहणारे गावपारधी यांच्याकडे थोडीफार शेती असल्याने ते शेती करूनच आपली उपजीविका करतात. परंतु फासेपारधी, गायपारधी किंवा थोड्याफार प्रमाणात असलेले भिल्लपारधी हे शेतीशिवाय अन्य मार्गाने उपजीविका करीत आहेत. भीक मागून जगणाऱ्या फासेपारध्यांची अवस्था दयनीय आहे. हडपसर येथे फासेपारध्यांच्या पालांवर गेलो, तेव्हा एका बाईने भीक मागून आणलेले पोतेभर भाकरीचे तुकडे दाखवले. पण तुकड्यांबरोबर खायला चटणी नाही, अशी अवस्था तिने सांगितली.

'निवडणुकीत मतं मागायला लोक येतात, मतं घेतात. नंतर मात्र विचारीत नाहीत,' असे ती म्हणाली.

गेल्या काही वर्षांपासून शहराच्या जवळपास राहणाऱ्या पारधी समाजातील काही लोकांमध्ये सामाजिक जाणीव दिसत आहे. मात्र बहुसंख्याक पारधी समाज हा शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला आहे. महाराष्ट्र शासनाने भटक्या विमुक्तांची जी यादी केली आहे, त्यात पारधी, फासेपारधी, लंगोटपारधी, बहेलिया पारधी, चित्तापारधी, शिकारपारधी, टाकणकार, तकिया आणि पालपारधी या पोटजातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये केलेला आढळतो. मात्र 'गावपारधी' आणि 'हरणपारधी' या तत्सम जातींचा समावेश विमुक्त जमातींत करण्यात आलेला आहे.

## उपेक्षित समाज

सरकारने दिलेल्या सवलती या पारधी समाजापर्यंत पोहोचलेल्या नाहीत. घटनेने दिलेल्या न्याय हक्कांची अद्याप त्यांना जाणीव नाही. हा इंग्रजांच्या काळात गुन्हेगार म्हणून ओळखला जात असल्याने स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याच देशवासीयांकडून उपेक्षित राहिलेला आहे. आजही त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहिले जाते. बहुजन समाजाच्या नजरेत त्यांच्याविषयी तुच्छतेची आणि संशयाची भावना कायम आहे. गाव नाही, कायमची नोंद नाही. त्यामुळे जातीचे दाखले मिळत नाहीत.

जातीच्या दाखल्याशिवाय सरकारी दरबारी कोणतेही प्रकरण होत नाही. ही मुख्य अडचण सांगण्यात आली.

आज पारधी समाज थोडयाफार प्रमाणात जागृत होऊ पाहतोय्. त्यांना स्थिर जीवन हवे आहे. गुन्हेगारी वृत्ती, वाईट रूढी, परंपरा मोडण्याचे ते प्रयत्न करीत आहेत. इतर पुढारलेल्या समाजाने त्यांना समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना सहकार्य द्यायला हवे आहे, तरच ह्या समाजाचे भटकेपण, दरिद्री जीवन संपण्यास काही प्रमाणात मदत होऊ शकेल.

● ● ●

# छप्परबंद समाज

' छप्परबंद समाज ' मूळचा राजस्थानातील असून मोगल काळात, लढाईच्या वेळी, सैन्याचा तळ ज्या ठिकाणी पडत असे, त्या ठिकाणी सैन्यासाठी तात्पुरता निवारा म्हणून छोटे छोटे तंबू आणि राहुटचा उभारण्याचे काम हे लोक करीत असत. असे तळ उभारणे हेच या लोकांचे प्रमुख काम असे. त्यामुळे सैन्याला निवाऱ्यासाठी छप्पर बांधणारा (तंबू किंवा राहुटचा) म्हणून या लोकांना ' छप्पर-बंद ' या नावाने लोक ओळखीत असत. अनेक वर्षे हेच काम हे लोक करीत होते. त्यामुळे नंतरच्या काळातही हे लोक याच नावाने ओळखले जाऊ लागले.

हा समाज त्या काळी हिंदू धर्मीय म्हणून ओळखला जात असे. हिंदूंच्या सैन्या-साठीच प्रामुख्याने हे लोक तंबू उभारीत असत. त्या काळात वारंवार होणाऱ्या मोगलांच्या हल्ल्यामुळे या लोकांना सतत असुरक्षित वाटत असे. त्यामुळे यांच्यांतील काही लोक तंबू उभारण्याचे काम सोडून आपल्या कुटुंबाबरोबर राजस्थानातून परागंदा झाले आणि उपजीविकेसाठी मिळेल ते काम करीत लपतछपत दक्षिण भारतात (विशेषत: कर्नाटक राज्यात) आले. त्या ठिकाणी मुसलमान धर्मातील सूफी पंथातील हजरत मीर नावाच्या इसमाबरोबर त्यांची ओळख झाली. त्याने या लोकांना संरक्षण दिले, निवारा दिला. त्यामुळे हजरत मीर यांच्याबद्दल त्यांना आपुलकी वाटू लागली. पुढे काही काळानंतर या समाजातील माला, मिठारे, पडगारे या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या हिंदू लोकांच्या गटाने हजरत मीर यांचे-कडून ' सूफी पंथाची ' दीक्षा घेतली आणि मुसलमान धर्म स्वीकारला. त्या वेळे-पासून वरील गटातील लोक स्वत:ची ओळख ' मुसलमान छप्परबंद ' अशी करून देऊ लागले.

नंतरच्या काळात मात्र राजस्थानातून परागंदा झालेल्या सर्व लोकांनी सूफी

पंथाची दीक्षा घेतली आणि तेही मुसलमान झाले. मात्र काही वर्षांतच त्यांच्यांत दोन गट पडले. ज्या लोकांनी प्रारंभी इस्लाम स्वीकारला, ते लोक ' बडे भाई ' या नावाने ओळखले जाऊ लागले. तर ज्यांनी उशिरा किंवा त्यांच्यानंतर इस्लाम धर्म स्वीकारला, ते ' छोटे भाई ' या नावाने ओळखले जाऊ लागले.

मुसलमान छप्परबंद समाजात फक्त दोन गटच पडले, असे नव्हे, तर या दोन गटांमध्ये रोटीबेटी व्यवहार होणेही बंद झाले. प्रत्येकजण स्वतःला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजू लागला. ' बडे भाई ' नावाप्रमाणेच स्वतःला बडे म्हणवून घेऊ लागले. त्यामुळे मूळचा छप्परबंद समाज दोन गटांत विभागला गेला, आजही हे गट या समाजात कायम आहेत. त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार होत नाहीत.

स्वातंत्र्यपूर्व काळात हे लोक वेगवेगळ्या प्रांतांत पसरले. विशेषतः ज्या ज्या ठिकाणी संस्थाने होती, अशा संस्थानांत या लोकांनी आश्रय घेतला. परंतु त्या काळच्या गावगाड्यात हे लोक मिसळू शकले नाहीत. त्यांची भाषा, पेहराव यांमुळे हे लोक स्थानिक लोकांना दूरचे व परके वाटू लागले. त्यामुळे त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी संशयी आणि मत्सरी अशीच राहिली.

पुढे काही काळ हे लोक गावाच्या आश्रयाने परंतु गावापासून दूर अंतरावर पाले ठोकून तात्पुरते राहू लागले.

## नाणी पाडण्याचा धंदा

इंग्रजांचे राज्य असताना या लोकांना उपजीविकेसाठी कायम व्यवसाय मिळाला नाही. त्यामुळे या लोकांनी गुप्त रीतीने चलनातील नाणी जशीच्या तशी तयार करण्याची कला अवगत करून ती नाणी बाजारात वठवून त्यावर आपली उपजीविका सुरू केली.

त्या काळात गुजरातेत एक घटना घडल्याचे सांगितले जाते, टपाल कचेरीवर दरोडा पडला, दरोडेखोरांनी मोठा ऐवज लुटला, मात्र पोस्टाच्या मोकळ्या पिशव्या गावाबाहेर नेऊन फेकल्या. त्या पिशव्या छप्परबंद समाजातील काही लोकांनी स्वतःच्या वापरासाठी आपल्याजवळ ठेवल्या. पुढे दरोड्याच्या तपासात या लोकांच्याकडे मोकळ्या पिशव्या मिळाल्यामुळे त्यांनीच दरोडा टाकला, म्हणून पोलिसांनी त्यांना पकडले, तेव्हा नाणी छापण्याच्या गुप्त धंद्याची माहिती पोलिसांना मिळाली. आणि हे लोक त्या काळच्या सेटलमेन्टमध्ये गुन्हेगार म्हणून बंदिस्त करण्यात आले. इंग्रज सरकारने इतर गुन्हेगार जमातींप्रमाणेच यांची नोंद ' छप्परबंद ' गुन्हेगार जमात म्हणून केली.

सेटलमेन्टमध्ये त्यांना छोट्या हस्त-व्यवसायांचे शिक्षण देण्यात आले, विशेषतः ब्रिटिश काळातील स्टार्टसाहेब या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्याने

त्यांना सुतारकाम व गवंडी-कामाचे शिक्षण दिले आणि त्यांच्यांत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. पुढील काळात हे लोक गवंडी-काम आणि सुतारकाम करूनच स्वत:ची उपजीविका करीत राहिले.

स्वातंत्र्योत्तर काळात सेटलमेन्टमधील लोकांना मुक्त करण्यात आले. त्यांमध्ये अनेक इतर जमातींचा समावेश होता, महाराष्ट्र शासनाने छप्परबंद समाजाचा समावेश विमुक्त जातींत करून त्यांना त्यांच्या विकासाची संधी उपलब्ध करून दिली.

## भातुवाली भाषा

छप्परबंद समाजाची मातृभाषा राजस्थानी असली, तरी ते राजस्थानी आणि हिंदी या भाषा एकत्रित बोलतात, त्या भाषेला ते 'भातुवाली भाषा' असे म्हणतात. ती त्यांची सांकेतिक भाषा आहे. उदा., रस्ता–पैंडा, लग्न–भ्या, आई–याई, बायको–म्हेरी, नवरा–मुनुस, मुलगा–नंडवा, मुलगी–नोंडचा, पुरुष–भातू, स्त्री–भूतानी, हे भातुवाली भाषेतील काही शब्द आहेत.

छप्परबंद समाजाची ही भाषा आणि कंजारभाट व बेलदार समाजाच्या सांकेतिक भाषेत साम्य असल्याचे आढळते. या सांकेतिक भाषेबरोबर हे लोक मराठी, हिंदी, उर्दू, तेलगू, कन्नड याही भाषा बोलतात.

या समाजातील स्त्रियांचा पेहराव, दागदागिने राजस्थानी पद्धतीचे असून बाजूबंद, कमरपट्टा, मंगळसूत्र आणि घुंगट हे दागिने प्रिय असल्याचे दिसते. विशेषत: सोन्याच्या दागिन्यांपेक्षा काचेचे, मण्यांचे दागिने त्यांच्या स्त्रिया वापरतात. या समाजातील महिला कुंकू लावत नाहीत. त्या अशिक्षित आणि अंधश्रद्धाळू असून त्यांच्यांत उपासतापास, नवस करण्याचे प्रमाण अधिक आढळते.

## जातपंचायत

या समाजात जातपंचायत ही सामाजिक संस्था आढळते. समाजांतर्गत भांडण–तंटा, अनैतिक संबंध किंवा चोरीमारी या संबंधातील निर्णय जातपंचायतीमध्ये घेतले जातात. जातपंचायतीचे पंच प्रमुख असून पंचांची सेवा करणारे किंवा त्यांना न्याय-निवाडयाचे कामात मदत करण्याचे काम काही लोक करतात, त्यांना 'खोगीर' असे म्हणतात.

जातपंचायतीचे नियम अलिखित असून गुन्हा करणाऱ्यास शिक्षेचे स्वरूप ठरलेले आहे. अनैतिक संबंधाला संबंधित व्यक्तीची नामुश्की म्हणून एक किंवा दोन पैसे दंड करण्याची किंवा बहिष्कृत करण्याची प्रथा आहे.

पूर्वी गुन्हेगार व्यक्तीचे मुंडन करून त्याची गाढवावरून धिंड काढली जात असे.

इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे या समाजातील लोक मढीच्या यात्रेत जात नाहीत.

## लग्नविधी

छप्परबंद हे मुस्लिमधर्मीय असले, तरी लग्न-सोहळा मारवाडी पद्धतीनेच केला जातो, मात्र लग्नातील विधी मुसलमान पद्धतीने होतो, असे सांगण्यात आले. लग्न-विधीचे वेळी, मांडवातील सहा खांबांपैकी एका खांबाला नवरदेव समजून त्याला धोतर, टोपी किंवा फेटा बांधला जातो, त्याची हळदकुंकू वाहून पूजा केली जाते. या विधीला 'थुन्नी सवारणी' असे म्हटले जाते. हा लग्नातील मुख्य विधी समजला जातो.

## डाली घेणे

हा एक महत्त्वाचा लग्नविधी मानला जातो. या प्रकारात एका करंडीत नवर-देवाचे बूट, लग्नवेळचे नवीन कपडे व हळद-कुंकू ठेवले जाते. ही करंडी लग्नविधी होण्यापूर्वी नवरदेवाकडील सुवासिनीने मुलीकडच्या सुवासिनीच्या हातांत द्यावी लागते. डाली देण्यात आणि घेण्यात देणाऱ्या आणि घेणाऱ्या स्त्रियांची ज्येष्ठता पाहिली जाते. एखाद्या महिलेने त्यापूर्वी पाच वेळा डाली दिली असेल, तर घेणाऱ्या महिलेनेसुद्धा त्यापूर्वी पाच वेळा डाली घेतलेली असली पाहिजे. तरच बरोबरी होऊ शकते. मात्र कोणी डाली देण्या–घेण्यात फसवणूक केली, तर तो अपमान समजून वेळप्रसंगी लग्न मोडते किंवा मारामारीचे प्रसंग उद्‌भवतात !

कोणत्या स्त्रीनें कितीवेळा डाली घेतली किंवा दिली, याचा हिशेब जातपचायती-कडे ठेवलेले असतात. विधवा स्त्रीला मात्र डाली घेण्याचा किंवा देण्याचा अधिकार नसतो.

या समाजात हुंडा पद्धत नाही. मात्र मुलाच्या घरच्यांनी मुलीच्या घरच्यांना लग्नखर्च देण्याची पारंपरिक रीत आहे. काडीमोड घेण्याची वेळ आलीच, तर पती आणि पत्नीकडील जाणते लोक एकत्र येऊन जातपंचायतीच्या सल्ल्याने काडीमोड घेऊ शकते. या समाजात मुसलमानांप्रमाणे 'तलाक' देण्याची रीत नाही.

पूर्वी लग्नप्रसंगी रेडे कापण्याची पद्धत होती. हळदीसमारंभ आणि लग्नसमारंभ दहा दहा दिवस चालत. ही प्रथा हल्ली बंद आहे. एक-दोन दिवसांतच लग्ने उरकली जातात.

हा समाज मुसलमानधर्मीय असला, तरी मुसलमानांप्रमाणे बहुपत्नीकत्वाची चाल या समाजात नसल्याचे सांगण्यात आले.

या समाजात 'पीरजादे' या नावाने ओळखले जाणारे प्रमुख घराणे आढळते. पीरजादे हे आडनाव असून त्यांच्याकडे या समाजाचे पारंपरिक पुरोहिताचे काम दिले गेले आहे.

## मयत आणि विधी

या समाजात मृताचे दफन करण्याची रीत आहे. मात्र जेथे प्रेताचे दफन केले जाते, तेथे थडगे बांधले जात नाही. मृताचा दहावा केला जातो. दहाव्याचे दिवशी मृताच्या सवयीनुसार किंवा त्याचे इच्छेनुसार खाण्याचे पदार्थ आणि दारू ठेवण्याची पद्धत आहे. तसेच दहाव्याचे दिवशी मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती लाभावी, म्हणून बकरे कापले जाते. त्याच्या मांसाचे तुकडे करून, काळजाचे तुकडे दोऱ्यात ओवून हार केला जातो आणि तो हार दफन केलेल्या जागेवर ठेवला जातो. तो हार नंतर मृतात्मा घेऊन जातो, अशी समजूत आहे.

मुसलमानांची व छप्परबंद समाजाची दफनभूमी वेगवेगळी आहे. तसेच छप्परबंद व मुसलमान यांच्यांत बेटी व्यवहार होत नाहीत, असे एका कार्यकर्त्याने सांगितले.

## पराकोटीची अंधश्रद्धा

हा समाज तसा धार्मिक वृत्तीचा आहे. हे लोक रोज नियमितपणे नमाज पडतात. इतर देवदेवतांचे मुखवटेही त्यांच्या घरी आढळतात. त्याला ते देवाचे ' टाक ' असे म्हणतात. विशेषत: कर्नाटकातील ' घंताशिरीमाता ' या देवतेचे पंचधातूचे मुखवटे घरोघर लावलेले आढळतात. हिंदूप्रमाणे देवदेवतांचे देव्हारेही काही कुटुंबांत पाहा-वयास मिळतात.

या समाजातील लोकांची नावे आडनावे महंमद, यासीन, अब्दुल्ला, शेख, सय्यद अशी असली, तरी दगडू, रगडा, रिपो, भाना, अशी मराठी व राजस्थानी वाटणारी नावेही आढळतात.

समाजात पराकोटीची अंधश्रद्धा दिसते. गोवर, कांजण्या झाल्या, तर लोक गावा-बाहेर जाऊन पाच दगडांची पूजा करतात. हळदकुंकू वाहतात. देवदेवतांना नवस करतात. अंगात येण्याची प्रथा या समाजात आहे.

महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या २५ ते ३० हजारांचे जवळपास असून मुंबई, ठाणे, भिवंडी, सोलापूर येथे हा समाज मोठ्या संख्येने आढळतो.

मुळातच हा समाज सतत भटकंती करून उपजीविका करणारा असल्याने साह-जिकच स्वत:च्या मालकीची जमीन नाही. स्वतःचा गाव नाही. एका ठिकाणी कायमचे स्थैर्य नसल्याने शिक्षण नाही. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक मागासले-पण प्रामुख्याने आढळते.

## बहुसंख्य अशिक्षित

या समाजात अशिक्षितांचे प्रमाण ९९ टक्क्यांचे वर आहे. या समाजात जे शिक-लेले किंवा आर्थिकदृष्ट्या बरे आहेत, ते समाजापासून दूर गेलेले आहेत. त्यांच्या-

कडून मदत किंवा मार्गदर्शन मिळत नाही.

बहुतेक लोक मोलमजुरी करतात. काही गवंडीकाम, सुतारकाम, टेलरिंगकाम करून उपजीविका करतात. याशिवाय शिंदीच्या झाडाच्या चटया तयार करणे, साखरेच्या बाहुल्या तयार करून विकणे, भंगार गोळा करणे. सुरमा, अत्तर विकणे आणि कानातला मळ काढणे अशीही कामे काही लोक करतात.

## समाजसुधारणेचे शहरांत काम

महाराष्ट्रातील शहरांत हा समाज अनेक वर्षांपासून राहत असल्याने शहरी वातावरणाचा परिणाम तरुण पिढीवर जाणवतो. सामाजिक सुधारणा व्हावी, शिक्षणाची गोडी लागावी, यासाठी काही कार्यकर्ते काम करीत आहेत.

या समाजाची मुख्य अडचण अशी आहे, की हा समाज मूळचा हिंदू असल्याने व नंतरच्या काळात त्यांनी मुसलमान धर्म स्वीकारल्याने हिंदू लोक त्यांना मुस्लिम समजून सहकार्य करीत नाहीत, तर मुसलमान लोक त्यांना मागासलेले समजून दूर लोटतात. त्यामुळे या लोकांची अवस्था त्रिशंकूसारखी झाली आहे.

समाज विस्कळीत असून, अंधश्रद्धा यामुळे दारिद्र्य–रेषेखाली कसेबसे जीवन जगतो आहे.

महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेश विमुक्त समाजांत केलेला असला, तरी 'विमुक्तांना' मिळणाऱ्या सरकारी सवलतींचा फायदा या समाजाला विशेष करून मिळालेला आढळत नाही. तसेच जातींचे दाखले सहजासहजी मिळत नसल्यामुळे छोट्या छोट्या धंद्यांसाठी बँकांकडून कर्ज मिळत नाही, त्यामुळे स्वतंत्र व्यवसाय करता येत नाही. विशेषतः हे लोक मुसलमान धर्मातील असल्याने त्यांना अधिकच अडचणी येत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

या समाजाला योग्य असे नेतृत्व न लाभल्याने समाज विस्कळीत असून शिक्षणापासून दूर राहिलेला आहे. त्यामुळे सामाजिक विकास नाही, आर्थिक पाठबळ नाही, राजकारणात स्थान नाही, असे उपेक्षित आणि दारिद्र्य-रेषेखालील जीवन जगत असलेला हा समाज आहे.

विशेषतः हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांपासून सतत उपेक्षा सहन करावी लागल्याने या समाजातील लोक एकलकोंडे, बुजरे आणि अत्यंत नम्र पाहावयास मिळतात.

शासनाने या समाजाच्या विकासाकडे लक्ष देऊन बहुजनसमाजाने त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतल्याशिवाय त्यांच्या विकासाचे दरवाजे खुले होऊ शकणार नाहीत.

• • •

३३२५
२५९८८
निबंध ३०।५।८९

# राजगौंड समाज

राजगौंड हा जंगलाच्या आश्रयाने वर्षानुवर्ष राहणारा आदिवासी समाज आहे. मध्य प्रदेशातील जंगल भागात, तसेच महाराष्ट्रातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या भागांतील जंगल प्रदेशात हा समाज प्रामुख्याने आढळतो. हे लोक रंगाने काळे, अत्यंत चपळ, काटक आणि धाडसी म्हणून ओळखले जातात. शिकार करणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असून कंदमुळे, फळे आणि प्राण्यांचे मांस हा त्यांचा प्रमुख आहार.

पराकोटीचे दारिद्र्य, विचित्र पारंपरिक रीतिरिवाज, अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक मागासलेपणा या समाजात दिसून येतो. त्यांचा पेहराव, दागदागिने, भाषा आणि जगण्याची पद्धत वेगळी आहे, त्यांची दैवते, देव्हारे, नवस, उपास-तापास यांचेही प्रकार विचित्र आहेत. हे लोक स्वतःला नागपूर भागातले संस्थानिक किंवा राजे समजतात, म्हणूनच स्वतःची ओळख ते 'राजगौंड' या नावाने करून देतात.

## स्त्रियांचे वेगळेपण

या समाजातील स्त्रियांचे वेगळेपण चटकन नजरेत भरणारे आहे. स्त्रिया रंगाने सावळ्या असल्या, तरी रेखीव बांध्याच्या, तरतरीत चेहऱ्यांच्या आहेत. त्यांची साडी नेसण्याची पद्धत वेगळी आहे. पायघोळ साडी न नेसता गुडघ्यांपासून वरती दुमडून कमरेत खोवलेली अशी पद्धत पाहावयास मिळते. गळ्यात मण्यांच्या माळा, नाकात फुल्ली, कानांत रिंगा किंवा झुमरे, हातांत बांगड्या हे त्यांचे आवडीचे दागिने वापरले जातात. काही स्त्रिया चेहऱ्यावर आणि हातावर गोंदवून घेतात. असेही पाहावयास मिळते.

## दुर्लक्षित समाज

राजगौंड हा समाज तसा दुर्लक्षित आणि अविकसित असा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या समाजातील काही लोकांनी जंगलातील वास्तव्य सोडून शहरांत आणि खेडो-पाड्यांत उपजीविकेसाठी भ्रमंती सुरू केलेली आहे. त्यामुळे इतर लोकांशी अधिक संपर्क वाढल्याने गेल्या चाळीस–पन्नास वर्षांत त्यांच्यांत बदल जाणवू लागलेला आहे. त्याचा पेहराव, दागिने, दैवते आणि रूढीपरंपरा परिस्थितीनुरूप बदलत असताना दिसतात. मुळातच जंगलात राहणारा हा आदिवासी समाज असल्यामुळे त्यांना जंगलातील औषधी वनस्पती परिचित आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या शारीरिक विकारांवर झाडपाल्याची औषधे खेड्यापाड्यांत आणि शहरांत रस्त्यावर बसून विकताना हे लोक आढळतात. औषधे विकणे हाच उपजीविकेचा व्यवसाय हे लोक करतात.

## जातपंचायत

इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे राजगौंड समाजातील जातपंचायतीला महत्त्वाचे स्थान आहे. जातपंचायत ही सामाजिक आणि न्यायसंस्था म्हणून मानली जाते. जातपंचायतीचे नियम अलिखित असले, तरी समाजातील लोक आजही ते पाळताना आढळतात. समाजातील लग्न, मयत, भांडणतंटा, कौटुंबिक झगडे अगर अन्य बाबतींत पंचायत जो निर्णय देईल, तो मान्य करावा लागतो. अन्यथा बहिष्कृत करण्याची शिक्षा दिली जाते. या शिक्षेच्या भीतीने समाजातील लोक जातपंचायतीचे नियम काटेकोरपणे पाळतात.

विठ्ठल ठाकूर नावाच्या ६० वर्षांच्या इसमाने सांगितले, की हिंदू धर्म समाजव्यवस्थेत अस्पृश्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातीतील एखाद्या व्यक्तीच्या हातचे किंवा त्याच्या घरचे पाणी राजगौंड समाजातील व्यक्ती पिताना दिसली, किंवा जातीतल्या कोणी इसमाने त्याला पाहिले, तर पाणी पिणाऱ्या त्या व्यक्तीस जातपंचायत शंभर रुपयांपर्यंत दंड करीत असे. अलीकडे ही प्रथा काही प्रमाणात बंद झाली असली, तरी अस्पृश्यता आजही या समाजात पाळली जाते.

जातपंचायतीचे प्रमुखपद इतर जमातींप्रमाणे विशिष्ट व्यक्तीला किंवा घराण्यात दिले जात नाही किंवा ते परंपरेनेही त्याला मिळत नाही. समाजातील ५ जाणकार वयोवृद्ध लोक पंच म्हणून काम पाहतात. त्यांना ' जमातीचे पंच ' म्हणून ओळखले जाते. या समाजातील लोक न्यायालयात जात नाहीत, जातपंचायतीतच भांडणतंट्याचा निवाडा केला जातो.

## चोख व्यवहार

राजगौंड समाजात जातपंचायतीचा प्रभाव आजही टिकून आहे. समाजातील

एखाद्या व्यक्तीने समाजातील दुसऱ्या व्यक्तीचे हातउसने घेतलेले पैसे देण्यास नकार दिला, तर जातपंचायत पैसे बुडविणाऱ्या व्यक्तीस जातीबहिष्कृत करते. आणि त्याला एक विशिष्ट शिक्षा दिली जाते. संबंधित व्यक्तीच्या नावाने वस्तीबाहेर झाडाला झोळी टांगली जाते. त्या झोळीत (त्या व्यक्तीचा निषेध म्हणून) त्याच्या नावाने जुन्या चपला, बूट ठेवले जातात. मात्र संबंधित व्यक्तीने पैसे देण्यास कबुली दिली, तर आणि त्याला पुन्हा जातीमध्ये यायचे असेल, तर जातपंचायत त्याच्या दाढी-मिशा कापून त्याला समाजात घेतले जाते. या समाजात दाढी–मिशा कापणे हे अप्रतिष्ठेचे लक्षण समजले आतें.

## बाळंतपणातील काही प्रथा

या समाजातील बाईचे बाळंतपण प्रामुख्याने घरीच केले जाते. समाजातील वयोवृद्ध स्त्रिया बाळंतपण करतात. बाळंतपणानंतर किमान पाच दिवस विटाळ पाळला जातो. समाजातील किंवा कुटुंबातील कोणीही व्यक्ती तिला पाच दिवस शिवत नाही, स्पर्श करत नाही. पाच दिवसांनंतर बाळाचे केस कापले जातात, त्याची नाळ कापून तिची पूजा केली जाते आणि ती नाळ खड्ड्यात पुरून टाकली जाते.

बाळाच्या डोक्यावरचे केस कापणारा हा सोयरा असावा लागतो. केस कापल्याबद्दल त्या सोयऱ्याला सव्वा रुपया दक्षिणा म्हणून दिली जाते.

त्या दिवशी संध्याकाळी बाळाचा पिता समाजातील लोकांना एकत्र आणून मूल–जन्माच्या निमित्ताने जेवण देतो. समाजातील सर्वांचे जेवण झाल्यावर सोयरा थाळीत तांब्या घेऊन येतो. त्या तांब्यास जमलेले लोक स्वतःच्या घरात जितके 'देव' असतील, तितके कुंकवाचे टिळे लावतो, असें प्रत्येकाने टिळे लावल्यानंतर बाळाचा बाप, तांब्या–थाळी उचलतो. आणि जमलेल्या प्रत्येक व्यक्तीस भेटतो. भेटलेली व्यक्ती आपल्या कुवतीनुसार त्या थाळीत भेट-वस्तू किंवा पैसे टाकतें. अशा प्रकारे जमा झालेल्या भेट–वस्तू आणि पैसे बाळाच्या आईकडे दिले जातात. त्यानंतर सव्वा महिना पुन्हा विटाळ पाळला जातो. सव्वा महिन्यानंतर देवाचा पूजापाठ करून आणि घरातील सर्व वस्तू पाण्याने धुऊन घर शुद्ध केले जाते. तेव्हाच बाळंतिणीचा घरातील आणि समाजातील विटाळ संपतो.

## मयतीचे वेगळेपण

या समाजात ज्या कुटुंबात मयत होते, त्या कुटुंबाशिवाय परजातीतील कोणीही मित्राने अथवा संबंधित व्यक्तीने प्रेताला स्पर्श करायचा नसतो. असा स्पर्श झाल्यास मयत बाटते, असे समजले जाते.

मयतीची विल्हेवाट लावण्यात 'सोयऱ्याचा' प्रमुख सहभाग असतो. मृत

व्यक्तीला नेण्यासाठी सोयऱ्याकडूनच ' ताटी ' तयार केली जाते. त्याला ते ' खटरी ' असे म्हणतात. त्या खटरीत प्रेत ठेवून, त्या घरचे तीन लोक आणि चौथा सोयरा, असे चार लोक प्रेताचे खांदेकरी असतात.

या समाजात मृत व्यक्तीस दफन करण्याची फार पूर्वीपासून प्रथा आहे. मृत व्यक्ती खड्ड्यात ठेवल्यानंतर त्याचा चेहरा मयतीला आलेल्या सर्वांना दाखवला जातो. नंतर सर्व लोकांच्या हातात एक एक छोटी काठी दिली जाते. जमलेले लोक हातात काठी घेऊन खड्ड्याभोवती गोलाकार उभे राहतात आणि मृताच्या डोक्यावर काठी मारून, ती तिथेच मोडून, प्रेताची क्षमा मागून, प्रेत त्या मोडलेल्या काठ्यांबरोबर पुरून टाकतात.

प्रेत ज्या ठिकाणी पुरले असेल, त्या ठिकाणी एक मोठा दगड आणून ठेवतात. त्या दगडावर प्रत्येकजण पाणी शिंपडतो आणि ज्याच्या इथे मयत झाली, त्याच्या घरी सर्वजण पुन्हा प्रेतदफनाचा विधी उरकून जमा होतात. तेथे आल्यावर त्या घरचा सोयरा एका भांड्यात (थाळीत) पाणी घेतो. त्यात कोळसे किंवा कोळशाची पूड मिसळतो. ते कोळसामिश्रित पाणी प्रत्येकजण स्वतःभोवती ओवाळून फेकून देतात. असे केल्याने मयतीचा विटाळ जातो आणि स्मशानातील भूतबाधा होत नाही, असा त्यामागे समज आहे.

या समाजात दहावा अगर तेरावा करण्याची पद्धत नाही. मयतीचे पाचवे दिवशी मृत व्यक्तीच्या घरचे लोक कोंबडा भाजतात, भात करतात आणि मयतीस आलेल्या सर्व लोकांना जेवण देतात. स्वतः मात्र ते जेवण करीत नाहीत. त्यांच्या सोयऱ्याने त्यांना जेवण दिले, तरच ते त्याच्या घरी खातात.

## आंतरजातीय विवाहास बंदी

या समाजात आंतरजातीय विवाह मान्य नाही. तसा जातपंचायतीचा अलिखित नियम आहे. परंतु असा नियम जर कोणी मोडला, तर संबंधित व्यक्तीस अत्यंत अपमानकारक शिक्षा दिली जाते.

उदा., एखाद्या स्त्रीने अथवा पुरुषाने दुसऱ्या जातीतील स्त्री–पुरुषाशी विवाह केला, तर जातपंचायत त्यांना गुन्हेगार ठरवून त्यांच्या नावाने कोंबडा कापते. आणि कोंबड्याच्या पोटातील आतड्याचा हार करून तो संबंधित व्यक्तीच्या गळ्यात घालून, त्यास गाढवावर बसवून समाजातील व्यक्तीच्या घरासमोर आणले जाते आणि माफी मागायला सांगितली जाते.

जातपंचायतीच्या अशा विचित्र शिक्षेमुळे या समाजात असे आंतरजातीय विवाह करण्याचे कोणी धाडस करीत नाही.

## राजगोंडाची ' फारसी ' भाषा

प्रत्येक भटक्या विमुक्त जातीजमातींना स्वतःची म्हणून अशी एक विशिष्ट सांकेतिक किंवा गुप्त भाषा आहे. राजगोंड समाजातही अशी सांकेतिक भाषा बोलली जाते. त्या भाषेला ते ' मिश्रभाषा ' किंवा ' फारसी ' भाषा असे म्हणतात.

औषध–विक्रीच्या निमित्ताने या समाजातील लोकांना सतत या गावाहून त्या गावी, वेळप्रसंगी एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जावे लागते. त्यामुळे तेथील स्थानिक भाषेचा परिणाम यांच्या भाषेवर अधिक प्रमाणात जाणवतो. विशेषतः हे लोक महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक या राज्यांतून सतत भटकंती करीत असतात. त्यामुळे त्यांच्या भाषेत मराठी, तेलगू, हिंदी, कानडी या भाषेचे शब्द मिसळल्याचे पाहावयास मिळते. अनेक भाषांच्या मिश्रणापासून तयार झालेली म्हणून ती मिश्र भाषा या नावाने ओळखली जाते. उदा., या भाषेतील वाक्ये अशी :

पोराल नावा आंद – ही माझी सासू आहे.
सारी तित्तिकबत्ती – भाकरी खाल्ली का ?
मेहमान वरा – पाहुणे आले.
शिकार तून – शिकार केली.
मरमिग ऑन्तू – लग्न झाले.
ओर सातू – तो मेला.
आद् येर पूर्त – ती बाळंत झाली.
आरे इस्कुतें आन्तारे – तो शाळेत गेला.
तान सडीसी ओतूर – तिला पळवून नेले.
ओन रोन कुदूतू – त्याला घर मिळाले.

काही शब्द आणि त्यांचे अर्थ असे :

| | |
|---|---|
| डूडल – मुलगा | गिदांग – कपडे |
| टूडी – मुलगी | रोन – घर |
| बाल – बाप | नेल – शेती |
| बये – आई | कोंदा – बैल |
| सेलारी – बहीण | कर – कोंबडा |
| मिदो – नवरा | यर्मी – म्हैस |
| बायको – पत्नी | बिलाल – मांजर |
| तमत्ते – भाऊ | मरा – झाड |
| कुडदे – नदी | येर – पाणी |
| तरास – साप | जनॉर – वाघ |

पन्ने – बेडूक　　　　　　　　　　कावल – कावळा
मलोल – ससा

## लग्नाचे वेगळेपण आणि लग्नविधी

लग्न हा विधी या समाजात पवित्र मानला जातो. या समाजातील लग्न पाच दिवस चालते. त्या पाच दिवसांचे एक वेगळे वैशिष्टच सांगितले जाते. पहिला दिवस टिळा लावण्याचा, दुसरा हळदीचा, तिसऱ्या दिवशी नवरानवरीला एका पाटावर बसवून आंघोळ घातली जाते आणि चौथ्या दिवशी नदीकिनारी समाजातील लोक जमतात. लोकांच्या समक्ष नवरी आणि नवऱ्याने एकमेकांच्या अंगठ्या वाळूत लपवून त्या शोधण्याचा खेळ खेळण्यात येतो. नवऱ्याने नवरीची आणि नवरीने नवऱ्याची अंगठी शोधून दिली, की लग्नविधी संपल्याचे जाहीर केले जाते.

बहुपत्नीकत्वाची चाल या समाजात आहे. मात्र हुंडा देण्याघेण्याची प्रथा नाही.

बालविवाहाची प्रथा फार पूर्वीपासून या समाजात रूढ आहे. गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून गर्भातील बाळाचा विवाह त्याच्या जन्माआधीच ठरविला जातो. अलीकडे काही वर्षांपासून ही प्रथा हळूहळू बंद होत असल्याचे सांगण्यात आले.

या समाजात आंतरजातीय विवाह मान्य नाही. एखाद्या व्यक्तीने तसे करण्याचा प्रयत्न केला, तर जातपंचायत संबंधित व्यक्तीस १५१ ते २०० रुपयांपर्यंत दंड करते. संबंधित व्यक्तीने दंड भरण्याचे नाकारले, तर त्याला समाजातून बहिष्कृत केले जाते.

## पाट लावणे

या समाजातील एखाद्या मुलीने मुलाला पळवून नेले किंवा मुलाने मुलीस पळवून नेले आणि ते जर समाजातील दुसऱ्या व्यक्तीने पाहिले, तर त्या दोघांचा विवाह, (त्यांची इच्छा असो नसो) पाच दिवसांऐवजी एकाच दिवसात उरकतात. त्याला ते ‘ पाट लावणे ’ असे म्हणतात.

## धार्मिक-श्रद्धाळू समाज

या समाजातील लोक आपण हिंदू धर्मीय असल्याचे सांगतात. परंतु हिंदू धर्मीयांप्रमाणे मृताचे दहन न करता मृतदेहाचे दफन करण्याची पद्धत फार पूर्वीपासून या समाजात चालत आलेली आहे. एवढेच नव्हे, तर मृताचे ज्या ठिकाणी दफन केले जाते, त्या ठिकाणी कबर बांधली जाते. मयतीनंतर दुसरे दिवशी कोंबडा कापून समाजाला जेवण देतात. हिंदू धर्मीयांप्रमाणे दहावा अथवा तेरावा दिवस केला जात नाही.

हा समाज अत्यंत धार्मिक वृत्तीचा आणि श्रद्धाळू आहे. हिंदूंच्या देवदेवतांना ते ज्या श्रद्धेने पूजतात, त्याच श्रद्धेने ते मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मांतील श्रद्धास्थाने पूजताना आढळतात. मरीआई हे या समाजातील लोकांचे कुलदैवत असून चैत्र पौर्णिमेला मरीआईचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. देवीच्या नावाने बकरे कापून समाजाला एकत्रित जेवण दिले जाते. अंगात येण्याचा प्रकार या समाजात आढळतो. विशेषत: स्त्रियांच्या अंगात मरीआई येते, अशी या लोकांची भावना आहे. घरात मरीआईचे देव्हारे, आणि छोटे मुखवटे पाहायला मिळतात.

वर्षातून एकदा येणाऱ्या ' मोहरम 'साठी हा समाज नाशिकला मोठ्या प्रमाणात एकत्र जमतो. तसेच ख्रिश्चन धर्मीयांच्या चर्चमध्येही हे लोक जात असल्याचे एका तरुणाने सांगितले. दसरा, होळी आणि बैलपोळा हेही सण या समाजातील लोक मोठ्या उत्साहाने साजरे करतात. या दिवशी नाचगाणी होतात, गोडधोड अन्न घरोघर केले जाते. दसरा आणि होळी या समाजाचे प्रमुख सण मानले जातात.

या समाजात ठाकूर, तडमासी आणि गौंड ही प्रमुख आडनावे सांगितली जातात. वरील आडनावांच्या लोकांत रोटीबेटी व्यवहार होतो. समाजातील बहुतेक लोकांची आडनावे ' ठाकूर ' आहेत. त्यामुळे इतर समाज त्यांना ' ठाकूर ' जमातीचे समजतात.

## औषध-विक्रीचा व्यवसाय

मूळ आदिवासी असणारा हा समाज, स्वातंत्र्योत्तर काळामध्ये हळूहळू महाराष्ट्रातील शहरी भागात येऊ लागला आहे. पराकोटीची अंधश्रद्धा, आर्थिक दारिद्र्य, सामाजिक मागासलेपणा आणि शिक्षणाचा अभाव यांमुळे इतर उद्योग-व्यवसायांत मिसळू शकलेले नाहीत. या समाजातील वृद्ध मंडळी आजही रस्त्याच्या कडेला बसून वनस्पती-औषधे विकतात आणि त्यातून मिळणाऱ्या अल्प मोबदल्यात कुटुंबाचे पोषण करतात. मात्र नवी पिढी या औषध-विक्रीच्या धंद्यात आढळत नाही. त्यांनी वेगवेगळे छोटेमोठे व्यवसाय सुरू केलेले आहेत.

गेल्या काही वर्षांपासून या समाजाचा शहरांशी संबंध आल्याने त्यांना सामाजिक आणि स्वत:च्या अस्तित्वाबद्दल जाणीव होत आहे. विशेषत: तरुणांमध्ये तशी जाणीव प्रकर्षाने जाणवते. आपल्या समाजाचा विकास व्हावा, शासनाने त्यांच्या सुधारणेसाठी प्रयत्न करावेत, म्हणून या समाजातील तरुण लोक इतर समाजांचे आणि सरकारचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. समाजाच्या संघटना स्थापना करण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मुळातच हा समाज शिक्षणापासून खूप दूर राहिल्याने ९९ टक्के अशिक्षित, अंधश्रद्धाळू आणि परंपरेला चिकटून बसलेला आढळतो.

आपला औषध-विक्रीचा पारंपरिक व्यवसाय सोडून इतर व्यवसाय करण्याची

या समाजातील अनेक तरुणांची इच्छा आहे. परंतु त्यात पुरेसे यश येत नसल्याची खंत एकाने बोलून दाखविली, तो म्हणाला, आम्ही हे असे आदिवासी. घर नाही, एका ठिकाणी कायम राहणं नाही, त्यामुळे जातीचे दाखवले मिळविण्यास अडचण येते. त्यामुळे बँका धंद्यासाठी कर्ज देत नाहीत. त्यामुळे इच्छा असूनही पैशाअभावी स्वतंत्र व्यवसाय करता येत नाही.

अशा या राजगौंड समाजाला इतर समाजाने समजावून घेऊन त्यांना सुधारणेचे प्रयत्न करायला हवेत, या समाजातील कलावंतांना स्वतःच्या पायांवर उभे राहण्यासाठी सरकारने आणि समाजाने सहकार्य करायला हवे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे गरजेचे आहे.

• • •

# मातंग समाज

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या आणि परिवर्तनाच्या चळवळीत अलीकडे सहभागी झालेला मातंग हा एक समाज आहे. त्याला खेड्यापाड्यांत ' मांग ' या नावानेही ओळखले जाते.

पूर्वीच्या काळी अस्तित्वात असणाऱ्या बारा बलुतेदारांच्या ग्रामव्यवस्थेमध्ये मातंग हा नंतरच्या काळात सामील झालेला एक बलुतेदार होता. त्याला परंपरेने काही हक्क मिळालेले नसले, तरी परंपरेने चालत आलेला जातिनिष्ठ असा, विशिष्ट व्यवसाय तो करीत होता. घायपातापासून वाख तयार करणे, त्यापासून दोरखंड, नाडे आणि चऱ्हाटे तयार करणे असे त्याच्या कामाचे स्वरूप असे. याचा उपयोग त्या काळच्या शेतकरी वर्गाने शेतीसाठी केला आणि मातंग हाही बारा बलुतेदारांतील एक बलुतेदार म्हणून ओळखला जाऊ लागला. याशिवाय, पोळ्याच्या सणादिवशी आंब्याचें तोरण गावच्या घरांना बांधणे, सवर्णांची बाई बाळंत झाली, की त्याच्या घरी मोळ (गवत) टाकणे, लग्नकार्यात हलगी वाजविणे, सनईसूर वाजविणे अशीही काही कामे त्याच्या वाट्याला आलेली होती. या कामाच्या मोबदल्यात शेतकऱ्याकडून वर्षाकाठी सुगीच्या हंगामात त्यांना काही प्रमाणात धान्य, खळ्यावरचं ' मात्रं ' मिळत असे, त्याला बलुतं म्हटले जात असे.

तसे पाहिले, तर इंग्रजाच्या काळात हा समाज इतर गुन्हेगार जातीजमातींप्रमाणेच एक गुन्हेगार जमात म्हणून नोंदला गेलेला होता. दरोडे घालणे, छोट्या मोठ्या चोऱ्या करणें, शेतातील धान्य कापून नेण किंवा, सुगीच्या हंगामात धान्याची खळी लुटणे या वहिमांवरून त्यांना गुन्हेगार ठरविण्यात आले होते.

## मातंगांची परंपरा

मातंग समाजाला फार मोठी, ऋषीमुनींची आणि शूर लढवय्या राजांची

परंपरा असल्याचे या समाजातील वृद्ध सांगतात. त्यामुळे मातंग लोक स्वतःला उच्चकुलीन किंवा पराक्रमी समजतात. विशेषतः या समाजाचा मूळ पुरुष म्हणून 'मार्तंड ऋषी' असल्याचे सांगतात. याशिवाय मातंग समाजाच्या वैभवी पराक्रमाचा पुरावा म्हणून रामायणाचा दाखला देतात. तुंगभद्रेच्या काठी दंडकारण्यातील 'किष्किंधा' पर्वताच्या भोवताली मातंगांची साम्राज्ये होती, परंतु हे राजे अहंकारी आणि ऐतखाऊ असल्याने त्यांचा इतरांनी पराभव केला. त्यांना गुलाम केले, शूद्र बनविले. त्यांचीच प्रजा म्हणजे आजचा मातंग समाज होय. असेही काही वृद्धांनी सांगितले.

'मातंग' या शब्दाचा अर्थ, 'माग काढणारा' किंवा 'मार्ग दाखविणारा' किंवा मागून खाणारा असा असल्याचे त्यांच्यांतील काही लोक सांगतात. पूर्वीच्या काळी गुन्ह्याचा आणि गुन्हेगारांचा माग काढणारा, नंतरच्या काळात गुन्ह्याचा मार्ग दाखविणारा आणि तदनंतरच्या काळात 'मागून खाणारा किंवा मागतकरी' (ग्रहण मागणारा) अशा त्याच्या जगण्याच्या तऱ्हा आहेत. महाराष्ट्राबाहेर या समाजाला वेगळी नावे आहेत. महाराष्ट्रात 'मातंग', कर्नाटकमध्ये 'मालेलू' आसाममध्ये 'माला' या नावाने या समाजाला ओळखले जाते.

## पोटजाती

महाराष्ट्रात मातंगांच्या अनेक पोटजाती आहेत. त्यांमध्ये प्रामुख्याने रंगीत मांग, ढाल्या मांग, व्हलूर मांग, दसऱ्या मांग, काकऱ्या मांग, तेलंग्या मांग ही त्यांच्या धंद्यावरून किंवा प्रदेशावरून पडलेली नावे आहेत, तर 'मिनिमादिग', याही दानखनी मांग, म्हशी मांग, मदारी मांग, गारूडी मांग, राधे मांग आणि मांगगारूडी नावांनी ओळखल्या जाणाऱ्या मातंगांच्या काही पोटजाती आहेत. या जाती स्वतःला स्वतंत्र आणि वेगळ्या समजतात. त्या आपापसांत रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत, असे सांगण्यात आले.

याशिवाय मातंगांच्या काही मागल्या जमाती आहेत, त्यांना उक्कलवार आणि कोकलवार या नावांनी ओळखले जाते. या जमाती भटक्या असून फक्त मातंग समाजाच्याच हातचे खाणाऱ्या आणि त्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या अशा जमाती आहेत. विदर्भ–मराठवाड्यात या जमातींची काही कुटुंबे आजही याच अवस्थेत आढळतात.

वरील मातंगांच्या जाती–पोटजातींना स्वतंत्र व्यवसाय आहेत. कातडी रंगविणे, शिंदीच्या झाडाच्या फोखांपासून पाट्या करणे, इ. मराठवाड्यात हा समाज बांबूपासून सुपे, टोपली, शिड्या, इ. वस्तू तयार करतो. वाख, दोरखंड, सुतळ्या, केरसुण्या, कुंचे, शिके तयार करतो. किंवा दारोदार भिक्षा मागून जगतो अथवा मनोरंजनाचे

खेळ करून उपजीविका करतो. अशा प्रकारचे अनेक व्यवसाय करून या जाती-पोटजाती आपली उपजीविका करीत आहेत.

## मातंगांची दैवते

मातंग हा हिंदू धर्मीय समाज आहे. हिंदूंचे सणवार आणि देवदेवतांचा तो उपासक आहे. अंबाबाई, जोखाई, मरीआई, म्हसोबा, लक्ष्मीआई, काळूबाई, खंडोबा आणि यल्लम्मा ही त्यांची दैवते आहेत. देवदेवतांना मुली, मुलं सोडण्याची प्रथा मातंग समाजात रूढ आहे. विशेषत: खंडोबाला मुरळी-वाघ्या सोडणे, यल्लमाला जोग-जोगतिणी सोडण्याची आणि मरीआईला पोतराज सोडण्याची प्रथा या समाजात आहे. देवदेवतांच्या नावाने उपवास करणे, नवस करणे, कोंबडे-बकरे कापणे, जाग्रण-गोंधळ घालणे, देव वाढविणे, हेही प्रकार धार्मिक रूढी आणि परंपरा म्हणून या समाजात पाळल्या जातात.

विशेषत: औरंगाबाद, नगर भागांत वरखडच्या आईची जत्रा उत्सव म्हणून पाळला जातो. या जत्रेत वरखडच्या आईला रेड्याचा बळी देऊन प्रसाद दाखविला जातो. तिला ' रेडे-जत्रा ' असे म्हणतात. चैत्री पौर्णिमेनंतर पाच दिवसांनी वरखड येथे दरवर्षी ही रेडे-जत्रा साजरी केली जाते.

या प्रथेविषयी विचारले असता काही लोकांनी सांगितले, की वरखडच्या देवीला रेडे कापण्याची प्रथा या समाजात प्राचीन काळापासून चालू आहे. त्या देवीला कोंबडे किंवा बकऱ्याचा नैवेद्य चालत नाही. रेडाच बळी द्यावा लागतो. याचे दुसरे कारण सांगताना एकजण म्हणाला, जत्रेला आलेल्या लोकांना पुरेल, इतके मांस खाण्यासाठी मिळावे, म्हणून रेडा कापण्याची चाल या समाजात रूढ होती. ' नाव देवीचे आणि खादगी मांगाला ' ही म्हण त्यावरूनच त्या भागात रूढ झाली आहे. मात्र पश्चिम महाराष्ट्रात देवीला रेडे कापण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून बंद झाल्याचे सांगण्यात आले.

## काही पारंपरिक प्रथा

अमावास्येला सवर्णांच्या घरोघरी भिक्षा मागण्याची प्रथा या समाजात होती, तिला ' आवस मागणे ' असे म्हणत. ' मांगाला आवस वाढा ' असे ओरडंत मातंग व्यक्ती सवर्णांच्या प्रत्येक दारात उभी राहत असे, तेव्हा सवर्ण लोक उरलेलं शिळं-पाकं अन्न, घरातला केरकचरा आणि केस मिसळून मांगाला वाढीत. त्यामागील अशी कल्पना होती, की अशा प्रकारचे केरकचरा व केसमिश्रित अन्न मांगाला वाढले, की घरातली इडापिडा जाते आणि सुख मिळते.

' आवस ' मागण्याच्या मागे मातंगांची एक वेगळी भूमिका आहे. आवस मागणे

हा आमचा पारंपरिक हक्क आहे, आणि सवर्ण लोक आमचे देणेकरी आहेत, असे ते सांगतात.

## शिमग्यातील सोंगे

पूर्वी मातंग समाजातील लोक शिमग्याच्या सणाला वेगवेगळ्या प्रकारची वेशभूषा करून सोंगे काढीत असत. सवर्णांच्या दारोदार भटकत त्यांची करमणूक करीत. त्या वेळी शिमग्याच्या सणाची पुरणपोळी मांगाला मिळत असे. ( यामागे मांगाचे दारिद्र्य आणि सामाजिक करमणुकीचा मुख्य भाग आहे.) या शिमग्याच्या सोंगातूनच पुढे त्या समाजातील तमाशे, वाजंत्री, ताफे आणि गायकी निर्माण झाल्याचे त्यांच्यांतील काही वृद्ध लोक सांगतात.

## ग्रहण मागणे

ग्रहण मागणे ही मातंग समाजातील एक प्रमुख परंपरा मानली जाते. ग्रहणाच्या दिवशी ' दे दान, सुटे गिरान ' किंवा ' मांगाला दान ' असे ओरडत या समाजातील लोक घरोघर फिरतात. त्या वेळी इतर सवर्ण लोक जुने कपडे, अन्न किंवा पैशाचे दान त्यांना देतात.

ग्रहण मागण्याच्या प्रथेमागील एक दंतकथा सांगितली जाते. ती अशी : राहू आणि केतू हे मातंगांचे पूर्वज असून अत्यंत बलाढ्य शक्तिमान् असे राक्षस होते. त्यांना भूक लागल्याने त्यांनी चंद्र–सूर्यांना गिळले, तेव्हा पृथ्वीवर अंधार झाला, देवलोकात हाहाकार उडाला. देवांनी राहू–केतूला विनंती केली, की सूर्य–चंद्रांना सोडून द्यावे. परंतु ही विनंती त्यांनी फेटाळून लावली आणि माझा समाज महाभयंकर भुकेला आहे, त्याला जर अन्नाचे दान दिले, तरच चंद्र-सूर्यांना मी सोडतो, असे तो म्हणाला. त्यावर देवांनी त्यांचे म्हणणे मान्य केले आणि ग्रहण सुटले.

वरील दंतकथेनुसार मातंग समाजात ग्रहण मागण्याची आणि सवर्णांनी त्यांना दान देण्याची प्रथा रूढ झाली.

## सणाचे महत्त्व

हिंदू धर्मात येणाऱ्या प्रत्येक सणामागे काही पौराणिक आणि दंतकथेचा आधार दिलेला आहे. प्रत्येक हिंदू जातीचा त्या त्या सणामागील वेगळा उद्देश सांगितलेला आहे. विशेषत: बैलपोळ्याच्या सणादिवशी शेतकऱ्यांनी बैलांची पूजा करायची, त्यांना गोडधोड खाऊ घालायचे, त्यांची गावभर मिरवणूक काढायची. या सणादिवशी मातंग लोक आंब्याच्या डहाळीचे तोरण सवर्णांच्या घराला बांधतात. त्या बदल्यात सवर्ण लोक त्यांना पुरणपोळीचा प्रसाद वाढतात. मांगाने घराला तोरण बांधणे हे शुभलक्षण समजले जाते. ही प्रथा आजही खेड्यांत चालू आहे.

दसऱ्याच्या सणाला मातंगाला विशेष महत्त्व दिले जाते. या दिवशी मांग लोक तांबडी माती आणि तरवडाच्या डहाळ्याची पेंडी प्रत्येक सवर्णाच्या दारात ठेवतात. त्या मोबदल्यात त्यांना धान्य आणि सणाचे अन्न वाढले जाते.

दिवाळीच्या सणात मातंग स्त्री–पुरुष गावच्या प्रतिष्ठित किंवा पाटील लोकांना आरती घेऊन ओवाळतात आणि इडापिडा जावो, बळीचं राज्य येवो, असे म्हणतात. त्या वेळी पाटील लोक आरतीच्या ताटात ओवाळणी म्हणून पैसे टाकतात.

## दंडवत घेण्याची प्रथा

दंडवत घेणे म्हणजे लोटांगण घेण्याची प्रथा मातंग समाजात रूढ आहे. देवीला केलेल्या नवसाची फेड म्हणून स्वतःच्या घरापासून, सनईसुराचा ताफा लावून, नवीन कपडे घालून लोटांगण घेत, देवीच्या मंदिरात आले, की केलेला नवस फिटतो, अशी कल्पना या समाजात रूढ आहे.

चैत्र–वैशाखांत देवीची जत्रा भरते, त्या दिवशी गोड नैवेद्य दाखवला जातो. मरीआईच्या मंदिराला पाच फेऱ्या मारल्या जातात. त्या वेळी मरीआईचे वारें पोतराजाच्या अंगात येते. पोतराज मरीआईपुढे घुमत राहतो, तेव्हा त्याला कोडी घातली जातात. दंडवत घेतलेली व्यक्ती त्याला साष्टांग नमस्कार करते, कोडी सोडविल्यावर नवस फिटतो, अशी कल्पना आहे.

गावच्या जत्रेत कुलदैवताला जाण्याची एक विशिष्ट प्रथा मातंग समाजात रूढ आहे. कळकाच्या काठीला नवीन कपडे घालायचे, सनईसूर आणि हलगी वाजवीत ती काठी मातंगांच्या सवाष्ण स्त्रिया देवीच्या मंदिरात घेऊन जातात. मरीआईला नारळ फोडतात, नैवेद्य दाखवतात आणि दर्शन घेऊन घरी येतात. तेव्हा जत्रेसाठी आलेल्या पाहुण्यांना पुरणपोळ्यांचे जेवण देतात. असे केल्याने देवीचा कोप होत नाही, अशी कल्पना आहे.

## काळा दोरा बांधण्याची प्रथा

प्रत्येक जाती-जमातीचे वेगळेपण त्यांच्या पोशाखावरून किंवा काही विशिष्ट दागदागिन्यांवरून ओळखता येत असे. ब्राह्मण पुरुषांनी शेंडी राखणे, तसे मातंग पुरुष विशेषतः तरुणांच्यामध्ये टाळूवर विशिष्ट प्रकारे केस ठेवण्याची प्रथा होती. 'तिला टाळू राखणे' असे म्हणत. त्याप्रमाणेच काळ्या रंगाचे दोरे, गळ्यात आणि मनगटावर बांधण्याची प्रथाही या समाजात रूढ होती. आजही खेड्यापाड्यांत काळा दोरा बांधण्याची प्रथा आहे. त्यामागील कल्पना अशी होती, की मातंग माणसाला कोणाची दृष्ट लागू नये. विशेषतः या समाजात मैदानी कुस्त्यांची आवड असल्याने पहिलवानकीचा शौक बहुतेकांना असे. त्यामुळे व्यायामाने कमावलेल्या शरीराला कोणाची नजर लागू नये, म्हणून पहिलवान मंडळी हातात,

पायात आणि दंडात काळा दोरा, बिब्बा आणि दुधाण्या बांधत असत. मातंगांचा पहिलवान दुसऱ्या जातीत कुस्तीचे आव्हान देण्यासाठी निघाला, की त्याच्या दंडाला काढण्या लावल्या जात आणि पुढे हलगी वाजवून त्याची मिरवणूक काढली जाते, 'पोरगी तरी द्या किंवा बिनजोड तरी द्या', असे त्यांचे आव्हान असे.

गळ्यात, मनगटावर काळा दोरा बांधणे, डोईवर टाळू राखणे, दंडांत दुधाण्या बांधणे हे मातंग मल्लाचे वैशिष्टय सांगितले जाते. मातंग ओळखण्याची खूण म्हणूनही काळा दोरा बांधण्याची प्रथा होती.

## मातंगांचे फुरमान

प्रत्येक समाजात, एकाने दुसऱ्याला अभिवादन करण्याची तऱ्हा वेगळी आहे. जसे मराठा कुणबी, अभिवादन करताना राम राम म्हणतात किंवा पूर्वी महार समाजात 'जोहार' म्हणण्याची रीत होती, तशी मातंग समाजात 'फुरमान, सोयरं' म्हणण्याची पूर्वी प्रथा होती. मांगाने मांगाला किंवा सोयऱ्याला रामराम, किंवा जोहार न म्हणता 'फुरमान' म्हटले पाहिजे, असा त्या काळी आग्रह असे. अलीकडे ही प्रथा फारच कमी झालेली आहे.

## मातंगांची 'अंबूजवाय'

ब्रिटिश काळात मातंग समाज हा गुन्हेगार समाज म्हणूनच ओळखला जात होता. त्या काळात या समाजात एक विशिष्ट प्रकारची बोली किंवा सांकेतिक भाषा बोलली जात होती. तिला चोरभाषा असेही म्हणत. परंतु मातंग समाजात ही भाषा 'अंबूजवाय' या नावाने प्रचलित होती. चोरीमारी करताना किंवा आपला हेतू इतरांना कळू न देण्यासाठी ही भाषा हे लोक वापरीत असत. ही सांकेतिक भाषा त्या काळी केवळ बोलली जात असे, परंपरेने चालत आलेली बोली-भाषा असे, त्या भाषेला लिपी नाही. उदा., डांडाळा (परका), दुसविणे (खाणे) करपाटी (भाकरी), हिकव (चोरी), पेडला (गेला) असे काही शब्द या भाषेतील आहेत. आजही या समाजातील काही लोक या भाषेचा वापर करताना आढळतात.

## जातपंचायत

इतर जाती-जमातींप्रमाणे पूर्वी मातंग समाजात जातपंचायत ही जातीची न्याय-पंचायत म्हणूनच अस्तित्वात होती. समाजातील भांडणतंटा, लग्न-कार्ये, विधी, उत्सव, या कामी जातपंचायतीला अतिशय महत्त्व असे. लग्नाच्या बायकोला मूल झाले, तर समाजातला त्याचा दर्जा ठरविणे, म्होतराच्या बायकोला मूल झाले, तर त्याचा दर्जा ठरविणे, काडीमोड घेणे-देणे अथवा सामाजिक गुन्ह्याचा न्यायनिवाडा करण्याची कामे पंचायत करीत असे. याशिवाय काही कारणामुळे समाजातून

बहिष्कृत केलेल्या व्यक्तीस किंवा कुटुंबास पुन्हा जातीत घ्यायचे झाल्यास पंचायतीची परवानगी आवश्यक असे. काही रकमेचा दंड वसूल करून संबंधित व्यक्तीला जातीत घेत असत.

जातपंचायतीत पाच लोक पंच म्हणून काम करीत. त्यात 'म्हेत्रे' हा समाजाचा व पंचायतीचा न्यायाधीश मानला जात असे. म्हेत्रे हा या समाजात राजा समजला जात असे. दोन नंबरचा पंच चौगुला असे, तो म्हेत्र्याचा घोडा धरणे, चारापाणी टाकणे, अशी कामे करीत असे. चौगुला हा तसा म्हेत्र्यांचा सेवक किंवा प्रधान समजला जात असे. तिसरा नंबर 'तडफदार' यांचा असे. हे म्हेत्र्यांचे जोडीदार समजले जात. उरलेले दोघे हे या तिघांना त्यांच्या कामांत मदत करीत. असे हे पाच पंच लोक पंचायतीमध्ये मातंग समाजाचा न्यायनिवाडा करीत असत. त्या काळात तो निवाडा लोकांना बंधनकारक असे. अलीकडे ही न्यायनिवाड्याची पद्धत बंद झालेली आहे.

## लग्नाची आगळीवेगळी रीत

मातंगांच्या लग्नाची पद्धत प्रत्येक जिल्ह्यात थोड्याफार फरकाने वेगळी आढळते. विशेषतः सोलापूर, बार्शी भागात लग्नविधीच्या वेळी मांडवात शिंदीच्या फोकापासून तयार केलेल्या छोट्या बाळाला निजवण्याच्या दोन पाट्या (हारे) ठेवतात. प्रत्येक पाटीत पाटा आणि वरवंटा ठेवून, नवऱ्याला एका पाटीत पाटावर, तर नवरीला दुसऱ्या पाटीत पाटावर उभे करून मगच लग्न लावले जाते. असे लग्न पूर्वी ब्राह्मण लावत असे, हल्ली याच समाजातील जाणते लोक लग्न लावतात.

पश्चिम महाराष्ट्रात या समाजाची लग्नरीत निराळी होती, आजही निराळी आहे. पूर्वी या समाजाचे लग्न पाच दिवस चालत असे. पहिला हळदीचा, दुसरा लग्नाचा, तिसरा साड्याचा, चौथा काकण-बाशिंग सोडण्याचा आणि पाचवा वऱ्हाड वळविण्याचा. या पाच दिवसांचा खर्च मुलीकडच्या मंडळींनी करावयाचा असतो. लग्नखर्च म्हणून मुलाकडून मुलीला दयाज देण्याची प्रथा पूर्वी रूढ होती. आता मुलीकडून हुंडा घेण्याची पद्धत सुरू आहे.

आंबा हे मातंगाचे देवक समजले जात असे. लग्नवेळी आंब्याच्या पानांना महत्त्व असे. मांडवाला आंब्याच्या डहाळ्या बांधून लग्ने लावली जात असत.

पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत लग्नवेळी नवरदेवांची रेड्यावर बसवून वरात काढण्याची प्रथा होती. लग्न, पोशाखाच्या वेळीही नवरदेवाला रेड्यावर बसवूनच हलगी आणि सनईसुराच्या ताफ्यासह मारुतीच्या देवळाच्या आवारात नेले जात असे. तेथे त्याला नवीन पोशाख केला जात असे आणि पुन्हा रेड्यावर बसवून वाजतगाजत लग्न-मंडपात आणले जात असे. मातंग समाजात रेड्यावर बसणे हे मोठेपणाचे आणि प्रतिष्ठेचे लक्षण समजले जात असे. गेल्या काही वर्षी-

पासून ही प्रथा बंद झाल्याचे काहींनी सांगितले. या प्रथेला या समाजात ' शेवती ' चढविणे असे म्हणतात.

## पाचवीचा विधी

प्रत्येक समाजाची पाचवी पूजण्याची रीत वेगळी आहे. मातंग समाजातील बाई बाळंत झाल्यानंतर पाच दिवसांनी सटवाईपूजनाचा वेगळा विधी केला जातो. पाचव्या दिवशी पाच छोटे दगड मांडून त्याची हळदकुंकवाने पूजा केली जाते. बाळ, बाळंतीण आणि पूजा केलेले पाच दगड रानात घेऊन जातात. तिथे बाभळीच्या झाडाखाली ते पाच दगड मांडून त्यांची पुन्हा पूजा केली जाते, तिला सटवाईची पूजा असे म्हणतात. यामागील कल्पना अशी आहे, की मूल जन्माला आल्यावर त्याच्या कपाळावर त्याचे जे काही नशीब किंवा भविष्य लिहिले जाते, त्यातील अशुभ किंवा वाईट घटना अशा तऱ्हेची पूजा केल्यानंतर कपाळावरून पुसल्या जातात.

## मयत आणि त्यामागील कल्पना

मृताला पुरण्याची प्रथा मातंग समाजात सर्वत्र रूढ होतो. पूर्वीच्या काळी गावगाड्यात नवी पांढरी आणि जुनी पांढरी असे गावाचे दोन वेगवेगळे भाग पाडलेले असत. मातंग लोक मयताला जुन्या पांढरीत पुरीत. पुरलेल्या ठिकाणी गुलाल आणि दूध टाकीत. त्यावर अगरबत्ती लावीत. गोमूत्र शिंपून एक मोठा दगड त्या ठिकाणी ठेवीत असत. ती त्या मृताच्या ओळखण्याची खूण असे. ही प्रथा काही भागांत आजही टिकून आहे.

या समाजात मयतीच्या तिसऱ्या दिवशी सावडण्याचा विधी केला जात असे. आणि दहा दिवसांनंतर दहावा घातला जाई. मृताचे सुतक तेरा दिवसांचे पाळले जाई. विशेषतः दहाव्याच्या दिवशी नदीकाठी पिंपळाची तेरा पाने, तेरा सुपाऱ्या, तेरा खारका, तेरा हळकुंडे एकत्र ठेवली जात व पिंपळाच्या पानाचा द्रोण तयार करून त्यात पाणी भरून जमिनीवर ठेवीत. ज्यांच्या घरातील व्यक्ती मरण पावली असेल, त्या घरातील कारभारी व्यक्तीने पाण्याने भरलेला द्रोण उजव्या पायाच्या अंगठ्याने नदीच्या पात्रात ढकलीत. नंतर त्या व्यक्तीच्या दाढीचे आणि डोक्याचे केस काढले जात. केस त्यांच्यांतीलच दुसरी व्यक्ती काढीत असे. त्या वेळी या लोकांचे केस न्हावी काढीत नसत. नंतर सर्वजण मयताचे घरी येऊन पुरणपोळीचे जेवण करीत. असे केल्याने सुतकातून शुद्धी मिळते आणि मृतात्मा शांत होतो, अशी त्या काळी कल्पना होती. तसेच मयतीची दुसरी एक वेगळी प्रथा या समाजात पश्चिम महाराष्ट्रात रूढ होती. ज्या दिवशी व्यक्ती मरते, त्याच दिवशी त्याचा दफनविधी उरकल्यानंतर संध्याकाळी घरात एका कोपऱ्यात टोपलीखाली राख झाकून ठेवली

जात असे. दुसरे दिवशी सकाळी ती टोपली उघडून पाहिली जात असे. टोपलीखाली ठेवलेल्या राखेवर मृत व्यक्तीच्या पाऊलखुणा उमटत. तेव्हा ती मृत व्यक्ती घरी येऊन गेली, असे समजले जात असे. आणि केवळ त्याची इच्छा अपूर्ण राहिली, म्हणूनच मृत व्यक्ती येऊन गेली, असे समजून त्याला ज्या पदार्थांची सवय होती, अशा बिडया किंवा दारू अथवा गोडधोड पदार्थ पुरलेल्या ठिकाणी नेऊन ठेवले जात असत. असे केल्याने मृतात्मा शांत होतो, अशी कल्पना होती.

## पितृपाठ

भाद्रपद महिन्यात पितृपंधरवडा या समाजात पाळला जातो. या पंधरवडयात आपल्या सोयऱ्याला खास बोलावून घेतले जाते. सोयऱ्याला पाटावर उभे करून त्याचे पाय धुतले जातात. त्याच्या बोटात गवताची अंगठी घातली जाते व त्याचे दर्शन घेऊन त्याला गोड भोजन दिले जाते. असे केल्याने मृतात्म्यांना शांती मिळते, असा समज या समाजात आहे,

## समज-गैरसमज

पुराणकथेतील परशुरामाने रेणुकेचे शिर धडावेगळे केले आणि पुन्हा त्या धडाला मातंगीचे (मातंग स्त्रीचे) शिर जोडले. पुढे ती यल्लम्मा या नावाने देवीरूपात प्रगट झाली, तेंव्हा ती देवी आपली आहे, असे समजून तिला जोगतीण म्हणून मुली सोडण्याची प्रथा मातंग समाजात रूढ झाली, असा एक समज या समाजात आहे. तर मूळ रेणुकेच्या शरीराला मातंगीचे शिर जोडल्यामुळे शरीरास्पृश्य (ब्राह्मणीचे) आणि शरीर अस्पृश्य (मातंगीचे) असे यल्लम्माचे देवीरूप झाल्याने ब्राह्मण समाजातील स्त्रिया त्या वेळेपासून डोक्यावर पदर घेत नाहीत किंवा डोक्यावरून पाण्याचे भांडे नेत नाहीत, असा एक समज समाजात आजही रूढ आहे.

अशा प्रकारे अनेक रूढी, परंपरा आणि प्रथा जपणारा किंवा जगणारा मातंग समाज स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या काही वर्षांपासून आपल्या अस्तित्वाविषयी जागृत होत असलेला दिसतो. पूर्वी हा समाज भटका किंवा गुन्हेगार व बलुतेदार म्हणूनच ओळखला जात होता. नंतर महाराष्ट्र शासनाने या समाजाचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करून इतर जातींना मिळणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक सवलती त्यांना दिलेल्या आहेत, त्यामुळे त्यांना विकासाची एक संधी मिळाली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाची अवस्था काही प्रमाणात बदललेली आहे. उद्योगीकरणाच्या लाटेत खेडयापाडयांतल्या बलुतेदारी किंवा गावगाडा व्यवस्थेचे उच्चाटन झाल्यामुळे या समाजाचा बलुत्याचा आधार गेला. पारंपरिक जात-व्यवसायावर उपजीविका करणे मुश्किल झाले. जातीनिष्ठ धंद्याला उतरती कळा

लागली. आणि फुकट काम करून घेण्यासाठी किंवा विनामोबदला राबविण्याच्या उद्देशाने सवर्ण शेतकऱ्यांचा जाच सुरू झाला. त्यातून अन्याय, अत्याचाराच्या घटना वाढत गेल्या. पर्यायाने खेड्यांतल्या जाणकार तरुणांनी शहराचा रस्ता धरला आणि कामधंद्याच्या शोधात ते शहरांत येऊन राहिले.

पुणे शहरात राहणाऱ्या मातंग समाजाची लोकसंख्या एक लाखाच्या जवळपास आहे. शहरातील झोपडपट्टी भागात या समाजाचे प्रमाण अधिक आहे. या समाजातील जे लोक शिक्षित आहेत, शासकीय, निमशासकीय सेवेत आहेत, अशी मंडळी सरकारी चाळीत किंवा खाजगी घरांत राहतात. मात्र यांचे प्रमाण अल्प आहे, असे सांगण्यात आले.

मातंगांच्या वस्त्यांतून फिरत असताना असे आढळून आले, की खेडी सोडून काही मंडळी शहरांत स्थायिक झाली खरी; परंतु त्यांच्यांत झालेला बदल केवळ स्थलांतराचा झाला असावा, असे दृश्य दिसते. खेड्यांतून शहरांत आलेल्या लोकांनी आपले जातीनिष्ठ धंदे चालू ठेवले आहेत. त्याचप्रमाणे पारंपरिक अंधश्रद्धा, त्याच रूढी, परंपरा आजही तितक्याच आस्थेवाईकपणे पाळताना ते दिसत आहेत. देवदेवतेला मुली सोडणे, देवीच्या नावाने पोतराज सोडणे, खंडोबाला मुरळी किंवा यल्लम्माला देवदासी सोडणे, देव वाढविणे, अंगात देवीचे वारे येणे, अंगारे–धुपारे आणि नवस करणे हे सर्व प्रकार आजही काही प्रमाणात या समाजात पाहावयास मिळतात.

गेल्या काही वर्षांपासून, ग्रहण मागण्याची प्रथा या समाजातील तरुणांनी जवळ जवळ बंद केली आहे. यांत दलित स्वयंसेवक संघ आणि मातंग युवक संघटना यांचा वाटा अधिक महत्त्वाचा आहे. या संघटनांच्या जागरूक प्रयत्नाने ही प्रथा बंद करण्यात त्यांना यश मिळाले आहे.

मातंग समाजातील शैक्षणिक प्रमाण तसे अत्यल्प आहे. या समाजातील अंदाजे ९० टक्के लोक अशिक्षित आहेत. हे सर्व लोक शारीरिक कष्टाची आणि मिळेल ती मोलमजुरी करूनच उपजीविका करतात. गवंडी काम, बिगारी काम, भंगार गोळा करणे, टाकाऊ कागद, काचा गोळा करणे, डबा-बाटलीचा व्यवसाय करणे, सवर्ण मंडळींच्या बंगल्यांत सफाईचे काम करणे, मंडई, मार्केट या ठिकाणी सफाई करणे, किंवा महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणूनही काही महिला–पुरुष कामे करतात.

हा समाज बव्हंशी अशिक्षित असल्याने आर्थिक, सामाजिकदृष्टया अत्यंत मागासलेला आणि अंधश्रद्धाळू असा आहे.

विशेषतः पुणे शहरातील या समाजातील मुलांचे शैक्षणिक प्रमाण असे : पहिली

ते चौथीपर्यंत पन्नास टक्के मुले शाळेत जातात. चौथीनंतर तीस टक्के मुलांनी शाळा सोडलेली असते. उरलेल्या वीस टक्के मुलांपैकी अत्यंत कष्टाने दहावी–अकरावी-पर्यंत दहा टक्के मुले पोहोचतात. नंतर शिक्षण घेणे त्यांना कठीण जाते. घरच्या दारिद्र्यामुळे पुढे शिकता येत नाही. त्यामुळे जवळ जवळ आठ टक्के मुलांनी शाळा सोडलेली असते. उरलेली दोन टक्के मुले स्वकष्टावर किंवा मित्रांच्या थोड्याफार सहकार्यावर पदवी परीक्षेपर्यंत पोहोचतात.

खेड्यापाड्यांत हे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. वडिलोपार्जित व्यवसायात आणि मोलमजुरी करण्यात रमलेली मंडळी अधिक आहेत. रोजच्या पोटाचा प्रश्न असल्याने पोटासाठी मोलमजुरी करणे त्यांना अपरिहार्य असते. त्यामुळे अर्थातच शाळेकडे दुर्लक्ष होते.

गेल्या काही वर्षांपासून किमान शहरांत राहणाऱ्या मातंग समाजात शिक्षणाचे प्रमाण हळू हळू वाढते आहे. शिक्षित जाणकार तरुण मंडळींच्यामध्ये आपल्या समाजाविषयीची जाण आणि जागृती होत असल्याचे आढळते. समाजावर होत असलेल्या सर्व प्रकारच्या अन्यायांविषयी, शिक्षित मातंग समाज पोटतिडकीने बोलताना आढळतो. घटनेने दिलेल्या हक्क, संरक्षण आणि सवलतींविषयी तो जागृत होऊ लागला आहे. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी किंवा वरच्या वर्गांकडून होत असलेल्या शोषणाविरुद्ध तो संघटितपणे भांडू लागला आहे. रस्त्यावर येऊ लागला आहे.

या समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी झटणाऱ्या अनेक संस्था मातंग समाजात निर्माण झाल्या आहेत, होत आहेत. त्यांत दलित स्वयंसेवक संघ, भारतीय मातंग युवक संघटना, महाराष्ट्र युवक धाडसी संघटना या काही प्रमुख संस्था होत. त्यांचे काम आजही महाराष्ट्रभर चालू आहे. या संस्थांच्या छोट्या छोट्या शाखा महाराष्ट्रभर काम करीत आहेत.

सामाजिक जागृती करीत असतानाच या समाजातील काही तरुण सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम करीत आहेत. पुण्यातील हौशी कलावंतांनी 'प्रतिभा थिएटर' नावाची नाट्य–संस्था निर्माण केलीय्, तर शाहीर अण्णा भाऊ साठे रंगमंच ही वगनाट्य सादर करणारी संस्था पोवाडे आणि कलापथकाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

अलिकडच्या काही वर्षांत पुरुष कार्यकर्त्यांच्या बरोबरीने या समाजातील काही शिक्षित, जाणकार महिला कार्यकर्त्या म्हणून समाजात वावरत आहेत. समाजातील स्त्रियांच्या समस्या सोडविण्याच्या उद्देशाने महिलांचे संघटन करून त्यांच्यावर होणाऱ्या सामाजिक अथवा कौटुंबिक अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम त्या करीत आहेत.

मातंग समाजाची माहिती मिळविण्यासाठी त्यांच्या वस्त्यांतून खूप भटकणे झाले. त्या वेळी त्या समाजातील अनेक सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ते भेटले. तेव्हा हा समाज एकत्रित नसल्याने त्यांच्या समस्या सोडविणे अधिक कठीण असल्याचे त्यांच्या बोलण्यात आले. वेगवेगळ्या विचारांना मानणारी, वेगवेगळ्या राजकीय पक्षांत काम करणारी आणि गटा-तटांत विखुरलेली अशी मातंग समाजाची माणसं आहेत. त्यांना विचारांची नेमकी दिशा नसल्याने जिकडे पुढारी, तिकडे समाज, अशी त्यांची अवस्था आहे.

इतर मागासवर्गीयांच्या तुलनेने मातंग समाजाची आर्थिक अवस्था तशी बेताचीच आहे. त्यांच्या आर्थिक विकासासाठी पुण्यासारख्या शहरात समाजातील लोकांनी काही सहकारी पतपेढ्या संस्था स्थापन केलेल्या आहेत. त्यांत शाहीर अण्णा भाऊ साठे सहकारी पत संस्था, यशवंत औद्योगिक सहकारी संस्था आहेत. विशेषत: मातंगांतील गरजूंना आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न या संस्था करतात. हातांवर पोट भरणारा मजूर, कागद अथवा भंगार गोळा करून संध्याकाळच्या भाकरीची सोय करणारी एखादी महिला किंवा दिवसभर ओझी वाहणारा हमाल आणि पदवी घेऊन बेकार फिरणारा तरुण, अशा अनेक प्रकारच्या गरजूंना या संस्थांतून सहकार्य देण्याचा प्रयत्न केला जातो. खेड्यांत अशा सहकार्य करणाऱ्या संस्था नाहीत. त्यामुळे कष्ट करून पोट भरण्याशिवाय खेड्यांतल्या मातंग माणसाला पर्याय नाही.

पुणे शहरातील मातंगांच्या एक लाख लोकसंख्येचा विचार करता केवळ शंभरांत एखादी दुसरी व्यक्ती सरकारी किंवा निमसरकारी खात्यात नोकरी करताना आढळते. ज्या व्यक्ती कायम नोकऱ्यांत आहेत, अशांची आर्थिक अवस्था बरी आहे. परंतु अशी माणसे सहसा सामाजिक कार्यात किंवा समाजसुधारणेत क्वचित पाहायला मिळतात. ते समाजापासून दूर गेलेले आहेत.

सामाजिक अज्ञान, पारंपरिक अंधश्रद्धा आणि आर्थिक दारिद्र्यामुळे मातंग समाज आजही मागासलेल्या अवस्थेत आढळतो. त्यांच्या किमान मूलभूत गरजांच्या गैरसोयीमुळे सामान्य मातंग माणसात उदासीनता जाणवते. त्यामुळे सामाजिक आणि राजकीय चळवळीपासून सामान्य माणूस थोडा दूरच राहिलेला आहे.

या समाजातील बहुतेक लोकांची वृत्ती धार्मिक असल्याने उपासतापास, गंडेदोरे आणि नवस यांत अनाठायी खर्च होताना दिसतो. घरात किरकोळ आजारासाठी देवाला नवस बोलणे, बकरे-कोंबडे कापणे, किंवा मांड बसविणे, देव वाढविणे, अशा प्रकारात आजही मातंग समाज खूप मोठ्या प्रमाणात अडकून पडलेला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये गेल्या काही वर्षांत मातंग समाजाला तरुण न्याय्य हक्कांसाठी झगडू लागलेला आहे. संघटनात्मक उभा राहू लागलेला आहे. सरकारी

पातळीवरून दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक किंवा आर्थिक सवलतींचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने तो थोडा जागृत होत आहे, परंतु शहरात आलेल्या आणि थोडेफार शिकलेल्या लोकांच्याखेरीज, अशिक्षितांना अशा सवलतींचा लाभ अजूनही घेता आलेला नाही. त्यामुळे सामान्य अशिक्षित मातंग माणूस, खेड्यातला काय नि शहरातला काय, त्यामध्ये फारसा फरक जाणवत नाही. आज जी काही मातंग समाजाची सुधारणा दिसते आहे, ती केवळ सुशिक्षित, शिकलेल्या आणि नोकऱ्या करणाऱ्या लोकांत आहे, त्यांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. उरलेले पंच्याण्णव टक्के सामान्य मातंग लोक आजही दारिद्र्यरेषेखालीच जीवन जगत आहेत.

• • •

REFBK-0025900

# शुद्धिपत्र

| पृष्ठ क्र. | परिच्छेद | ओळ क्र. | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|---|
| २९ | ५ | ५ | पद्मसाळी | पद्‌मसाळी |
| ३१ | १ | २ | पेद्यावार | पेदद्यावार |
| ३६ | ३ | १ | आनद | आनंद |
| ३६ | ६ | १ | कलासावर | कैलासावर |
| ३९ | २ | ५ | हांडीमारणे | हाडीमारणे |
| ४४ | १ | २ | कुडबुडकी | बुडबुडकी |
| ४४ | १ | २ | मेडंगी | मेढंगी |
| ४४ | १ | ४ | उमरुवाळे | डमरूवाले |
| ४४ | ४ | ६ | कुडबुडकी | बुडबुडकी |
| ४५ | ३ | १ | उमगणार | समजणार |
| ६० | २ | २ | बकरी | बकरे |
| ६० | ४ | ४ | वव् | वत् |
| ६४ | ३ | ४ | जानिया | जातिया |
| ७८ | १ | १ | गोपाळ हणून | म्हणून गोपाळ |
| ८० | २ | १ | बांगड्याचे | बागड्यांचे |
| ८२ | १ | २ | लाल झेंडा | झाल झेंडा |
| ८४ | १ | ७ | औशीद | औषिद |
| ८५ | ३ | २ | नंदलोड | मंदलोड |
| " | " | ८ | " | " |
| ९९ | ६ | २ | मुळे | मूल |
| १०१ | १ | २ | सिकलगार | सिक्कलगार |
| १०६ | २ | १ | " | " |
| १०९ | ३ | ३ | पंचायत | पंच |
| ११४ | ५ | ४ | पारशी | फारशी |
| १२० | ३ | १ | मागल्या | मागत्या |
| " | " | " | उकलवार | डक्कलवार |
| " | " | ४ | " | " |
| " | ६ | २ | परिस्थित्यनुसार | परिस्थितीनुसार |
| १२३ | २ | ६ | माथरे | पाथरे |
| " | ३ | ३ | पारशी | फारशी |
| १२४ | ४ | २ | उक्कलवार | डक्कलवार |
| " | " | ३ | " | " |

| पृष्ठ क्र. | परिच्छेद | ओळ क्र. | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|---|
| १२४ | ४ | ६ | उक्कलवार | डक्कलवार |
| " | " | ७ | " | " |
| " | " | " | " | " |
| " | " | ९ | " | " |
| १२७ | ३ | ४ | पारशी | फारशी |
| " | " | ७ | पारशी ढोमणी | फारशी ढोमणी |
| " | ४ | ५ | पारशी | फारशी |
| १३० | १ | २ | (मराठीत द्याज) | (मराठीत दयाज) |
| १३५ | ४ | ३ | सोयर संबध | सोयरे संबध |
| १३६ | २ | ३ | मटक्यात | मडक्यात |
| " | " | " | मटके | मडके |
| " | ३ | ३ | नात | नाट |
| १४१ | ४ | २ | द्याज | दयाज |
| " | " | " | " | " |
| " | " | ५ | " | " |
| " | " | ८ | " | " |
| १४८ | ३ | १ | जात पचायती | जात पंचायती |
| १४९ | ३ | ३ | धंताशिरी माता | धंतेशिरी माता |
| १६० | ३ | २ | दसऱ्या मांग | दासऱ्या मांग |
| " | " | ३ | याही | – |
| " | " | ४ | म्हशीमांग | मांगम्हशी |
| " | ४ | १ | मागल्या | मागत्या |
| " | " | " | उकलवार | डक्कलवार |
| " | " | २ | कोकलवार | कोक्कलवार |
| १६१ | १ | २ | जापली | आपली |
| " | २ | ५ | जोग | जोगे |
| " | ५ | २ | ओरडंत | ओरडत |
| १६४ | ३ | ७ | दुसविणे | दुतविणे |
| १६५ | ३ | ११ | दयाज | दयाज |
| १६६ | ३ | १ | रूढ होतो | रूढ होती |
| १६७ | ३ | ५ | शरिरास्पृश्य | शरिरस्पृश्य |
| " | " | ६ | शरीर | शीर |
| " | ५ | २ | उद्योगीकरणाच्या | औद्योगीकरणाच्या |
| १७० | ६ | १ | समाजाला | समाजातला |

□

श्री. रामनाथ चव्हाण हे दलितांच्या सामाजिक आणि साहित्य चळवळी-तील प्रसिद्ध कार्यकर्ते आणि उत्तम लेखक आहेत. म. ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांच्या कार्याची प्रेरणा आहे.

हा ग्रंथ म्हणजे जाती जमातींचा एक अभ्यास आहे. त्यात महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील काही ज्ञात-अज्ञात जाती जमातींच्या जन-जीवनाची दुर्मिळ अशी माहिती दिलेली आहे. ती नवीन आहे, विचार करायला लावणारी आहे. लेखकाने त्यांच्या दैनंदिन जीवनातून आणि प्रत्यक्ष भेटीतून ती घेतलेली आहे, म्हणूनच तिचे मोल अधिक आहे.

खरेतर अनेक जाती जमातींची इतकी समृद्ध माहिती— वाचकांना क्वचितच एकत्रित वाचावयास मिळेल. सामाजिक कार्य करणाऱ्या कार्य-कर्त्यांना आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकांना ही माहिती अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. म्हणूनच संदर्भाच्या दृष्टीने या ग्रंथाचे मोल अधिक आहे.

या पुढील काळात ज्या ज्या वेळी, जाती जमातींचा विचार करण्याची वेळ येईल त्या त्या वेळी प्रस्तुत ग्रंथाची दखल घ्यावी लागेल. विशेषतः समाजामध्ये घडून येत असलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात या ग्रंथाचं महत्त्व विशेष मोलाचं मानावं लागेल व्यापक सामाजिक क्रांतिचा एक भाग म्हणून या ग्रंथाचा गौरवाने उल्लेख करावा लागेल.

मराठी साहित्यातील हा एक अतिशय महत्त्वाचा संदर्भ ग्रंथ आहे.

**डॉ. मा. प. मंगुडकर**

ISBN 81—7161—024—2